5349

Dhananjayarao Gadgil Library

GIPE-PUNE-005349

# रुपया

अर्थात्

## आनचें चलन.

लेखक व प्रकाशक,


वामन नारायण गोडबोले.

आणि

विनायक हरिहर घोरपडे.



मुद्रक—वासुदेव नारायण ठकार, श्रीसिद्धेश्वर छापखाना, कोल्हापूर.

चैत्र शुद्ध १ शके १८४४

सन १९२२ इसवी,

in marathi - 22/02/11

X61.2
F2
5349

# प्रस्तावना.

स्वार्थसाधनास अतिशय उपयोगीं अशीं जीं अनेक शास्त्रें आहेत, त्यांमध्यें 'अर्थशास्त्र' हें महत्वाचें आहे. या शास्त्राचा अभ्यास पाश्चात्य राष्ट्रांत फार बारकाईनें केला जातो; परंतु भारतवर्षांत या शास्त्राविषयीं ज्ञान अत्यल्प प्रमाणावर दिसून येतें व नवीन शोधाचा तर पूर्ण अभावच आहे. ही स्थिति बदलण्यास जीं अनेक साधनें आहेत, त्यांत वाङ्मय तयार करणें हें मुख्य आहे. आबालवृद्धांमध्यें अर्थशास्त्राच्या ज्ञानाचा प्रसार झाल्यांशिवाय योग्य मतें तयार होणार नाहींत व मतें तयार झाल्यावांचून आचरणावर परिणाम होणार नाहीं.

आर्थिक उन्नतीचा प्रश्न हा फावल्या वेळच्या घटपटादि वाक्पाटवाप्रमाणें नसून, माध्यान्हवेळच्या भोजनाचा अथवा 'भाकरी'चा प्रश्न आहे. हिंदुस्थानांतील लोकांची सरासरीची वार्षिक प्राप्ति अदमासें तीस रुपये आहे, ती निदान शंभर रुपये तरी झाल्याशिवाय जगाच्या स्पर्धेमध्यें टिकाव धरण्याचीही शक्ति आह्मास राहणार नाहीं याची जाणीव उत्पन्न व्हावी ह्मणून या विषयाचें सांगोपांग विवेचन करण्याकरितां, आह्मीं अर्थशास्त्राच्या अनेक शाखांवर लिहिण्याचें योजिलें आहे. इंग्लंडांतील युद्धपूर्व 'शिलिंग एडिशनप्रमाणें' या पुस्तकाची किंमत एक शिलिंग ह्मणजे बारा आणे ठेवण्याचा संकल्प होता; परंतु मुद्रणसाधनांच्या महर्घतेमुळें हा संकल्प मूर्तस्वरूप पावूं शकला नाहीं.

देशांतील व्यापारधंदा व इतर सर्व वस्तुविनिमय हीं चलनाच्या चांगले वाईटपणावर फार अवलंबून असतात. चलनपद्धति सदोष असल्यास, संपत्तीच्या उत्पादनावर व व्यापारावर अनिष्ट परिणाम होतो. हल्लींची पद्धति ही अशा तऱ्हेची म्हणजे सदोष आहे असें बहुतेक भारतीय अर्थशास्त्रज्ञांचें मत आहे. याकरितां ह्या पद्धतीची रचना काय आहे व इच्यांत कोणते दोष आहेत हें प्रस्तुत पुस्तकांत दाखविलें आहे. शिवाय गेल्या दोन चार वर्षांत सरकारनें 'उलट हुंड्या' विकल्यापासून व त्यामुळें उत्पन्न झालेल्या तीव्र वादापासून या विषयास विशेष महत्व आलें आहे. अशा हल्लींच्या जिज्ञासेच्या प्रसंगीं चलनाचें विवेचन लोक विशेष उत्सुकतेनें ग्रहण करतील अशा दृष्टीनें हा विषय प्रथम हातीं घेतला आहे.

यापुढें "बँकिंग", "अंतरराष्ट्रीय हुंडणावळ" [ Foreign Exchange ], "राष्ट्रांचा जमाखर्च व अंदाजपत्रकें" [ Public Fiance ] इत्यादि क्लिष्ट विषय सुगम करण्याचा विचार आहे. निव्वळ द्रव्यार्जनाकरितां हें पुस्तक लिहिलेलें नाहीं; तथापि द्रव्यार्जन झाल्यास, पुढील कार्य करण्यास जास्त उत्साह येईल हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. अलमतिविस्तरेण ।

बा० ना० गो०,
वि० ह० घो०.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| | | पृष्ठ. |
| प्रकरण १ लें—पूर्वेतिहास | .... .... .... .... | १ |
| प्रकरण २ रें—सुवर्णसंलग्नचलन. | .... .... .... | १३ |
| प्रकरण ३ रें—हिंदुस्थानांतील धातूंचें चलन-सोनें व रुपें. | | २३ |
| प्रकरण ४ थें—कायद्याचें चलन अथवा नोटा. | .... .... | ५० |
| प्रकरण ५ वें—कौन्सिलबिलें अथवा हुंड्या. | .... .... | ६८ |
| प्रकरण ६ वें—सुवर्णचलननिधि, नोटांचानिधि व खजिन्यांतील शिल्लक. | .... .... | ९[illegible] |
| प्रकरण ७ वें—पैसा व त्याचें कार्य आणि चलनाचीं तत्वें. | | १३३ |
| प्रकरण ८ वें—हिंदुस्थानांतील बँका व त्यांचें स्वरूप. | .... | १७३ |
| प्रकरण ९ वें—महायुद्धाच्या कालांतील फेरबदल. | .... | २०[illegible] |
| प्रकरण १० वें—गुणदोषविवेचन. | .... .... .... | २१८ |
| परिशिष्ट अ. | .... .... .... .... .... .... | १ |

# प्रकरण १ लें.

## पूर्वेतिहास.

हिंदुस्थानांत अति प्राचीन काळापासून सोन्याचें नाणें चालत होतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. १८३५सालीं रुपया हेंच फक्त कायदेशीर फेडीचें नाणें आहे असें कंपनीनें जाहीर केलें व सोन्याचें नाणें बाजारभावाप्रमाणें खजिन्यांत घेतलें जाईल असें आश्वासन दिलें. १८५३ सालीं लॉर्ड डलहौसी यांनीं सर्व सोन्याचीं नाणीं कंपनीचे मुलखांत बेकायदेशीर आहेत असें ठरविलें व रुपया हेंच फक्त चलनी नाणें मुकरर केलें. नंतर १८६४ सालीं हिंदुस्थान सरकारनें सोन्याचें नाणें येथें प्रचलित करण्याविषयीं स्टेट सेक्रेटरी यांस विनंति केली; परंतु ती अमान्य झाली; कारण एकचलनपद्धतीचा त्या वेळेस ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांवर पगडा बसलेला होता. १८६६ मध्यें एका कमिटीनें हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें हें फार लोकप्रिय आहे असें अहवालांत नमूद केलें व सोन्याचें नाणें प्रचलित करण्याची शिफारस केली. अनेक फडणिसांचीं मतेंही या सूचनेस अनुकूल होतीं; विशेषतः सर रिचर्ड टेंपल यांनीं या मताचा अतिशय जोरानें पुरस्कार केला होता. १८७६ सालीं इंग्लिश व्यापाऱ्यांनीं रुप्याचें

नाणें फक्त सरकारनें काढून खुली टांकसाळ बंद करण्याविषय लॉर्ड लिटन यांजकडे अर्ज केला; व त्यास अनुसरून १८७ मध्यें हिंदुस्थान सरकारनें स्टेट सेक्रेटरीकडे असें करण्याविषय मंजुरी मागितली. या खलित्यांत सोन्याचें नाणें प्रचलित कर ण्याचा आमचा उद्देश आहे असें स्पष्ट नमूद केलें होतें. कांह कारणाकरितां ही मंजुरी स्टेट सेक्रेटरी यांनी दिली नाही १८९२ मध्यें पुन्हां इंग्लिश व्यापाऱ्यांनी तीच हूल उठविली असें करण्यांत त्यांचा उद्देश असा होता की, रुपयाची किंम कृत्रिम रीतीनें १६ पेन्सांवर आणून या फायदेशीर भावानें आप रुपये इंग्लंडमध्यें पाठवावे. सरतेशेवटीं, भवति न भवति होऊन हर्शेल कमिटीच्या शिफारसीवरून हिंदुस्थान सरकारनें खुल टांकसाळ बंद केली. या कमिटीपुढें ज्यांच्या साक्षी झाल्य त्यांमध्यें हिंदुस्थानी मनुष्य एकच होता, ही गोष्ट लक्षांत ठेवण्य सारखी आहे.

१८९८ सालीं फौलर कमिटीनें या व यासारख्या दुसऱ्या स प्रश्नांचा उहापोह करून सोन्याचें चलन व सोन्याचें नाणें कर ण्याचें ठरविलें. सॉव्हरिन हें कायदेशीर चलन ठरवून त्यां रुपयाशीं प्रमाण १ : १५ असें निश्चित केलें; एक सुवर्णनि अस्तित्वांत आणला. १८९९ सालीं या सर्व गोष्टी कायद्यां अमलांत आणल्या. सरकारनें लवकरच एक सोन्याच्या नाण्य करितां टांकसाळ सुरू करण्याचें आश्वासन दिलें. ही गोष्ट अनि

वाटल्यावरून इंग्लंडांतील ट्रेझरींनें याविरुद्ध आक्षेप घेतले; व हिंदुस्थान सरकारास गम खावी लागली. तेव्हांपासून हें घोंगडें असेंच भिजत पडलें आहे.

१९१२ सालीं नामदार गोखले, सर विठ्ठलदास थाकरसी व इतर वरिष्ट कौंसिलचे सभासदांनीं टांकसाळींत सोन्याचें नाणें पाडण्याविषयीं व खुली टांकसाळ करण्याविषयीं ठराव पुढें आणला. परंतु पुन्हां ट्रेझरींनें आक्षेप घेतल्यामुळें स्टेट सेक्रेटरी यांनीं अशी युक्ति काढली की, दहा रुपयांचें नाणें काढलें ह्मणजे ट्रेझरीच्या संमतीची जरूर राहणार नाहीं. परंतु यानंतर लवकरच एक नवें कमिशन नेमलें गेलें व त्यानें हें सर्व प्रकरण फेंटाळून लावलें. सोन्याचें नाणें हें हिंदुस्थानास फायदेशीर होणार नाहीं असें या कमिशनचें मत होतें. अशा रीतीनें अनेक वेळां द्विर्बद्ध सुबद्ध झालेल्या सोन्याच्या नाण्याचा लोप होऊन आज मितीस रुप्याचें नाणें हें हिंदुस्थानांतील मुख्य नाणें होऊन बसलें आहे.

आतां ज्या कारणाकरितां १८९३ सालीं खुली टांकसाळ बंद केली त्या करणांचा विचार करणें अवश्य आहे. १८९३ च्या पूर्वीं रुप्याचें नाणें पाडण्याकरितां टांकसाळ खुली केली होती. कोणाही व्यक्तीस एक विवक्षित वजनाची चांदी देऊन रुपये पाडून घेण्याचा हक्क होता. १८० ग्रेन अथवा $\frac{११}{१२}$ तोळे चांदी दिली ह्मणजे एक रुपया मिळे. टांकसाळ खुली असल्यामुळें इंग्लंड किंवा इतर देशांतील व्यापारी यांना हिंदुस्थानांतील लोकांचें

नाणें फक्त सरकारनें काढून खुली टांकसाळ बंद करण्याविषयी लॉर्ड लिटन यांजकडे अर्ज केला; व त्यास अनुसरून १८७८ मध्यें हिंदुस्थान सरकारनें स्टेट सेक्रेटरीकडे असें करण्याविषयी मंजुरी मागितली. या खलित्यांत सोन्याचें नाणें प्रचलित करण्याचा आमचा उद्देश आहे असें स्पष्ट नमूद केलें होतें. कांही कारणाकरितां ही मंजुरी स्टेट सेक्रेटरी यांनी दिली नाही. १८९२ मध्यें पुन्हां इंग्लिश व्यापाऱ्यांनी तीच हूल उठविली. असें करण्यांत त्यांचा उद्देश असा होता की, रुपयाची किंमत कृत्रिम रीतीनें १६ पेन्सांवर आणून या फायदेशीर भावानें आपले रुपये इंग्लंडमध्यें पाठवावे. सरतेशेवटीं, भवति न भवति होऊन, हर्शेल कमिटीच्या शिफारसीवरून हिंदुस्थान सरकारनें खुली टांकसाळ बंद केली. या कमिटीपुढें ज्यांच्या साक्षी झाल्या त्यांमध्यें हिंदुस्थानी मनुष्य एकच होता, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

१८९८ सालीं फौलर कमिटीनें या व यासारख्या दुसऱ्या सर्व प्रश्नांचा ऊहापोह करून सोन्याचें चलन व सोन्याचें नाणें करण्याचें ठरविलें. सॉव्हरिन हें कायदेशीर चलन ठरवून त्याचें रुपयाशीं प्रमाण १ : १५ असें निश्चित केलें; एक सुवर्णनिधि अस्तित्वांत आणला. १८९९ सालीं या सर्व गोष्टी कायद्यानें अमलांत आणल्या. सरकारनें लवकरच एक सोन्याच्या नाण्याकरितां टांकसाळ सुरू करण्याचें आश्वासन दिलें. ही गोष्ट अनिष्ट

वाटल्यावरून इंग्लंडांतील ट्रेझरीनें याविरुद्ध आक्षेप घेतले; व हिंदुस्थान सरकारास गम खावी लागली. तेव्हांपासून हें घोंगडें असेंच भिजत पडलें आहे.

१९१२ सालीं नामदार गोखले, सर विठ्ठलदास थाकरसी व इतर वरिष्ट कौंसिलचे सभासदांनीं टांकसाळींत सोन्याचें नाणें पाडण्याविषयीं व खुली टांकसाळ करण्याविषयीं ठराव पुढें आणला. परंतु पुन्हां ट्रेझरीनें आक्षेप घेतल्यामुळें स्टेट सेक्रेटरी यांनीं अशी युक्ति काढली कीं, दहा रुपयांचें नाणें काढलें ह्मणजे ट्रेझरीच्या संमतीची जरूर राहणार नाहीं. परंतु यानंतर लवकरच एक नवें कमिशन नेमलें गेलें व त्यानें हें सर्व प्रकरण फेंटाळून लावलें. सोन्याचें नाणें हें हिंदुस्थानास फायदेशीर होणार नाहीं असें या कमिशनचें मत होतें. अशा रीतीनें अनेक वेळां द्विर्बद्ध सुबद्ध झालेल्या सोन्याच्या नाण्याचा लोप होऊन आज मितीस रुप्याचें नाणें हें हिंदुस्थानांतील मुख्य नाणें होऊन बसलें आहे.

आतां ज्या कारणाकरितां १८९३ सालीं खुली टांकसाळ बंद केली त्या करणांचा विचार करणें अवश्य आहे. १८९३ च्या पूर्वीं रुप्याचें नाणें पाडण्याकरितां टांकसाळ खुली केली होती. कोणाही व्यक्तीस एक विवक्षित वजनाची चांदी देऊन रुपये पाडून घेण्याचा हक्क होता. १८० ग्रेन अथवा ११/१२ तोळे चांदी दिली ह्मणजे एक रुपया मिळे. टांकसाळ खुली असल्यामुळें इंग्लंड किंवा इतर देशांतील व्यापारी यांना हिंदुस्थानांतील लोकांचें

काढलेल्या कर्जावर काय झाला हें आतां पाहिलें पाहिजे. हिंदुस्थानचा पुष्कळसा व्यापार सोन्याचें नाणें हें चलन असणाऱ्या देशांशीं आहे. त्यामुळें त्या देशांत एका पौंडास जो माल मिळत होता त्याची किंमत येथें १० रुपये ठेविली म्हणजे कार्यभाग होत असे. आतां त्याच मालाची किंमत १५ किंवा २० ठेवणें आवश्यक झालें; नाहींतर खर्च केलेला पौंड वसूल होणें शक्य नव्हतें. अशा रीतीनें आवश्यक अशा आयात मालाची किंमत दिवसेंदिवस वाढूं लागली. जो चाकू ६ आण्यास मिळत असे त्याची किंमत १२ आणे झाली. जी बायसिकल ९० रुपयांस मिळत असे तिची किंमत १७५–२०० पर्यंत झाली. याच्या उलट निर्यात मालाची किंमत स्वस्त झाली. परंतु या स्वस्ताईमुळेंच, बाहेरच्या व्यापाऱ्यांस येथें चहा, कापूस, गहूं, पोती, गळिताचीं धान्यें वगैरे माल घेणें फायदेशीर झालें. त्यामुळें ह्या व्यापारास तेजी येऊन अधिकाधिक माल बाहेर जाऊं लागला. त्यामुळें देशांत, धान्य पिकविण्याची प्रवृत्ति कमी होऊन वर लिहिलेल्या ‘व्यापारी मालाच्या’ उत्पादनाकडे जास्त लक्ष्य गेलें. यामुळें दिवसेंदिवस धान्य महाग होत चाललें. देशांतील एकंदर किंमती विशेष बदलल्या नाहींत; कारण रुपया हेंच नाणें येथें प्रचलित असल्यामुळें सोन्याशीं रुपयाचें प्रमाण जरी बदललें तरी त्याचा या देशांतील किंमतीवर कांहीं परिणाम झाला नाहीं. फक्त सोनें ही वस्तु रुपयांच्या तुलनेनें महाग झाली म्हणजे तोळाभर सोन्यास जास्त रुपये पडूं

लागले. तथापि धान्य व आयात माल हीं महाग होणें हें नुकसान काांहीं लहानसहान नव्हतें.

हिंदुस्थान सरकारास ( ह्मणजे पर्यायानें हिंदुस्थान देशास ) इंग्लंडमध्यें पौंडामध्यें जें देणें द्यावें लागतें त्याला 'होम चार्जेस' असें ह्मणतात. ही रक्कम रेलवे कालवे वगैरेकरितां काढलेलें जें कर्ज आहे त्याचें व्याज, सिव्हिलिअन लोकांचीं पेन्शनें व रजेंतील पगार, रेलवेकरितां 'स्टोअर्स' ह्मणजे वस्तु इत्यादिकांची बेरीज करून झालेली असते. आतां रुपे स्वस्त झाल्यामुळें व हुंडणावळ अनिश्चित झाल्यामुळें ही रक्कम पौंडांत देण्यास किती रुपये एकत्र करावे लागतील हें ठरवितां येईना; पूर्वीपेक्षां जास्त रुपये द्यावे लागतात एवढें मात्र निश्चित होतें. कोणत्याही देशांतील जमा-खर्चाच्या खर्ड्याचें आद्यतत्व असें आहे कीं, एखादी बाबत कमी खर्चाची असो अथवा जास्त खर्चाची असो, एखादी जमा जास्त असो वा कमी असो, परंतु तो आंकडा ठोकळ मानानें तरी निश्चित असला पाहिजे, नाहींतर अंदाज करणें अशक्य होईल, जो अंदाज दहा वीस कोटींनीं जास्त कमी होऊं शकतो तो अंदाज कसला!

हें दाखविण्याकरितां, आपण एक काल्पनिक उदाहरण घेऊं. कल्पना करा कीं, होम चार्जेस १ कोटि पौंड आहेत. पौंडाचें रुपयाशीं प्रमाण १:१० असल्यास आपणांस हिंदुस्थानांत १० कोटि रुपये एकत्र करावे लागतील. आतां, हें प्रमाण १:१८ झाल्यास १८ कोटि रुपये एकत्र करावे लागतील. १:१५ असें

प्रमाण झाल्यास १५ कोटि रुपये लागतील. अशा स्थितींत मार्च-मध्यें अंदाजपत्रकांत आपण १८ कोटींचा हिशोब केला व हुंडणावळ पुन्हां १:१५ झाली तर ३ कोटि शिल्लक राहील, व १:२५ झाल्यास ७ कोटींची तूट येईल. सप्टेंबरमध्यें ही तूट येईल असें कळल्यास एकदम ७ कोटी रुपये करांच्या योगानें उत्पन्न करणें अशक्य आहे. कारण एकदां कर ठरविल्यावर पुन्हां ते एक वर्षपर्यंत बदलतां येत नाहींत.

आतां, काल्पनिक उदाहरण सोडून एकदोन सालची वस्तुस्थिति आपण पाहूं. १८७२ सालीं होम चार्जेसची संख्या १३ दशलक्ष म्हणजे १ कोटि ३० लक्ष पौंड होती व त्या वेळच्या हुंडणावळीचा दर १ रुपया = १ शि० १०½ पेन्स असा होता. त्यामुळें होम चार्जेसकरितां अदमासें १४ कोटि रुपये द्यावे लागले. १८९२ सालीं दर १ रु० = १ शि० ३ पेन्स असा होता व होम चार्जेसचा आंकडा १ कोटि ६५ लक्ष पौंड होता. त्यावेळेस अदमासें २६½ कोटि रुपये द्यावे लागले; फक्त ३५ लक्ष पौंडांचा फरक असतांना रुपयांच्या संख्येंत १२½ कोटींचें अंतर पडलें. ही फुगलेली रक्कम फक्त रुप्याच्या स्वस्तपणामुळें हिंदुस्थानास द्यावी लागली. १८७२ सालच्या हुंडणावळीप्रमाणें हीच रक्कम १७ कोटि ५० लक्ष रुपये झाली असती. अशा रीतीनें कराचें मान शुक्लेंदुप्रमाणें वृद्धिगत होत चाललें. अशा अनेक आपत्तींमुळें रुप्याच्या अवनतीचा प्रश्न सोडविणें अपरिहार्य झालें.

याच वेळीं रुप्याचा प्रश्न युनायटेड स्टेट्स व लॅटिन युनियन यांनाही त्रासदायक होऊं लागला. रुप्याची किंमत होईल तितकी वर ठेवण्याकरितां युनायटेड स्टेट्सनें कायदे पास केले. या कायद्यान्वयें दरसाल एक कोटि तोळे रुपें सरकारनें खरेदी केलेंच पाहिजे असा नियम होऊन त्याप्रमाणें क्रम सुरू झाला. तथापि रुप्याच्या अवनतीस आळा बसला नाहीं. लॅटिन युनियननें सोनें व रुपें ह्या दोनही धातू चलनांत ठेवून द्विचलनपद्धति स्थापण्याचा अकटोविकट प्रयत्न केला; परंतु शेवटीं कंटाळून त्यांनेंही १८७३ सालीं रुप्याची खुली टांकसाळ बंद केली.

यानंतर, सर्व देशाच्या ऐकमत्यानें द्विचलनपद्धति सुरू करून रुप्याची उन्नति करण्याचा प्रयत्न सुरू झाला. हा प्रयत्न स्तुत्य होता व आमच्या मतें, सरतेशेवटीं याच मार्गाचा अवलंब सर्व जगास करावा लागेल. तथापि या प्रयत्नास अनेक विघ्नें येऊं लागलीं. सोन्याच्या नाण्याविषयीं युरोपांतील देशांत अधिक प्रीति उत्पन्न झाल्यामुळें रुप्याची उन्नति करण्यास पुष्कळ राष्ट्रें कबूल होईनात. १८७८ मध्यें आंतरराष्ट्रीय परिषद भरली होती त्यांत जर्मनी सामील झालें नाहीं. १८७३ मध्यें नॉर्वे व स्वीडन यांनीं सोन्याचें नाणें सुरू केलें व १८७६ मध्यें हॉलंडनें व १८९२ सालीं ऑस्ट्रियानें सोन्याचें नाणें सुरू केलें. हे सर्व देश द्विचलनपद्धतीचे कट्टे द्वेष्टे बनल्यामुळें १८९३ सालीं जी

चवथी आंतरराष्ट्रीय परिषद भरली, त्यामध्यें कांहीं निश्चित सिद्धांत न ठरतां शुष्क वाद माजला. अशा रीतीनें द्विचलन-पद्धतीसारखें अप्रतिम साधन सर्व राष्ट्रांनी आपल्या हातांनी गमविलें.

इतकें झाल्यावर, सोन्याचें नाणें सुरू करावें व रुप्याची खुली टांकसाळ बंद करावी असें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें व त्या-प्रमाणें स्टेट सेक्रेटरीकडे १८९३ च्या जानेवारींत त्यांनीं एक खलिता पाठविला. त्यामध्यें रुपयाची किंमत १८ पेन्स ठरवावी व हिंदुस्थानांत टांकसाळींत पौंड पाडून सुवर्णैकचलनपद्धति सुरू करावी असें आमचें स्पष्ट मत आहे असें त्यांनीं जाहीर केलें. मामुली पद्धतीप्रमाणें स्टेट सेक्रेटरी यांनीं लॉर्ड हर्शेल यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली. या कमिटीच्या सूचना पुढें लिहिल्याप्रमाणें होत्या :—रुप्याची खुली टांकसाळ बंद करावी; १ रु.=१६ पेन्स अशी अबाधित व कायदेशीर हुंडणावळ ठरवावी व सोन्याचें नाणें सुरू करावें. या सूचनांस दादाभाई नौरोजी यांनीं प्रतिरोध केला. नंतर १८९३ चा ८ वा ॲक्ट पास करून, त्याअन्वयें या सर्व सूचना अमलांत आणिल्या. टांकसाळ जरी बंद झाली तरी स्वतः रुपये पाडण्याचा हक्क सरकारनें आपल्याकडे राखून ठेविला.

लोकांनीं सॉव्हरिन किंवा सोनें दिलें असतां, त्यांना १ पौंड=१५ रुपये या प्रमाणानें रुपये मिळतील अशी हमी सरकारनें

घेतली. परंतु रुपये दिले असतां पौंड देण्यास मात्र सरकार या कायद्यानें बांधलें नव्हतें. अशा रीतीनें सोन्याचें नाणें प्रचलित झालें.

हुंडणावळीच्या फरकामुळें हिंदुस्थान सरकारची स्थिति अतिशय काळजी करण्यासारखी झाली होती. तथापि पुष्कळ तज्ज्ञांचें मत असें होतें कीं, रुप्याचें नाणें ठेवणें हेंच हिंदुस्थानास श्रेयस्कर आहे. या विरुद्ध मतांचें दिग्दर्शन करणें जरूर आहे. सर जेम्स वेस्टलंड ( कॉंपट्रोलर ) यांचें म्हणणें असें होतें कीः—

' होमचार्जेसशिवाय हिंदुस्थानास सोन्याशीं कांहींएक कर्तव्य नाहीं. जोंपर्यंत हे पैसे फेडण्याची व्यवस्था उत्तम रीतीनें केलेली आहे तोंपर्यंत आंतरव्यवहाराकरितां हिंदुस्थानास सोनें अनावश्यक आहे. युरोपियन नोकर व व्यापारी यांना इंग्लंडांत पैसे पाठविण्याचे असल्यामुळें त्यांनांच फक्त या प्रश्नाचें महत्व वाटतें, रुप्याचें नाणें हें किंमतीच्या दृष्टीनें जास्त स्थिर असल्यामुळें हेंच चालू ठेवावें. '

सर डेव्हिड बार्बर यांचे म्हणणें असें होतें कीं, ' सोन्याचें नाणें केल्यानें युरोपांत हिंदुस्थानांतील मालाला जी किंमत येईल ती अधिक होईल ही कल्पना भ्रामक आहे. आयात मालाची किंमत निर्यात मालानें फिटत असल्यामुळें, सोन्याच्या नाण्याशीं हिंदुस्थान देशाचें नफानुकसान ग्रथित झालेलें नाहीं. ' या मतांत पुष्कळ सत्य होतें, यांत संशय नाहीं. १८७८ मध्यें स्टेट सेक्रेटरी यांनीं

हिंदुस्थानांत जो खलिता पाठविला त्यांतही पैशाची कृत्रिम किंमत करणें अनिष्ट आहे व उत्तम चलन हें नेहमीं नैसर्गिक व स्वशक्ति-प्रेरित असें असावें असें स्पष्ट लिहिलें होतें.

हिंदुस्थानसरकारचें मत या सर्व मतांच्या विरुद्ध होतें. हुंड-णावळीच्या दरांच्या फरकामुळें बजेट करण्यांत होणारा घोंटाळा हें त्यांच्या मतें त्यावेळच्या पद्धतीच्या विरुद्ध अतिशय प्रबळ कारण होतें. रुप्याची किंमत स्थिर करून हुंडणावळीचा प्रश्न कायमचा सोडवून टाकावा असें त्यांना वाटलें. दूरवर विचार न करितां त्यांनीं तात्पुरत्या अडचणींकरितां पूर्वीचें चलन बदलून नवीन सुरू केलें, परंतु दैवगति अशी विचित्र आहे की, सोन्याचें नाणें करण्याचें १८९३ मध्यें ठरलें असतां व नंतर १८९९ त फौलर कमिटीनें हेंच तत्त्व जोरानें प्रतिपादन केलें असतां, हिंदु-स्थानांत अद्यापिही सोन्याचें चलन चालू नाहीं. हल्लींच्या पद्धतीस Gold Exchange Standard अथवा सुवर्णसंलग्नचलन असें म्हणतात. हें चलन कसें आहे, याची पद्धति काय, याचीं तत्त्वें काय हें आतां पाहिलें पाहिजे.

# प्रकरण २ रें.

## सुवर्णसंलग्नचलन.

### ( Gold Exchange standard. )

खुली टांकसाळ बंद केल्यानंतर व रुपयाचा भाव पौंडांत १६ पेन्स असा ठरविल्यानंतर, नवीन युगास सुरवात झाली. प्रथम रुपयाचा भाव इतका खाली होता कीं, कायद्यामध्यें रुपयाची किंमत १६ पेन्स असूनही खरोखरीच्या व्यवहारांत १२।१३ पेन्स होती व कधीं कधी १२ पेन्सांपेक्षांही खालीं जाई. प्रथम सरकारनें नवीन रुपये पाडण्याचें बंद करून, रुपयाची किंमत कृत्रिम रीतीनें वाढविण्याचा प्रयत्न केला. परंतु हुंडणावळ १६ पेन्सांवर येईना. हिंदुस्थान सरकारास आपण केलें हें बरोबर केलें किंवा नाहीं असा संशय येऊं लागला. खुली टांकसाळ बंद केल्यामुळें कांहीं व्यापारीही असंतुष्ट झाले. अशी स्थिति १८९८ पर्यंत चालली. त्या सालीं तीच पद्धति अमलांत आणण्याचें ठरून स्टेट सेक्रेटरी यांनीं पुन्हां सर्व धोरण व्यवस्थित स्वरूपांत आणण्याकरितां फौलर कमिटी नेमिली. १८९८ मध्यें सोन्याचें नाणें सरकार आपल्या करामध्यें घेत असे, परंतु लोकांच्या व्यवहारांत तें कायदेशीर नव्हतें. सोनें किंवा सॉव्हारीन दिल्यास रुपये मिळत.

त्यामुळें १:१५ या प्रमाणाच्या वर हुंडणावळ जात नसे. या कमिटीपुढें जीं मतें मांडलीं गेलीं त्यांत दोन पक्ष होते. एका पक्षाचें म्हणणें असें होतें कीं, पूर्वीचीच पद्धति उत्तम असून रुपयाला कृत्रिम किंमत देणें घातक आहे; असें केल्यानें प्रजेचें नुकसान होईल; कारण लोकांना जास्त किंमतीच्या रुपयांत कर द्यावे लागतील. हुंडणावळीच्या अस्थिरतेसंबंधानें या पक्षाचें म्हणणें असें होतें कीं, काटकसर करून व नवीन कर्ज पौंडांत न काढतां, रुपयांत काढून हा प्रश्न सोडवितां येईल. व्यापाऱ्यांचेंही मत या पक्षाच्या वतीनें होतें. कारण, रुपयाच्या अवनतीनें व्यापाराचा फायदा होता. इंग्लंडांत मालाला पौंड तितकेच मिळून त्याचे रुपये हिंदुस्थानांत जास्त मिळत. दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें होतें कीं, हुंडणावळ वारंवार बदलणें ही फार अनिष्ट गोष्ट आहे. तेवढ्यापुरता व्यापारास थोडा फायदा झाला तरी एकंदर व्यापारास अस्थिरतेनें प्रतिबंध होतो. शिवाय होम चार्जेसकरितां जास्त पैसे द्यावे लागतात त्यामुळें सरकारची त्रेधा होऊन लोकांसही करांचें प्रमाण जास्त द्यावें लागतें.

दोनही पक्षांचीं साधकबाधक प्रमाणें ऐकून व त्यांतील सार काढून अखेर फौलर कमिटीनें नवीन पद्धति अमलांत आणण्याच्या बाजूनें निकाल दिला. या कमिटीच्या सूचना पुढीलप्रमाणें होत्या :—सोन्याचें चलन अस्तित्वांत आणावें व सोन्याचें नाणेंही पाडावें; पौंड व रुपया यांमधील प्रमाण १:१५ असें निश्चित करावें;

सोन्याची खुली टांकसाळ असावी; रुप्याचें नाणें फक्त सरकारनें व्यापाराच्या स्थितीप्रमाणें पाडावें; रुप्याच्या नाण्यांत जो फायदा होईल तो बाजूला ठेवून त्याचा सुवर्णनिधि बनवावा.

या सूचनांस अनुसरून जे ॲक्ट पास झाले त्या वेळच्या भाषणांत फडणीस सर क्लिन्टन् डॉकिन्स यांनीं लवकरच हिंदुस्थानांत रॉयल मिंटची एक शाखा उघडली जाईल असें जाहीर केलें. (या शाखेचें अद्यापपर्यंत नामापि न श्रूयते!) ही शाखा उघडण्याच्या विरुद्ध 'ब्रिटिश ट्रेझरीनें' अनेक आक्षेप घेऊन गर्भावस्थेंतच या बालकास ख्रिस्तलोकास पाठवून दिलें. सरतेशेवटीं, हिंदुस्थान सरकारनें निराश होऊन १९०२ मध्यें या शाखेची कल्पना सोडून दिली. ह्या वादांत लॉर्ड कर्झन यांचें मत हिंदुस्थानास अनुकूल होतें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सोन्याची टांकसाळ जरी उघडली नाहीं, तरीही सरकारनें लेखी जाहिरनामा काढून सॉव्हारीन हें नाणें कायदेशीर फेडीचें चलन केलें. हे पौंड अर्थात्च इंग्लंडाहून व्यापाराच्या देवघेवींत यावयाचे. लोकांच्या व्यवहारांत पौंड जास्त देण्याकरितां सरकारनें खुद्द आपल्या खजिन्यांतून कॉंट्रॅक्टर लोकांस व स्वतःचे नोकरांस शक्य तेवढे पौंड देण्यास सुरवात केली. अशा रीतीनें सोनें व रुपें अशीं दोनही तऱ्हेचीं नाणीं सुरू झालीं.

यानंतर हिंदुस्थान सरकार हलके हलके फौलर कमिटीच्या सूचनांपासून च्युत होऊं लागलें. याचें विस्तृत विवेचन पुढें योग्य

ठिकाणीं येईल. या ठिकाणी फक्त इतकेंच सांगावयाचें की, सोन्याचें चलन वाढवण्याचा उद्देश हलके हलके मागें पडून सोन्याचें चलन शपथ घेण्यापुरतें अल्प प्रमाणांत राहिलें व मुख्य व्यवहारांत रुपये व चलनी नोटा हींच कायम राहिलीं. अर्थात् अशा चलनपद्धतीस 'सोन्याचें चलन' हा शब्द लावितां येईना; म्हणून त्यास सोन्याशी संलग्न चलन असें नांव देणें भाग पडलें.

या पद्धतीचें तत्त्व असें आहे की, खरोखरी चलनांत सोनें न ठेवितां, सोन्याच्या नाण्याशीं नेहमींच्या व्यवहारांतील चलनाचा संबंध जोडून द्यावयाचा; त्याचप्रमाणें ज्यावेळेस बाहेरच्या देशांतील कर्जे वारण्याकरितां सोन्याची जरूर भासेल त्यावेळेस एका केंद्र-स्थानीं—मग हें केंद्रस्थान देशाच्या बाहेर असलें तरी हरकत नाहीं—सर्व सोनें असतें त्याच्या आधारावर सर्व आंतरराष्ट्रीय व्यवहार करावयाचे. हिंदुस्थानांत प्रत्यक्ष व्यवहारांत रुपये हें चलन आहे. रुपये हें कायदेशीर फेडीचें चलन असल्यामुळें तें वाटेल त्या रकमेपर्यंत देतां येतें. रुपयांच्या आधारावर काढलेल्या चलनी नोटा हें व्यव-हारांतील दुसरें चलन होय. परंतु हें प्रतिनिधिभूत असल्यामुळें त्याची किंमत मुख्य चलनावर अवलंबून असते. सोनें व्यवहारांत फार थोडें असतें; म्हणजे असून नसून सारखेंच. रुपयाची किंमत ही कृत्रिम असून ती सोन्याचें नाणें जें पौंड त्यामध्यें दर्शविली जाते. रुपयाची त्यांतील धातूच्या दृष्टीनें किंमत कांहींही असो;

त्याची कायदेशीर किंमत ही पौंडाच्या १/१५ असते. रुपया म्हणजे १/१५ पौंड; मग त्यांतील रुप्याची किंमत ९ आणे असो किंवा ११ आणे असो किंवा १५ आणे असो. होमचार्जेसकरितां जें सोनें लागतें तें लंडनमध्यें कौन्सिलबिलें विकून व इतर रीतींनीं स्टेटसेक्रेटरीजवळ जो निधि जमलेला असेल त्यांतून देतात. याशिवाय दुष्काळामुळें किंवा अन्य कारणांनीं हिंदुस्थानांतील लोकांस युरोपांत सोन्याच्या नाण्यांत देणें असल्यास तेंही स्टेट-सेक्रेटरीवर " उलट कौन्सिलबिलें " विकून देतात. या उलट कौन्सिलबिलांचे पैसे तेथील दोन सुवर्णनिधींतून देतात. एवंच, प्रत्यक्ष चलनांत सोनें न ठेवितां आवश्यक असें सोन्याचें काम लंडन येथील केंद्रीभूत केलेल्या सुवर्णनिधीच्या द्वारें करतात. सर्व हिशोब अर्थात् सोन्याच्या नाण्यांत ठेविले जातात; कारण रुपया म्हणजे १/१५ पौंड असा अर्थ असल्यामुळें रुपयांत ठेविलेले हिशोब हे पर्यायानें पौंडांतच ठेविलेले आहेत हें स्पष्ट आहे.

या पद्धतीचें पूर्ण विवेचन पुढील चार प्रकरणांतील स्पष्टीकरण पूर्ण झाल्याशिवाय करितां येणार नाहीं. प्रस्तुत या पद्धतीमध्यें १८९८ पासून १९१४ पर्यंत जे गुणदोष दिसून आले त्यांचें निरीक्षण करण्याकरितां जें रॉयल कमिशन नेमलें, त्याच्या सूचनांचा विचार करणें आवश्यक आहे. हें कमिशन ' चेंबरलेन कमिशन ' या नांवानें प्रसिद्ध आहे. या कमिशननें एकंदर पुराव्याचा विचार करून असें ठरविलें कीं, हिंदुस्थानास सोन्याच्या चलनाची मुळींच

अपेक्षा नाहीं; सुवर्णसंलग्नचलन हेंच हिंदुस्थानांत जास्त फायदेशीर आहे. या कमिशनच्या मुख्य सूचना पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत.

( १ ) रुपयाची हुंडणावळ स्थिर ठेवणें हें फार महत्वाचें आहे. ( २ ) याकरितां अमलांत आणलेली घटना ही फौलर कमिटीच्या सूचनांचा अतिक्रम करते, पण यांत कांहीं वावगें नाहीं. ( ३ ) सोन्याचें नाणें चलनांत असणें हें इष्ट नाहीं व सोन्याची टांकसाळही नको आहे. ( ४ ) रुपये व नोटा हेंच चलन चालू ठेवावें; लोक मागतील तें चलन द्यावें, परंतु नोटा जास्त लोकप्रिय होतील असें करावें. ( ५ ) सोन्याचा निधि हुंडणावळीच्या कामास येईल इतका भरपूर असावा; याला मर्यादा असूं नये. ( ६ ) दोन्ही निधींत १॥ कोटि पौंड सोनें जमल्यानंतर सर्व निधीचा अर्धा हिस्सा सोन्यांत ठेवावा. ( ७ ) हिंदुस्थानांत सुवर्णचलननिधीमध्यें रुपये मुळींच ठेवूं नयेत. ( ८ ) सर्व निधि लंडन येथें ठेवावा. ( ९ ) वाटेल त्या वेळेस उलट कौन्सिलबिलें १ शि.—३ $\frac{२१}{३२}$ पेन्स या दरानें विकण्याची हिंदुस्थानसरकारनें हमी द्यावी. ( १० ) चलनी नोटांमध्यें २० कोटि नोटा, रुपये नसतांना सुद्धां सरकारच्या प्रॉमिसरी नोटांच्या आधारावर चलनांत आणाव्या; नंतर कांहीं कालानें सरकारजवळ असलेल्या नोटा व बाकी चलनांत असलेल्या नोटांचा $\frac{१}{३}$ भाग इतका रुपयांच्या आधारावर नसला तरी चालेल. चलनी नोटांच्या निधीमध्यें ज्या सिक्युरिटी

असतील त्या हिंदुस्थानांत व लंडनमध्यें व्याजीं लावाव्या. ( ११ ) मोटांचे रुपये देण्याच्या सोई जास्त कराव्या. ( १२ ) सरकारी वर्ष १ जानेवारीपासून सुरू करावें. सरकारनें शिलकींतून प्रेसिडेन्सी बँकांना पैसे देऊन, ती शिलक लोकांना उपयोगी होईल असें करावें. ( १३ ) शिल्लक लंडनमध्येंही पाठविणें इष्ट आहे. कारण त्यामुळें नवीन कर्ज काढण्याचें टाळतां येतें. ( १४ ) पुष्कळसें कर्ज हिंदुस्थानांतच काढावें. ( १५ ) कौन्सिलबिलें किती व कोणच्या दरानें विकावीं यासंबंधानें स्टेटसेक्रेटरीस निर्बंध असूं नये; तथापि व्यापाराच्या सोईकरितां वाटेल तितकीं बिलें विकणें हें अनिष्ट आहे. ( १६ ) लंडनमध्यें व्याजीं लावलेला हिंदुस्थानचा पैसा जाहीर रीतीनें उत्तम ठरलेल्या संस्थांस द्यावा व तो थोड्या मुदतींत परत घेतां येईल असा असावा. ( १७ ) 'इंडिया ऑफिसची फायनॅन्शियल कमिटी' चालू ठेवावी, बंद करूं नये. यांतील सभासद असे असावे.—एक सरकारी फायनॅन्शियल खात्यांतील; एक हिंदुस्थानांतील व्यापारी ( अनुभव असलेला; ) एक लंडनमधील व्यापारी ( अनुभव असलेला ); एकूण तीन असावे. ( १८ ) अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट दोन असावे व त्यांपैकीं एकास जमाखर्चाचें ज्ञान असावें. ( १९ ) स्टेट बँक असावी किंवा नसावी हें ठरविण्याकरितां लवकरच एक कमिटी नेमावी व तिच्या मदतीनें हा प्रश्न कायमचा सोडवून टाकावा.

यापैकीं पुष्कळ मुद्द्यांचें विशदीकरण पुढील चार प्रकरणांत होईलच. सध्यां महत्वाचा मुद्दा हा आहे कीं, चेंबरलेन कमिशननें सुवर्णसंलग्नचलन हेंच चांगलें आहे असें सिद्ध केलें व १८९८ पासून फौलर कमिटीच्या सूचनांविरुद्ध सरकारनें जें आचरण केलें होतें, त्यावर आपल्या संमतीचा शिक्का ठोकला. त्यामुळें, सोन्याचें नाणें बाजूलाच राहून हें मध्येंच उपस्थित झालें. पूर्वींचें रुप्याचें चलन गेलें व सोन्याचें झालें नाहीं. 'न हिंदुर्न यवनः' अशी चलनाची स्थिति झाली आहे.

अशा तऱ्हेचें चलन दुसऱ्या कोणत्या देशांत आहे व असेल तर तें कोणत्या प्रकारचें आहे हें आतां पाहूं. ऑस्ट्रिया-हंगेरीमध्यें मुख्य नाणें सोन्याचें असतें; तरीही, खरोखरी चलनांत सोनें फार थोडें असतें. बहुतेक व्यवहार नोटांमध्यें चालतो. ज्यावेळेस सोनें बाहेर पाठविण्याचा प्रसंग येतो, त्यावेळेस त्या देशांतील मुख्य बँक ही एका ठराविक भावानें सोनें देण्याची व्यवस्था करते. निर्यात मालापेक्षां आयात माल जास्त झाल्यामुळें, या देशाच्या विरुद्ध हुंडणावळ होते तेव्हां, ही बँक दुसऱ्या देशांत जें आपलें सोनें असतें त्याच्या आधारावर लोकांस हुंड्या देते व त्यामुळें लोकांचा कार्यभाग होतो. या कारणाकरितां ही बँक, आपल्या शिलकींत ५०।७५ लक्ष पौंडपर्यंत लंडन, बर्लिन येथील बँकांवर काढलेल्या हुंड्या ठेवून देते. रशिया देशांतही अशीच पद्धति

आहे. खुद्द रशियांत सोनें फार नसून जवळ जवळ अडीच कोटि पौंडाच्या किंमतीच्या हुंड्या (इंग्लंड, जर्मनी, इत्यादि देशांत पटणाऱ्या) रशियन बँक आपल्याजवळ ठेवते, व त्यांचा उपयोग आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याकरितां करिते. नॉर्वे, डेन्मार्क येथेंही अशीच पद्धति आहे. परंतु देशांत जरी सोनें विशेष नसलें, तरी टांकसाळ खुली असल्यामुळें, या सर्व देशांतील नाण्यांना हिंदुस्थानप्रमाणें किंमत दिलेली नाहीं. त्याची किंमत त्यांतील सोन्यावर अवलंबून असते. त्यामुळें, हिंदुस्थानच्या पद्धतींत व या पद्धतींत पूर्ण साम्य आहे असें ह्मणतां येणार नाहीं.

प्रो० कीन्स यांचें असें ह्मणणें आहे कीं, या सर्व देशांतील पद्धति व हिंदुस्थान देशांतील पद्धति यांमध्यें फरक एवढाच आहे कीं, त्या देशांनीं जे अर्धवट केलेलें आहे तेंच हिंदुस्थाननें पूर्णपणें व कायद्याच्या आधारानें केलेलें आहे. परंतु हें ह्मणणें चुकीचें आहे. कारण, वरील देशांत मुख्य चलन सोन्याचें असल्यामुळें जरी सोन्याचें नाणें व्यवहारांत नसलें, तरी टांकसाळ खुली असल्यामुळें, चलनास कृत्रिमता आलेली नसते.

१९०३ मध्यें फिलिपाईन बेटांत अशाच तऱ्हेची चलनपद्धति युनायटेड स्टेट्स्नें सुरू केली. चलनांत पिसो हें नाणें असून, त्याचा व डॉलरचा भाव नेहमींचा ठरवून जरूर त्या वेळेस अमेरिकेंत डॉलर मिळतील अशी हुंडणावळीची रचना केली. त्यामुळें

पिसोचा संबंध सोन्याशीं जडला गेला व त्यास स्थिरता आली. त्यानंतर मेक्सिको, सयाम, स्ट्रेट्स् सेटलमेंट्स या ठिकाणींही सुवर्ण-संलग्नपद्धति प्रचलित केली व त्यामुळें, या सर्व देशांचा फायदा झाला आहे असें प्रो० कीन्स यांचें म्हणणें आहे.* या लहानशा पुस्तकांत स्थलाभावामुळें या वादांत शिरणें शक्य नाही. येथे एवढेंच सांगितलें पाहिजे की, ही पद्धति हिंदुस्थानदेशास फायद्याची नाहीं व जरी असली तरी हल्लीं ज्या तत्त्वांवर तिची अंमलबजावणी चालली आहे, ती तत्त्वें तरी हिंदुस्थानच्या हितास घातक अशीं आहेत. याविषयीं विशेष विवेचन, शेवटच्या प्रकरणांत करणार आहों.

सुवर्णसंलग्नचलनांत, देशांतील नाण्याची स्थिति कृत्रिम होते हा मोठा दोष आहे. इंग्लंड इत्यादि देशांत, सोनें हें वाटेल तेव्हां टांकसाळींत नेऊन नाणें पाडून घेतां येतें. त्यामुळें सॉव्हरिन व त्यांतील सोनें यांच्या किंमतींत तफावत रहात नाहीं. जास्त नाणीं झाल्यास त्यांची किंमत कमी होऊन नाणीं अटविलीं जातात. कमी नाणीं असल्यास सोनें देऊन नाणें नवीन पाडतात. सुवर्ण-संलग्नचलनांत असें होत नाहीं. नाण्याची किंमत धातूच्या किंमतीपेक्षां जास्त असल्यामुळें तें अटविण्यांत नुकसान होतें; त्या-

* Keyne's Indian Currency and Finance Chapter II. या पद्धतीचें विस्तृत वर्णन Kemmerer—Modern Currency Reforms या पुस्तकांत केलेलें आहे.

मुळें, चलनाच्या आकारावर सरकारची सारखी नजर नसल्यास, चलन जास्त जास्त वाढून त्याची क्रयशक्ति कमी होऊन देशांत महामाई होऊं लागते. यामुळें दुसऱ्या अनेक आपत्ति उत्पन्न होतात. सुवर्णसंलग्नचलन हें संक्रमणावस्थेचें द्योतक असून, सोन्याचें चलन एकदम करणें कठीण असतें, म्हणून कांहीं दिवस हें चलन करणें इष्ट आहे. परंतु हें संक्रमणावस्थेचें चलन हिंदुस्थानांत आत्यंतिक होऊन बसलें आहे.

हें चलन चांगलें आहे अशी सरकारची खात्री झाली आहे, त्यामुळें नुकत्याच नेमिलेल्या 'स्मिथ करन्सी कमिटीला' ह्या चलनाविषयीं साधकबाधक प्रमाणें जमा करण्याचा अधिकार न देतां, फक्त रुपये महाग झाल्यामुळें उत्पन्न झालेल्या अडचणीस उपाय सुचविण्याचेंच काम तिच्याकडे सोपविलें होतें. वस्तुतः हिंदुस्थानांत सोन्याचें चलन स्थापणें इष्ट आहे, असें सर्व हिंदुस्थानांतील अर्थशास्त्रज्ञांचें मत असल्यामुळें, ह्या प्रश्नाचा पुनः मुळापासून विचार करणें अवश्य आहे. परंतु तसें न करतां, तात्पुरत्या युक्त्यांचा प्रयोग करून, हें चलन कायम ठेवण्याचा सरकारी अधिकाऱ्यांचा विचार आहे असें स्पष्ट दिसत आहे. यामुळें ही कृत्रिम पद्धति अतिशय घोटाळ्याची होत चालली असून, नैसर्गिक व उत्तम मानलेल्या अशा चलन पद्धतींचें एकही अंग इच्यामध्यें उत्क्रांत होत नाहीं.

हुंडणावळ स्थिर ठेवणें हें या पद्धतीचें हृद्गत असल्यामुळें, कोणत्याही नैसर्गिक कारणांनीं हुंडणावळ कायदेशीर प्रमाणाहून

भिन्न झाली म्हणजे अकटोविकट श्रम करून तिला पूर्वपदावर खेंचावी लागते. हें काम करण्याकरितां येथें रुप्याचा निधि व केंद्रस्थानीं सोन्याचा निधि ठेवावा लागतो. रुप्याचें नाणें कमी पडल्यास नवीन नाणें पाडावें लागतें; व हा उपाय पांचचार वर्षे चालू राहिल्यास नाण्याची रेलचेल होऊन जाते. सोन्याचा निधि कमी पडल्यास तो सारखा वाढवावा लागतो व त्यालाही मर्यादा रहात नाहीं. हा निधि वाढविण्याकरितां, सारखा निर्यात माल पाठवावा लागतो व त्याबद्दलची जमा निधींत गेल्यामुळें मुख्य देशास तीपासून कांहींच फायदा होत नाहीं.

नैसर्गिक कारणांनीं हुंडणावळ बदलल्यास त्या पद्धतीची कशी त्रेधा होते, याचें उत्तम दिग्दर्शन गेल्या सालीं झालें. रुपें महाग झाल्यामुळें १ रु.=२६ पेन्स अशी हुंडणावळ झाली. ही हुंडणावळ सरकारला इष्ट अशा स्थानीं आणण्याकरितां, ५० कोटी-पेक्षां अधिक रुपये किंमतीचें सोनें इंग्लंडांत दिलें गेलें तरीही हुंडणावळ स्थिर झाली नाहीं ती नाहींच. हिंदुस्थानास मात्र ३०।३५ कोटींस मुकावें लागलें. त्याचप्रमाणें १९०८ सालीं जवळ जवळ ४० कोटींचा निधि खलास झाला. त्यावेळेस मुष्किलीनें हुंडणावळ पूर्वस्थळावर आली. अशा रीतीचा या पद्धतीचा मुख्य दोष आहे.

या पद्धतीविषयीं तज्ज्ञ लोकांत मतभेद असल्यामुळें, ह्या प्रश्नाची पूर्ण शहानिशा करणें जरूर आहे. या कारणाकरितां रॉयल

कमिशन नेमणें हाच उत्तम मार्ग आहे. नुकत्याच नेमलेल्या करन्सी कमिटीस हा प्रश्न मुळापासून तपासून, हें चलन हिंदुस्थानास हितकर आहे किंवा नाहीं हें ठरविण्यास सांगितलें असतें तर सहजच काम झालें असतें. परंतु सरकारनें ह्या कमिटीस, फक्त रुपें महाग झाल्यामुळें उत्पन्न झालेल्या अडचणींचाच विचार करण्यास नियुक्त केलें होतें. त्यामुळें हा प्रश्न अद्यापि अनिश्चित राहिलेला आहे. अशी स्थिति असणें, आमच्या मतें अत्यंत अनिष्ट आहे. हिंदुस्थानांतील व्यापारी व अर्थशास्त्रज्ञ, हे सर्व–कांहीं अपवाद सोडून देऊन–सुवर्णसंलग्नचलनाच्या विरुद्ध आहेत. त्यांचें ठाम मत असें आहे कीं, सोन्याचें चलन हिंदुस्थानांत स्थापित झाल्याशिवाय हल्लींच्या अडचणी कमी होणार नाहींत. नवीन कौन्सिलांत या प्रश्नाची पूर्ण चर्चा झाली नाहीं; म्हणून पुन्हां एकदां या प्रश्नाचा आरंभापासून विचार करणें हें सरकारचें कर्तव्य आहे. विशेषतः महायुद्धांत ह्या चलनाच्या कृत्रिमपणामुळें अतिशय विघ्नें येऊन, हुंडणावळीचा दर कायम ठेवणें दुरापास्त झालें. एका वर्षी (१९२०–२१) तर हा दर कायम ठेवण्याच्या प्रयत्नांत जवळ जवळ ३५ कोटि रुपयांचा फडशा पडला. यामुळें या चलनपद्धतीविषयीं हिंदुस्थानांतील तज्ज्ञ लोकांत अविश्वास उत्पन्न झाला आहे. किंबहुना ही पद्धति सर्वथैव त्याज्य आहे असें बहुतेकांचें मत झालें आहे.

———

## प्रकरण ३ रें.

### हिंदुस्थानांतील चलनापैकीं धातूचें चलन — सोनें व रुपें.

फौलर कमिटीच्या सूचनांस अनुसरून १८९९ मध्यें सॉव्हरिन हें नाणें कायदेशीर फेडीचें चलन केलें व इंग्लंडांतून सॉव्हरिन येण्यास सुरवात झाली. १९०३ पासून १९१० पर्यंत सॉव्हरिन चलनांत आणण्याबद्दल विशेष जोराचे प्रयत्न कोणीही केले नाहींत. १९१० सालीं सर जेम्स मेस्टन यांनीं सोन्याचें नाणें चलनांत आणण्याचा आमचा पूर्ण निश्चय आहे असें जाहीर केलें. १९१२ मध्यें हिंदुस्थानाकरितां निराळें दहा रुपयांचें सोन्याचें नाणें करावें असें स्टेट सेक्रेटरी यांनीं ठरविलें; परंतु त्यासंबंधानें हिंदुस्थान सरकारनें कांहींच केलें नाही.

यूरोपांतील देशांची प्रवृत्ति अलीकडे अशी आहे कीं, खरोखरी चलनांत सोनें विशेष न ठेवतां, नोटांवर जास्त व्यवहार करावयाचा व सर्व सोनें एका बँकेंत शिलकीमध्यें ठेवावयाचें. जर्मनी व ऑस्ट्रिया-हंगेरी वगैरे देशांत याप्रमाणेंच करितात. किंबहुना हल्लीं इजिप्टशिवाय कोणत्याही देशांत खरोखरीचें चलन, सोन्याचें नाणें नाहीं. चलनांत सोनें ठेविल्यास, आंतरराष्ट्रीय देणें देण्याकरितां जेव्हां त्याची गरज पडते, त्यावेळेस तें हातास लागत नाही. तेव्हां शक्य तेवढें सोन्याचें नाणें एका केंद्रस्थानीं ठेवणें

हाच उत्तम पक्ष आहे असें पुष्कळ तज्ज्ञांचें मत आहे. रिकार्डो, मिल, गॉशन इत्यादि अर्थशास्त्रज्ञांनींही अशाच तत्त्वाचें प्रतिपादन आपल्या ग्रंथांत केलें आहे. वरील तत्त्वाचा अवलंब करून, हल्लीं सोन्याचें चलन ज्यांनीं अमलांत आणलेलें आहे, ते देश मुद्दां सोनें खरोखरी चलनांत कमी राहील अशी तजवीज योजतात. इंग्लंडमध्यें बहुतेक मोठे व्यवहार बँक ऑफ इंग्लंडच्या नोटा व चेक यांच्या आधारानें करतात. जर्मनीमध्येंही नोटा जास्त लोकप्रिय करण्याची गेलीं दहा–वीस वर्षें खटपट चालू आहे व ती सर्वांशीं यशस्वी झालेली आहे.

वरील अर्थशास्त्रज्ञांचा युक्तिवाद हिंदुस्थानांतील तज्ज्ञ लोकांस सम्मत आहे; परंतु त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, चलनामध्यें सोन्याचें नाणें विशेष प्रमाणावर नसलें तरी, मुख्य चलन सोन्याचें पाहिजे व खुली टांकसाळ पाहिजे. ह्मणजे हल्लीं जो पौंडांत नुसता हिशोब करितात व फक्त इंग्लंडमध्येंच पौंड मिळण्याची व्यवस्था असते ती पद्धति काढून टाकून, पौंड हे हिंदुस्थानांतच वाटेल त्यास वाटेल तेव्हां मिळाले पाहिजेत. असें झाल्याशिवाय सोन्याचें चलन आहे असें ह्मणणें ह्मणजे निव्वळ शब्दच्छल करणें होय.

सन १९०० मध्यें पौंड खरोखरीच्या चलनांत आणण्याचा सरकारनें प्रयत्न केला. नोटा दिल्या असतां, रुपयांऐवजीं पौंड

देण्याविषयीं सर्व 'करन्सी ऑफिसां'ना हुकूम दिला. कांहीं दिवसांनीं जिल्ह्यांतील ट्रेझरीऑफिसांनाही असें करण्याविषयीं परवानगी दिली. पोष्टांत मनीऑर्डरीचे पैसे देतांना पौंड देऊं लागले. प्रेसिडेन्सी बँकांनाही अशाच तऱ्हेच्या पद्धतीनें पौंड लोकप्रिय करण्याविषयीं सूचना दिल्या. १९०१ च्या मार्चमध्यें ६७½ लक्ष पौंड लोकांच्या हातांत खेळत होते. यांपैकीं कांहीं पौंड बाहेर देशांत निर्यात झाले व कांहीं लोकांनीं ते पुनः सरकारकडे नेऊन त्यांचे रुपये मागितले. या दुसऱ्या कारणामुळें सरकारनें हें धोरण बरेचसें बदललें. त्यावेळेपासून हल्लींपर्यंत सरकारचें धोरण पुढील प्रकारचें आहे. पौंड हे कायदेशीर फेडीचें चलन आहे. पौंड दिल्यास, रुपये देण्याबद्दल सरकारनें जाहिरनामा काढून हमी घेतली आहे. रुपये दिल्यास, पौंड देणें हें मात्र सरकारच्या इच्छेवर अवलंबून आहे. शक्य तितकें व सोईप्रमाणें सोन्याचें नाणें सरकार देतें; पण कायद्यानें सरकार बांधलेलें नाहीं.

१९०० मध्यें सोनें चलनांत आणण्याचा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. याचें कारण कित्येकांच्या मतें लोकांची पुष्कळ दिवसांची रुपये वापरण्याची संवय हें होय. हल्लींच्या काळीं सोन्याचें नाणें केल्यास तें कितपत लोकप्रिय होईल हें पाहूं. गेल्या दहा पंधरा वर्षांत पौंडांचें चलन कसें झालें आहे तें प्रथम दिलें पाहिजे.

| | सोन्याच्या संग्रहांत पडलेली भर. | पेपरकरन्सी रिझर्व व सरकारी खजिन्यांत भर | लोकांच्या हातांत गेलेल्या सोन्यांत भर. | लोकांचे हातांत गेलेल्या सोन्याच्या गटांत भर. | लोकांचे हातांत गेलेल्या सॉव्हरिनमध्यें भर. |
|---|---|---|---|---|---|
| १९०१- २ | ४,८३,४५ | –७५ | ४,८४,२० | ३,३९,१५ | १,४५,०५ |
| १९०२- ३ | ११.८२,३० | ४,३०,५० | ७,५१,८० | ४,२२,१० | ३,२९,७० |
| १९०३- ४ | १३,४४,४५ | १,४१,६० | १२,०१,८५ | ७,११,१५ | ४,९१,७० |
| १९०४- ५ | १६,२६,१५ | ५,७० | १३,२०,४५ | ८,७९,९० | ४,४०,५५ |
| १९०५- ६ | ४,०४,७० | –१०२६०० | १४,३०,७० | ८,७०,९० | ५,५९,८० |
| १९०६- ७ | १८,०९,१५ | २८ ९५ | १८,३८,१० | १०,६४,७० | ७,७३,४० |
| १९०७- ८ | २०,५१.५५ | १,४८,९५ | २२,००,५० | १०,८६,४५ | ११,१४,०५ |
| १९०८- ९ | ७,५३.३० | ४;२६,४५ | ११,७९,७५ | ६,६३,३० | ५,१६,४५ |
| १९०९-१० | २४,९३,०० | ९,५२,०५ | १५,४०,९५ | ११,११,०५ | ४,२९,९० |
| १९१०–११ | २६,२२,९५ | १०,६५ | २७,१२,३० | १४,९८,६५ | ११,१३,६५ |
| १९११-१२ | ४१,०१,७५ | १४०२०५ | २६,९९,७० | १३,६७,५५ | १३,३२,१५ |
| १९१२-१३ | ३६,८२,६५ | ६,३४,६५ | ३०,४८,०० | १३,९८,०० | १६,५०,०० |
| १९१३-१८ | २८,१५,०५ | ४,४७,४५ | २३,६७,६० | ... ... ... | ... ... ... |
| १९१४-१५ | ७,६३.९५ | –६,९२,१० | १४,५६,०५ | ... ... ... | ... ... ... |
| १९१५-१६ | –१,११,०० | –२,९३,७० | ४,०४,७० | ... ... ... | ... ... ... |
| १९१६-१७ | ४,१५,८० | – ४७,७० | ४,६३,५० | ... ... ... | ... ... ... |
| १९१७-१८ | २६,७०,०० | १४.७०,१५ | ११,९९,८५ | ... ... ... | ... ... ... |
| १९१८-१९ | –३,०४.७० | –९,४९,२० | १३,५३,९० | ... ... ... | ... ... ... |

हे सर्व आंकडे हजार वगळून दिले आहेत, म्हणजे प्रत्येकापुढें तीन शून्यें द्यावयाचीं. हे सर्व रुपये आहेत.

**कोष्टकांचें स्पष्टीकरणः**—कोष्टक १ हें कोष्टक २ + कोष्टक ३ यांची बेरीज करून आलेलें आहे. लोकांच्या हातांतील सोनें व खजिन्यांतील सोनें मिळून एकंदर पडलेली भर आहे. कोष्टक ४ व ५ हीं कोष्टक ३ चे विभाग आहेत. एकंदर लोकांच्या हातांत गेलेल्या सोन्याचे, सोन्याचा गट + सॉव्हरिन असे विभाग केलेले आहेत. दुसऱ्या कोष्टकांत – (उणें) अशी खूण आहे तिचा अर्थ असा कीं, खजिन्यांत सोनें जास्त न येतां, उलटें कमी झालें व तें देशाच्या बाहेर पाठविलें गेलें.

तिसऱ्या कोष्टकांत दिलेल्या आंकड्यांची सरासरी केली असतां असें दिसतें कीं, दरसाल अदमासें वीस कोटि रुपयांचें सोनें लोकांजवळ नवीन येतें. शेवटच्या कोष्टकांत लोकांच्या हातांत पौंड किती येतात हें दिलेलें आहे. या पौंडांपैकीं खरोखर चलनांत किती राहतात व दागिन्याकरितां किती आटवले जातात हें सांगतां येणें शक्य नाहीं. त्याप्रमाणें पुरून ठेविलेले किंवा बाजूला काढून ठेविलेले असें किती आहेत हेंही समजण्यास साधन नाहीं. कांहीं सॉव्हरिन दिसण्यास सुरेख असल्यामुळें, लोक ते तसेच भूषणांप्रमाणें वापरतात.

सॉव्हरिन आटविण्याचें कारण असें आहे कीं, थोडक्या प्रमाणांत सोनें लागल्यास, सॉव्हरिन आटविणें हेंच सगळ्यांत सोपें

असतें. त्याचप्रमाणें ज्यावेळेस हुंडणावळीचा भाव उन्हाळ्यांत फडक होतो ह्मणजे १ पौंडाची हुंडी मिळण्यास, १५ पेक्षां जास्त रुपये द्यावे लागतात, त्यावेळेस सरकारी खजिन्यांतून सॉव्हरिन घेणें हें फायद्दशीर होतें. या मार्गानें पुष्कळसे सॉव्हरिन चलनांतून नाहींसे होतात. इतकें असूनही पुष्कळसे पौंड चलनामध्यें आहेत; परंतु ते संचय करून सांठवून ठेविण्याकरितां वापरले जातात असें सरकारी अधिकाऱ्यांचें मत आहे.

आतां पौंड खरोखरी चलनांत आहेत किंवा नाहींत याविषयीं कांहीं प्रत्यक्ष पुरावा आहे किंवा काय हें पाहूं. १९०८ मध्यें पोष्टांत १ लक्ष पौंड आले. १९११ सालीं १३।१४ लक्ष पौंड पोष्टांत आले. त्याचप्रमाणें १९११ सालीं रेलवेवर १२ लक्ष सॉव्हरिन कंपन्यांना लोकांनीं दिले. १९०९ व १९१० मध्यें फारच थोडे पौंड पोस्ट व रेलवे यांच्या हातांत आले. यावरून १९०८ मध्यें ते वितळले गेले असा तर्क आहे. बंगाल, आसाम, मध्यप्रांत, ब्रह्मदेश या प्रांतांत पौंड विशेष चलनांत नाहींत. मद्रास व संयुक्तप्रांत येथें त्यांचा जास्त प्रचार आहे. पंजाबमध्यें पौंड फारच लोकप्रिय झालेले आहेत; परंतु त्यांपैकीं पुष्कळसे संचयामध्यें पडून राहतात असा अंदाज आहे. त्यामुळें हुंडणावळ हिंदुस्थानच्या विरुद्ध झाल्यास, यूरोपांत पाठविण्याकरितां त्यांचा उपयोग होईल असें समजूं नये. १९१२ मध्यें, अदमासें ४५ कोटि रुपयांचें सोनें (यापैकीं ३१ कोटि पौंड होते) हिंदुस्थानांत

आलें. याचें कारण असें होतें की, ऑस्ट्रेलियांतून व इजिप्ट-मधून पौंड येथें पाठविणें हें सोन्याचे गट पाठविण्यापेक्षां किंवा कौन्सिलबिलें खरेदी करण्यापेक्षां स्वस्त पडत होतें. या कारणामुळें इंग्लंडांतील व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानचें देणें देण्याकरितां या मार्गाचा अंगिकार केला; परंतु यावरून हिंदुस्थानांतील चलनांत हे सर्व पौंड गेले असें अनुमान करणें चुकीचें होईल. प्रो० कीन्सच्या मतानें हे पौंड चलनांत न जातां, लोकांनीं सोन्याच्या गटाप्रमाणें वापरले.

एकंदरीनें पाहतां, पौंड हे चलनांत राहण्यापेक्षां संचय करून ठेविले जातात असें १९१२ पर्यंतच्या अनुभवावरून दिसतें. पौंडांचें चलन जास्त वाढविण्याकरितां कांहीं लोकांनीं पुढील मार्ग सुचविले आहेत:—हिंदुस्थानांत टांकसाळ उघडणें, १० रुपयांचें सोन्याचें नाणें पाडणें व लोकांच्या इच्छेविरुद्ध प्रत्येक व्यवहारांत पौंड देणें. आतां टांकसाळ उघडल्यास, तेथें सोनें कोठून येईल तें पाहूं. ज्यांनीं सोनें मागविलें आहे, त्यांना तें नकोसें झाल्यास, ते नाणीं पाडून घेतील. कांहीं लोक नाणीं पाडण्यासाठीं इंग्लंडांतून सोनें मागवितील. हिंदुस्थानांतील सोन्याच्या खाणी आपलें सोनें टांकसाळीकडे पाठवितील. लोक आपले दागिने किंवा सोन्याचे गट हे नाणीं पाडण्याकरितां आणतील. यांपैकीं मुद्दाम इंग्लंडांतून सोनें मागविण्याचा संभव कमी आहे. कारण

इंग्लंडांतून पौंड मागविणें किंवा सोनें आणून येथें नाणें पाडणें यांत फायद्याच्या दृष्टीनें कांहींच फरक नाहीं. हें पाडलेलें नाणें लोकांस नकोसें झाल्यास, तें देऊन पुनः नोटा किंवा रुपये घेण्याचा अधिकार असल्यामुळें, सोनें चलनांत ठेवणें हें लोकांच्या इच्छेवर राहील दुष्काळांत लोकांनीं सोनें देऊन नाणीं घेतल्यास, शेवटीं तीं नाणीं आयात मालाचें देणें देण्याकरितां सरकारचे मार्फत परत इंग्लंडांत पाठवावीं लागतील.

अशा रीतीनें हिंदुस्थानांत टांकसाळ उघडल्यास विशेष फायदा होणार नाहीं हें सर्व खरें आहे; परंतु याचें कारण हल्लींची पद्धति आहे. हल्लींची पद्धति ह्मणजे सुवर्णसंलग्नचलन ठेविल्यास, येथें टांकसाळ काढून फायदा होणार नाहीं. कारण रुपये हें वाटेल त्या प्रमाणांत कायदेशीर चलन असल्यामुळें, पौंड देऊन लोक रुपये मागतात; परंतु पन्नास किंवा शंभर रुपयांच्यापेक्षां जास्त देणें असल्यास, सोनें किंवा सोन्याच्या नाण्यावर आधारभूत अशा नोटा दिल्याच पाहिजेत असा नियम केल्यास, वरील सर्व आपत्ति टळतील. टांकसाळ उघडल्याबरोबर हजारों तोळे सोनें बाहेर काढून लोक त्याचीं नाणीं घेतील. त्याचप्रमाणें हल्लीं पौंड सरकारकडे येण्याचा क्रम आहे तो बंद होऊन लोकांस पौंड वापरणें भागच पडेल.

दहा रुपयांचें सोन्याचें नाणें जास्त लोकप्रिय होईल; परंतु त्याच्या योगानें चलनांत आणखी घोंटाळा उत्पन्न होईल. हीं

नाणीं बाहेरच्या देशांत पाठविल्यास, त्यांची किंमत काय होईल हें निश्चित सांगतां येणार नाहीं. शिवाय सॉव्हरिन हा ब्रिटिश साम्राज्याच्या बाहेरही जास्त परिचित असल्यामुळें, तेंच नाणें हिंदुस्थानानें स्वीकारणें जास्त इष्ट आहे. लोकांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर पौंड लादल्यास, ते घेतांना लोक बटाव मागूं लागतील व रुपयांना त्यांच्या किंमतीपेक्षां जास्त भाव येईल व अशा रीतीनें सोन्याच्या नाण्याची अवनति होईल.

आतां चलनांत सोन्याचें नाणें ठेवण्याच्या विरुद्ध जे आक्षेप घेतलेले आहेत, त्यांचा विचार करूं. पहिला आक्षेप असा आहे कीं, चलनांत सोन्याचें नाणें ठेवणें हें खर्चाचें असून, यायोगानें कारण नसतांना कोट्यवधि रुपयांचें सोनें बिनव्याजीं अडकून राहतें. गेल्या दहा वर्षांत रुप्याच्या नाण्यापासून झालेला फायदा व नोटांच्या रिझर्व्हमधील सिक्यूरिटी यांचें व्याज मिळून एकंदर पंधरा कोटि रुपये जमले आहेत. हा सर्व फायदा सोन्याचें नाणें केल्यास नाहींसा होईल. यावर उत्तर असें आहे कीं, सोन्याचें नाणें व त्याच्या आधारावर काढलेल्या नोटा यांपासूनही हा फायदा होईलच. नोटांच्या रिझर्व्हमध्यें कांहीं सोन्याचें नाणें ठेवून बाकीचा रिझर्व्ह सिक्यूरिटींच्या रूपानें ठेवतां येईल. शिवाय कृत्रिम किंमतीच्या रुपयापासून झालेला फायदा हा कुचकामाचा आहे. चलनपद्धति दोषयुक्त ठेवून त्यापासून फायदा मोजण्यांत कोणता अर्थ आहे? सोन्याचें नाणें काढून रुपयांच्या नोटांचें

चलन कमी करणें हें चांगलें नाहीं. हें सर्व हल्लींची पद्धति कायम ठेवावयाची या गृहीतकृत्याप्रमाणें खरें आहे; परंतु सोन्याचें चलन असावें असें प्रतिपादन करणारे रुपयांच्या नोटांच्या ऐवजीं सोन्याच्या नाण्यावर आधारभूत अशा नोटा काढाव्या असें ह्मणतात. असें केल्यावर नोटांचें चलन कमी होईल असें ह्मणणें अगदींच हास्यास्पद आहे. कारण पांच पौंड, दहा पौंड, पन्नास पौंड अशा नोटांची व सोन्याच्या नाण्यांची स्पर्धा होणें मुळींच शक्य नाहीं.

आतां, सुवर्णसंलग्नचलन कायम ठेवून सोन्याचें नाणें अधिक केल्यास, सोनें व हल्लींच्या नोटा यांमध्यें स्पर्धा होईल हें खरें आहे. चलनांत सोनें जास्त झाल्यास, नोटा कमी होतील व त्यामुळें नोटांचा रिझर्व्हही कमी होईल. रुपये कमी झाल्यास, गोल्ड स्टँडर्ड रिझर्व कमी होईल. आतां हुंडणावळ हिंदुस्थानच्या विरुद्ध झाल्यास, यूरोपांत पैसे पाठविण्याकरितां जें सोनें लागेल, तें चलनांत असलेल्या नाण्याच्या रूपानें एकत्र करितां येईल किंवा नाहीं हा प्रश्न आहे. अशा प्रसंगीं बहुतकरून लोक सोन्याचें नाणें जवळ ठेवून सरकारी खजिन्यांत रुपये देतील असा जास्त संभव आहे. अशा वेळीं सरकारजवळचे दोनही सुवर्णनिधि अल्प असल्यास, बाहेरच्या देशांतील देणें भागविणें हें काम कठिण होईल. तेव्हां हें सोनें चलनांत न ठेवितां, एकत्र निधींच्या

रूपानें सरकारजवळ असणें श्रेयस्कर आहे; परंतु यावरून एवढेंच सिद्ध होतें कीं, हल्लींची पद्धति कायम ठेविल्यास, सोन्याचें नाणें जास्त प्रमाणावर चलनांत ठेवणें घातक आहे; परंतु इंग्लंडप्रमाणें सुवर्णैकचलनपद्धति अमलांत आणल्यास या ह्मणण्यांत मुळींच तथ्य राहत नाहीं.

दुसरा आक्षेप असा आहे कीं, सोन्याचें नाणें चलनांत आणिल्यास, एकंदर चलनपद्धति जास्त अस्थिर व संकटकालीं दगा देणारी अशी होईल. हल्लीं सरकारजवळ जे सुवर्णनिधि असतात, त्यांत पुष्कळ सोन्याचें नाणें असतें व तें संकटांत उपयोगी पडतें. आतां यांपैकीं पुष्कळसें नाणें लोकांच्या हातांत गेल्यास, तें जरूर लागेल तेव्हां सरकारी खजिन्यांत येणें हें शक्य आहे कीं काय! लॉर्ड गॉशन यांनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे, "लोकांच्या हातांत ४५ कोटि सॉव्हरिन असण्यापेक्षां, बँक ऑफ् इंग्लंडमध्यें तीस कोटि असलेले मी जास्त पसंत करतों." हेंच तत्त्व लावल्यास, या आक्षेपांत थोडें तथ्य आहे असें दिसून येईल. एकंदर चलनापैकीं फक्त $\frac{1}{2}$ सोन्याचें नाणें असेल तर संकटाचे वेळीं सरकारच्या हातांत त्यापैकीं चौथा हिस्साही येणें कठिण आहे. ह्मणून रुपये व पौंड हे दोनही चलनांत असल्यास, सोनें हें मुख्यत्वेंकरून सरकारी खजिन्यांतच असणें हें आवश्यक आहे.

या आक्षेपास उत्तर एवढेंच कीं, सोन्याचें चलन येथें करावयाचें नाहीं अशा कल्पनेवर रचलेला हा आक्षेप आहे. सर्वत्र नाणें

सोन्याचें केश्यावर मग त्याचा कांहीं भाग तरी सरकारी निधींत आलाच पाहिजे व तो हुंडणावळ प्रतिकूल झाली असतां वापरण्यास पुरेसा होईल. सुवर्णसंलग्नचलन चालू आहे तोंपर्यंत चलनांत सोन्याचें नाणें जास्त वाढविल्यास विशेष फायदा होणार नाहीं, हें आक्षेपकांचें ह्मणणें आह्मांस कबूल आहे. कारण अशा रीतीनें पौंड सर्व देशभर पसरले जाऊन हिंदुस्थानांत बँकिंगची पद्धति बाल्यावस्थेंत असल्यामुळें, ते एकत्र कोठेंतरी जमणें शक्य होणार नाहीं.

आतां सोन्याचें नाणें चलनांत येऊन त्याच्यायोगानें रुपये कमी झाल्यास काय होईल हें पाहिलें पाहिजे. पौंड चलनांत जास्त आल्यास, 'रिझर्व्ह'ला जास्त किंमत येईल. हल्लीं रिझर्व्हमध्यें बहुतेक रुपये असल्यानें व त्यांची किंमत कृत्रिम असल्यानें, परकीय देशांतील देणें देण्याच्या दृष्टीनें रिझर्व्ह कमकुवत राहतो. तोच रिझर्व्ह त्यापैकीं $\frac{3}{4}$ भाग पौंडांमध्यें असल्यास जास्त उपयोगी होईल. असें करण्याकरितांच पांच चार वर्षें पौंड चलनांत आणण्याचा सरकारनें प्रयत्न केला; परंतु त्याचा परिणाम असा दिसून आला कीं, रुप्याचें नाणें हें चलनांतून कमी न होतां, उलट आपल्या हातांत आलेले पौंड खजिन्यांत देऊन लोक रुपये घेऊं लागले. कांहीं ठिकाणीं पौंड हे चलनांत आले; परंतु त्यायोगानें नोटांचें चलन कमी झालें. पंजाबमध्यें पौंड चलनांत

आल्यापासून दहा रुपयांच्या नोटा कमी होऊं लागल्या. बंगालमध्यें नोटा पहिल्यापासून लोकप्रिय असल्यामुळें, पौंडाचें चलन जास्त वाढलें नाहीं. यावरून असें अनुमान निघतें कीं, पौंड व नोटा यांमध्यें विशेष स्पर्धा असते. एवंच पौंड चलनांत आणल्यास, रुपये बाजूला सारून त्यांचा उपयोग लोक करतील असें गेल्या वीस वर्षांच्या अनुभवावरून संभवनीय दिसत नाहीं.

हल्लींचीच पद्धति कायम ठेविल्यास, सोन्याच्या नाण्याच्या ऐवजीं नोटा चलनांत ठेवण्यांत एक फायदा आहे. तेजी व मंदी असे दोन मोसम प्रत्येक प्रांतांत असतात. अशा तेजीच्या मोसमांत चलन जास्त लागतें. हें चलन सोन्याचें नाणें केल्यास, चलन वाढविण्यास जास्त कठिण पडेल; परंतु नोटा या वाटेल तेव्हां खजिन्यांतील शिलकींतून लोकांस देतां येतात. ऑक्टोबरपासून डिसेंबरपर्यंत लोक सॉव्हरिन देऊन नोटा घेतात. नंतर जानेवारीपासून एप्रिलमध्यें त्याच नोटा मंदीच्या मोसमांत लोक परत करतात; परंतु नोटांच्या ऐवजीं पौंड लोकांनीं नेल्यास, ते परत येतील किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं. हे पौंड अटवून चलनांतून बाहेर गेल्यास, पुनः तेजीच्या मोसमांत नवीन नाणें पाडावें लागेल; परंतु नोटांना अशा प्रकारचें भय नसतें म्हणून जास्त पौंड चलनांत आणल्यानें विशेष प्रकारची अस्थिरता चलनांत उत्पन्न होते हें निर्विवाद आहे; परंतु या सर्वाला उपाय सोन्याचें चलन सुरू करणें हाच होय.

आतां पौंड करन्सीऑफिसमधून जातात केव्हां व येतात केव्हां व कोणत्या कारणाकरितां हें पाहूं. नोटा किंवा रुपये हे हिंदुस्थानांत पाठविण्याचे दोन मार्ग आहेत. एक कौन्सिलबिल इंग्लंडांत विकत घेऊन पाठविणें (प्रकरण ५ पहा.) किंवा कौन्सिलबिल महाग असल्यास, सॉव्हरिन पाठविणें. ज्या वेळेस कौन्सिलबिलांचा भाव तेजींत असतो, त्या वेळेस यूरोपांतील रिणको हिंदुस्थानांत सॉव्हरिन पाठवितात. नंतर हे खजिन्यांत येऊन लोक त्यांच्या मोबदला नोटा किंवा रुपये नेतात. त्याचप्रमाणें लोकांना चलनाकरितां किंवा संचयाकरितां सोनें पाहिजे असेल त्या वेळेस ते नोटा किंवा रुपये देऊन पौंड नेतात. अशा रीतीनें खजिन्यांतील पौंड कमी होतात. कधीं कधीं सोन्याचा भाव अधिक झाल्यास, रुपये देऊन पौंड घेणें व ते अटविणें हें फायदेशीर पडतें. अशा रीतीनेंही पुष्कळ प्रसंगीं पौंड खजिन्यांतून नाहीसे होतात. कॉंपट्रोलर जनरलच्या अहवालांवरून असें दिसतें कीं, तेजीच्या मोसमांत पुष्कळ पौंड बाहेर जातात व मंदीच्या मोसमांतही पुष्कळसे बाहेर जातात. तेजीच्या वेळेस चलनाची फार जरूर असते त्यामुळें हे पौंड चलन ह्मणून वापरीत असले पाहिजेत; परंतु उन्हाळ्यांत मंदीच्या वेळीं जे पौंड देतात, ते सोनें समजून वितळण्याकरितां लोक नेतात असें अनुमान आहे. कारण त्यावेळीं लंडनवरच्या हुंड्यांचा भाव कमी असतो ह्मणजे एक रुपया देऊन फक्त १६ पेन्स लंडनमध्यें मिळ-

तात. या रकमेचें सोनें घेऊन हिंदुस्थानांत पाठविल्यास, एक पौंड मिळविण्याकरितां १५ रुपयांपेक्षां जास्त खर्च येतो. हिंदुस्थानांत नक्की पंधरा रुपये दिले ह्मणजे एक पौंड मिळतो. अशा रीतीनें सरकारी खजिना ह्मणजे सोनें विकत घेण्याचें साधन होऊन बसतें ही गोष्ट अनिष्ट आहे. कारण पौंडांचा उपयोग या कामाकरितां करणें हें मूलहेतूचा विपर्यास करणें होय. अशा रीतीनें हल्लींच्या चलनपद्धतीचा फायदा घेऊन सोन्याचे व्यापारी सोनें स्वस्त देण्यास सरकारास भाग पाडतात.

सोनें रुपें यांचा संचय करण्यांत हिंदुस्थानांतील लोक आपली संपत्ति खर्च करितात असें युरोपियन ग्रंथकारांचें ह्मणणें आहे. सोनें चलनांत जास्त आणल्यानें, या प्रवृत्तीस आळा बसण्याऐवजीं उलट मदत होते. होईल तितकें सोनें व रुपें चलनांतून काढून शक्य तेवढा व्यवहार नोटांच्या सहाय्यानें करावा. हा विषय अतिशय क्लिष्ट असल्यामुळें, या स्थळीं त्याचें पूर्ण विवेचन करणें शक्य नाहीं. तथापि दोन तीन मुद्दे येथें देणें जरूर आहे. निर्यात माल आयात मालापेक्षां जास्त असल्यामुळें, हिंदुस्थान हा नेहमीं धनको देश असतो. 'होमचार्जेस'चे पैसे देऊनही तीस कोटि चाळीस कोटि रुपये हिंदुस्थानास घेणें असतात. हे रुपये सोन्याच्या रूपांत घेणें हा आमचा हक्क आहे व यासंबंधानें लोकांनीं तक्रार करणें हें अप्पलपोटेपणाचें आहे. आतां दागिन्यांऐवजीं इतर सुखोत्पादक वस्तूंत जास्त पैसे घातले असतां हितकर

आहे किंवा नाहीं हा नीतिशास्त्राचा व समाजशास्त्राचा प्रश्न आहे. शेतकी सुधारण्यांत, चांगलीं घरें बांधण्यांत लोक आपला पैसा खर्च करतील तर, तो जास्त श्रेयस्कर आहे; परंतु या सबबीवर आमच्या हक्काचें सोनें इंग्लंडमध्यें किंवा दुसऱ्या कोठेंही दाबून ठेवणें हें अन्यायाचें आहे.

त्याचप्रमाणें चलनांतही पुष्कळ सोनें असावें असें कोणाही हिंदुस्थानी अर्थशास्त्रज्ञाचें मत नाहीं. गोखले, थाकरसी, वेब वगैरेंनीं सोन्याचें चलन असावें एवढेंच मागितलें होतें. सोन्याचें चलन केल्यावर नोटा न वापरतां, फक्त पौंडावरच व्यवहार करावा व सोनें चलनांत अडकून ठेवावें असें त्यांचें ह्मणणें नव्हतें. फक्त या नोटा, हल्लींच्या रुपयांच्या नोटा नसून पौंडाच्या नोटा असाव्या. हिंदुस्थानांत बँकिंगची प्रगति झाल्यावर, आपोआप पौंडांची काटकसर करण्याची व्यवस्था होईल. इंग्लंडमध्यें जर ही काटकसर होते, मग हिंदुस्थानांत कां होऊं नये? हिंदुस्थानच्या लोकांची सोन्याचें नाणें संचय करून ठेवण्याची प्रवृत्ति आहे हें खरें आहे; तथापि ही संवय नाहींशीं करण्यास दुसरे मार्ग आहेत. त्याकरितां हल्लींची घेडगुजरी चलनपद्धति कायम ठेवणें हा उपाय नव्हे.

आतां रुपयांसंबंधीं विचार करूं. १८९३ मध्यें टांकसाळ बंद केल्यानंतर १९०० पर्यंत नवीन रुपये मुळींच पाडले नाहींत. १९०० पासून पुनः रुपये पाडण्यास सुरवात केली. १९०७ मध्यें हुंडणावळ विरुद्ध असल्यामुळें, पुष्कळ रुपये चलनांतून कमी झाले.

तेव्हांपासून १९१२ पर्यंत नवीन रुपये फारसे पाडले नाहींत. १९१२ नंतर पुनः रुपये पाडण्यास सुरुवात झाली. खालील कोष्टकांत कोणत्या सालीं किती रुपये पाडले हें दिलें आहे. यांत जुने रुपये पुनः पाडलेले वजा केले नाहींत.

( हे आंकडे लक्ष वगळून लिहिलेले आहेत. )

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८८० | ७,२२ | १८९२ | १०,४७ | १९०४ | १६,०२ |
| १८८१ | ५६ | १८२३ | ४,१४ | १९०५ | १२,७५ |
| १८८२ | ७,१५ | १८९४ | ३ | १९०६ | २६,३७ |
| १८८३ | २,३२ | १८९५ | २५ | १९०७ | ५,२२ |
| १८८४ | ४,८५ | १८९६ | मुळींच नाहीं | १९०८ | २,५६ |
| १८८५ | ९,९० | १८९७ | ४९ | १९०९ | २,०८ |
| १८८६ | ५,२० | १८२८ | ४२ | १९१० | ५८ |
| १८८७ | ८,८६ | १८९९ | १,३० | १९११ | ९४ |
| १८८८ | ७,०८ | १९०० | १६,९३ | १९१२ | १२,४२ |
| १८८९ | ७,४७ | १९०१ | ५,१३ | १९१३ | १६,३२ |
| १८९० | ११,७६ | १९०२ | ११,३९ | १९१४ | ४,८४ |
| १८९१ | ६,४६ | १९०३ | १६,५३ | | |

टांकसाळ बंद झाल्यापासून किती रुपये पाडावे हें सरकारच्या अंदाजावर अवलंबून असतें. हा अंदाज कसा करितात हें समजण्याकरितां लोकांना कोणत्या मार्गांनीं रुपये मागतां येतात हें पाहिलें पाहिजे. पहिला मार्ग ह्मणजे सॉव्हरिन आपल्याजवळ

असल्यास ते देऊन रुपये मागतां येतात व हे देण्यास सरकार कायद्यानें बांधलें गेलें आहे. दुसरा मार्ग नोटा देऊन रुपये घेणें. हेंही सक्तीचें असतें. ज्याअर्थी नोटांवर 'मी तुह्मांला देखत अमुक रुपये देईन' असें लिहिलें असतें, त्याअर्थी ते शब्द खरे करणें सरकारास भाग आहे; नाहीं तर नोटांवरील लोकांची श्रद्धा उडून जाईल. या कामाकरितां जे रुपये ठेवितात, ते नोटांचा रिझर्व्ह असतो त्यांत ठेवितात (प्रकरण ६ पहा.). तिसरा मार्ग ह्मणजे कौन्सिलबिल दाखवून रुपये मागतां येतात (प्रकरण ५ पहा). असे तीन प्रकार असल्यामुळें, रुपये किती पाडावे हें या तीनही प्रकारांच्या वस्तूंच्या संख्येवर अवलंबून आहे. सॉव्हरिन जास्त आल्यास व ते लोक खजिन्यांत किंवा टांकसाळींत आणतील असा संभव आल्यास, रुपये जास्त पाहिजेत व ते खजिन्यांत नसल्यास पाडले पाहिजेत. नोटा जास्त काढल्यास रुपयेही जास्त पाहिजेत (प्रकरण ४ पहा). त्याचप्रमाणें कौन्सिलबिलें जितक्या रुपयांचीं विकलीं, तितके रुपये हिंदुस्थानात तयार ठेविले पाहिजेत. अशा रीतीचा अंदाज करून, जितके रुपये पाडणें जरूर असतें, तितके रुपये सरकार पाडतें.

हिंदुस्थानांतील व्यवहार लहान लहान रकमेचे असल्यामुळें, रुपये हेंच मुख्य चलन असतें. मोठ्या रकमा देण्याकरितां मात्र नोटा किंवा पौंड यांचा उपयोग करितां येतो. त्यामुळें पुष्कळ वेळां लोकांस नोटा देऊन रुपये घेणें भाग पडतें. शिवाय अनेक प्रांतांत लोक आपल्या पिकांऐवजीं रुपयांशिवाय कांहीं घेत नाहींत

त्यामुळें त्यांना देण्याकरितां लाखों रुपये जमा करावे लागतात. वस्तुतः ही स्थिति शोचनीय आहे. अशा रीतीनें लोकांजवळ कोट्यवधि रुपये पडून राहतात व देशाचें नुकसान होतें; परंतु बँकिंगची प्रगति होईपर्यंत ही स्थिति अशीच राहणार. पुष्कळ लोक हजारों रुपयांचें देणें सुद्धां रुपयांत देतात. वस्तुतः ही चूक आहे. अशा व्यवहाराकरितां नोटाच वापरणें उत्तम आहे; परंतु लोकांमध्यें, मोठीं शहरें वगळलीं असतां, नोटांविषयीं विश्वास अद्याप उत्पन्न झाला नाहीं. तथापि हलकें हलकें कां होईना, नोटांची लोकप्रियता वाढत्या प्रमाणावर आहे यांत संशय नाहीं. हल्लींसुद्धां कित्येक जिल्ह्यांत खेड्यापाड्यांत सुद्धां लोक नोटा वापरतात असें दिसून येतें.

चलनांत रुपये किती आहेत याचा अंदाज करणें हें फार कठिण आहे तथापि पुष्कळ परिश्रम करून कांहीं अधिकाऱ्यांनीं अंदाज केलेला आहे तो पुढील कोष्टकांत दिलेला आहे. हे आंकडे कोटींचे आहेत.

| | मि० हॅरिसन याचा. | मि. ॲडी यांचा | मि० ॲटकिनसन यांचा. |
|---|---|---|---|
| १८८१–१८८५ | ११५ | १०९ | १२६ |
| १८८५–१८९० | १२० | १११ | १५० |
| १८२०–१८९५ | १२८ | १२८ | १७० |
| १८९५–१९०० | १२० | ११५ | १७८ |
| १९०१ .... .... | ...... | ...... | १८९ |

| साल | लोकांजवळ वर्षाचे आरंभी. | नवीन पाडलेले. | खजिन्यां-तून बाहेर आलेले. | देशाच्या बाहेर पाठविलेले | वर्षाच्या अखेरीस लोकांजवळ. | नोटा. | एकंदर चलन रुपये व नोटा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०० | १२०,०० | १३,६० | −४,६६§ | − ३५ | = १२८ ५९ | २३,७९ | १५२,३८ |
| १९०१ | १२८,५९ | २,० | −२,७२ | − १,४२ | = १२६,४९ | २४,२४ | १५०,७३ |
| १९०२ | १२६,४९ | ६० | − ५८ | − २,२३ | = १२४.२८ | २८,८७ | १५३,१५ |
| १९०३ | १२४ ५८ | ११,४२ | − ४५ | + ४० | = १३५,६५ | ३१,५४ | १६७,१९ |
| १९०४ | १३५,६५ | ६,८८ | + ५५ | − ६१ | = १४२,४७ | ३३,७३ | १७६,२० |
| १९०५ | १४२,४७ | १६.११ | −२,११ | − ७८ | = १५५.६९ | ३७,९० | १९३,५९ |
| १९०६ | १५५,६९ | २२.८८ | −४,८८ | − १,२८ | = १७२ ४१ | ४१,२० | २१३,६१ |
| १९०७ | १७२,४१ | १५,४८ | −११,५६ | − ४१ | = १७५,९२ | ३८,६५ | २१४,५७ |
| १९०८ | १७५,९२ | २ | −१४,९० | − २९ | = १६०,७५ | ३९,२३ | १९९,९८ |
| १९०९ | १६०,७५ | ८ | +१३,१४ | − १,३९ | = १७२,४२ | ४६,५१ | २१८,९३ |
| १९१० | १७२,४२ | − ४३ | + ३,७६ | − १,७२ | = १७४ ०४ | ४५,६८ | २१९,७२ |
| १९११ | १७४,०४ | − ७* | +११,६१ | − १,१३ | = १८४,८१ | ५३,२४ | २३७,६[illegible] |
| १९१२ | १८४,८१ | | | | | | |

या सर्व आंकड्यांवर पांच शून्यें द्यावीत.

* उणे याचा अर्थ टांकसाळींत किंवा खजिन्यांत परत आले.

§ याचा अर्थ खजिन्यांतून बाहेर न जातां परत सरकारजवळ आले.

आतां हे सर्वच रुपये हिंदुस्थानांत राहिले असें म्हणतां येत नाहीं. कांहीं रुपये अफगाणिस्थान, तिबेट, नेपाळ इत्यादि परकी मुलुखांत जातात. कांहीं अटविले जातात; तथापि त्यांची संख्या कळण्यास मार्ग नसल्यामुळें, हे आंकडे गृहीत धरूनच चाललें पाहिजे. वरील कोष्टकांत १९०० पासून १९१२ पर्यंत चलनांत रुपये किती आहेत याचा अंदाज दिला आहे.

या १८४ कोटींपैकीं नऊ कोटि अफगाणिस्थान इत्यादि देशांत गेले असें धरलें तर १९१२ मध्यें १७५ कोटि रुपये चलनांत होते असें सिद्ध होतें. १९०० मध्यें जितके रुपये चलनांत होते, त्यापेक्षां जवळ जवळ दीडपट रुपये १९१२ सालीं चलनांत होते.

हिंदुस्थान देश मोठा आहे हें लक्षांत ठेविलें तरीसुद्धां हें चलन इतर देशांच्या मानानें फारच आहे यांत शंका नाही. बँकिंगची पद्धति इंग्लंडच्या तऱ्हेवर येथें प्रस्थापित केल्यास, यापैकीं निम्में चलन वांचण्यासारखें आहे. विशेषतः चेक जास्त वापरले पाहिजेत व त्याकरितां प्रत्येक जिल्ह्यांत इंपीरियल बँकेची एक शाखा उघडली पाहिजे.

सोन्याचें नाणें केल्यास व एकचलनपद्धति स्वीकारल्यास असा नियम करावा लागेल कीं, पन्नास किंवा शंभर रुपयांवर कोणतेंही देणें देण्याचें असल्यास, तें सोन्याचें नाणें किंवा त्यावर आधारभूत अशा नोटा यांमध्येंच दिलें पाहिजे. असा नियम केल्यावर, रुपये फक्त मोड या नात्यानें वापरले जातील व चलनांत ५० कोटींच्यावर जास्त

रुपये असण्याची जरूर राहणार नाहीं. अशा रीतीनें हल्लींचा पुष्कळ घोटाळा कमी होईल. कमी किमतीचें नाणें वापरून जागा अडवून टाकणें व तासच्या तास रुपये मोजीत बसणें इत्यादि कंटाळवाणे व फुकट दिकाल यांचा अपव्यय करणारे प्रकारही नाहींसे होतील.

हल्लींच्या पद्धतींत रुपया हेंच मुख्य नाणें आहे असें ह्मटलें पाहिजे. कारण रुपये देऊन पौंड मिळणें हें ऐच्छिक असल्या-मुळें, रुपयाची पौंडांत अदलबदल होईल असा नियम नाहीं. पौंड दिला असतां मात्र रुपये मिळालेच पाहिजेत. शक्य तितका पौंड देण्याचा प्रयत्न सरकार करतें; परंतु पुष्कळ वेळां पौंड नस-ल्यामुळें सरकारास तसें करणें शक्य नसतें. संकटाचे वेळीं रुपये दिले असतां, पौंडामध्यें लिहिलेली लंडनवरची उलट हुंडी (Reverse Council) देण्यास सरकार नेहमीं तयार असतें. तथापि हें करण्यास सरकार कायद्यानें बांधलेलें नाहीं. अशा रीतीची रुपयाची कायदेशीर स्थिति आहे. रुपयाची किंमत पौंडांत १६ पेन्सांपेक्षां जास्त झाल्यास, पौंड आणून रुपये मागणें शक्य असतें. त्यामुळें १६ पेन्स ही हल्लींच्या पद्धतींत रुपयाच्या किंमतीची वरची मर्यादा आहे. त्याचप्रमाणें रुपयाची किंमत १६ पेन्सचे खालीं गेल्यास, सरकार एका रुपयास १५$\frac{२९}{३२}$ पेन्स देतें; त्यामुळें ही रुपयाच्या किंमतीची खालची मर्यादा आहे.

१८९३ पासून १९०६ पर्यंत पौंड किंवा पौंडांत जितकें सोनें असतें, तितकें दिल्यानें रुपये मिळत असत; परंतु १९०६ मध्यें सरकारनें एक जाहिरनामा काढला; त्याअन्वयें फक्त पौंड देऊनच रुपये मागतां येतात. अर्थात् हल्लीं कोणास रुपये पाहिजे असल्यास, त्यानें पौंड दिले पाहिजेत. या पद्धतीचा परिणाम असा होतो कीं, लोकांस रुपये पाहिजे असल्याशिवाय सरकार ते चलनांत आणूं शकत नाहीं. पुष्कळ लोकांची कल्पना अशी आहे कीं, सरकार टांकसाळींतून रुपये काढून लोकांवर लादतें; परंतु ही कल्पना अगदीं भ्रामक आहे. कोट्यवधि रुपये सरकारी खजिन्यांत असले तरी, कोणीं तरी नोटा किंवा पौंड आणून दिल्याशिवाय सरकारास रुपये बाहेर काढितां येत नाहींत. जरी एकंदर सुवर्णसंलग्नचलन कृत्रिम व स्वतःप्रेरणेनें चालणारें असें नाहीं तरी सुद्धां रुपये चलनांत आणण्याचें काम हें अगदीं यांत्रिक आहे. यामध्यें कोणत्याही अधिकाऱ्याच्या इच्छेवर किंवा लहरीवर कोणतीही गोष्ट अवलंबून नाहीं. दोष फक्त एवढाच आहे कीं, जास्त कौन्सिलबिलें विकून सरकार येथें जास्त रुपये चलनांत आणतें व त्यामुळें वस्तूंच्या किंमती अधिकाधिक होत जातात.

हल्लींच्या रुपयाची किंमत कृत्रिम आहे. याचें कारण असें आहे कीं, रुपयांतील रुप्याची बाजारभावाप्रमाणें किंमत १०।११ आणे इतकी असतें व कायद्यानें ठरविलेली किंमत १६ आणे आहे. यामुळें प्रत्येक रुपयामागें त्याचें नाणें हें स्वरूप कायम

झालें ह्मणजे ५।६ आणे फायदा होतो. या कृत्रिम किंमतीमुळें एक महत्वाचा फायदा झालेला आहे तो असा. रुपयाची किंमत त्यांतील धातूवर अवलंबून असती तर, त्याची किंमत दहा आणे झाल्यामुळें एकंदर किंमती अतिशय जास्त झाल्या असत्या; परंतु रुपयास कृत्रिम किंमत दिल्यामुळें ह्या किंमती तितक्या प्रमाणांत नियंत्रित झाल्या. तथापि रुपया हा सोन्याच्या नाण्याशीं संलग्न झाल्यामुळें, यूरोपांत जेव्हां जेव्हां किंमती चढतात, त्या वेळेस आमच्या देशांतही कारण नसतां किंमती चढतात. जर रुप्याचेंच नाणें हिंदुस्थानांत चालू असतें, तर ही दुसऱ्या प्रकारची आपत्ति आह्मांस सहन करावी लागली नसती. किंमतीचा प्रश्न अलाहिदा असल्यामुळें, त्यासंबंधीं या पुस्तकांत यापेक्षां जास्त विवेचन करणें शक्य नाहीं.



# प्रकरण ४ थें.

## कागदाचें चलन अथवा नोटा.

नोटांचा मुख्य उद्देश असा आहे की, मोठ्या रकमेचें देणें देण्याकरितां रुपये जागोजाग न हालवितां, सोईकर व हलक्या वजनाचें असें चलन अस्तित्वांत आणणें. कल्पना करा की, सरकारास एखाद्या नोकरास किंवा व्यापाऱ्यास १००० रुपये देणें आहे. हे रुपये एका सुरक्षित ठिकाणीं ठेवून सरकारनें त्याला नोट दिली. त्यानें ती नोट आपल्या एका धनकोस दिली; त्यानें ती कापूस खरेदी करून एखाद्या शेतकऱ्यास दिली व त्यानें ती जमिनीचा सारा देण्याऐवजीं फिरून सरकारजवळ दिली. आतां ती नोट परत आल्यामुळें, रुपये जागचे न हालतां सरकारचें देणें व सरकारचें येणें यांची रमारमी झाली. अशाच रीतीनें जास्त मनुष्यांच्या हातांत ती नोट खेळल्यास विशेष त्रास न होतां, सर्वांचा व्यवहार व्यवस्थित रीतीनें चालू शकतो.

परंतु हें सर्व निर्विघ्न पार पडण्यास, त्या नोटांबद्दल केव्हांही रुपये मिळूं शकतील असा सर्वांचा पूर्ण विश्वास पाहिजे. याच कारणाकरितां कागदी चलनास विश्वासजनित चलन असें सार्थ नांव दिलेलें आहे. सरकारी कायद्याप्रमाणें नोट हें कायदेशीर फेडीचें चलन आहे. म्हणजे कोणत्याही धनकोस नोट घेणें हें भाग

आहे. नोट न घेतल्यास त्याच्यावर पीनल कोडाप्रमाणें दावा करतां येईल; तथापि नोटींचें खरें रहस्य तिच्या मोबदला मिळणाऱ्या धातूच्या चलनावर अवलंबून आहे. याकरितां कोणतीही नोट दाखविल्याबरोबर तिचे पैसे रोख दर्शनी देणें हें सरकारचें कर्तव्य आहे. यासंबंधानें कायदा असा आहे कीं, ज्या करन्सी-ऑफिसमधून ती नोट निघाली, त्याच ऑफिसांत ह्मणजे इलाख्याचे ठिकाणीं त्या नोटीचे पैसे देण्यास सरकार बांधलें गेलें आहे. शक्य तितकें जिल्ह्याच्या खजिन्यांत रुपये देण्याचा प्रयत्न सरकार करतें; परंतु असें करण्यास तें बांधलेलें नाहीं. तथापि नोटांवर लोकांचा विश्वास बसावा अशी इच्छा असल्यास, प्रत्येक ठिकाणीं त्यांचा विनिमय होण्याची व्यवस्था केली पाहिजे.

१८३९ मध्यें नोटा काढण्याबद्दल मुंबई, मद्रास व कलकत्ता येथील 'प्रेसीडेन्सी बँकां'स सरकारनें परवानगी दिली. त्यानंतर १८६१ सालीं हा हक्क काढून घेऊन सरकारनें हें काम आपल्या हातांत घेतलें. त्यानंतर कोणत्याही खाजगी संस्थेस हा हक्क दिलेला नाहीं. १८६१ च्या कायद्याची ही रचना इंग्लंडांत १८४४ सालीं पास झालेल्या 'बँक चार्टर ॲक्ट'च्या धर्तीवर केलेली होती. त्यांतील मुख्य तत्व असें होतें कीं, व्यापारांत खेळण्यास अत्यावश्यक अशी जी नोटांची रकम आहे, तिच्या ऐवजीं रुपये न ठेवितां, सिक्युरिटी (सरकारी कर्जाचे रोखे) ठेवायाच्या व यापेक्षां जितक्या अधिक नोटा सरकार काढील,

तितक्याबद्दल रोख रुपये ठेवलेच पाहिजेत. प्रथम अत्यावश्यक नोटांची रकम ४ कोटि ठरविण्यांत आली. उदाहरणार्थ, १४ कोटींच्या नोटा काढल्यास ४ कोटींच्या सिक्यूरिटी व १० कोटि रोख रुपये सरकारी ऑफिसांत असले पाहिजेत.

प्रथम सर्व देशाचे कांहीं भाग पाडून, त्यांची 'सर्कल्स' केलीं. बंगाल-आसामकरितां कलकत्ता, संयुक्तप्रांताकरितां कानपूर, पंजाबकरितां लाहोर, मद्रास व कुर्गकरितां मद्रास, मुंबई इलाखा व मध्यप्रांत यांकरितां मुंबई, सिंधकरितां कराची अशीं सर्कल्स होतीं. एका सर्कलची नोट दुसऱ्या सर्कलमध्यें कायदेशीर चलन नसे व तिचे पैसेही दुसऱ्या सर्कलमध्यें मिळत नसत. नोटा ५, १०, २०, ५०, १००, ५००, १०००, १०००० अशा असत. हल्लीं २० रुपयांची नोट काढून टाकिली आहे. वरील संकुचित क्षेत्रामुळें, सर्व देशभर नोटांचा प्रचार होण्यास बाध होई. सरकार शक्य तेवढ्या दुसऱ्या सर्कलच्या नोटा घेऊन वाटेल त्या ऑफिसांत पैसे देई व पुष्कळ वेळां जिल्ह्याच्या खजिन्यांतही दुसऱ्या सर्कलच्या नोटांचे पैसे देत असत.

सर्कल्स करण्याचें कारण असें होतें कीं, कोणतीही नोट कोणत्याही करन्सी ऑफिसांत पटविण्याची परवानगी दिल्यास, सरकारची जबाबदारी वाढून, प्रत्येक ऑफिसांत कोट्यवधि रुपये ठेवावे लागतील. उदाहरणार्थ, मुंबईसर्कलमध्यें ३ कोटींच्या नोटा आहेत अशी कल्पना करूं व कानपूर सर्कलमध्येंही ३

कोटींच्या नोटा आहेत. आतां मुंबईच्या १$\frac{1}{2}$ कोटींच्या नोटा पोष्टानें संयुक्त प्रांतांत पाठविल्या व त्या तेथें पटविण्याची हमी घेतली तर, कानपूर येथें ४$\frac{1}{2}$ कोटि रुपये ठेवणें भाग आहे. त्याचप्रमाणें त्याच नोटा परत येऊन आणखी १$\frac{1}{2}$ कोटींच्या कानपूरच्या नोटा मुंबईस आल्यास, मुंबईसही ४$\frac{1}{2}$ कोटि ठेवणें भाग पडेल. सर्कलच्या पद्धतीप्रमाणें ३ कोटींच्यावर रुपये ठेवण्याची जरूर नाहीं. नोटा व्यवहारांत वापरण्याची सार्वत्रिक संवय झाल्याशिवाय, त्या एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत पाठविण्याची सवलत देणें म्हणजे सरकारची पत धोक्यांत घालण्याप्रमाणें आहे.

परंतु सर्कलच्या पद्धतीनें नोटा लोकप्रिय होऊन त्यांचा फैलाव सार्वत्रिक होण्यास प्रतिबंध होतो. १८९३ मध्यें नवीन चलन-पद्धति सुरू केल्यावर, नोटांचा प्रश्न महत्वाचा झाला. जर स्वस्त चलन खरोखरीच्या चलनांत ठेवणें हें सुवर्णसंलग्नचल-नाचें हृद्गत आहे, तर नोटांसारखें दुसरें स्वस्त चलन कोणतेंच नाहीं. नोटांची लोकप्रियता वाढण्यास सर्कलची पद्धति काढून टाकावी असें सरकारनें ठरविलें; परंतु सार्वत्रिक पटविण्याची हमी घेतल्यास, संकट येईल या भीतीमुळें १९०३ पर्यंत तसें करण्यास सरकार तयार झालें नाहीं. १९०३ मध्यें पांच रुपयांची नोट सार्वत्रिक केली म्हणजे तिचे पैसे कोणत्याही करन्सी ऑफिसांत मिळण्याची व्यवस्था केली. १९१० मध्यें १० रुपयांची नोट व ५० रुपयांची नोट या सार्वत्रिक केल्या. १९११ मध्यें १००

रुपयांची नोट सार्वत्रिक केली; परंतु याच वेळीं जास्त किंमतीच्या ह्मणजे पांचशे व त्यावरच्या नोटा सर्कलच्या बाहेर पोष्टांत किंवा सरकारांत घेतल्या जाणार नाहींत असा नियम केला.

या नोटा सार्वत्रिक केल्यामुळें, सरकारास कोणतीही अडचण पडली नाहीं. यावरून नोटांचे पैसे न मागतां, त्या चलनांत ठेवण्याची लोकांची प्रवृत्ति वाढली आहे असें दिसतें, तथापि प्रत्येक नोटीवर हलीं सर्कलचें नांव असतें तेंही काढून टाकून तिचें खरें स्वरूप जाहीर केल्यास जास्त चांगलें होईल. नोटांचे पैसे वाटेल तेव्हां मिळूं शकतात हा विश्वास नोटांचें चलन वाढविण्याची गुरुकिली आहे. पुढील कोष्टकांत १८९२ पासून आजपर्यंतचें नोटांचें चलन दिलेलें आहे.

| साल. | एकंदर. + | लोकांजवळ | साल. | एकंदर | लोकांजवळ |
|---|---|---|---|---|---|
| १८९२ | २७,१० | २२,३३ | १९११ | ५७,३७ | ४९,४९ |
| १८९३ | २८,२९ | २०,८३ | १९१२ | ६९,६२ | ४५,३१ |
| १८९९ | २७,९६ | २३ ६७ | १९१३ | ६८,९८ | ५१,२९ |
| १९०० | २८,८८ | २४,७३ | १९१४ | ६६,१२ | ५१,११ |
| १९०२ | ३३.७४ | २७,३५ | १९१५ | ९४,१० | ४५,०९ |
| १९०४ | ३९,२० | ३२,७६ | १९१६ | ७६.१० | ५४.११ |
| १९०६ | ४५ १४ | ३९,४१ | १९१७ | १०१,७० | ६७,९० |
| १९०८ | ४४,५२ | ३९,०२ | १९१८ | १०४,८० | ८२,१० |
| १९०९ | ४९,६६ | ४५,३९ | १९१९ | १९३,४६ | १३४,०० |
| १९१० | ५४,३५ | ४६,४८ | १९२० | १६४,०७ | ........ |

( हे आंकडे लक्षांचे आहेत. )

+ एकंदर चलनांतून सरकारी खजिन्यांत ज्या नोटा आहेत त्या वजा केल्या ह्मणजे 'लोकांजवळ' हा आंकडा निघतो.

यावरून १९०३ नंतर नोटांचें चलन कसें वाढत चाललें आहे हें दिसून येईल. या नोटांचे रुपये देण्याकरितां जे नियम आहेत, ते असे. १८९० पर्यंत सिक्यूरिटींची संख्या ६ कोटि ठरविलेली होती. १८९१ मध्यें ही मर्यादा ७ कोटींपर्यंत ढकलली; १८९२ मध्यें ८ कोटि झाली; १८९७ मध्यें १० कोटि झाली व १९०५ मध्यें १२ कोटि झाली. याचा अर्थ असा कीं, १२ कोटींपर्यंतच्या नोटा व्यापारास अत्यावश्यक असल्यामुळें, या नोटांचे पैसे कोणीही मागणार नाहीं; ह्मणून त्यांच्याऐवजीं रुपये ठेवण्याचें कारण नाहीं. १९११ मध्यें ही मर्यादा १४ कोटींपर्यंत नेली. या सिक्यूरिटींचें जें व्याज मिळतें, तें 'कागदी चलनाचा नफा' या सदराखालीं एकंदर जमेंत सामील केलें जातें.

१८९८ पर्यंत या मर्यादेपेक्षां अधिक ज्या नोटा होत्या, त्यांबद्दल रुपये ठेवीत असत. नंतर सोन्याचें चलन प्रचलित झाल्यामुळें कांहीं भाग पौंडांच्या रूपानें ठेवूं लागले. १९०० मध्यें यांपैकीं कांहीं भाग लंडनमध्यें ठेवण्याची परवानगी कायद्यानें दिली. १९०५ मध्यें हिंदुस्थान किंवा इंग्लंड यांपैकीं कोणत्याही स्थानीं हा निधि ठेवावा अशी कायद्यानें सवलत करून घेतली.

यांत नियंत्रण एवढेंच होतें की, रुपये हे फक्त हिंदुस्थानांतच ठेवावे. पुढील कोष्टकांत या निधीमध्यें सोनें किती होतें तें दिलें आहे.

| साल | हिंदुस्थानांत | इंग्लंडांत | साल | हिंदुस्थानांत | इंग्लंडांत |
|---|---|---|---|---|---|
| १९०० | ११,२५ | २,२५ | १९१० | ९,०० | ३,७५ |
| १९०१ | ९,०० | ० | १९११ | ९,०० | ७,५० |
| १९०२ | १०,५० | ० | १९१२ | २३,१३ | ८,५५ |
| १९०३ | १५,०० | ० | १९१३ | २०,३८ | ९,१५ |
| १९०४ | १६,५० | ० | १९१४ | २२,४४ | ९,१९ |
| १९०५ | १५,७५ | ० | १९१५ | ७,६४ | ७,१५ |
| १९०६ | ६,०० | १०,९० | १९१६ | १२,२४ | ११,९० |
| १९०७ | ९,२५ | १०,५० | १९१७ | १२, ० | ६,३७ |
| १९०८ | ३,७५ | ५,२९ | १९१८ | २६,८९ | ६७ |
| १९०९ | ० | २,२५ | १९१९ | १७,३७ | १२ |

पुढील कोष्टकावरून रुपये, सोनें व सिक्यूरिटी नोटांच्या निधींत कशा हेत्या हें समजेल. [ सर्व आंकडे लक्ष रुपयांचे आहेत. ]

| वर्षे | एकदर चलन | रुपये | सोनें हिंदुस्थानांत | सोनें इंग्लंडांत | सिक्यूरिटी |
|---|---|---|---|---|---|
| १८७१–१८८१ | ११,८२ | ५,९८ | ...... | ...... | ५,८४ |
| १८८१–१८९१ | १५,७४ | ९,६४ | ...... | ...... | ६,१० |
| १८९१–१९०१ | २७,२९ | १९,७४ | २,३२ | २३ | ९,०० |
| १९०१–१९११ | ४३,८२ | १९,४९ | ९,१५ | ४,०२ | ११,२० |
| १९१२ | ६१,३६ | १५,४८ | २३,३३ | ८,५९ | १४,०० |
| १९१३ | ६८,९८ | १६,४५ | २९,३८ | ९,१९ | १४,०० |
| १९१४ | ६६,१२ | २०,९३ | २२,४४ | ९,१५ | १४,०० |

यावरून १९०६ नंतर सोन्याचा निधि इंग्लंडांत जास्त प्रमाणांत ठेवूं लागले असें दिसून येईल. या निधींत सोनें जमण्याचें कारण असें कीं, पौंड देऊन रुपये किंवा नोटा नेण्याची परवानगी दिल्यामुळें, लोकांकडून आलेले पौंड या निधींत साचूं लागले. ७ कोटींच्या वर किंमतीचे पौंड या निधींत आल्याबरोबर ते चलनांत आणण्यास सरकारनें सुरुवात केली हें पूर्वीं सांगितलेंच आहे. हें धोरण हितकर नाहीं असें वाटल्यावरून, चलनांत पौंड ठेवण्याचा नाद सोडून देऊन, तें केंद्रीभूत करण्यास सुरुवात झाली. नवीन धोरणास अनुसरून पौंड इंग्लंडांत ठेवण्याचें निश्चित केलें व येथील बराचसा निधि इंग्लंडमध्यें नेला. हे पौंड बँक ऑफ् इंग्लंडमध्यें सेक्रेटरी ऑफ् स्टेटच्या नांवावर अलग ठेविलेले असतात.

१९०० पासून नोटांचें चलन जोरानें वाढूं लागलें. लोकांमध्यें नोटांविषयीं विश्वासही जास्त उत्पन्न झाल्यामुळें, इतकें सोनें व रुपये हें निधीमध्यें ठेवावें किंवा नाहीं हा प्रश्न उत्पन्न झाला आहे. चलनांत ५० कोटींच्या नोटा आहेत व यांपैकीं २५ कोटींपेक्षां जास्त नोटांचे रुपये कोणीही मागत नाहींत. असें असल्यास, निधीमध्यें २०।२५ कोटींचे पौंड व रुपये व्यर्थ बिनव्याजीं कां ठेवावे अशा तऱ्हेचा हा प्रश्न आहे. यासंबंधानें दोन मतें आहेत. एक मत असें आहे कीं, केव्हां कोण पैसे मागेल याचा नियम नसल्यामुळें, निधि धातूच्या रूपांत ठेवणें जरूर

आहे. कारण सिक्यूरिटी ठेविल्यास व वेळेस रुपये कमी पड-ल्यास बदनामी होण्याचा संभव आहे व एकदां लोकांचा नोटांवर अविश्वास झाल्यास, पुनः विश्वास उत्पन्न करणें दुरापास्त होईल.

दुसरें मत असें आहे कीं, व्यर्थ रुपये व पौंड सांचवून ठेवणें हें अनुत्पादक असल्यामुळें, जितक्या पैशाची जरूरी नाहीं तितके पैसे सिक्यूरिटींत घालून व्याजाचें उत्पन्न वाढवावें.

वास्तविक हा प्रश्न सोडविण्यास गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह व नो-टांचा निधि यांचा खरोखरी उपयोग काय आहे व त्यांचें हल्लींच्या पद्धतींत ह्मणजे सुवर्णसंलग्नचलनांत काय कार्य आहे हें प्रथम ठर-विलें पाहिजे. ह्या प्रश्नाचा (प्रकरण ६ पहा.) पुढें विस्तृत रीतीनें ऊहापोह केलेला आहे त्यामुळें या स्थळीं जास्त लिहीत नाहीं.

पूर्वीं नोटांचें चलन अतिशय थोड्या प्रमाणांत असल्यामुळें, नोटा पटविण्याकरितां रोख नाणें ठेवणें जरूर होतें. त्या वेळच्या स्थितीस अनुसरून नोटांचे सर्व कायदे केलेले आहेत. ते आज मितीस तसेच चालू ठेविले असतां देशाचें नुकसान होईल कीं काय हें पाहिलें पाहिजे. नोटा व रुपये यांसंबंधानें हिंदुस्थानांत युरोपांतील देशापेक्षां भिन्न स्थिति आहे. इतर देशांत तेजीच्या मोसमांत लोक नोटा जास्त मागतात व सर्व लोक नोटा खुषीनें घेतात त्यामुळें नाण्याची विशेष कोणी पर्वा करीत नाहीं. मुख्य बँकेचें काम या मोसमांत जास्त नोटा काढणें हेंच असतें. हिंदु-

स्थानांत मंदीच्या मोसमांत लोक नोटांचा संचय करून ठेवितात. कारण रुपये किंवा पौंड जवळ ठेवणें हें धोक्याचें व खर्चाचें असतें. तेजीच्या मोसमांत लोक नोटा घेण्यास खुषी नसतात. बहुतेक लोक रुपये मागतात. या कारणानें या मोसमांत एकंदर नोटांचें चलन जास्त होण्याऐवजीं कमीच होतें; ह्मणजे लोक नोटा पटवून रुपये जमा करूं लागतात. त्यामुळें या मोसमांत सरकारी खजिने व करन्सी ऑफिसें यांवर सारखा मारा चाललेला असतो. हे रुपये नंतर शेतकरी, लहान व्यापारी यांच्या हातांत येतात. यामुळें नोटांची लोकप्रियता जरी वाढली आहे, तरी सुद्धां नोटांपेक्षां रुपये जास्त पसंत करण्याची प्रवृत्ति कमी झालेली नाहीं. या कारणामुळें रुपये व पौंड यांच्या निधीचा आकार कमी करणें हें अनिष्ट आहे.

एक दोन वर्षांच्या आंकड्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होईल.

१९१०-११ मध्यें जूनपासून सप्टेंबरपर्यंत मंदीच्या मोसमांत लोकांजवळ अंदाजें ३७ कोटींच्या नोटा होत्या व सरकारी खजिन्यांत व सरकारी बँकांत मिळून (प्रेसीडेन्सी बँकांना सरकारी बँका या नांवानेंच आपण यापुढें संबोधन करूं.) अंदाजें २२ कोटींच्या नोटा होत्या व एकंदर चलन ५९ कोटि होतें. आतां तेजीच्या मोसमांत ह्मणजे जानेवारीपासून मार्चपर्यंत लोकांजवळ ४१ कोटि नोटा होत्या व सरकारी खजिन्यांत व सरकारी बँकांत १३ कोटि होत्या व एकंदर चलन ५४ कोटि होतें. सरकारी खजिन्यांतील

९ कोटि नोटा कमी झाल्या; परंतु लोकांजवळ फक्त ४ कोटीच वाढल्या. अर्थात् बाकीच्या ५ कोटि नोटा पेपरकरन्सीमध्यें देऊन लोकांनी रुपये घेतले. १९११–१२मध्यें मंदीच्या मोसमांत लोकांजवळ ३९ कोटि नोटा होत्या व खजिन्यांत व बँकांत २१ कोटि होत्या. नंतर तेजीच्या मोसमांत लोकांजवळ ४४ कोटि होत्या व खजिन्यांत व सरकारी बँकांत अदमासें ११ कोटि होत्या, म्हणजे एकंदर चलन ६० कोटींचें ५५ कोटि झालें. कारण ५ कोटींच्या नोटा करन्सीऑफिसांत पटविण्याकरितां गेल्या. वरील दोन वर्षांच्या अनुभवावरून तेजीच्या दिवसांत सरकारास ५ पासून ८ कोटि रुपये जवळ ठेविलेच पाहिजेत असें सिद्ध होतें.

परंतु या आंकड्यांवरून एवढें सिद्ध होतें की, व्यापाराच्या विस्तारसंकोचांत नोटांचें कांहींच कार्य नाहीं असें जें पुष्कळांस वाटतें, तें खोटें आहे. दिवसेंदिवस नोटा या जास्त परिचित होत चालल्या आहेत हें स्पष्ट आहे. वरील आंकड्यांत तेजीच्या मोसमांत दोनही वर्षीं ४।५ कोटींच्या नोटा चलनांत जास्त आल्या असें दिसेल. त्यामुळें कांहीं कालानें व्यापाराच्या गरजा व निर्यात अशा मालाची देवघेव यांकरितां लागणाऱ्या चलनांत नोटांचा अधिक अधिक उपयोग होईल असें मानण्यास जागा आहे. नोटांचें चलन जास्त वाढल्यास, रुपयांवरचा ताण कमी होईल व कालांतरानें रुपयांचें चलन कमी करण्यास सांपडेल.

गेल्या पांच वर्षांत चांदीचा भाव जास्त झाल्यामुळें जी आपत्ति आली, तिचा विचार केला असतांहि, नोटांचें चलन वाढविणें जास्त श्रेयस्कर आहे. रुपये पाडण्यास कोणत्याही कारणानें विघ्न आलें तर नोटांवर व्यवहार चालूं शकतो; परंतु असें होण्यास लोकांमध्यें कागदी चलन वापरण्याची पद्धति पूर्ण रूढ पाहिजे. नोटांचें चलन वाढल्यास आणखी एक फायदा होईल. हल्लीं असें दिसून येतें कीं, रुपयांच्या चलनांत अतिशय अस्थिरता आहे; ह्मणजे एका वेळीं कोट्यवधि रुपये चलनांतून कमी होतात व दुसऱ्या वेळीं कोट्यवधि रुपये चलनांत येतात. नोटा चलनांत आल्यास, नोटा देऊन रुपये घेणें व रुपये देऊन नोटा घेणें हा व्यवहार कमी होईल व त्यापासून एकंदर चलन जास्त स्थिर होईल.

येथील नोटांच्या चलनाचा एक मोठा दोष असा होता कीं, एखादी मध्यवर्ति स्टेट बँक नसल्यामुळें, बँकिंगचें मामुली काम करण्यास सरकारजवळ कांहीं साधन नव्हतें. 'ट्रेझरीज्' आहेत त्यांचें, पैसे रक्षण करण्याशिवाय दुसरें कांहीं काम नाहीं. फार झालें तर नोटांचे रुपये देणें व रुपयांच्या नोटा देणें हें काम त्या करितात; परंतु व्यापाराच्या तेजीच्या वेळीं ज्याप्रमाणें जर्मनींतील 'रीशबँक' जास्त नोटा काढूं शकते, त्याप्रमाणें येथें सरकारला देखील करतां येत नाहीं, आतां 'इंपीरियल बँक' निघाल्यामुळें हा दोष नाहींसा होईल अशी आशा करण्यास जागा आहे.

सरकारनें आजपर्यंत बँकिंग न केल्यामुळें असें होतें की, करांच्या रूपानें आलेले पैसे सरकारजवळ पडून राहतात व लोकांना चलनाची जरूर लागेल त्यावेळेस किंवा कर्ज लागेल त्या वेळेस हे पैसे लोकांना देण्याचा कांहींच मार्ग राहत नाही. ही शिलक शेवटीं इंग्लंडांत जाऊन पडते व तिकडील लोकांस मात्र आमचे पैसे सोप्या व्याजानें वापरण्यास मिळतात. वास्तविक पहातां ही शिलक आमची आह्मांस येथेंच परत मिळण्याची सोय होणें आवश्यक आहे. सरकारी बँकांच्या द्वारें सरकारचे कांहीं पैसे लोकांस परत मिळतात हें खरें; परंतु ही रक्कम अगदींच थोडी असल्यामुळें, सरकारी शिलकेचा लोकांचें चलन वाढवि- ण्याच्या कामांत कांहींच उपयोग होत नाहीं. अशा तऱ्हेच्या चलनास एकच उपाय आहे. तो हा कीं, सोन्याचें नाणें करून सोन्याच्या नाण्यावर आधारभूत अशा नोटा काढून इंग्लंडप्रमाणें 'चेक'ची पद्धति अमलांत आणणें.

हल्लींच्या नोटांच्या पद्धतींत नोटा वाढविण्याची कांही युक्ति नाहीं. चेक प्रचलित झाल्यास, जास्त चलन जेव्हां लागेल, तेव्हां चेक देतां येतात व चेकच्या योगानें देणें घेणें झाल्यानंतर हे चेक एकत्र करून, त्यांची रमारमी करून, ते फाडून टाकितात. आतां नवीन होणाऱ्या इंपीरियल बँकची एक शाखा प्रत्येक जि- ल्ह्यांत उघडून, चेकची पद्धति सुरू करावी. हल्लींच्या पद्धतींत जास्त रुपये किंवा नोटा पाहिजे असल्यास, एक तर कौन्सिलबिल पैदा केलें पाहिजे किंवा पौंड आणिले पाहिजेत.

परंतु या दोनही गोष्टी परदेशाशीं जो व्यापार आहे त्यावर अवलंबून असल्यामुळें, जिच्या सहाय्यानें जरूरीप्रमाणें चलन वाढवितां येईल अशी एखादी शक्ति हिंदुस्थानांत नाहीं. अर्थात् स्वतःच्या शक्तीनें चालणारें असें नोटांचें चलन नाहीं.

अशा तऱ्हेचा लवचिकपणा कागदी चलनांत आणणें हें नवीन निघालेल्या इंपीरियल बँकेचें एक महत्वाचें कर्तव्य आहे. यासंबंधानें कायद्यामध्यें थोडी दुरुस्ती करणें आवश्यक आहे. हल्लींच्या कायद्याप्रमाणें एका ठराविक मर्यादेपलीकडे, सरकारास लोकांनी धात्वात्मक चलन म्ह० पौंड किंवा रुपये आणून दिल्याशिवाय नोटा बाहेर काढतां येत नाहींत. नवीन कायद्यांत अशी सवलत ठेविली पाहिजे की, तेजीच्या मोसमांत रिझर्व्ह वगैरे नसतांही सरकारनें ५।६ कोटींपर्यंत नोटा चलनांत आणाव्या. नंतर एप्रिलमध्यें त्यांचें काम झाल्यावर त्या बाद कराव्या. नवीन स्टेट बँकेच्या कायद्यांत अशा तऱ्हेचें कलम घातलेलें नाहीं.

प्रो० कीन्स यांचें मत असें आहे कीं, एकंदर नोटांच्या चलनापैकीं $\frac{1}{3}$ निधि पौंड व रुपये या रूपांत असावा. २० कोटि रुपये सिक्यूरिटींच्या रूपांत असावे व बाकीच्यासंबंधीं कोणतेंही नियंत्रण असूं नये. सरकारनें वाटेल त्या रूपांत बाकीचा निधि ठेवावा किंवा त्याचा वाटेल तसा विनियोग करावा. हिंदुस्थानांत किंवा इंग्लंडांत तीन महिन्यांच्या मुदतीनें कर्ज देणें व तें पुनः वसूल करणें हा उत्तम मार्ग आहे.

या सर्व सूचना ग्राह्य आहेत; परंतु आमच्या मतें नोटांच्या निधीचा कांहीं भाग इंग्लंडांत ठेवणें चुकीचें आहे. नोटांचा सर्व निधि हिंदुस्थानांतच असला पाहिजे. नोटा जर हिंदुस्थानांत तर निधि इंग्लंडांत कां? हुंडणावळ हिंदुस्थानच्या विरुद्ध झाल्यास तेवढ्यापुरतें एक कर्ज लंडनमध्यें काढून 'उलट हुंड्या' विकाव्या; परंतु तेवढ्याकरितां नोटांचा निधि नेहमींच लंडनमध्यें ठेवणें हें अगदींच अस्थानीं आहे.

इंग्लंडमध्यें जो नोटांचा निधि असतो, त्याचा व्यय कसा होतो व त्याची रचना कशी असते याचा तपशील असा आहे. या निधीचा पुष्कळसा भाग हिंदुस्थानांत रुपये पाडण्याकरितां जें रुपें लागतें, तें खरेदी करण्याकडे खर्च होतो. हें रुपें हें निधीचाच भाग असें समजलें जातें. स्टेट सेक्रेटरीनें वाटल्यास सोनें किंवा सोन्याचें नाणें आपल्याजवळ ठेवावें किंवा तें नाणें हिंदुस्थानांत पाठवावें किंवा रुपें खरेदी करावें. हें रुपें अर्थातच हिंदुस्थानांत येऊन त्याचे रुपये पाडतात व ते येथील निधीमध्यें नंतर जमा करितात. पौंड किंवा रुपें इंग्लंडहून येथें प्रवास करितांना ह्मणजे आगबोटीवर असतांनाही तें निधीचा भाग आहे असें समजलें जातें.

स्टेट सेक्रेटरीनें व्यापाराच्या सोईकरितां कौन्सिलबिलें विकल्यास, त्याचे रुपये येथें द्यावे लागतात. हे रुपये खजिन्यांत नसल्यास किंवा तूट पडल्यास, नवीन रुपये न पाडतां, नोटांच्या

निधींतून रुपये देण्यास सांपडल्यास सोईचें असतें; परंतु पूर्वीच्या कायद्यानें या निधींतील रुपये, नोटा पटविण्याशिवाय दुसऱ्या कामाकरितां वापरतां येत नाहीत. ह्मणून १८९८ ॲक्ट २ हा कायदा पास करून असें ठरविलें की, स्टेट सेक्रेटरीनें नोटांच्या निधींत तिकडे सोनें अथवा सोन्याचें नाणें ठेविलें ह्मणजे तितक्याच किंमतीचे रुपये येथील निधींतून देण्यास हरकत नाहीं. इंग्लंडांतील नोटांचा निधि व येथील निधि यांची एकंदर बेरीज कायद्याप्रमाणें असली ह्मणजे झालें. उदाहरणार्थ, स्टेट सेक्रेटरीनें २५ कोटींचीं बिलें विकलीं व येथील खजिन्यांत १५ कोटीच रुपये असले तर बाकीचे १० कोटि येथील नोटांच्या निधींतून द्यावे; व त्याच्या मोबदला त्याच किंमतीचें ह्मणजे १० कोटींचें सोनें किंवा सोन्याचें नाणें इंग्लंडांतील नोटांच्या निधींत जमा करावें. येथें १० कोटि (−) उणे झालें व इंग्लंडांत १० कोटि (+) अधिक झाले व एकंदर बेरीज कायम राहिली. यावर हिंदुस्थानच्या दृष्टीनें आक्षेप असा आहे कीं, एकदां कौन्सिलबिलें जास्त विकण्याची चटक लागली ह्मणजे ती वाढत जाऊन हिंदुस्थानांतील निधि कमी होतो व इंग्लंडांतील निधि वाढत जातो. अशा रीतीची पद्धति ही दोषयुक्त आहे. व्यापारास मदत करणें हें स्टेट सेक्रेटरीचें काम नाहीं. लोकांस देणें असेल तर त्यांनीं एक्स्चेंज बँकांच्या द्वारें हिंदुस्थानांत पैसे पाठवावे. स्टेट सेक्रेटरीचा या कृत्याशीं अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं. सेक्रेटरीनें

फक्त 'होमचार्जेस' पुरतीं बिलें विकावीं. (याचें जास्त विवेचन प्रकरण ५ मध्यें केलें आहे.)

नोटांचा निधि लंडनमध्यें ठेवण्याविषयीं एक कारण सरकारतर्फे सांगण्यांत येतें. तें असें:—हा निधि नुसता नोटांच्या चलनाकरितां नसून सुवर्णसंलग्नचलनाप्रमाणें हुंडणावळ स्थिर राखण्याकरितां याचा उपयोग होतो. यावर उत्तर असें आहे कीं, हुंडणावळ स्थिर राखण्याकरितां 'गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह' हा निधि असल्यामुळें, या दुसऱ्या निधीची आवश्यकता नाहीं. आवश्यकता आहे असें धरून चाललें तरी, त्याला नोटांच्या चलनाचा निधि असें ह्मणणें हें निरर्थक आहे इंग्लंडांत असलेला निधि येथील नोटांचें संरक्षण कसें करणार? तो निधि खर्च करून रुपें घेतलें पाहिजे व तें हिंदुस्थानांत पाठवून टांकसाळींत त्याचे रुपये पाडले पाहिजेत. इतकें केल्यावर मग त्याचा येथें खऱ्या कार्याकडे उपयोग होणार. इतकें होईपर्यंत बराच कालावधि लागतो. त्यांतूनही ह्या निधींत सिक्यूरिटी आहेत त्यांचा तर संकटसमयीं मुळींच उपयोग होणार नाहीं. एकंदरीनें हें धोरण चुकीचें आहे असें ह्मणावें लागतें.

१९१४ मध्यें चेंबरलेन कमिशननें असा निकाल दिला कीं, हुंडणावळ स्थिर ठेवण्याकरितां गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह हा अपुरा आहे व या कारणाकरितां नोटांच्या निधीमधील सोनें इंग्लंडमध्यें ठेवणें आवश्यक आहे. कारण रुपये घेऊन सोन्यावर हुंड्या देण्याचा

प्रसंग आल्यास या सोन्याचा उपयोग लंडनमध्येंच जास्त होईल. गेल्या दहा वर्षांत 'गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह' अतिशय मोठा झाला असल्यामुळें, ह्या विधानांत विशेष तथ्य राहिलें नाहीं. सोन्याचें चलन केल्यास, हा सर्वच प्रश्न बाजूला राहील. आतां इंपीरियल बँक स्थापल्यामुळें नोटांच्या निधीचें स्थान बदलून सर्वच निधि हिंदुस्थानांत ठेवणें श्रेयस्कर झालेलें आहे.

नोटांचा निधि जर इंग्लंडमध्यें नेला नसता, तर त्यांतील रुपये व पौंड हिंदुस्थानांत कर्जाऊ देतां आले असते व त्यापासून हिंदुस्थानच्या व्यापारास फायदा झाला असता. हिंदुस्थानांत उन्हाळ्याच्या महिन्यांत पैशाची तूट पडते व व्याजाचा दर अतिशय कडक होतो. असें असतां येथील नोटांच्या निधीचे पैसे सिक्यूरिटींच्या रूपांत इंग्लंडांमध्यें अडकविणें हें हिंदुस्थानच्या हितास विघातक आहे. सर जेम्स मेस्टन यांनीं चेंबरलेन कमिशनपुढें साक्ष देतांना स्पष्ट म्हटलें आहे, "नोटांचा निधि हा विश्वासानें ठेविलेली ठेव (Trust fund) असल्यामुळें त्यांतील कोणताही भाग व्याजीं लावणें किंवा नोटा पटविण्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही कामीं त्याचा व्यय करणें हें अन्यायाचें आहे."

# प्रकरण ५ वें.

## कौन्सिलबिलें अथवा हुंड्या.

हिंदुस्थानसरकारास इंग्लंडांत पगार, पेनशनें, व्याज इत्यादि-करितां सोन्यांत जें देणें द्यावें लागतें, त्याला "होमचार्जेस" ह्मणतात. ही रकम हल्ली २८ पासून ३० कोटींपर्यंत असते. यांतून इंग्लंडांत नवीन काढलेलें कर्ज वजा दिलें ह्मणजे, अदमासें २५ कोटि रुपये इंग्लंडांत पाठविणें भाग आहे. या कारणा-करितां 'कौन्सिलबिलें' विकण्याची क्लृप्ति काढलेली आहे. कौन्सिलबिलें हीं स्टेट सेक्रेटरी विकतो व तीं बहुतकरून एक्स-चेंज बँका विकत घेतात. हीं बिलें (अथवा यांना आपण हुंड्या असें ह्मणूं.) कलकत्ता, मुंबई व मद्रास येथें दाखवून रुपये घेतां येतात. त्यांच्या मोबदला इंग्लंडांत स्टेट सेक्रेटरी यास पौंड मिळतात. अशा रीतीनें होमचार्जेस इकडून तिकडे पाठविण्याची व्यवस्था होते.

अशा रीतीनें सरकार हें मोठ्या प्रमाणावर बँकिंगचा धंदा करतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि यायोगानें मोठ्या बँकांशीं तें स्पर्धा करितें असें ह्मणतां येत नाहीं. कारण लोकांशीं प्रत्यक्ष व्यवहार सरकार करीत नाहीं. कौन्सिलबिलें नेहमी मोटाले हुंड्यांचे व्यापारी व एक्सचेंज बँका याच विकत घेतात. हिंदु-

स्थानांत रुपये मिळण्याचा हा महत्त्वाचा मार्ग असल्यामुळें, बँकांना हीं बिलें विकत घेणें फायद्याचें असतें. कारण त्यांच्या हिंदुस्थानांतील शाखेमध्यें रुपयांची भरती करणें जरूर असते व या हुंड्यांच्या योगानें तें काम सहज होतें.

या हुंड्या दर बुधवारीं टेंडरें मागवून विकतात. त्यावेळेस त्यांची संख्या जाहीर केली जाते. सगळ्यांत कमींत कमी किंमत दिलेली असते व त्याच्या खालीं हुंड्या मिळणार नाहींत असें ठरलेलें आहे. टेंडरांमध्यें १ रुपयास किती पेन्स देऊं हें विकत घेणारा नमूद करतो. नंतर लिलावाच्या पद्धतीप्रमाणें जास्त किंमत देणारास अगोदर, त्यानंतर सवडीप्रमाणें त्याच्यापेक्षां कमी किंमतीस मागणारास, याप्रमाणें एकंदर रकमेपर्यंत हुंड्या विकतात. एका आठवड्यांत मागणी पुष्कळ आल्यास, पुढच्या आठवड्यांत जास्त रुपयांच्या हुंड्या विकण्यास काढितात. मध्यंतरीं कोणास विशेष जरूर असल्यास, पूर्वींच्या बुधवारच्या दरापेक्षां $\frac{1}{32}$ पेन्स जास्त घेऊन, स्पेशल हुंड्या विकतात किंवा थोड्या कमी दरानें साध्या हुंड्या विकतात.

ज्यांना तावडतोब रुपयांची जरूर असते व हिंदुस्थानांत रुपये मिळेपर्यंत जो काळ जातो, त्याबद्दलचें व्याज बुडविण्याची इच्छा नसते; ते किंचित् अधिक भाव देऊन टेलेग्राफिक् ट्रॅन्स्फर अथवा टी. टी. (T. T.) विकत घेतात. असें केल्यानें इंग्लंडमध्यें पौंड

दिल्याबरोबर हिंदुस्थानांत रुपये मिळतात. या फायद्यामुळें स्टेट सेक्रेटरी टी. टी. बद्दल $\frac{1}{32}$ पेन्स जास्त चार्ज करितो. हिंदुस्थानांत व्याजाचा दर जास्त असल्यास, लोक टी. टी. पसंत करितात.

१९०९ पर्यंत होमचार्जेसच्या रकमेइतक्याच हुंड्या विकीत असत. कधीं कधीं हुंड्या कमी विकल्या जात. कारण कधी कधीं त्यांना मागणी कमी असे. १९०९ नंतर या हुंड्यांचें महत्व वाढलेलें आहे. सुवर्णसंलग्नचलनांत हुंडणावळ स्थिर ठेवणें हें एक प्रधानअंग आहे. हें करण्याकरितां इंग्लंडमध्यें पौंड दिल्यास हिंदुस्थानांत रुपये देणें हें आवश्यक आहे. असें न केल्यास, रुपयांची किंमत वाढून एक्सचेंज बँका वगैरे एका पौंडास बारा रुपये देऊं लागतील व ते घेणें भाग पडेल. शिवाय असें झाल्यानें सुवर्णसंलग्नचलन ढांसळून पडेल.

कौन्सिलबिलें न विकल्यास, व्यापारी व बँका हे पौंड हिंदुस्थानांत पाठवून तेथें ते करन्सी ऑफिसांत नेऊन रुपये मागतील व त्यामुळें सोनें हिंदुस्थानांत सरकारजवळ जमा होईल. हे रुपये खजिन्यांतून गेले म्हणजे पुनः रुपये पाडण्याकरितां रुपें लागतें व तें लंडनमध्यें खरेदी करावें लागतें. त्याकरितां हे पौंड पुनः इंग्लंडमध्यें पाठवावे लागतील दोन वेळां सोनें पाठविण्याचा खर्च फुकट जाऊन, हल्लीं हुंड्या विकून होणारा नफा मात्र नाहींसा

होईल. कारण हिंदुस्थानांत फक्त १५ रुपयांस १ पौंड मिळतो, परंतु हुंडी विकून १४ रु० १४ आण्यांस पौंड मिळतो.

ह्या आपत्तीस आमच्या मतें दोन उपाय आहेत. एक्सचेंज बँकांकडे पौंड आल्यास, त्यांनीं ते तसेच आपल्या गिऱ्हाइकांस द्यावे व त्यांनींही त्यांचा चलनांत उपयोग करावा. लोकांच्या जवळ पौंड आल्यास, ते सर्व पौंड खजिन्यांत देऊन, लोक रुपये मागतील हें नेहमीं गृहीत धरलें जातें; परंतु हें पुष्कळसें काल्पनिक आहे. सोन्याचें चलन लोकप्रिय करण्याची खटपट केल्यास, पुनः रुपये पाडण्याची आवश्यकता राहणार नाहीं. शिवाय रुपें खरेदी करण्यास लंडनच पाहिजे काय? हिंदुस्थानांत रुपें खरेदी करण्याची पद्धति पाडल्यास, येथेंही रुप्याचा बाजार सुरू होईल. अस्तु; या पद्धतीचे दोष दाखविण्यापूर्वीं ही पद्धति काय आहे हें समजून घेणें जास्त सोईचें होईल.

दुसरें हुंड्या विकण्याचें कारण असें आहे. नोटांच्या निधींत सोनें येथें जास्त झाल्यास, तें स्टेट सेक्रेटरीकडे पाठवावें लागेल. तेव्हां हुंड्या विकून इंग्लंडांतील नोटांच्या निधींत सोनें जमा करावें व हुंड्यांचे रुपये येथील नोटांच्या निधींतून द्यावे हें स्टेट सेक्रेटरीच्या धोरणाच्या दृष्टीनें जास्त हितावह आहे. असें करण्यानें आपोआप स्टेट सेक्रेटरीचा नोटांचा निधि वाढत जातो व तो हुंडणावळ स्थिर ठेवण्यास त्याला उपयोगांत आणतां येतो. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत खजिन्यांत जास्त शिल्लक जमल्यास, होम-

चार्जेसकरितां जरी हुंड्यांची जरूर नसली, तरी ती शिल्लक इंग्लंडांत नेण्यास हुंड्यांच्या योगानें मदत होते. उदाहरणार्थ, येथें दीड कोटि रुपये फालतू असल्यास, दीड कोटीच्या हुंड्या विकल्या ह्मणजे त्यांच्या ऐवजीं हे रुपये दिले ह्मणजे स्टेट सेक्रेटरीची शिलक दहा लक्ष पौंडांनीं इंग्लंडांत वाढते.

सारांश, हिंदुस्थानांतील शिलक कोणत्याही कारणांनीं जास्त असल्यास व ती इंग्लंडांत नेण्याची असल्यास, हुंड्या हें उत्तम साधन आहे. ही शिलक वाढल्यानें, इंग्लंडांत कर्ज काढण्यास अनुकूल संधि सांपडली ह्मणजे स्टेट सेक्रेटरीस त्या संधीचा फायदा घेतां येतो. या सर्व कारणामुळें हुंड्या न विकणें ह्मणजे हिंदुस्थानांत बेफायदा शिलक जमा करणें होय. जर इंग्लंडांतील लोकांस हिंदुस्थानांत पैसे पाठविणें जरूर असेल व जर चांगली किंमत देण्यास ते तयार असतील, तर हुंड्या न विकल्यानें हुंडणावळीचा भाव इतका वाढेल कीं, हिंदुस्थानांत पौंड पाठविणें स्वस्त पडेल व येथें पौंड आले ह्मणजे पुनः वर सांगितलेली आपत्ति उत्पन्न होईल.

इंग्लंडहून हिंदुस्थानांत सोनें पाठविण्यास रुपयामागें $\frac{1}{8}$ पेन्स खर्च येतो; त्यामुळें जर स्टेट सेक्रेटरी हुंडीचा भाव १६ $\frac{1}{8}$ पेन्सपेक्षां जास्त ठेवील, तर हुंडी विकत घेण्यापेक्षां पौंड पाठविणें जास्त स्वस्तें होईल. यामुळें हुंडीच्या भावाची वरची मर्यादा १६ $\frac{1}{8}$ पेन्स ही आहे. इतका भाव दिल्यास, कोणत्याही वेळीं

आह्मी हुंड्या विकूं असें इंडिया ऑफिसनें जाहीर केलेलें आहे. त्याचप्रमाणें पौंड हिंदुस्थानांत गेल्यास, ते पुनः आणण्याचा खर्च तितकाच असल्यामुळें, १६ पेन्स $-\frac{१}{८}$ पेन्स = १५ $\frac{७}{८}$ पेन्स ही हुंडीच्या भावाची खालची मर्यादा आहे. यापेक्षां कमी किंमतीस हुंड्या विकणें तोट्याचें होईल. या दोन मर्यादांच्या मध्यें कोठें तरी हुंड्यांचा भाव असला पाहिजे.

ही मर्यादा पुष्कळ वेळां व्याजाच्या दरावर अवलंबून असते. व्याजाचा दर शेकडा ५ असल्यास, एका रुपयास पाऊण आणा व्याज होतें व पंधरा दिवसांचें व्याज $\frac{१}{३२}$ आणे होतें. कौन्सिल-बिल विकत घेतल्यापासून रुपये मिळेपर्यंत १५ दिवस लागतात, त्यामुळें विकत घेणारा, एकदम (टी. टी. नें) रुपये मिळाल्यास, $\frac{१}{३२}$ आणे अथवा पेन्स देण्यास तयार होतो. व्याजाचा दर ७ $\frac{१}{२}$ असल्यास, टी. टी. ची किंमत याच्या दीडपट ह्मणजे $\frac{३}{६४}$ पेन्स इतकी, १६ पेन्सांपेक्षां अधिक देण्यास तो तयार होईल. ह्मणजे वरची मर्यादा १६ $\frac{१}{८}$ पेन्स वर सांगितली ती १६ $\frac{१}{८}+\frac{३}{६४}$ = १६ $\frac{११}{६४}$ होऊं शकेल. अर्थात् हिंदुस्थानांत व्याजाचा दर वाढल्यास, हुंड्यांची किंमत $\frac{३}{६४}$ पेन्सांनीं वाढविण्यास हरकत नाहीं.

आतां हुंड्यांचा दर १५ $\frac{७}{८}$ पेन्सांपेक्षां खालीं जाणें शक्य नाहीं. कारण इतका भाव कमी झाला ह्मणजे स्टेट सेक्रेटरी

हुंड्या विकण्याचें बंद करतो; परंतु त्यामुळें असा परिणाम होतो कीं, इतर बँका याचा फायदा घेऊन हिंदुस्थानांत इंग्लंडवर जे 'रेमिटन्सेस' विकतात, ते कमी भावानें विकूं लागतात. उदाहरण, हुंडणावळीचा दर १५ पेन्स झाला ह्मणजे हिंदुस्थानांत १ रुपया दिल्यास त्याला 'रेमिटन्स' बद्दल इंग्लंडांत फक्त १५ पेन्सच मिळतात; परंतु लोकांना 'रेमिटन्स'ची जरूर असल्यामुळें, ते ह्या भावानेंसुद्धां सवदा करण्यास तयार असतात. कारण स्टेट सेक्रेटरी जेव्हां हुंड्या विकण्याचें बंद करतो, त्या वेळेस निर्यात मालापेक्षां आयात माल जास्त असून, हिंदुस्थानास इंग्लंडचें देणें, घेण्यापेक्षां जास्त असतें अशी स्थिति असते. निर्यात कमी असल्यामुळें, लंडनमध्यें हुंड्या कोणीच घेत नाहीं. कारण इंग्लंडनें हिंदुस्थानास पैसे देणें नसून, उलट हिंदुस्थानांतून पैसे येणें असतात. अशी स्थिति बहुतकरून दुष्काळाच्या सालीं येते. दुष्काळामुळें गहूं, कापूस, गळिताचीं धान्यें इत्यादि निर्यात माल बंद असल्यामुळें, व्यापाराची तफावत आमच्या विरुद्ध असते. अर्थात् आह्मांस देणें निघतें; परंतु लोकांच्या गरजा नेहमींप्रमाणेंच असल्यामुळें, आयात मालाचा सपाटा चाललेलाच असतो. अशी स्थिति झाली ह्मणजे हुंडणावळीचा दर खालीं खालीं जातो.

आतां हा दर खालीं जाऊं देणें हें सुवर्णसंलग्नचलनाच्या विरुद्ध आहे. या चलनाचें आद्य तत्त्व हें आहे कीं, १ रु० = १६ पेन्स हें गुणोत्तर कायम ठेवावयाचें. आतां बँका जर एका रु-

यास १५ किंवा १४ पेन्स देऊं लागल्या, तर रुपयाची अवनति होऊन, पौंडाची उन्नति होऊं लागते. असें कां होतें, तर आंतरराष्ट्रीय देणें हिंदुस्थानास द्यावयाचें असतें व तें देण्याकरितां सोनें किंवा सोन्याचें नाणें ज्यायोगानें मिळेल असा ड्रॅफ्ट यांची जरूर असते; परंतु हें सोन्याचें नाणें हिंदुस्थानांत विशेष प्रमाणांत नसतें हें पूर्वीं सांगितलेंच आहे. अशा वेळीं लोक सरकारास आपली हुंडणावळ कायम ठेवण्याविषयीं आव्हान करितात. रुपया देऊन जर सोनें मिळालें नाहीं, तर सुवर्णसंलग्नचलन राहिलें कोठें? चलनांतही सुवर्ण नाहीं व आवश्यक सुवर्ण तेंही रुपयांच्या मोबदला मिळत नाहीं असें झालें ह्मणजे सर्वच ग्रंथ आटोपला. याकरितां सरकारास 'उलट हुंड्या' (Reverse Councils) विकणें भाग पडतें व त्याप्रमाणें तें करतेंही.

'उलट हुंड्यां'ची पद्धति अशी आहे. हिंदुस्थानांत नोटा किंवा रुपये देऊन सरकारजवळून पौंडाचा ड्रॅफ्ट घ्यावयाचा; व तो इंग्लंडांत धनकोकडे पाठवून द्यावयाचा; नंतर तो धनको इंडिया ऑफिसमध्यें हा ड्रॅफ्ट अथवा 'उलट हुंडी' दाखवून तेथें पौंड घेतो. असें केल्यानें हुंडणावळीचा दर परत खेंचला जाऊन, पुनः १ रु० = १६ पेन्स या बिंदूवर येतो. दुसऱ्या तऱ्हेनेंही ही गोष्ट सांगतां येईल. एक्सचेंज बँकेकडे गेल्यास, ती रुपयास १४ पेन्सचा ड्रॅफ्ट देतां येईल असें सांगते. सरकार असें सांगतें कीं, आमच्या संकल्पाप्रमाणें आह्मी रुपयास १६ पेन्स

देण्यास तयार आहों. तुह्मांस बँकेकडे जाण्याची जरूर नाहीं. अशा रीतीनें ४।५ कोटींच्या 'उलट हुंड्या' विकल्या ह्मणजे बँकांनाही हा भाव कबूल करावा लागतो व सर्व परिस्थिति पालटून जाऊन हुंडणावळ पुनः पूर्वपदावर येते.

यावरून असें दिसून येईल कीं, सामान्यतः 'उलट हुंड्या' विकण्याचा प्रसंग येत नाहीं. हिंदुस्थानांतून जाणारा निर्यात माल हा नेहमींच आयात मालापेक्षां ७०।८० कोटींनी अधिक असतो. त्यामुळें हिंदुस्थानास पैसे देणें नसून होमचार्जेस मागूनही कांहीं तरी घेणेंच असतें. यालाच 'अनुकूल व्यापार' [ favourable balance of trade ] असें ह्मणतात. या कारणानें हुंड्यांचीच नेहमीं अपेक्षा असते. कारण आयात मालाबद्दलचें आमचें कर्ज वारूनही यूरोपांतील लोकांनीं आह्मांस ७०—८० कोटि रुपये द्यावयाचे असतात. त्यामुळें लोक चढाओढ करून हुंड्या विकत घेतात. १६ पेन्सांपेक्षांही जास्त रकम देऊन एक रुपया घेणें हें त्यांस इष्ट असतें. त्यामुळें हुंडणावळ रुपयाच्या विरुद्ध जाण्याची भीति नसून, उलट पौंडास प्रतिकूल होण्याचीच जास्त भीति असते; परंतु दुष्काळांत हें सर्व बदलतें व आयात मालापेक्षां निर्यात माल विशेष जास्त नसल्यामुळें, हुंडणावळ खालीं येऊन, रुपयास प्रतिकूल व पौंडास अनुकूल अशी होते. अशा प्रसंगीं पौंडाची टंचाई भासते व ती कमी करण्याकरितां 'उलट हुंड्यांचा' प्रयोग करावा लागतो.

या व्यवहाराची बरोबर कल्पना येण्याकरितां एक दोन सालचे व्यापाराचे आंकडे घेऊं. १९०९–१० मध्यें निर्यात माल १८७ कोटि ८८ लक्ष रुपयांचा होता व आयात माल ११७ कोटि ६ लक्षांचा होता. याची वजाबाकी करून ७० कोटि ८२ लक्ष रुपये आमच्या वतीनें येणें निघालें. हें येणें निघालें त्यापैकीं ४१ कोटि ७३ लक्षांचीं कौन्सिलबिलें विकलीं. हें एक प्रकारचें देणेंच झालें. तें वजा जातां, २९ कोटि ९ लक्ष रुपये येणें अद्यापि बाकी राहिलें; तें १३ कोटि ८२ लक्षांचे पौंड; ७ कोटि ८६ लक्ष सोन्याचा गट व ९ कोटि ३७ लक्ष रुपें या रूपानें आम्हांस मिळालें. (१३,८२ + ७,८६ + ९,३६ = ३१,०५). ३१ कोटि ५ लक्षांतून घेणें २९ कोटि ९ लक्ष गेलें म्हणजे १ कोटि ९६ लक्ष शेवटीं देणें निघतें. हें देणें निघालें तें खाजगी लोकांनी येथें आणलेल्या सिक्यूरिटी व इंग्लंडांतून आणलेलें कर्ज यांकरितां होतें. १९१२–१३ मध्यें अशी स्थिति होतीः—

| जमा. | | नांवें. | |
|---|---|---|---|
| निर्यात माल | २४८,८८ | आयात माल | १८३,२५. |
| | | हुंड्या | ४६,६०. |
| | | पौंड | ११,३४. |
| | | सोनें गट | ११,८९. |
| | | रुपें | ६,२४. |
| | | सिक्यूरिटी | १,१२. |
| एकूण | २४८,८८. | | २६०,४४. |

यांत ११,५६ बाकी देणें निघालें. (लक्षापुढील शून्यें दिलीं नाहीत.)

दोनही वर्षांत बाकी देणें निघालें त्याचा अर्थ व्यापार प्रतिकूल आहे असा नसून, सोनें, रुपये व सिक्यूरिटी आह्मी—लोक किंवा सरकार यांनीं—जास्त घेतल्या. फक्त निर्यात व आयात मालाकडे पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, १९०९–१० मध्यें नुसत्या व्यापारांत आमचें ७० कोटि ८२ लक्ष येणें निघालें व १९१२–१३ मध्यें ६५ कोटि ६३ लक्ष रुपये निखालस येणें निघालें.

वरील आंकडयांवरून, सामान्यतः उलट हुंडया विकण्याचा प्रसंग कां येत नाहीं हें उत्तम रीतीनें समजेल. आतां ज्या सालीं हुंडया विकाव्या लागल्या, त्या सालीं व्यापाराची काय स्थिति आहे हें पाहिलें ह्मणजे, तुलनेनें, नेहमींची स्थिति व विशिष्ट स्थिति यांमधील भेद कळून येईल. १९१४–१५ सालीं निर्यात माल १८१,६० लक्ष होता व आयात माल १३७,९३ लक्ष होता व यांमधील फरक ४३,६७ लक्ष रुपये हा सरासरीनें होमचार्जेस भागण्यापुरता होता; परंतु पौंड १,६५ लक्ष, सोनें ६,८० लक्ष, रुपे १०,०१ लक्ष व ३५ लक्ष सिक्यूरिटी मिळून १८,८१ लक्ष अधिक देणें झालें. किंवा दुसऱ्या तऱ्हेनें हिशोब केल्यास, मालाची आयात १३७,९३ लक्ष व ही दुसरी आयात मिळून १५६,७४ लक्ष एकंदर देणें निघालें. निर्यातीबद्दल येणें १८१,६० लक्ष निघालें. मिळून २४,८६ लक्ष निखालस येणें निघालें. ही रकम होमचार्जेस भागविण्यास पुरी नाहीं. अर्थात् व्यापा-

राचा एकंदर कल हिंदुस्थानच्या विरुद्ध होता. त्यामुळें हुंड्या फक्त १०,७९ लक्षांच्याच विकल्या गेल्या व 'उलट हुंड्या' १३,०६ लक्षांच्या विकाव्या लागल्या.

अशा रीतीचा उलट हुंड्यांची रचना असते. आतां गेल्या दोन वर्षांत उलट हुंड्या कां विकल्या हें पाहूं. १९१८ मध्यें रुपें महाग झाल्यामुळें, रुपयांची किंमत वाढली. त्यामुळें १ पौंडास १५ रुपये देणें अशक्य झालें. हुंड्या नेहमीच्या भावानें विकल्यास, जास्त किंमतीचे रुपये लोकांना मिळून, ते अटविले असतां, लोकांना फायदा पडूं लागला. तो असा. रुप्याची किंमत एका तोळ्यास ४० सेंट अशी अमेरिकेंत होती. हें रुपें लंडनमध्यें खरेदी केल्यास, नेहमींच्या हुंडणावळीप्रमाणें २७ पेन्स द्यावे लागतात; परंतु या वेळेस पौंड व डॉलर यांमधील प्रमाण बदलल्यामुळें, एका पेन्साची किंमत दोन सेंट न राहतां, दीड सेंट झाली होती; त्यामुळें ४० सेंट हे = २६ २/३ पेन्सांबरोबर झाल्यामुळें, एका तोळ्यास लंडनमध्यें अदमासें २७ पेन्स पडूं लागले. २७ पेन्स हे = २७ आण्यांबरोबर आहेत त्यामुळें एका तोळ्याची किंमत २७ आणे झाली. एका रुपयांत १८० ग्रेन रुपें असल्यामुळें, एका तोळ्यांत (= १९२ ग्रेन) १९२/१८० = १ १/१५ रुपये पडतात, म्हणजे १ १/१५ रुपयांची किंमत २७ आणे झाली व एका रुपयाची किंमत अदमासें २५ आणे आली. याचा अर्थ असा कीं, १६ आण्यांच्या किंमतीचा रुपया पाडण्यास २५

आणे किंमतीचें रुपें विकत घेतलें पाहिजे. अशा स्थितीत एका पौंडास १५ रुपये देणें ह्मणजे २३ रुपये किंमतीचें रुपें लोकांस देण्यासारखें आहे.

वरील कारणामुळें हुंडयांचा भाव वाढविणें आवश्यक झालें व एक रुपयाऐवजीं जास्त पेन्स घेण्याचें स्टेट सेक्रेटरीनें ठरविलें. प्रथम हुंडणावळीचा दर १८ पेन्स केला व पुढें रुपें आणखी महाग झाल्यामुळें २० पेन्स, नंतर २२ पेन्स, नंतर २४ पेन्स व १९१९ डिसेंबरमध्यें २८ पेन्स केला. भाव वाढल्यामुळें हुंडया विकत घेण्यास कोणी तयार होईना. हिंदुस्थानांत रुपये मिळाल्यानंतर एक्सचेंज बँका पुनः हिंदुस्थानांत लंडनवर ड्रॅफ्ट खरेदी करितात. हीं बिलें हिंदुस्थानांतील ज्या लोकांनीं इंग्लंडांत माल पाठविला असतो, त्यांनीं आपल्या रिणकोच्या नांवावर दिलेलीं असतात. हे ड्रॅफ्ट दाखवून बँका पौंड वसूल करितात व नंतर पुनः हे पौंड कौन्सिलबिलें विकत घेण्याकरितां उपयोगांत आणितात. अशा रीतीनें एक्सचेंज बँकांची मुख्य देवघेव आहे. हिंदुस्थानांत रुपये मिळून पुनः बिलें खरेदी करण्याची वेळ आली व हुंडणावळीचा भाव २८ पेन्सांऐवजीं २४ पेन्स झाला तर प्रत्येक रुपयामागें ४ पेन्स = आणे नुकसान होणार. या अस्थिरतेमुळें हुंडया घेण्यास विशेष कोणाचा धीर होईना; परंतु हुंडया घेतल्याशिवाय रुपये मिळणें शक्य नसल्यामुळें, सरतेशेवटीं हुंडया घेणें बँकांस भाग पडलें. शिवाय रुपें अधिक अधिक महाग होत चालल्या-

मुळें व पौंडाची किंमत डॉलरच्या तुलनेनें कमी कमी होत चालल्यामुळें, लोकांस अशी भीति पडली कीं, हुंडयांचा भाव २८ पेन्सांऐवजीं ३०।३२ पेन्स असा होईल; याकरितां २८ पेन्सांच्या भावानें हुंडया न घेतल्यास, शेवटीं अधिकच नुकसान होईल. अशी स्थिति झाल्यामुळें पुनः हुंडयांना मागणी येऊं लागली; परंतु हुंडयांचा जो भाव असतो, तोच रुपये देऊन ड्रॅफ्ट घेण्याचाही असतो. असें असल्यानें, हिंदुस्थानांत कोणी रुपये दिल्यास त्याला प्रत्येक रुपयामागें २८ पेन्स देणें जरूर आहे. या २८ पेन्सांचा फायदा घेण्याकरितां व पुनः हुंडणावळ काय होईल याचा निश्चय नसल्यामुळें, येथील व्यापाऱ्यांनीं व बँकांनीं उलट हुंडया मिळण्याविषयीं मागणी केली. सरकारच्या हल्लींच्या धोरणाप्रमाणें रुपये कोणी दिले असतां पौंड देणें हें सरकारचें कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें व्यापारास मदत करणें हेंही कौन्सिलबिलें अथवा हुंडया व 'उलट हुंडया' यांचें मुख्य कार्य आहे असें आजपर्यंत जाहीर केल्यानें, सरकारनें उलट हुंडया विकण्यास सुरुवात केली व १९२० च्या जानेवारींत ८ कोटींच्या रुपयांच्या 'उलट हुंडया' विकल्या.

यानंतर या नवीन परिस्थितीचा विचार करून पुनर्घटना करण्याच्या विचारानें स्मिथकमिटी सरकारनें नेमिली. त्या कमिटीनें असें ठरविलें कीं, एक रुपया टांकसाळींत पाडण्यास अदमासें १ $\frac{1}{?}$ रुपया खर्च पडत असल्यामुळें, रुपया व पौंड यांचा

पूर्वीचा भाव बदलून १ : १० असा करावा. असें न केल्यास सर्व रुपये आटविले जाऊन, नोटांचें चलन हें निराधार होऊन नोटांबद्दल रुपये देणें अशक्य होईल. त्यामुळें रुपयाचा भाव पौंडांत जास्त केला ह्मणजे रुपें १ रु. १० आणे तोळा असलें तरीही रुपया पाडण्यांत नुकसान होणार नाहीं; परंतु पौंड हा स्वतःच बदलत असल्यामुळें, एखाद्या वेळीं पौंडाची किंमत ५ डॉलर असते; कधीं कधीं ४ डॉलर असते व कधीं कधीं ३॥ डॉलरही होतें. त्यामुळें पौंड शब्दाचा अर्थ सॉव्हरिन हें नाणें अथवा ग्रेटब्रिटनमधील चलनाचें मापन असा न घेतां, एका पौंडांत जितकें सोनें असतें, तितकें सोनें असा करावा; ह्मणजे सॉव्हरिनच्या गाड्याबरोबर रुपयाच्या नळ्याची यात्रा नको. असें स्मिथ कमिटीनें ठरविल्यानंतर, स्टेट सेक्रेटरी व हिंदुस्थानसरकार यांनीं तें मान्य करून, ही सूचना अमलांत आणण्यास सुरुवात केली.

सुरुवातीलाच असें दिसून आलें कीं, १ रु० = २४ पेन्स = २ शिलिंग (सोनें) हें प्रमाण जर अंतिम साध्य ठेवावयाचें असेल, तर त्या मानानें हल्लींच्या हुंडणावळीचा भाव कमी आहे. त्या वेळेस हुंडणावळीचा भाव १ रु० = २६ पेन्स स्टर्लिंग असा होता; परंतु स्टर्लिंगची अथवा सॉव्हरिनची किंमत सोन्यांत कमी असल्यामुळें, २६ पेन्स स्टर्लिंग हे सोन्यांत फक्त १८$\frac{१}{२}$ पेन्स इतके होते. अर्थात् १ रु० = १८ पेन्स हा भाव होता त्या-

ऐवजी १=२४ पेन्स हा भाव करणें इष्ट होतें. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, हुंडणावळीचा दर खालीं होता तो वर न्यावयाचा होता.

पूर्वी १९०७ मध्यें व १९१४ मध्यें अशा तऱ्हेची स्थिति असतांना ' उलट हुंड्या ' विकल्या होत्या व त्या वेळेला हुंडणावळ वर नेण्याकरितां त्यांचा उपयोग झाला. या समजुतीनें सरकारनें उलट हुंड्या विकण्याचा सपाटा चालविला. एकंदर ५० कोटींपर्यंत उलट हुंड्या विकल्यामुळें, इंग्लंडांतील निधीमधील सोनें इतक्या किंमतीचें बाहेर काढावें लागलें; परंतु हें सोनें पूर्वी तेथें नेलें तें पौंडास १५ रुपये या दरानें नेलें होतें. म्हणजे १ पौंड निधींत जाण्यास आम्हांस १५ रुपये येथें द्यावे लागले होते. आतां या परत हुंड्या नवीन भावानें विकल्यामुळें, येथें ७।८ रु० दिले म्हणजे १ पौंड तेथें निधींतून द्यावा लागे. अशा रीतीनें प्रत्येक पौंडामागें अदमासें सात रुपये नुकसान झालें. इतकें करूनही भाव १ रु० = २ शि० झाला नाहीं तो नाहींच. याशिवाय सोनें स्वस्त करण्याकरितां लाखों रुपयांचें सोनेंही सरकारनें विकलें; परंतु त्याचाही परिणाम झाला नाहीं.

वरील इतिहासावरून असें दिसून येईल कीं, सरकारचें हल्लींचें धोरण दोन सिद्धांतांवर अवलंबून आहे. ( १ ) व्यापाराच्या सोईकरितां हुंड्या व उलट हुंड्या विकणें हें सरकारचें कर्तव्य आहे. ( २ ) हुंडणावळ कमी झाली तर ती जास्त करणें हें कार्य उलट हुंड्यांनीं घडून येतें.

हे दोनही सिद्धांत चुकीचे आहेत. हुंड्यांचें काम फक्त होम-चार्जेसचे पैसे स्टेट सेक्रेटरीकडे जमा करणें हें आहे. व्यापाराशी सरकारास कांहींएक कर्तव्य नाही. व्यापाराच्या घडामोडी आपो-आप बँकांच्यामार्फत होत असतात. त्यांत साधारणपणें सरकारनें पडतां कामा नये. एखादे वेळीं आपत्काल ह्मणून कांहीं तात्पुरती व्यवस्था करणें आवश्यक असतें; परंतु होईल तितकें नैसर्गिक पद्धतीनें कार्य झालेलें चांगलें. दुसरा सिद्धांत कांहीं अंशीं खरा आहे. दुष्काळाच्या सालीं हुंडणावळ खालीं गेली असतां, ती उलट हुंड्या विकून पूर्वस्थलावर आणतां येते ही गोष्ट १९०७ सालीं व १९१४–१५ सालीं सिद्ध झाली आहे; परंतु उलट हुंड्या विकणें ही गुरुकिल्ली वाटेल त्या प्रसंगीं सारासार विचार न करितां लावूं पहाणें हें अनुभवाचे विरुद्ध आहे. हल्लींची स्थिति अशी आहे कीं, रुपें महाग असून सोनेंही महाग आहे व स्मिथ-कमिटीचे मापें १ रु० = २ शिलिंग ( सोनें ) असा दर होण्यास सोनें १६ रुपये तोळा झालें पाहिजे व रुपें अतिशय महाग असलें पाहिजे. ह्या दोनही गोष्टी जगांतील घडामोडीवर अव-लंबून असल्यामुळें, अशी स्थिति मी आपल्या कृतीनें करीन असें ह्मणणें हास्यास्पद आहे. वास्तविक पहातां, हल्लींच रुपें अधिक अधिक स्वस्त होऊं लागलें आहे व तें पुनः पूर्वीप्रमाणें स्वस्त झाल्यास, १ पौंड = १० रुपये हा दर टिकणें शक्य नाही. त्याचप्रमाणें सोनें स्वस्त झालें पाहिजे. पण तसेंही होण्याचा

संभव दिसत नाहीं. उलट तें अधिकच महाग होत चाललें आहे. अशा स्थितींत नुसत्या उलट हुंड्या विकून जबरदस्तीनें हुंडणावळ खेंचूं अशी आशा करणें व्यर्थ आहे. हें वैयर्थ्य सरकारनें नुकतेंच कबूल आहे ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. हा विषय मनोरंजक आहे; पण स्थलसंकोचास्तव याहून जास्त विस्तार येथें शक्य नाहीं.

कौन्सिलबिलें किती विकतात याची कल्पना येण्याकरितं कांहीं वर्षांचे आंकडे खालीं दिले आहेत. ( लक्ष रुपये. )

| वर्ष. | हुंड्या. | दर पेन्स. | होमचार्जेस. |
|---|---|---|---|
| १९०१ | २८,०० | १५·९८ | २५,२० |
| १९०२ | २८,०० | १६·०० | २६,४० |
| १९०३ | ३५,८५ | १६·०४ | २६,१० |
| १९०४ | ३६,६० | १६·०४ | २८,१० |
| १९०५ | ४७,४० | १६·०४ | २६,४० |
| १९०६ | ५०,१० | १६·०८ | २७,४९ |
| १९०७ | २२,९५ | १६·०२ | २६,५९ |
| १९०८ | २०,८५ | १५·९६ | २७,४५ |
| १९०९ | ४१,२५ | १६·०४ | २७,६० |
| १९१० | ३९,७५ | १६·०६ | २७,९० |
| १९११ | ४०,६५ | १६·०८ | २८,२० |
| १९१२ | ३८,५५ | १६·०५ | २८,१५ |
| १९१३ | ४६,८० | १६·०७ | २९,१० |
| १९१४ | ११,५५ | १६·०० | २९,२५ |
| १९१५ | ३०,४५ | १६·०८ | २९,१० |

उलट हुंड्या कशा विकल्या हें पुढील आंकड्यांवरून दिसून येईल.

| | लक्ष. | दर पेन्स. | | लक्ष. | दर पेन्स |
|---|---|---|---|---|---|
| १९०८ | १२,०८ | १५ ३१/३२ | १९१५ | ७,३४ | १५ ३१/३२ |
| १९०९ | २३ | १५ २९/३२ | १९१९ | | |
| १९१४ | १३,०५ | १५ २७/३२ | १९२० | | |

स्टेट सेक्रेटरीचा एक दोन वर्षांचा जमाखर्च पाहिला ह्मणजे होमचार्जेस किती असतात व त्याचा व हुंड्यांचा काय संबंध असतो हें दिसून येईल.

१९०९—१०.

| जमा. | रुपये. | नांवें. | रुपये. |
|---|---|---|---|
| होमचार्जेस | २८,१४,४५,०००. | हुंड्या | ४०,६४,४०,०००. |
| रेलवेस्टोअर्स | ८,६२,२०,०००. | नवें कर्ज | १६,९८,००,०००. |
| गोल्डस्टँ.रि. | १२,१३,५०,०००. | | |
| नोटांचा निधि | १,५०,००,०००. | | |
| शिलक इंग्लंडांत | ७,२२,२५,०००. | | |
| | ५७,६२,४०,०००. | | ५७,६२,४०,०००. |

१९११—१२.

| जमा. | रुपये. | नांवें. | रुपये. |
|---|---|---|---|
| होमचार्जेस | २७,४९,९५,०००. | हुंड्या | ४०,५८,७०,०००. |
| रेलवेस्टोअर्स | ७,६२,४५,०००. | नवें कर्ज | ५,८५,०००. |
| गोल्डस्टँ.रि. | ................... | | |
| नोटांचा निधि | २,९८,२०,०००. | | |
| शिल्लक इंग्लंडांत | २,५३,९५,०००. | | |
| | ४०,६४,५५,०००. | | ४०,६४,५५,०००. |

या कोष्टकांवरून, होमचार्जेसपेक्षां किती तरी जास्त रकमेच्या हुंड्या स्टेट सेक्रेटरी विकतो असें दिसून येईल. दोनही साली होमचार्जेस २८ कोटि असतांना, ४०।४१ कोटींच्या हुंड्या विकल्या. हे जास्त मिळालेले पौंड कोणत्या तरी निधींत जमा करून, हिंदुस्थानांतील त्या निधींतून तितक्याच किंमतीचे रुपये देतात.

जरी ही हुंड्यांची पद्धति १८९३ नंतर विशेष महत्वाची झाली, तरी तिचें मूळ बरेच प्राचीन आहे. १८१३ मध्यें कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स यांनीं हिंदुस्थान सरकारास इंग्लंडांत पैसे ठेवण्याचे दोन तीन मार्ग सुचविले. एक, खाजगी व्यापाऱ्यांस इंग्लंडमध्यें हुंड्या विकणें; किंवा व्यापाऱ्यांस हिंदुस्थानांत प्रथम रुपये देणें व त्याचे पैसे त्यांनीं इंग्लंडमध्यें भरणें; किंवा सोनें रुपें

पाठविणें. कांहीं वर्षांच्या अनुभवानें हुंड्या आधीं विकण्याची पद्धतीच उत्तम ठरली व १८६२ पासून दर महिन्यास एकदां याप्रमाणें हुंड्या विकूं लागले. प्रथम या हुंड्या ठरीव दरानें विकीत असत. नंतर कांहीं वर्षांनी टेंडरें घेऊं लागले व दर आठवड्यास हुंड्या विकूं लागले.

ही हुंड्यांची पद्धत हिंदुस्थानचा निर्यात माल जास्त आहे ह्मणूनच शक्य आहे. व्यापाराच्या एकंदर व्यवहारांत आम्हांस दुसऱ्या देशांकडून इतकें येणें असतें की, त्यापैकी कांहीं रकम स्टेट सेक्रेटरीला वसूल करण्यास सांगण्यास हिंदुस्थानास कांहींच दिकत वाटत नाहीं. हुंड्या विकूनही जें आणखी येणें राहिलें, त्याबद्दल पूर्वी रुपें येत असे; परंतु १८९३ मध्यें टांकसाळ बंद झाल्यापासून रुपें घेण्यांत फायदा नसल्यामुळें, सॉव्हरिन किंवा सोन्याचा गट पाठविण्याची वहिवाट सुरू झाली.

आतां या पद्धतींत काय दोष आहेत तें पाहून, त्यासंबंधी काय उपाय योजिले पाहिजेत हें पाहूं. पहिला दोष असा आहे कीं, या पद्धतीनें स्टेट सेक्रेटरीजवळ कारण नसतांना जास्त जास्त शिलक सांचत जाते. १९१२ मध्यें ही शिलक २७ कोटि होती. ही शिलक बिनव्याजी पडूं नये ह्मणून ती लंडन येथील बँकांस व व्यापाऱ्यांस व्याजानें देतात. त्यामुळें हिंदुस्थानांत ७।८ टक्के व्याज देऊनही पैशाची टंचाई ज्या वेळेस असते, त्या वेळेस ही शिलक २॥-३ टक्के व्याजानें तेथील व्यापाऱ्यांस मिळूं शकते.

वस्तुतः ही शिलक हिंदुस्थानांत सरकारी बँकांजवळ ठेवणें जास्त श्रेयस्कर आहे. त्यायोगानें येथील व्यापाऱ्यांस त्या रकमेचा अतोनात फायदा होऊन व्याजाचा दर विशेष वाढणार नाहीं.

सरकारच्या वर्तीनें हुंड्यांच्या विक्रीचें असें समर्थन करण्यांत येतें कीं, व्यापारास मदत करणें हें सरकारचें कर्तव्य आहे; व या हुंड्या न विकल्यास व्यापारास धोका पोंचेल व निर्यात व आयात मालाच्या घडामोडीस लागणारा पैसा व्यापारास मिळणार नाहीं. आमच्या मतें हें समर्थन भ्रामक कल्पनांवर आधारभूत असें आहे. कोणत्याही देशांत सरकार व्यापारास प्रत्यक्ष रीतीनें मदत करीत नाहीं. हें काम बँकांचें आहे व नैसर्गिक रीतीनें ही व्यापाराची देवघेव चालली पाहिजे. हुंड्या न विकल्या तरी हें काम दुसऱ्या रीतीनें होऊं शकेल.

हिंदुथानांत सुवर्णचलनपद्धति सुरू केल्यास, हें काम बँकांच्या द्वारें होण्यासारखें आहे. होमचार्जेससुद्धां अशा रीतीनें बँकांच्या मार्फत देतां येतील. येथील बँकांनीं ड्रॅफ्ट दिले असतां अथवा चेक दिले असतां, ते तेथें पटवून स्टेट सेक्रेटरीस आपला खर्च भागवितां येईल. बरें, या व्यवहारांत स्टेट सेक्रेटरीस नेहमींच फायदा होतो असें नाहीं. पुष्कळ वेळां ह्या हुंड्या अगदीं कमी भावानें विकाव्या लागतात.

ह्या हुंड्या न विकल्या तर, पौंड अथवा सोनें पाठवावें लागेल. नंतर ते पौंड अथवा सोनें हिंदुस्थानांत देऊन लोक रुपये माग-

तील व नंतर रुपये पाडण्याकरितां, रुपें खरेदी करण्याकरितां. तें सोनें पुनः इंग्लंडमध्यें पाठवावें लागेल अशा तऱ्हेचें दुसरें एक समर्थन ऐकण्यांत येतें; परंतु हेंही सर्वांशीं खरें नाही. सोनें चलनांत आणण्याची सोय झाल्यास, असें होणार नाही. लोक तेंच पौंड चलनांत वापरूं लागतील व रुपये पाडण्याचा प्रश्नच उद्भवणार नाहीं. हल्लींच्या लंगड्या पद्धतीमुळें व रुपयास खोटें प्राधान्य दिल्यामुळें, ही आपत्ति उत्पन्न झालेली आहे. सुवर्ण-चलन केल्यास, हें सर्वच संकट आपोआप नाहींसें होईल. हुंड्या विकल्यामुळें, हल्लींच्या पद्धतींचें कृत्रिमत्व अधिकच दृढ झालें आहे. हुंड्यांची पद्धत बंद करून नवीन स्थापलेल्या इंपीरियल बँकेच्या द्वारें ड्रॅफ्ट विकणें हा सर्वांत उत्तम उपाय आहे.

होमचार्जेस कमी करण्यास उत्तम उपाय असा आहे कीं, नवीन कर्ज नेहमीं हिंदुस्थानांत काढावें व पूर्वीचें कर्ज हलकें हलकें परत देऊन टाकावें. पूर्वीं हिंदुस्थानांत कर्ज मिळत नसे अशी सबब असे; परंतु हल्लीं हिंदुस्थानांत भांडवल इतकें वाढलें आहे कीं, हिंदुस्थानांत कर्ज मिळण्यास मुळींच अडचण पडणार नाहीं. महायुद्ध चालू असतां हिंदुस्थानांत कोट्यवधि रुपयांचें कर्ज काढलें हा अनुभव अगदीं अलीकडला आहे. तेव्हां या मुद्यासंबंधानें कोणीही साशंक राहण्याचें कारण आम्हांस दिसत नाहीं.

यासंबंधानें दुसरा एक प्रश्न उद्भवतो. शिलक हिंदुस्थानांत पुष्कळ आहे म्हणून स्टेट सेक्रेटरी जास्त हुंड्या विकतो. कारण शिलकींत रुपये असल्याशिवाय हुंड्या पटवितां येणार नाहींत; परंतु इतकी शिलक आली कशी? व ही येणें चांगलें आहे काय? जास्त शिलक आहे याचा अर्थ करांच्या रूपानें खर्चापेक्षां जास्त जमा सरकारी खजिन्यांत आली. पण असें करणें अयोग्य आहे. बजेट असें केलें पाहिजे कीं, खर्चाच्या अदमासानेंच जमा ठेविली पाहिजे. एखाद्या वर्षी चुकून जास्त शिलक राहिल्यास, पुढल्या वर्षी करांचें प्रमाण कमी केलें पाहिजे. हा मुद्दा नामदार गोखले यांच्या बजेटावरील वरिष्ठ कौन्सिलांतील भाषणांत अतिशय विशद केलेला आहे व तो वाचकांनीं अवश्य वाचावा. एकंदर विचार करितांना असें दिसतें कीं, होमचार्जेसपेक्षां एका पौंडाच्याही जास्त हुंड्या स्टेट सेक्रेटरीनें विकूं नये. या हुंड्या एक्सचेंज बँकांना सोईच्या असतात; परंतु त्यांचें हिताहित म्हणजे हिंदुस्थानचें हिताहित नव्हे हें कधींही विसरतां कामा नये. चेंबरलेन कमिशननें असें ठरविलें आहे कीं, स्टेट सेक्रेटरीच्या इच्छेवरच ही गोष्ट सोंपवावी व कायद्यानें त्याच्या कृत्यास नियंत्रण घालूं नये. चेंबरलेन कमिशनचा रिपोर्ट एकंदर प्रतिगामी असल्यामुळें, त्यांतील इतर सूचनांप्रमाणेंच हीही सूचना 'स्थितस्य गतिः समर्थनीया' या न्यायाला अनुसरून आहे यांत नवल नाहीं.

अंदाजपत्रकाच्या बाहेर दरसाल जास्त शिलक राहते हें पुढील आंकड्यांवरून समजेल. १९०१ पासून १९०५ पर्यंत अंदाज-

पत्रकापेक्षां एकंदर ५० कोटि रुपये जास्त घेऊन, ते हिंदुस्थानां-तून काढून निरनिराळ्या निधींत लंडनमध्यें जमा केले. १९०९ पासून १९१२ पर्यंत चार वर्षांत अदमासें ६२ कोटि शिलक राहिली; ह्मणजे दरसाल १५ कोटि रुपये खर्चापेक्षां जास्त वसूल केले जातात व नंतर शिल्लक झाली ह्मणून जास्त हुंड्या विकून ते इंग्लंडांत नेतात.

या हुंड्यांच्या विरुद्ध भारतवासी आक्षेपकांचा आणखी एक आरोप आहे. तो महत्वाचा असल्यामुळें, त्यांत किती तथ्य आहे हें पाहिलें पाहिजे. सोनें किंवा पौंड दिल्यास, रुपये द्याव-याचे असा कायदा केल्यापासून १६ $\frac{1}{8}$ पेन्सांपेक्षां हुंड्यांना जास्त किंमत देण्यास कोणीही कबूल असत नाहीं, हें वर दाखविलेंच आहे. कारण जास्त दर देण्यापेक्षां पौंड पाठविणें हें फायदेशीर होतें. हे पौंड हिंदुस्थानांत आल्यानें, रुपयांचें चलन वाढत नाहीं; परंतु हुंड्या विकल्यास रुपयांचें चलन वाढतें. त्यामुळें दरसाल रुपये चलनांत जास्त होऊन एकंदर किंमती वाढूं लाग-तात. नामदार गोखले हे या पक्षाचे एक प्रधान अध्वर्यु होते. 'कृत्रिम चलनाची रेलचेल', 'चलन पातळ अथवा द्रवीभूत करणें' अशा तऱ्हेची शब्दरचना ते करीत असत. आमच्या मतें हें ह्मणणें सयुक्तिक दिसतें; परंतु यावर सरकारी पक्षाचें काय सम-र्थन आहे तें प्रथम पाहूं:

हें समर्थन चेंबरलेन कमिशनच्या अहवालांत दिलेलें आहे तें येणेंप्रमाणें. जर हुंड्या न विकल्या, तर व्यापारी व बँका पौंड पाठवितील; नंतर तेथील बँका हे पौंड पटवून रुपये घेतील. कारण त्यांना आपल्या गिऱ्हाइकांस रुपये द्यावयाचे असतात. असें झाल्यानें पौंड हिंदुस्थानांतील खजिन्यांत जमून त्यांचा कांहीं उपयोग न होतां, तें तेथें कुजत पडतील. तेंच सोनें स्टेट सेक्रेटरीजवळ इंग्लंडमध्यें असल्यास, त्याचा उपयोग करतां येईल, किंवा खजिन्यांतील रुपये संपल्यास नवे पाडावे लागतील व हे पाडण्याकरितां रुपें इंग्लंडांत खरेदी करावयाचें असल्यामुळें, तेच पौंड पुनः इंग्लंडमध्यें येतील. मग ते प्रथमच अडकवून ठेवलेले काय वाईट!

या मुद्यांचा विचार पूर्वीं केलाच आहे. पौंडांचें चलन जास्त वाढविल्यास, पौंड कुजत राहण्याचें कांहींच कारण नाहीं. हल्लींची पद्धति कायम ठेवून पौंड चलनांत आणणें कठिण आहे असें म्हटलें तर, त्याला उत्तर हेंच कीं, अशा तऱ्हेची कृत्रिम पद्धति काढून सोन्याचें चलन करावें हेंच उत्तम आहे. सोन्याचें चलन केल्यास हे पौंड येथें अनायासें चलनांत उपयोगांत येतील. याहीपेक्षां उत्तम उपाय हा कीं, पौंडही न आणतां सोनेंच आणावें म्हणजे चलन कोणत्याही प्रकारें न वाढतां हें सोनें देशांत धातूच्या रूपानें राहील. जरूर पडल्यास या सोन्याचें वाटेल तेव्हां नाणें पाडणें, सोन्याची टांकसाळ उघडली असतां शक्य होईल. म्हणजे हल्लीं

जसें रुपये घेणें भाग पडतें, तसें न होतां सोनें घेणें अथवा त्याचें नाणें पाडणें हें लोकांच्या इच्छेवर अवलंबून राहील.

एकंदरींत पहातां, सरकारी समर्थनाचें हें एक गृहीत तत्व दिसतें कीं, पौंड येथें पाठविल्यास, त्याचे रुपये घेतल्याशिवाय लोक राहणार नाहींत. असें झालें म्हणजे जे रुपये हुंड्या पटवून चलनांत आले असते, ते पौंड देऊन त्याच्या मोबदला चलनांत येतील. एवंच स्टेट सेक्रेटरीच्या कृत्यानें किंवा लहरीनें रुपयांचें चलन वाढलें असें म्हणतां येणार नाहीं. यावर हिंदुस्थानांतील तज्ज्ञांचें उत्तर असें आहे कीं, ज्या पद्धतीमुळें हुंडणावळीचा भाव कायम राखण्याकरितां इंग्लंडमध्यें जास्त सोनें ठेवणें भाग पडतें, ती पद्धतीच त्याज्य आहे.

ही कृत्रिम पद्धति प्रचलित नसती तर रुपये किंवा पौंड या दोहोंचीही हिंदुस्थानास गरज लागली नसती होमचार्जेस जाऊन जें येणें निघेल, तें सोन्याच्या रूपानें हिंदुस्थानांत आलें असतें. यामुळें सोनें हिंदुस्थानांत जास्त वाढलें असतें व त्याची किंमत अतिशय कमी झाली असती हें खरें; परंतु त्याचा चलनावर परिणाम होऊन किंमती भडकल्या नसत्या. वस्तुतः रुपयांची संख्या कमी करून त्यांची किंमत वाढविण्याच्या उद्देशानें टांकसाळ सरकारनें बंद केली; परंतु आतां तें धोरण बाजूलाच राहून रुपये उलटे जास्तच वाढत चालले आहेत. १९०० पासून १९१० पर्यंत एकंदर दहा वर्षांत अदमासें ११२ कोटि रुपये

नवीन पाडले असें पुढें दिलेल्या कोष्टकावरून दिसून येईल. हे सर्व रुपये हुंड्या विकण्याच्या पद्धतीनें अस्तित्वांत आले. सोनें पाठविलें असतें व सोन्याचें नाणें चलनांत जास्त प्रमाणावर आणलें असतें तर इतके रुपये पाडण्याची मुळींच आवश्यकता झाली नसती. या योगानें चलन बेसुमार झालें व त्याचीं फळें महागाईच्या रूपानें आज हिंदुस्थानास भोगावीं लागत आहेत.

रुपया कृत्रिम असल्यानें, तो अटविण्यापासून नुकसान होतें. त्यामुळें चलन अधिक झाल्यास, तें अटवून कमी होण्याचा जो धर्म नैर्सागक चलनपद्धतींत असतो, तो धर्म हल्लींच्या कृत्रिम पद्धतींत नाहीं. याही कारणाकरितां हल्लींची कृत्रिम पद्धति काढून टाकणें श्रेयस्कर आहे. महागाई झाल्यामुळें प्रत्येकास जास्त मजुरी, जास्त नफा घेणें भाग पडतें; परंतु हा एका पातळीवर सर्व प्राप्ति आणण्याचा क्रम लवकर साध्य नसल्यामुळें, संप, नोकर व धनी यांमधील कलह, व्यापाऱ्यांची सट्टेबाजी असे अनेक अनिष्ट प्रकार सुरू झाले आहेत. या सर्व कारणांनीं देशांत असंतोष व अस्थिरता पसरून एकंदर आर्थिक स्थिति अधिकाधिक घोंटाळ्याची व अन्यायाच्या आचरणास अनुकूल अशी झालेली आहे.

नवीन स्थापन झालेल्या इंपीरियल बँकच्या हातांत इंग्लंडमधील सर्व देण्याघेण्याचे व्यवहार दिल्यास, यापैकीं पुष्कळ दोष नाहींसे होतील. याशिवाय होमचार्जेस कमी करण्याकरितां पौंडांतील

शक्य तितकें देणें देऊन टाकून याउपर सर्व कर्ज हिंदुस्थानांतच काढावें व सोन्या-रुप्याची आयात व निर्यात अनियंत्रित ठेवावी. असें केल्यानें देणें घेणें यांची वजावाट नैसर्गिक रीतीनें होऊन, कृत्रिम रीतीनें हुंडणावळ ठरविण्याकरितां, हुंड्या व उलटहुंड्या विकण्याची जरूर भासणार नाही.

हुंडणावळ स्थिर राखण्याकरितां हुंड्या व उलटहुंड्या विकल्या पाहिजेत हें सर्वस्वी खरें आहे. हुंड्या न विकल्यास, एक्सचेंज बँका पौंडाचे रुपये कमी देतील. त्याचप्रमाणें हुंडणावळीचा दर खालीं गेल्यास, उलटहुंड्या विकणें जरूर आहे. कारण असें न केल्यास, हुंडणावळ अधिक अधिक अवनत होऊन, रुपयांच्या मोबदला पौंड मिळणें हें सुवर्णसंलग्नचलनाचें मुख्य कार्य आहे तें होणार नाहीं; परंतु हें सर्व कृत्रिम आहे. सुवर्णसंलग्न ही पद्धतीच दोषयुक्त असल्यामुळें, हीं सर्व समर्थनें लंगडीं आहेत. पद्धतीच वाईट असल्यामुळें, ती अमलांत आणण्याचीं सर्व साधनें-ही वाईट ठरतात. हुंडणावळीचा प्रश्न मुळांतच नाहीसा करण्यास सोन्याचें चलन करणें हाच एक मार्ग आहे. हा मार्ग आक्रमण न केल्यास, हुंड्या विकणें, जास्त रुपये पाडणें, महर्घता, अधिक कर, अधिक शिल्लक व पुनरपि हुंड्या विकणें, हें 'अनर्थवर्तुल' (Vicious circle) असेंच फेऱ्या घालीत राहील.

## प्रकरण ६ वें.

### सुवर्णचलननिधि, नोटांचा निधि व खजिन्यांतील शिल्लक.
### ( Reserve and Cash balances. )

फौलरकमिटीनें सोन्याचें नाणें करण्याचें ठरविल्यानंतर, हें नाणें करण्यास सोन्याचा सांठा पाहिजे तो जमविण्यास सुरवात केली. टांकसाळींत रुपये पाडल्यास रुप्याचा भाव स्वस्त असल्यामुळें, प्रत्येक रुपयामागें अदमासें पांच आणे नफा होतो. हा नफा दुसऱ्या कोणत्याही कामाकरितां न वापरतां, तो एका निधींत अलाहिदा ठेवूं लागले. या निधीचें नांव सुवर्णनिधि ( Gold Reserve ) असें ठेविलें. १९०६ मध्यें या निधींत रोख रुपये ठेवूं लागल्यामुळें, त्याचें नांव बदलून सुवर्णचलननिधि ( Gold Standard Reserve ) असें त्यास ह्मणूं लागले.

१९०० पासून १९०७ पर्यंत या निधींत बरीच रक्कम जमली होती; परंतु १९०७ मध्यें उलट हुंड्या विकल्यामुळें, रुपये चलनांतून निघून सरकारी खजिन्यांत सांचले. त्यामुळें १९१२ पर्यंत पुनः नवीन रुपये पाडण्याचें काम पडलें नाहीं. त्या मितीपर्यंत हा निधि २४,९० लक्षांपर्यंत गेला होता व याचें व्याज ४,८० लक्ष, मिळून एकंदर २९,७० लक्ष रुपये यांत जमले होते. १९१२ मध्यें पुष्कळ रुपये पाडल्यामुळें, १९१३ च्या सुरवातीस हा निधि ३४,५० लक्षपर्यंत गेला. याचा तपशील असा होताः

६,७५ लक्ष ट्रेझरी बिल्स; ७,१० लक्ष एक्सचेकर बाँड्स (हे दोनही इंग्लंडांतील गव्हर्मेंटचे कर्जरोखे आहेत. यांचे पैसे थोडक्या मुदतींत मिळूं शकतात. हिंदुस्थानांत ट्रेझरी बिल्स काढलेली सर्वांना माहीत आहेतच, त्याप्रमाणेंच हीं असतात.) १०,५० कनसोल्स (आपल्याकडे सरकारी प्रॉमिसरी नोटा असतात त्याचप्रमाणें इंग्लंडांत कन्सोल्स असतात. यांचे पैसे लवकर मिळत नाहींत); २,२५ लक्ष (कॅनडा, ऑस्ट्रेलिया, कलोनियल सिक्यूरिटी इत्यादि देशांतील सरकारच्या प्रॉमिसरी नोटा); एकूण २७ कोटि सिक्यूरिटी; १,५० लंडन येथील बँकांस व्याजी दिलेले; ५,६२ लक्ष हिंदुस्थानांत रुपये; ३७ लक्षांचें इंग्लंडांत सोनें.

त्या वेळचें धोरण असें होतें कीं, हा निधि जवळ जवळ ४० कोटींपर्यंत वाढल्यानंतर, मग रुपये पाडल्यामुळें जो नफा होईल तो दुसऱ्या कामाकडे लावावयाचा; परंतु मध्यंतरीं सोन्याचें चलन करण्याची कल्पना सरकारनें सोडून दिली व या निधीचा उपयोग फक्त हुंडणावळ स्थिर राखण्याकरितां करावयाचा असें ठरविलें. नंतर चेंबरलेन कमिशननें हें धोरण पसंत करून, सोन्याचें चलन करणें हें मूर्खपणाचें आहे असें ठरविलें! सुवर्णचलनासारखें उत्क्रांतीच्या उच्च शिखरावर गेलेलें चलनच हिंदुस्थानास हितकर आहे असें ठरवून, त्यांनी हा निधि मुख्यत्वेंकरून इंग्लंडमध्यें ठेवावा असेंही सुचविलें. याशिवाय इतर चेंबरलेनकमिशनच्या सूचना

पुढीलप्रमाणें होत्या. आतां हुंडणावळ १६ पेन्सांच्या खालीं गेली म्हणजे उलटहुंड्या विकाव्या लागतात व त्याबद्दल सोनें अथवा पौंड इंग्लंडांत द्यावे लागतात, म्हणून या निधीपैकीं बहुतेक भाग इंग्लंडमध्यें ठेवण्याचें ठरविलें; परंतु अशा प्रसंगी सिक्यूरिटी विकाव्या लागतील व त्यांमध्यें तोटा होईल, करितां सिक्यूरिटी कमी करून, सोनें अथवा सोन्याचें नाणें जास्त प्रमाणांत ठेवावें असें निश्चित केलें. नोटांच्या निधींतून सोनें काढून घेऊन त्यांमध्यें रुपये ठेवावे म्हणजे १५ कोटि रुपयांचें सोनें जमेल व नंतर अर्धा निधि सोन्याच्या रूपांत ठेवावा. १९ $\frac{२९}{३२}$ पेन्स या दरानें कोणीही उलटहुंड्या मागितल्यास त्या हिंदुस्थानांत विकाव्या.

१९१६ च्या मार्चमध्यें या निधींतील रकमेचा तपशील खालीं लिहिल्याप्रमाणें होता.

| | | |
|---|---|---|
| इंग्लंडांत सिक्यूरिटी | २४,३२,७०,००० | रुपये |
| रोख सोन्याचें नाणें | ८,६८,८०,००० | ,, |
| हिंदुस्थानांत सोनें | ३५,७०,००० | ,, |
| नेहमींच्या शिलकेंत | ६,००,००,००० | ,, |
| कर्जाऊ घेतले (हिंदुस्थानांत) | ———— | |
| | ३९,३७,२०,००० | |

नोटांचा निधि हा दुसरा निधि होय. यांतील सिक्यूरिटी किती असाव्या हें कायद्यानें ठरविलेलें असतें; याशिवाय बाकीचा सर्व निधि सोनें किंवा पौंड व रुपे किंवा रुपये या रूपांत असला पाहिजे.

यापैकीं सोनें किंवा पौंड हे इंग्लंडांत ठेवावे किंवा हिंदुस्थानांत ठेवावे. १९१२ मध्यें या निधीचा तपशील खालीं दिल्याप्रमाणें होता.

| | |
|---|---|
| पौंडांच्या सिक्यूरिटी | ३,७५ लक्ष. |
| रुपयांच्या सिक्यूरिटी | ९,७५ ,, |
| इंग्लंडमध्यें सोनें | १०,८७ ,, |
| हिंदुस्थानांत सोनें | २६,२५ ,, |
| हिंदुस्थानांत रुपये | १२,७५ ,, |
| हिंदुस्थानांत रुपें | २,२५ ,, |
| | ६५,६२ लक्ष. |

या दोन निधींशिवाय सरकारी खजिन्यांत रुपये व पौंड असतात. यांना ' शिल्लक ' असें म्हणतात. ही शिल्लक करांचे पैसे, नवीन काढलेलें कर्ज, इत्यादि बाबींच्या अनुरोधानें कमीजास्त होते. ही शिल्लक हिंदुस्थानांत व इंग्लंडांत अशा दोनही ठिकाणी असतें. इंग्लंडांतील शिल्केस स्टेटसेक्रेटरीची शिल्लक असें म्हणतात. हिंदुस्थानांतील शिल्लक सरकारी खजिन्यांत असते. असे खजिने प्रत्येक जिल्ह्यांत असतात. याशिवाय तीन ' रिझर्व्ह ट्रेझरीज् ' म्हणजे मोठे खाजिने असतात. याशिवाय सरकारी बँकांत कांहीं शिल्लक ठेव म्हणून ठेवलेली असते. जिल्ह्यांच्या खाजिन्यांत रोजच्या व्यवहारापुरती शिल्लक ठेवून बाकीची मोठ्या खाजिन्यांत पाठवितात. या खजिन्यांत रुपये असतात ते बेतापुरते असतात. त्यामुळें विशेष रुपयांची मागणी आल्यास नोटांच्या निधींतील

रुपयांमधूनच ते द्यावे लागतात. इंग्लंडांतील शिल्लक, नेहमींच्या व्यवहारापुरती बँक ऑफ् इंग्लंडमध्यें ठेवलेली असते. व ही अदमासें ७५ लक्ष रुपयापर्यंत असते. याशिवाय बाकीची शिल्लक थोडक्या मुदतांच्या व्याजानें कर्जाऊ दिलेली असते.

रुपयांचा मोठा सांठा, नोटांचा निधि व सुवर्णचलन निधि या दोन निधीमध्यें ठेवलेला असतो. पौंडाचा सांठा या दोन निधींमध्यें असतो व शिवाय इंग्लंडमधील शिलकेंत असतो. हा सर्व रोख असत नाहीं; कांहीं कर्जाऊ दिलेल्या रकमेच्या स्वरूपांत असतो व कांहीं सिक्यूरिटीच्या रूपांत असतो. परंतु कर्जाऊ रकमा महिन्या दोन महिन्यांच्या आंत वसूल करतां येतात. व वेळ पडल्यास सिक्यूरिटी विकतां येतात.

हे निधि आपलें कर्तव्य बजावण्यास समर्थ आहेत किंवा नाहींत हें आतां पाहिलें पाहिजे. हें पहाण्यास ज्या वर्षी या निधींवर सत्त्वपरीक्षेचा प्रसंग आला त्या वर्षांचा इतिहास सूक्ष्मरीतीनें अवलोकन करणें श्रेयस्कर आहे. त्यानंतर त्यांची नेहमींची स्थिति काय आहे हें पहातां येईल. १९०६ पासून १९०८ पर्यंत असे प्रसंग सारखे येत गेले. १९०० पासून १९०५ पर्यंत रुपयांची मागणी साधारण होती. या पांच वर्षांत अदमासें ४२ कोटि रुपये नवीन पाडले; परंतु विशेष टंचाई केव्हांच भासली नाहीं. १९०५ च्या जुलई महिन्यांत एकंदर शिलक १८ कोटि होती.

डिसेंबर महिन्यांत येथील खजिन्यांतील रुपें सर्व संपलें व खजिन्यांत रुपये १८ कोटि होते ते ७॥ कोटींवर आले. परंतु इंग्लंडांत हुंड्याची मागणी जोरांत असल्यामुळें, हुंड्या विकणें भाग होतें; परंतु इतके रुपये शिल्लक नसल्यामुळें, स्टेट सेक्रेटरीनें हुंड्यांचा दर १६ ३१/३२ पेन्स असा केला. मध्यंतरी रुपें खरेदी करून, तें हिंदुस्थानांत पाठवून जास्त रुपये पाडून घेतले व १९०६ च्या मार्च महिन्यांत पुनः खजिन्यांत १५ कोटि रुपये झाले व त्यामुळें काळजी दूर झाली. यानंतर असा पुनः प्रसंग येऊं नये ह्मणून सरकारनें रुपये पाडण्याचा सपाटा चालविला, व रुपये नोटांच्या निधींत जास्त झाले ह्मणून कांहीं रुपये सुवर्ण-चलननिधींत जमा केले. जून महिन्यांत एकंदर शिल्लक ३२ कोटि रुपये होते. नंतर तेजीच्या मोसमांत कांहीं रुपये कमी होऊन १९०७ च्या मार्चमध्यें २० कोटि रुपये शिल्कींत राहिले. पूर्वींच्याप्रमाणें संकट येईल या भीतीनें सरकारनें रुपये पाडण्याचें बंद न करितां, पुनः रुपये पाडून एकंदर शिल्लक १९०७ च्या सप्टेंबरमध्यें ३१॥ कोटींवर आणून सोडली.

१९०७ चा पावसाळा चांगला झाला नाहीं व अवर्षणामुळें दुष्काळ पडला. दुष्काळ पडला ह्मणजे निर्यात माल कमी होतो व आयात आहे तसाच राहून, 'प्रतिकूल व्यापारा' ची स्थिति येते हें पूर्वी स्पष्ट केलेंच आहे. या नियमाप्रमाणें हुंड्यांची मागणी कमी होऊन उलटहुंड्यांची मागणी सुरू झाली. रुपये

निधींमध्यें व शिलकींत जास्त झाले व पौंडांचा संचय कमी झाला. उलटहुंड्या विकल्यामुळें निधींमधील पौंडांच्या सिक्यूरिटी व रोख पौंड यांवर गदा आली. सुदैवानें हा निधींचा भाग सुस्थितींत होता. १९०७च्या सप्टंबरमध्यें स्टेट सेक्रेटरी-जवळ १५ $\frac{१}{२}$ कोटींचें सोनें, ८ कोटींचें थोडक्या मुदतीनें दिलेलें कर्ज, व २३ कोटींच्या सिक्युरिटी होत्या. हुंड्यांची मागणी कमी झाल्यामुळें नवीन सोनें मिळणें शक्य नव्हतें.

यामुळें हुंडणावळ खालीं जाऊं लागली व रुपयाची किंमत १५ $\frac{१}{२}$ पेन्सांवर आली. या वेळेस एकदम ३।४ कोटींच्या उलटहुंड्या विकल्या असत्या ह्मणजे कार्य झालें असतें; परंतु थोड्या थोड्या उलटहुंड्या सरकारनें भीत भीत विकल्या त्यामुळें सोनें जाऊनचें जाऊन हुंडणावळीवर परिणाम झाला नाहीं. हुंड्या न विकल्यामुळें, स्टेट सेक्रेटरीनें आपल्या खर्चाकरितां नोटांच्या निधींमधून रक्कम काढली व तितकीच रक्कम येथील नोटांच्या निधींत हिंदुस्थान सरकारनें घातली. डिसेंबरमध्यें सरकारनें उलट-हुंड्या वाटेल त्या प्रमाणावर विकण्याचें जाहीर केलें. यानंतर लोक उलटहुंड्या मोठ्या प्रमाणावर खरेदी करूं लागले. त्यामुळें मार्च १९०८मध्यें सर्व निधींतील सोनें संपून गेलें व फक्त सिक्यूरिटी व थोडक्या मुदतीनें दिलेलें कर्ज एवढीच शिल्लक राहिली. एप्रिलमध्यें पुनः हुंडणावळ खालीं गेली. नंतर दर-आठवड्यास ७५ लक्ष रुपयांच्या उलटहुंड्या विकूं लागले. कांहीं

दिवसांनीं एक आठवडयांत १ $\frac{१}{२}$ कोटींच्या उलटहुंडया विकल्या. याबद्दलची रकम सुवर्णचलननिधींतून सिक्यूरिटी विकून पैदा केली. १९०८च्या आगष्टपर्यंत एकंदर १२ कोटींच्या उलटहुंडया विकल्या. या सुमारास निधीपैकीं पौंडांच्या भागाची स्थिति पुढीलप्रमाणें होती.

| | |
|---|---|
| सोनें हिंदुस्थानांत | २२ लक्ष. |
| सोनें इंग्लंडांत | २,७० ,, |
| बँक ऑफ् इंग्लंडमध्यें | २,७० ,, |
| सिक्यूरिटी .... .... | ११,०० ,, |
| | १६,६२. लक्ष. |

सप्टेंबर १९०७ मध्यें स्टेटसेक्रेटरीजवळ ४६ $\frac{१}{२}$ कोटि पौंडांचा ऐवज होता तो सप्टेंबर १९०८मध्यें १६,६२ लक्षांवर आला; ह्मणजे अदमासें ३० कोटि रुपयांचें निःसारण झालें. याशिवाय आपला खर्च भागविण्याकरितां स्टेटसेक्रेटरीनें १० कोटींचें कर्ज काढलें तें अलाहिदा. एकंदरीत अदमासें ४ कोटींची तूट या संकटांत आली.

याच वेळेस आणखी एक दुष्काळचें साल असतें तर निधीची स्थिति फार वाईट झाली असती. २०।२५ कोटींचें नवीन कर्ज काढावें लागलें असतें. सुदैवानें हें वर्ष सुबत्तेचें होतें, त्यामुळें पुन्हां निर्यात सुरू होऊन हुंडयांची मागणी सुरू झाली. यानंतर

हुंडणावळ खाली गेल्यामुळें १९०९ च्या आगष्ट व सप्टेंबर महिन्यांत पुन्हां उलट हुंडया विकणें भाग पडलें. यानंतर अशा तऱ्हेचें संकट महायुद्धापर्यंत आलें नाहीं. तथापि या कालाच्या इतिहासांवरून हल्लींच्या सुवर्णसंलग्नचलनाप्रमाणें इंग्लंडांत किती रक्कम पौंडांत ठेविली पाहिजे याचा अंदाज करतां येईल.

आतां इंग्लंडांत पौंड द्यावयाचे ते जोपर्यंत शिलकेंतून देतां येतात तोंपर्यंत हिंदुस्थानांतील रुपयांस धक्का पोंचत नाहीं. परंतु सुवर्णचलन निधि व नोटांचा निधि यांतून ते पौंड दिल्यास तितकेंच रुपये चलनांतून काढून त्या त्या निधींमध्यें हिंदुस्थानांत घालावे लागतात. उदाहरणार्थ, एकंदर चलनांत ५४ कोटींच्या नोटा असल्यास कायद्याप्रमाणें १४ कोटि सिक्यूरिटी ठेवण्याची परवानगी आहे व बाकीचे ४० कोटि पौंड किंवा रुपये रोख असले पाहिजेत. याची विल्हेवाट खालीं लिहिल्याप्रमाणें आहे अशी कल्पना करा.

| इंग्लंडांत | ( लक्ष ) | हिंदुस्थानांत | ( लक्ष ) | |
|---|---|---|---|---|
| सिक्यूरिटी | ४. | सिक्यूरिटी | १०. | + २ |
| इंग्लंडांत सोनें | ८. | हिंदुस्थानांत सोनें | १५. | |
| | १२. | हिंदुस्थानांत रुपये | १५. | + ८ |
| | —१० | हिंदुस्थानांत रुपे | २. | |
| | | | ४२. | +१० |

आतां उलट हुंड्या १० कोटींच्या विकल्या अशी कल्पना करा. हे पैसे ४ कोटि सिक्यूरिटी विकून व ६ कोटींचें सोनें देऊन फेडून टाकिले. बाकी इंग्लंडांत फक्त २ कोटींचें सोनें राहिलें, परंतु कायद्याप्रमाणें ४० कोटि रोख शिल्लक पाहिजे; आतां फक्त हे दोन कोटि रुपये व हिंदुस्थानांत ३२ कोटि रुपये मिळून ३४ कोटि राहिले. त्यामुळें आणखी ६ कोटि रुपये चलनांतून काढून किंवा खजिन्यांतून काढून हिंदुस्थानांत शिल्लक ३८ कोटि केली पाहिजे. त्याचप्रमाणें सिक्यूरिटी १४ कोटींच्या ऐवजीं १० कोटिच राहिल्या. ह्मणून हिंदुस्थानांतील रुपयांच्या सिक्यूरिटी येथील निधींत घातल्या पाहिजेत; किंवा आणखी ४ कोटि रुपयांचे पौंड किंवा रुपये येथील निधींत घातले पाहिजेत. ह्मणजे जेवढें इंग्लंडमध्यें 'उणें' होईल, तेवढें हिंदुस्थानांत 'अधिक' केलें पाहिजे.

यावरून असें दिसून येईल कीं, रुपये चलनांतून काढण्याची शक्ति असल्याशिवाय उलट हुंड्या विकणें अशक्य असतें व जितके रुपये काढतां येतील तितकेंच सोनें इंग्लंडांत दिलें पाहिजे. येथील नोटांच्या निधींत ११ कोटि ५० लक्ष रुपये १९०८च्या मार्चमध्यें घातले; डिसेंबरमध्यें निधींत घातलेले एकंदर रुपये १५ कोटि ४० लक्षांपर्यंत गेले. नंतर सुवर्णचलननिधींतून इंग्लंडांत सोनें दिल्यामुळें येथील सुवर्णचलननिधींत १९०८ च्या नोव्हेंबर महिन्यांत १३ कोटि रुपये भरावे लागले. याशिवाय नेहमींच्या

शिल्कींतही पुष्कळ रुपये जास्त जमा झाले. एकंदर ३० कोटि रुपये याप्रमाणें चलनांतून काढावे लागले.

पौंडांचे रुपये देणें व रुपयाचे पौंड देणें हें सुवर्णसंलग्नपद्धतीचे हद्दीत असल्यामुळें, हुंड्या व पौंड जितके हिंदुस्थानांत येतील तितक्यांच्या मोबदला रुपये देतां येतील इतका रुपयांचा निधि हिंदुस्थानांत पाहिजे. त्याचप्रमाणें उलटहुंड्या विकण्याचा प्रसंग आल्यास त्या सर्व पटविण्याइतकें सोनें इंग्लंडांतील निधींत पाहिजे. ही त्यांच्या कार्यक्षमतेची कसोटी आहे. हल्लींच्या धोरणाप्रमाणें जितके रुपये निधींत जास्त असतील तितकें सोनें कमी असतें. रुपये कमी असल्यास सोन्याच्या मोबदला नवीन रुपें घेऊन ते पाडतां येतात. परंतु सोन्याचा निधि कमी असल्यास, हुंडणावळ खालीं जाऊन सुवर्णसंलग्नचलनाचा पाया डळमळीत होतो. याकरितां रुपये अगदीं आवश्यक तेवढे ठेवावे व पौंडाचा निधि जास्त प्रमाणांत ठेवावा. १९०७ च्या संकटकाळच्या अनुभवावरून पाहिलें तर, दोनही निधींत मिळून चाळीस कोटींचें सोनें अथवा सिक्यूरिटी ठेवणें अत्यावश्यक आहे.

रुपये अगदीं आवश्यक तेवढे ठेवल्यास, संकटकाळीं रुपें किती विकत घेतां येईल व तें कोणत्या भावानें विकत घेतां येईल ह्याचा पूर्ण विचार केला पाहिजे एक मार्ग असा आहे कीं, गुप्त रीतीनें एखाद्या दलालाच्या मार्फत रुपें खरेदी करणें; दुसरा मार्ग ह्मणजे राजरोस बाजारांत जो भाव पडेल तो देऊन खरेदी करणें.

पहिल्या मार्गानें स्वस्त भावानें खरेदी करतां येते; परंतु त्यामध्यें सरकारी अधिकाऱ्यांवर टपका येण्याचा संभव असतो. याकरितां दुसरा मार्ग हाच उत्तम आहे. एक दोन कोटींचें रुपें निर्धीन ठेवावें व अडचण पडल्यास बाजारभावानें लागेल तेवढें खरेदी करावें. शिवाय हल्लीं रुपये चलनांत इतके झालेले आहेत कीं, सरकारजवळ २०।२५ कोटि रुपये नेहमीं राहतील व नवीन रुपये पाडण्याची आवश्यकता राहणार नाहीं. नोटांचें चलन जास्त लोकप्रिय झालें ह्मणजे हुंड्यांच्या ऐवजीं रुपये न मागतां लोक नोटांवर व्यवहार करूं लागतील.

आतां रुपें वाटेल तेव्हां मिळेल असें धरून चाललें तरी त्याचे रुपये पाहिजे तितक्या जलदीनें पाडतां येतील किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे. जास्त वेळ काम केल्याशिवाय येथील टांकसाळींत एका महिन्यांत २ १/२ कोटि रुपये पडूं शकतात व अधिक वेळ काम केल्यास ४ कोटींपर्यंत पडूं शकतात. डिसेंबर महिन्यांत नेहमींच्या अंदाजाप्रमाणें जी किमान मर्यादा असते, त्यापेक्षां ५।६ कोटि रुपये जास्त असले ह्मणजे साधारणरीत्या धास्ती बाळगण्याचें काम नाहीं. गेल्या दहा वर्षांच्या अनुभवावरून असें दिसतें कीं, जानेवारीपासून मेपर्यंतच्या तेजीच्या मोसमांत सरासरीनें स्टेट सेक्रेटरी १५।१६ कोटींच्या हुंड्या विकतो. इतके रुपये खजिन्यांत अवश्य ठेविले पाहिजेत. दुसरी बाब पौंडांची: सरासरीनें एका वर्षांत १०।१५ कोटींचे पौंड येतात असें व्यापाराच्या सरकारी अहवालावरून दिसून येईल. यापैकीं कांहीं पौंड

सरकारी खजिन्यांत राहतात; परंतु लोकांजवळ आलेल्या पौंडां- पैकीं कांहीं चलनांत राहतात व कांहींच्या मोबदला लोक रुपये मागतात. १९०२ पासून १९१३ पर्यंतच्या चार वर्षांत नोटांच्या निधींत एकंदर नवीन ३० कोटींचे पौंड आले. याचा अर्थ असा कीं, हे पौंड पटवून लोकांनीं नोटा किंवा रुपये नेले. याची सरासरी काढली असतां दरसाल ७ $\frac{१}{२}$ कोटि होते; परंतु कधीं कधीं रुपयांची टंचाई न पडतां, उलट रुपये सरकारास देऊन लोक पौंड नेतात. याबद्दल थोडीशी कसर काढली तरीसुद्धां पौंडांच्याकरितां दरसाल अदमासें ५ कोटि रुपये लागतील असें धरून चालण्यास हरकत नाहीं. एकूण हुंड्यांचे १६ कोटि व पौंडांबद्दल ५ कोटि (= २१ कोटि) इतकी शिलक जानेवारीच्या आरंभीं आवश्यक अशी किमान मर्यादा आहे. यांत ६ कोटि जास्त मिळवून २७ होतात. एवढा रुपयांचा निधि असला ह्मणजे पुरें आहे.

आतां सोन्याचा निधि किती असला पाहिजे याचा तपशीलवार विचार करूं. निधीचा आकार ठरविण्यापूर्वीं त्या निधीचा उद्दिष्ट हेतु काय आहे हें ठरविलें पाहिजे. एका पक्षाचें ह्मणणें असें आहे कीं, सोन्याच्या निधीचा उद्देश फक्त रुपये दिले असतां कोणत्याही वेळीं सोनें देणें इतकाच आहे. सुवर्णसंलग्नाच्या व्याख्येप्रमाणें हें चलन सुवर्णाशीं संलग्न असलें पाहिजे. ठराविक दरानें वाटेल तेव्हां रुपये दिल्यास, सोनें अथवा पौंड मिळाले पाहि-

जेत. दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें असें आहे कीं, वर लिहिलेला फक्त एक उद्देश आहे व तोही गौण आहे. सोन्याच्या निधींचा मुख्य उद्देश असा आहे कीं, निर्यातमालापेक्षां आयातमाल जास्त झाल्यामुळें किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळें (उदाहरणार्थ, येथील बँकाचें दिवाळें वाजण्याची वेळ आल्यास) आह्मांला जें आंतरराष्ट्रीय देणें संकटकाळीं द्यावें लागेल, तें सर्व देणें सोन्यांत देतां यावें. या दोन उद्देशापैकीं दुसऱ्या उद्देशाच्या अनुरोधानें हल्लींचें सरकारचें धोरण बहुतकरून ठरवितात.

पहिल्या उपपत्तीप्रमाणें निधि विशेष मोठा असण्याची जरूर नाहीं. आंतरराष्ट्रीय देणें असल्यास त्याबद्दल तरतूद करणें हें बँकांचें काम आहे. फक्त हें देणें सोन्यांत द्यावयाचें असल्यामुळें, बँकाजवळच्या नोटा व रुपये घेऊन त्यांना पौंडांचा ड्रॅफ्ट देणें एवढेंच सरकारचें काम आहे. जेवढ्या नोटा व जेवढे रुपये चलनांतून काढतां येतील, तेवढा सोन्याचा निधि ठेविला ह्मणजे झालें. उदाहरणार्थ, चलनांतून ३० कोटि रुपये काढतां येतील असा अंदाज असल्यास २ कोटि पौंडांचा निधि इंग्लंडांत असला ह्मणजे काळजी करण्याचें कारण नाहीं.

हा अंदाज आतां आपण विशेष बारकाईनें करूं. एकंदर चलनांत १९१२ साली अदमासें १७५ कोटि रुपये खरोखरी चलनांत होते असें पूर्वीं (प्रकरण ३ पहा.) सांगितलेंच आहे. त्यामध्यें आणखी २५ कोटि रुपये नवीन पाडलेले घालून महा-

युद्धाच्या सुरुवातीस रुपयांचें एकंदर चलन २०० कोटि रुपयांचें होतें असें मानण्यास हरकत नाहीं. यांमध्यें ५० कोटींच्या नोटा मिळविल्या ह्मणजे एकंदर चलन २५० कोटि झालें.

संकटकाळीं यापैकीं किती रकम चलनांतून काढणें परवडेल ह्याचें अनुमान केलें पाहिजे. १९०८ च्या आणीबाणीच्या प्रसंगीं जवळ जवळ ४० कोटि रुपये कमी झाले व तितकेच पौंड इंग्लंडांत द्यावे लागले हें वर दिलेंच आहे. याहीपेक्षां कठिण प्रसंग येणें सध्यांच्या काळीं शक्य दिसत नाहीं. तथापि याही-पेक्षां कठिण असा परीक्षेचा काळ आल्यास, यापेक्षां १५ अथवा कमाल ह्मणजे १० कोटि रुपये जास्त काढावे लागतील. हें अनुमान बरोबर असल्यास, एकंदर सोन्याचा निधि ६० कोटि रुपयांच्या किंमतीचा असला ह्मणजे त्यापेक्षां अधिक वाढविणें हें अपव्यय करण्यासारखें होईल. सिक्यूरिटीबद्दल जरी व्याज येतें तरी रोख पौंड व सोनें असतें तें बिनव्याजीं अडकून पडलेलें असतें. यामुळें कमाल मर्यादेच्या बाहेर निधि ठेवणें हें हानि-कारक आहे.

आतां दुसऱ्या उपपत्तीप्रमाणें निधींच्या कर्तव्याची व्याख्या केली असतां कमाल मर्यादा काय ठरते तें पाहूं. एक प्रसंग अशा तऱ्हेचा आहे कीं, हिंदुस्थानांतील बँकांनीं शिल्लक कमी ठेविल्यामुळें अथवा सट्टेबाजी केल्यामुळें त्यांना आपल्या ठेवी परत देतां येणें शक्य नाहीं. नवीन कंपन्या काढणें, आयात

माल अविचारानें वाटेल तितका मागविणें, कडक दुष्काळ पडणें इत्यादि कारणांनीं असा प्रसंग येण्याचा पुष्कळ संभव असतो. एक दोन बँका बुडाल्या ह्मणजे लोक सावध होऊन इतर बँकांतूनही पैसे काढूं लागतात. रुपये व पौंड हे आपल्याजवळ रोख ठेवण्याची प्रवृत्ति वाढते. त्यामुळें सर्व बँकांची स्थिति शोचनीय होते व कोणीकडून तरी रोख पैसे जमा करण्याकडे त्यांचें लक्ष लागतें. अशा वेळीं सरकारी बँका (Presidency Banks) हाच काय तो सर्व बँकांचा मोठा आधार असतो. अशा वेळीं सरकारी बँकांनीं २।४ कोटि रुपये मागितल्यास ते देणें सरकारचें काम आहे काय? अशा तऱ्हेचा हा प्रश्न आहे. अशा तऱ्हेची मदत करणें हें सरकारचें काम आहे. असें मानल्यास तसें करणें विशेष अवघड नाहीं. २।४ कोटि रुपये तीनही सरकारी बँका मिळून थोडक्या मुदतीनें सरकारास केव्हांही देतां येतील.

आतां दुसऱ्या तऱ्हेचें व याहीपेक्षां जास्त सत्वपरीक्षा करणारें संकट दुष्काळाच्या सालीं अथवा इतर कोणत्याही कारणांनीं आयात जास्त झाली असतां येतें. परंतु या संकटांत प्रथम रुपये घेऊन इंग्लंडांत पौंड देण्याचा प्रसंग येतो त्यामुळें पौंडाच्या निधीचा आकार पूर्वी हिशोब केला त्यापेक्षां मोठा असण्याची आवश्यकता नाहीं. फार झालें तर ३०।३५ कोटींपर्यंत सोनें द्यावें लागेल व आपण कमाल मर्यादा ६० कोटींची ठरविलेलीच आहे.

कांहीं लोकांची कल्पना अशी आहे कीं, एखादे वेळीं दोन तीन दुष्काळाचीं वर्षें एकामागून एक आल्यास ६० कोटींचा निधि पुरावयाचा नाहीं; परंतु गेल्या पन्नास वर्षांच्या अनुभवानें असें होणें हें अशक्यप्राय असल्यामुळें, त्याविषयीं विचार करण्याचें कारण नाहीं.

आतां दुष्काळामुळें आलेलें संकट व देशांतील बँकांची त्रेधा अशीं दोनही एकवटल्यास, निधींची स्थिति काय होईल? अशा वेळीं प्रत्येक जण रुपये किंवा नोटा बँकांतून काढून आपल्या घरीं ठेवील, त्यामुळें उलटहुंड्या विकत घेण्यास लागणाऱ्या नोटा व रुपये बँकांजवळ राहणार नाहींत. व्याजाचा दर भडकून जाईल व बँकांना उलटहुंड्या रोख पैसे न घेतां दुसऱ्या कांहीं तारणावर सरकारास देणें भाग पडेल. वास्तविक पहातां, सरकारनें मदत करणें हें देशाच्या हिताच्या दृष्टीनें बरोबर होईल; परंतु प्रत्येक संकटांत सरकार आपल्यास मदत करील अशी बँकांची खात्री झाल्यास, त्यांची स्वतःच्या जबाबदारीची जाणीव दुर्बल होईल व ते हल्लींपेक्षांही कमी शिल्लक ठेवूं लागतील.

या सर्व अडचणी टाळण्यास एकच उपाय आहे. तो हा कीं, इंपीरियल बँकेच्या हातांत सरकारी सर्व शिल्लक देऊन, संकटकालीं तिचा उपयोग कसा करावा हें सर्वस्वी तिच्या चालकांच्या हातांत ठेवावें. असें केल्यानें सरकार जसें आजपर्यंत बँकिंगच्या व्यवहाराच्या बाहेर राहून तटस्थ राहत असे, तसें न होतां, इंपी-

रियल बँकेचा व एकंदर बँकिंगचा निकट संबंध येऊन ते आप-सांत कोणतेंही धोरण ठरवितील. अशा संकटांत इंपीरियल बँकेनें आपल्या जवळचे रुपये, पौंड व सोनें हें इतर बँकांस शक्य तेवढें देण्याचा प्रयत्न करावा. वाटलें तर या कर्जाबद्दल व्याजाचा दर ८।१० टक्के ध्यावा; परंतु जवळ शिलक असतां देशांतील बँकांचें दिवाळें वाजण्याचा प्रसंग येऊं देणें हें कधींही हितावह होणार नाहीं.

इंग्लंडांत अशा आणीबाणीच्या प्रसंगीं बँक ऑफ् इंग्लंड आपली शिलक इतर बँकांस शक्य तितक्या प्रमाणांत देण्याचें वचन देते व त्यामुळें पुष्कळ वेळां अनिष्ट प्रसंग टळून सर्व स्थिरस्थावर होतें. तेंच काम येथें इंपीरियल बँकेनें केलें पाहिजे. सर्वांत महत्वाचा मुद्दा असा आहे कीं, थोडकी थोडकी रक्कम प्रत्येक आठवड्यांत देण्यापेक्षां, मोठी रकम एकदम देऊं करणें हें जास्त परिणामकारक असतें. त्या योगानें वेळींच लोकांची भीति कमी होऊन, पुढें येणारें संकट पुष्कळ वेळां टळतें. उलट असें न करितां तटस्थ राहिल्यास, बँकांची स्थिति अधिक अधिक अस्थिर होऊन, त्यांची शिलक कमी होते व नंतर पहिल्या रकमेच्या चौपट रकम देऊनही कार्य होत नाहीं.

हिंदुस्थानांतील बँका अगदीं नवीन असल्यामुळें व त्यांपैकीं पुष्कळ आपल्या व्यवहारांत अद्यापि वाकब झाल्या नसल्याकारणानें, बँकांचें दिवाळें वाजण्याचा संभव केव्हां येईल याचा नियम

नाहीं. या कल्पनेंवरच सध्यां निधींच्या आकाराचें प्रमाण बसविलें पाहिजे. १९०७।८ मध्यें आंतरराष्ट्रीय देणें जास्त झालें, परंतु बँकांची हिंदुस्थानांत विशेष त्रेधा झाली नव्हती. त्यामुळें उलटहुंड्या विकून पौंड दिल्याबरोबर सर्वत्र शांतता झाली; परंतु नेहमीं असेंच होईल असें मानतां येत नाहीं. विशेषतः नोटांची लोकप्रियता ही अगदीं आधुनिक असल्यामुळें, नोटांविषयीं अविश्वास होऊन, नोटा व रुपये जमविण्याची हूल केव्हां उठेल याचा नियम नाहीं. अशा स्थितींत रुपयांचा निधि व पौंडांचा निधि हे दोनही भरभक्कम असल्याशिवाय अशा संकटास पाठ देतां येणार नाहीं. बँकांवरील विश्वास उडाला तरी लोकांनीं नोटा घेण्याचें कबूल केल्यास पुष्कळ काम होईल. कारण नोटा व्यवहारांत राहिल्यास, रुपये व पौंड यांवर विशेष भार पडणार नाहीं; पण याप्रमाणें होईलच असें खात्रीनें सांगतां येत नाहीं.

अशा तऱ्हेनें सरकारची जबाबदारी ही फक्त रुपयांच्याऐवजीं पौंड देण्याची नसून, व्यापाराच्या देवघेवींत चलबिचल झाली असतां जी आपत्ति येईल, तिचा प्रतिकार करण्याचीसुद्धां आहे. असें मानलें तर ६० कोटि रुपयांचा सोन्याचा निधि बस्स होईल किंवा नाहीं? हा प्रश्न सोडविण्यास व्यापाराच्या आंकड्यांचा व हिंदुस्थानास नवीन कर्ज दरसाल किती काढावें लागतें याच्या आंकड्यांचा तपशील पाहिला पाहिजे.

गेल्या पंधरा वर्षांत सामान्यतः आयात मालापेक्षां निर्यात मालाचें आधिक्य ६० कोटींचें होतें. दुष्काळाच्या सालीं हा फरक ३० कोटींपर्यंतच असतो. दुष्काळाच्या साली, होमचार्जेस अदमासें ३० कोटि व नवीन कर्ज अदमासें १० कोटि यांस मात्र दुसऱ्या बाजूला घातलें म्हणजे दोनही बाजूंचें तोंड मिळालें. परंतु आयात व निर्यात यांमधील फरक २५ कोटिच असल्यास व ३० कोटि रुपय.चें कर्ज पाहिजे तेव्हां थोडक्या व्याजानें न मिळाल्यास एवढी तूट येईल व ही तूट निधींमधून भरून काढावी लागेल. नवीन कर्ज किती काढावें लागतें हें एकंदर तोंडमिळवणीवर अवलंबून असतें. तोंडमिळवणी न झाल्यास नवीन कर्ज इंग्लंडांत काढतात. १९०९ मध्यें १७ कोटींचें कर्ज काढावें लागलें; परंतु १९१० मध्यें निर्यात पुष्कळ असल्यामुळें ५ कोटींचेंच कर्ज काढालें. १९११ मध्यें निर्यात माल आयात मालापेक्षां ८२ कोटींनीं जास्त असल्यामुळें फक्त ६०,००० रुपयांचेंच कर्ज काढलें. एकंदर सरासरी काढली असतां, कितीही वाईट साल असलें तरी १० कोटींपेक्षां अधिक कर्ज काढावें लागेल असें वाटत नाहीं.

वरील विवेचनावरून पुढील अनुमानें निघतात. नोटा किंवा रुपये घेऊन पौंड देण्यास ६० कोटि पुरे आहेत. कारण ३०।४० कोटींचा उलट हुंड्या व १० कोटि रुपये नवीन कर्ज हें सर्व त्यांत भागतें. याशिवाय बँकांना मदत देण्याची वेळ आल्यास

इंग्लंडांत १० कोटि रुपयांचें अधिक सोनें असलेलें फायदेशीर होईल. ह्या सोन्याच्या आधारावर सरकारी उलट हुंड्यांशिवाय एक्सचेंज बँकांना पौंडाचे ड्रॅफ्ट देतां येतील किंवा हे पौंड हिंदुस्थानांत पाठवून रुपये घेतां येतील. हे १० कोटि मिळविले असतां सोन्याच्या निधींची कमाल मर्यादा ७० कोटि होईल. यापेक्षां अधिक ठेवण्याची आवश्यकता नाहीं.

आतांपर्यंत एकंदर निधीविषयीं विवेचन झालें. परंतु यापैकीं कोणता भाग सुवर्णचलन निधींत असावा व कोणता भाग नोटांच्या निधींत असावा यासंबंधानें पुष्कळ मतभेद असल्यामुळें याविषयीं तपशीलवार विवेचन केलें पाहिजे. लॉर्ड कर्झन यांचे वेळीं सुवर्णचलन निधींत १९ कोटि रुपये असावे असें सरकारी अर्थशास्त्रज्ञांचें मत होतें. नंतर १९१२।१३ च्या सुमारास हा निधि ४० कोटींचा असावा असें अधिकाऱ्यांचें मत होतें. चेंबरलेन कमिशनच्या मतानें ४० कोटि ही मर्यादा अपुरी असून यापेक्षां जास्त सोनें या निधींत असावें. १९१९ मध्यें हा निधि जवळ जवळ ५५ कोटींचा होता. इतकें असूनही नवीन रुपये पाडण्यापासून जो नफा होतो, तो अद्यापि या निधींत घालण्याचा क्रम चालू आहे. हिंदुस्थानांतील अर्थशास्त्रज्ञांच्या मतें हें धोरण चुकीचें आहे. त्यांच्या मतें हा निधि आतां बंद करून ठेवावा व रुपये पाडून होणारा फायदा नेहमींच्या जमाखर्चांत घालून त्याचा खर्चाकडे विनियोग करावा.

प्रो० कीन्स यांच्या मतें* '१६ कोटि पौंडांच्या सिक्यूरिटींत ठेवावे व बाकीचे हिंदुस्थानांत किंवा इंग्लंडमध्यें सोन्याचें नाणें किंवा सोनें या स्वरूपांत ठेवावे. नोटांच्या निधींतील ६ कोटींचं सोनें काढून टाकून ते सुवर्णचलननिधींत ठेवावें व सुवर्णचलननिधींतील ६ कोटि रुपये नोटांच्या निधींत ठेवावे. असें केल्यानें सुवर्णचलननिधींत फक्त सोनें राहील व त्याचें स्वरूप मिश्र न होतां एकाच जातीचें होईल.' ही सूचना विचार करण्यासारखी आहे.

हल्लीं सुवर्णचलननिधींत ६ कोटींचे रुपये असतात. त्यामुळें दोनही निधींत रुपये व पौंड झाल्यामुळें घोंटाळा होतो. याकरितां सुवर्णचलननिधि हा पौंडांच्या सिक्यूरिटी किंवा सोनें या स्वरूपांत असल्यानें, हिशोबांत जास्त व्यवस्थितपणा येईल.

१९२० नोव्हेंबरमध्यें सुवर्णचलननिधि येणेप्रमाणें होता.

| | पौंड. |
|---|---|
| सोनें हिंदुस्थानांत | ०. |
| रोख शिलक इंग्लंडांत | २१७. |
| सिक्युरिटी सप्टेंबरपर्यंत | १८,६१०,४७७. |
| सिक्युरिटी नवीन घेतलेल्या | १९,२२५,२१२. |
| | ३७,८३५,९०६. |

*Keynes's Indian Currency and Finance, pp. 173-174.

नोटांच्या निधींत सोनें किती असावें व पौंडांच्या सिक्यूरिटी किती असाव्या याविषयींसुद्धां मतभेद आहे. महायुद्धाच्या अडचणीमुळें या निधिपैकीं ९८ $\frac{१}{२}$ कोटींचा भाग ट्रेझरी बिल्स व इतर पौंडांच्या सिक्यूरिटी या स्वरूपांत ठेवण्याविषयीं विशिष्ट कायदा केलेला आहे; परंतु महायुद्धाच्या पूर्वी फक्त ४ कोटि रुपये पौंडांच्या सिक्यूरिटींत ठेवण्याची परवानगी असे. याशिवाय नोटांचा निधि हा रुपयांत किंवा पौंडांत ठेवण्याचा विकल्प असल्यामुळें, या निधींत १९०० सालापासून इंग्लंडमध्यें सोनें ठेवूं लागलें, हें पूर्वी ( प्रकरण ३ यांत ) सांगितलेंच आहे. १९०३ पासून १९१३ पर्यंत दहा वर्षांत या निधींत सरासरीनें दरसाल १५ कोटि रुपयांचें सोनें ( अथवा पौंड ) असे. हिंदुस्थानांतील आक्षेपकांचें असें ह्मणणें आहे कीं, ४ कोटींच्या पौंडांच्या सिक्यूरिटींशिवाय बाकी सर्व नोटांचा निधि हिंदुस्थानांत असावा. हल्लीं इंपीरियल बँक स्थापल्यामुळें हें त्यांचें तत्व अमलांत आणण्यास कोणतीही हरकत दिसत नाहीं. वास्तविक नोटांचा निधि इंग्लंडांत असणें अगदींच व्यवहारास सोडून आहे. नोटा पटविण्याकरितां जो निधि आहे, तो येथेंच असला पाहिजे. १९१३ पासून पुढें या निधींत जास्त सोनें ठेवूं लागले. नोटांची संख्या जशी वाढूं लागली, तसतसा एकंदर निधि वाढूं लागला व त्या प्रमाणानें निधींतील सोनेंही वाढूं लागलें. महायुद्धाचे सुरवातीस हें सोनें कमी करून याच्या ऐवजीं ३४ कोटींपर्यंत पौंडांच्या

सिक्यूरिटी इंग्लंडांत ठेवण्याची कायद्यानें परवानगी दिली व ही मर्यादा पुढें ९८ कोटींपर्यंत गेली.

हल्लीं ह्मणजे फेब्रुवारी १९२१ मध्यें नोटा व निधि यांचा तपशील खालीलप्रमाणें आहे.

| | |
|---|---|
| नोटा एकंदर | १६३,४१,२५,०२५. |
| निधि रुपये | ५८,१४,८३,७९७. |
| सोनें व पौंड हिंदुस्थानांत | २३,११,१०,८६१. |
| रुपये टांकसाळांत पडत आहेत | ४,०४,४४,२५९. |
| सोनें इंग्लंडांत | ०. |
| सिक्यूरिटी हिंदुस्थानांत | ६८,०७,१५,१४६. |
| सिक्यूरिटी इंग्लंडांत | ८,१४,१०,२०२. |
| निधीची बेरीज | १६३,४१,२५,०२५. |

यावरून असें दिसून येईल कीं, निधींपैकीं सोन्याचा भाग ७० कोटींपर्यंत असला ह्मणजे पुरें झालें असें जें वर आपण ठरविलें, त्याप्रमाणें वस्तुस्थिति आहे; एवढेंच नव्हे तर, या मर्यादेच्याही पलीकडे सोन्याचा एकंदर निधि गेलेला आहे. महायुद्धांतील व्यवस्था अपवादक ह्मणून जरी सोडून दिली, तरीही महायुद्धाचे सुरवातीस अशी स्थिति होती.

| | | लक्ष (अंदाजानें). |
|---|---|---|
| नोटांचा निधि | सोनें हिंदुस्थानांत | २७००. |
| | सोनें इंग्लंडमध्यें | ११००. |
| | सिक्यूरिटी | ४००. |

| | | |
|---|---|---|
| सुवर्णचलननिधि | सोनें इंग्लंडमध्यें | ३७ |
| | कर्जाऊ दिलेले | १,५०. |
| | रोख शिल्लक बँक ऑफ् इंग्लंड | ११,००. |
| | सिक्यूरिटी | २४,००. |
| | | ७७,८७. |

याप्रमाणें एकंदर सोन्याचा निधि जवळ जवळ ७८ कोटि होता. हिंदुस्थानांतील तज्ज्ञांचें असें ह्मणणें आहे कीं, ७० कोटींच्या वर जो निधि आहे, तो इंग्लंडांत न ठेवितां हिंदुस्थानांत आणून त्याचा येथील व्यापारास फायदा होईल अशी व्यवस्था करावी.

नोटांच्या चलनाचा कांहीं भाग खाजगी व्यापाऱ्यांच्या हुंड्यांच्या रूपांत असणें इष्ट आहे. असें केल्यानें ज्या व्यापाऱ्यास पैसे पाहिजे असतात, त्याला असल्या हुंड्या (ह्या हुंड्या ह्मणजे कौन्सिलबिलें नव्हेत हें लक्षांत ठेवावें.) गहाण लावून नोटांच्या निधीमधून नोटा अथवा रुपये घेतां येतील. अशा तऱ्हेचें एक कलम नवीन इंपीरियल बँकच्या कायद्यांत घातलेलें आहे. (परिशिष्ट १ पहा.) प्रो० कीन्स यांच्या मतानें नोटांच्या निधीचा $\frac{1}{3}$ भाग या स्वरूपांत असावा. त्यापैकीं कांहीं इंग्लंडांत असावा व कांहीं हिंदुस्थानांत असावा.

हिंदुस्थानांत जो पौंडांचा निधि असतो, त्यासंबंधानें एक प्रकारची सावधगिरी ठेविली पाहिजे. हुंडणावळ हिंदुस्थानास

प्रतिकूल झाली म्हणजे लोकांस हें सोनें देण्यास काढल्यास, तें फक्त बँकांसच द्यावें व त्यांपासून तें देशाच्या बाहेर पाठविण्या संबंधानें करार लिहून घ्यावा. खाजगी व्यक्तींना पौंड देऊं लाग ल्यास, ते इतस्ततः पसरले जाऊन त्यांचा हुंडणावळीकरितां उपयोग न होतां, वितळण्याकडे, दागिने करण्याकडे अथवा संचय करण्याकडे उपयोग होतो.

आतां हा सर्व सोन्याचा निधि लंडनमध्यें असावा किंवा हिंदुस्थानामध्यें असावा? भारतवासी तज्ज्ञांचें मत अर्थातच असें आहे कीं, हा निधि हिंदुस्थानांत असावा इंग्लंडमध्यें असण्यांत असा फायदा आहे कीं, आंतरराष्ट्रीय देणें देण्याचें असल्यास, या निधीच्या आधारावर इंग्लंडांत तें फेडून टाकतां येतें; परंतु यावर त्यांचें उत्तर असें आहे कीं, दहा वर्षांत एकदां आंतरराष्ट्रीय देण्यामुळें संकट येतें. तेवढ्याकरितां हा निधि दहा वर्षे इंग्लंडमध्यें ठेवण्याचें प्रयोजन नाहीं. हा सर्व निधि येथें ठेविल्यास त्याबद्दल इंग्लंडांत जेवढें व्याज मिळतें त्यापेक्षां जास्त व्याज येथें मिळेल व हिंदुस्थानांतील व्यापारास या रकमेचा अंशतः तरी फायदा मिळेल. यद्यपि कांहीं निधीचा भाग इंग्लंडमध्यें असावा असें मानलें तरी ही निदान निम्मे भाग तरी हिंदुस्थानांत असावा. फार झालें तर एवढेंच होईल कीं, दहा बारा वर्षांनी एकदां सोनें अथवा पौंड इंग्लंडांत पाठवावे लागतील व त्याबद्दलचा पाठविण्याचा खर्च हिंदुस्थानास सोसावा लागेल.

सुवर्णसंलग्नचलनाचे जे कट्टे भक्त आहेत त्यांचें ह्मणणें असें आहे कीं सोन्याचा निधि हा विशेषतः संकटकाळीं आंतरराष्ट्रीय देणें देण्याकरितां ठेवण्याचा असतो; यामुळें तो केंद्रीभूत असलेला चांगला व ज्या ठिकाणीं आंतरराष्ट्रीय देणें सहज देतां येईल अशा ठिकाणीं तो असावा. असें ठिकाण ह्मणजे अर्थात् लंडन हेंच होय. शिवाय हिंदुस्थान हा साम्राज्याचा घटक असल्यामुळें लंडन हें परकीय नसून साम्राज्याचीच राजधानी आहे. ' यूयं वयं वयं यूयं ' अशी भावना असावी. हिंदुस्थानांतच निधि असावा ही इच्छा फक्त मनोविकारानें प्रेरित झालेली असून हिच्यांत विचारशक्तीचा गंधही नाहीं. हें सर्व ठीक आहे. यावर उत्तर एकच आहे; तें असें कीं, आमच्या निधीचा फायदा आमच्या व्यापारास होणें हेंच युक्तिवादास धरून आहे. १९१२ च्या मार्चमध्यें वरिष्ठ कौन्सिलांत सर विठ्ठलदास थाकरसी यांनीं सुवर्णचलननिधि हिंदुस्थानांत असावा अशा अर्थाचा ठराव पुढें आणला व सर्व हिंदुस्थानी सभासदांनीं त्याला अनुकूल मत दिलें. परंतु अखेरीस ३३ विरुद्ध २४ अशीं मतें पडून हा ठराव रद्द झाला.

१९०८ मध्यें नामदार गोखले यांनीं कौन्सिलांत भाषण केलें त्यांत ते ह्मणाले " या सर्व घोंटाळ्यांतून बाहेर पडण्यास एकच मार्ग आहे. तो असा—युनायटेड स्टेट्स व फ्रान्स प्रमाणें रुपये हे वाटेल त्या प्रमाणांत कायदेशीर फेडीचें चलन समजावें. परंतु

नवीन रुपये पाडण्याचें बंद करून सोन्याचें नाणें सुरू करावें" सुवर्णचलन स्थापित झालें म्हणजे निधि, हुंडणावळ, कौन्सिलबिलें, वगैरे सर्व 'पदार्थां' चा आपोआप अत्यंताभाव होईल.

आतां नेहमींची 'रोख शिलक' हा एक एकंदर सरकारी खजिन्याचा महत्वाचा भाग असल्यामुळें त्याविषयी विचार करूं. या शिलकेचा बराचसा भाग लंडनमध्यें ठेवून तो तेथील व्यापाऱ्यांस कर्जाऊ देऊं लागले, त्यामुळें याविषयीं हिंदुस्थानांत व इंग्लंडांत वर्तमानपत्रांतून बरीच टीका सुरू झाली. सरकारच्या बाजूनें या विषयींचें समर्थन असें आहे कीं, ही शिलक नेहमीं ठेवण्याचा विचार नसून, कांहीं आगंतुक कारणांनीं ती जमलेली आहे. हें पुष्कळ अंशीं खरें आहे. एकंदर ७० कोटि रुपयांचा निधि पुरें आहे असें वर दाखविलेंच आहे. याशिवाय जास्त पैसे इंग्लंडांत आल्यास ते पुनः हिंदुस्थानांतील रोख शिलकींत जमा केले पाहिजेत हें तत्व सरकारनें मान्य केलें पाहिजे. हल्लींची स्थिति अशी आहे कीं, एक तर पुष्कळशी शिलक हिंदुस्थानांत जमून ती बिनव्याजी पडून राहते किंवा ती इंग्लंडांतील शिलकेंत जमा करून व्याजानें तेथील व्यापाऱ्यांस देतात; परंतु याला उपाय अगदीं साधा आहे. हिंदुस्थानांतील शिलक हल्लींच्या कायद्याप्रमाणें लोकांस देतां नाहीं, म्हणून हा कायदा बदलून टाकून रोख रुपये दिल्याशिवाय लोकांस खजिन्यांतील नोटा कर्जाऊ देण्याची नवीन कायद्यानें व्यवस्था करावी. इंपी-

रियल बँकेंत ही शिलक ठेवून ती सरकारच्या धोरणाप्रमाणें लो-कांस द्यावी अशा तऱ्हेची योजना हल्लीं केलेली आहे. (परिशिष्ट १ पहा.)

नोटांचें चलन जास्त वाढत गेलें ह्मणजे लवकरच नोटांच्या निर्धीत जास्त रक्कम सांचेल. ही रक्कम पौंडांच्या रूपांत न ठेवितां रुपयांमध्यें ठेवून ती नेहमींच्या शिलकेंत जमा करावी. (किंवा शिलकेस कर्जाऊ द्यावी असें ह्मटलें असतां जास्त शोभेल.) नंतर ती तेजीच्या मोसमाच्या आरंभीं किंचित् जास्त व्याजानें—७।८ टक्के—फक्त तीन चार महिन्यांच्या करारानें येथील व्यापाऱ्यांस द्यावी. या रकमेचें काम होऊन, या मोसमाच्या अखेरीस ती लोकांना निरुपयोगी झाल्यावर ती सरकारजवळ मे महिन्यांत परत येईल. नंतर ती शिलकेंतून काढून पुनः नोटांच्या निर्धीत जमा करावी. ( अथवा नोटांच्या निर्धीचें कर्ज परत करावें. ) अशा रीतीनें शिलकेंत विशेष रक्कम न सांचतां, तिचा उपयोग व्यापारास लागणाऱ्या जास्त नोटा अथवा रुपये पुरविण्याकडे होईल.

१८६६ मध्यें सरकारची जी शिलक सरकारी बँकांत असे ती त्यांनीं नेहमींच्या देवघेवींत सामील करून त्याचा वाटेल तसा उपयोग करावा अशी कायद्यानें परवानगी दिली; परंतु १८७४ मध्यें सरकारनें आपली शिलक मुंबई येथील बँकेजवळ मागितली; परंतु ती तिला देतां आली नाहीं. त्या वेळचे स्टेट सेक्रेटरी लॉर्ड सॅल्सबरी यांनीं, सरकारनें इतःपर आपली शिलक आपल्याच

जवळ ठेवून थोड्या व्याजानें व थोडक्या मुदतीनें लोकांस द्यावी अशी सूचना केली; परंतु ही मान्य न होतां, ही शिलक 'रिझर्व्ह ट्रेझरी' मध्यें अडकवून ठेवण्याचा विचार पका झाला; परंतु पुनः १८७८ मध्यें रिझर्व्ह ट्रेझरीमधून वाटेल ती रकम व्यापारास देण्याची मुख्य खजिनदार (Comptroller General) यास परवानगी दिली. फक्त या कामांत असें नियंत्रण केलें कीं, अशा रकमा फक्त ४।५ महिन्यांच्या मुदतीनेंच कर्जाऊ द्याव्या व त्या फक्त सरकारी बँकांच्याच द्वारें लोकांस द्याव्या. अशा रीतीनें सरकारी बँकांना कर्जाऊ रकम देण्याचा क्रम सुरू झाला व तो १८९२ पर्यंत चालला. तथापि १८९२ पासून पुनः ही रकम देण्याचें सरकारनें कमी केलें व पांच चार अडचणीचे प्रसंगी दिलेलें कर्ज विचारांत न घेतल्यास, सामान्यतः असें म्हणतां येईल कीं, १८९२ पासून महायुद्धाच्या आरंभापर्यंत सरकारनें या बँकांस कर्जाऊ पैसे दिले नाहींत.

या पद्धतीचा एक दोष असा आहे कीं, सरकारी खजिन्यांत कोट्यवधि रुपये असूनही व्यापारास त्यांचा मुळींच फायदा होत नाहीं. रोख शिलक दरसाल वाढत चालली आहे. १८७८ मध्यें सरकारनें विशेष खबरदारी घेतली हें सयुक्तिक आहे. कारण त्या काळीं सरकारी बँकांमध्यें लोकांच्या ठेवीपेक्षां सरकारचे पैसे जास्त असत, किंबहुना जवळ जवळ तितकेच असत; परंतु हल्लीं बँकिंगची अमर्याद प्रगति झाल्यामुळें, सरकारी बँकांस सरकारचे

पैसे केव्हांही देण्याची पंचाईत पडणार नाहीं. यामुळें हल्लींच्या धोरणाचा कडकपणा थोडासा कमी केला पाहिजे. हल्लीं सरकारी रक्कम एकंदर रकमेच्या $\frac{१}{१०}$ असते. त्याचप्रमाणें सरकारी बँकांचें एकंदर भांडवल व त्यांची रोख शिल्लक हीं दोनही पूर्वींच्या दुपटी पेक्षां जास्त आहेत.

तथापि जास्त शिल्लक जरी ठेविली नाहीं, तरी कायद्यानें कांहीं शिल्लकेचा भाग सरकारी बँकांत ठेवावाच लागतो व यावर त्यांना व्याज द्यावें लागत नाहीं. साधारणपणें ही रक्कम १॥ कोटीपर्यंत असते. सरकारी बँकांच्या शाखांमध्यें सरासरीनें ३ कोटि रुपये शिल्लक असते. शाखांची शिल्लक ही वाटेल तेव्हां मागतां येते. दोनही मिळून एकंदर शिल्लक ४॥ कोटींपर्यंत असते. या शिवाय अशी सर्व शिल्लक जिल्ह्यांच्या खजिन्यांत व रिझर्व्ह खजिन्यांत ठेवलेली असते. संकटाच्या प्रसंगीं सरकारी बँकांस सरकार व्याजानें पैसे देतें.

या शिल्लकेंतून नेहमीं व्यापाराकरितां रकमा देतां येतील किंवा नाहीं हा प्रश्नच आहे. एखाद्या वर्षीं जरी शिल्लक चांगली असली तरी ती दर वर्षीं तशी असेलच असें नाहीं. विशेषत दुष्काळाच्या सालीं अथवा अर्धा दुष्काळ पडला तरी सुद्धां शिल्लक सांचण्याच्या ऐवजीं नेहमींच्या खर्चासच तूट पडते. विशेषत जमिनीचा महसूल हा जानेवारीच्या पुढें वसूल होतो व त्याचवेळीं

तेजीच्या मोसम सुरू होतो. यामुळें तेजीचा मोसमाकरितां शिलकांचा उपयोग होणें शक्य नाहीं.

सामान्यः जानेवारी १ ला व ऑगष्ट १ ला किति शिलक असते हे पुढील आंकड्यावरून दिसून येईलः—

| | जानेवारी १. | | आगष्ट १. | |
|---|---|---|---|---|
| | रि. खजिने | एकूण शिलक. | रि. खजिने | एकूण शिलक. |
| १९०६ | १,६० | १०,४६ | ५,२६ | १७,१८ |
| १९०७ | ३,२० | ११,८४ | ५,१८ | १७,११ |
| १९०८ | ७६ | ९,३१ | ७,४१ | १९.५४ |
| १९०९ | १,७४ | १०,१६ | ३,२२ | १३,६१ |
| १९१० | ५,८२ | १३,१८ | ९,४९ | २१,४३ |
| १९११ | ३.२१ | १५,१८ | ९,१२ | २२,६६ |

यावरून असें दिसतें कीं सामान्यतः शिलक जानेवारींत म्हणजे तेजीच्या मोसमाच्या आरंभीं १०।१२ कोटींपर्यंत असते. व ही शिलक रोजच्या व्यवहारापुरतीच असते. ही शिलक म्हणजे जिल्ह्यांतील खजिन्यांतील शिलक म्हटलें असतां हरकत नाहीं. तेव्हां फक्त रिझर्व्ह खजिन्यांत जी रक्कम आहे तीच फार झालें तर कर्जानें देतां येईल. जानेवारीनंतर शिलक वाढत जाते परंतु हुंड्या या महिन्यांत बऱ्याच विकतात. त्यामुळें ते सर्व रुपये पुन्हां लोकांच्या हातांत जातात.

यावरून शेवटीं शिलकींतून तेजीच्या मोसमांत व्यापारास पैसा मिळेल असें मानण्यास जागा नाहीं. लोकांना कर्जाऊ देण्याक-

रितां नोटांच्या निधीपैकीं ३१४ कोटि रुपयांचा उपयोग करावा हेंच उत्तम आहे. नोटा दिल्याशिवाय रुपये देण्याकरितां एक कायदा पास करून घ्यावा लागेल; परंतु असें करणें अवघड नाहीं. त्याचप्रमाणें खजिन्यांत जी शिल्लक आहे ती शक्य तितकी मोटांच्या रूपांत ठेवून रुपये सर्व नोटांच्या निधींत ठेवावे.

इंग्लंडमधील शिल्लक दोन स्वरूपांत असते. रोजच्या व्यवहारापुरती रक्कम बँक ऑफ् इंग्लंडमध्यें ठेविलेली असते. दुसरा हिस्सा उत्तम पतीच्या बँकांस, हुंड्यांच्या व्यापाऱ्यांस व शेअरच्या दलालांस कर्जाऊ देतात. ह्या व्यापाऱ्यांची दरसाल यादी करितात व त्या यादीस 'पसंत केलेले कर्जदार यांची यादी' असें ह्मणतात. अशा रकमेपासून बरेंच व्याज जमा होतें. ह्या रकमा दोन किंवा तीन महिन्यांपेक्षां जास्त मुदतीनें देत नाहींत.

१९१२ मध्यें या दुसऱ्या रकमासंबंधानें बरीच टीका इंग्लंडांत व हिंदुस्थानांत झाली. टीकाकारांचें ह्मणणें असें होतें कीं, व्याजानें रक्कम खावयास सांपडते याचा अर्थ असा होतो कीं, त्या रकमेची स्टेट सेक्रेटरी यांस जरूर नाहीं. एक तर ही रकम हिंदुस्थानांतून नेऊं नये किंवा तिचा पूर्वीचें कर्ज वारण्याकडे विनियोग करावा.

या निधींच्या रचनेसंबंधानें व त्यांच्या विभागणीसंबंधानें पुढीलप्रमाणें आक्षेप येथील कौन्सिलचे सभासद, अर्थशास्त्रज्ञ व वर्तमानपत्रकार यांनीं घेतलेले आहेत.

( १ ) या निधीच्यामुळें स्टेट सेक्रेटरीच्या हातांत अतिशय मोठी रकम जमा होते. त्याचे सल्लागार हे बहुतेक लंडन येथील बँकर व व्यापारीवर्ग यांमधून घेतलेले असल्यानें, लंडनच्या हिताहिताकडे नैसर्गिक रीतीनें त्यांचें लक्ष जास्त जातें व हिंदुस्थानच्या दृष्टीनें प्रत्येक गोष्टीचा शक्य तेवढा विचार त्यांच्याकडून होत नाहीं.

ह्या रकमा पुष्कळ वेळां शेंकडा २ व्याजानें कर्जाऊ देतात. त्याच वेळीं हिंदुस्थानांत व्याजाचे दर ६।७ असूनही येथें पैसे मिळत नाहींत. उदाहरणार्थ, १९१२ सालीं निधींशिवाय स्टेट सेक्रेटरीजवळ २७ कोटि रुपये रोखशिलकेंत होती. इतकी शिलक ठेवणें हें अयोग्य आहे.

( २ ) निधींची मर्यादा ४० कोटि सरकारनें ठरविली असूनही हल्लीं त्याच्या दुप्पट रकम निधींत आहे; तथापि ती रकम हिंदुस्थानांतील शिक्षण, आरोग्य इत्यादि अत्यावश्यक बाबींकडे न लावितां, इंग्लंडमध्येंच जमा होत चालली आहे. पुढें हिचें करणार काय याबद्दलही स्टेट सेक्रेटरीकडून कांहीं धोरण जाहीर केलें जात नाहीं. या रकमा हिंदुस्थानांतच असल्या पाहिजेत. फक्त हुंडणावळ स्थिर राखण्याकरितां लागणारी रकम तेथें असावी.

( ३ ) शिलक पुष्कळ जमते याचा अर्थ करांच्या रूपानें जास्त पैसे वसूल होतात. असें होणें अनिष्ट आहे. नामदार

गोखले यांनीं १।२ कोटींपेक्षां जास्त शिलक अंदाजपत्रकांत असणें हें अयोग्य आहे असें कौन्सिलच्या निदर्शनास अनेक वेळां आणलें होतें व हा मुद्दा लॉर्ड कर्झन यांनींही कबूल केला होता.

( ४ ) नोटांचा निधि सिक्यूरिटींच्या रूपांत इंग्लंडांत असणें हें अर्थशास्त्राच्या तत्वांच्या अगदीं विरुद्ध आहे. कोणत्याही देशांत, नोटांचा निधि रोख न ठेवतां कागदी रोख्यांच्या स्वरूपांत व तोही दूरच्या एखाद्या स्थानीं ठेवण्याची पद्धति नाहीं.

नोटांचा सर्व निधि हिंदुस्थानांत असला पाहिजे व तोही $\frac{२}{३}$ रोख रुपये अथवा पौंड या स्वरूपांत असला पाहिजे.

( ५ ) सुवर्णचलननिधीचा मूळ उद्देश सोन्याचें नाणें करणें हा फौलर कमिटीप्रमाणें असतांना तें सर्व फेटाळून लावून हा निधि फक्त हुंडणावळ स्थिर राखण्याकरितां ठेवलेला आहे.

सोन्याचें चलन केल्यास, हुंडणावळीची भानगडच नाहींशी होईल. अशा कृत्रिम पद्धतीनें हिंदुस्थानांत कृत्रिम किंमत दिलेले रुपये राहून हिंदुस्थानचें नुकसान होतें. तें असें. रुपये १.६ पेन्साच्या किंमतीचे झाल्यामुळें येथील इंग्लिश व्यापाऱ्यांस इंग्लंडांत फायदेशीर दरानें रुपये पाठवितां येतात; परंतु येथील व्यापाऱ्यांना निर्यात मालाबद्दल फक्त रुपयेच मिळतात. हेच रुपयांऐवजीं पौंड मिळाल्यास जास्त फायदा होईल. सोन्याचें नाणें केल्यास निर्यात मालापासून जास्त फायदा होईल.

या सर्व आक्षेपांविषयीं विस्तृत विचार करणें या लहानशा पुस्तकांत शक्य नाहीं; तथापि यांपैकीं बहुतेक आक्षेप खरे आहेत असें ह्मणण्यास पुष्कळ आधार आहे. महायुद्धाचे वेळेस या कृत्रिम पद्धतीमुळें अनेक संकटें उत्पन्न झालीं. कारण नसतांना येथें १०० कोटि रुपयांच्यावर रुपये पाडावे लागले. सुवर्णचलन असतें तर रुपये न पाडतां, नुसत्या जमाखर्चांत हिशोब करून हिंदुस्थानांतून जो माल इंग्लंडांत पाठविला त्याची विल्हेवाट लागली असती. हिंदुस्थान व इंग्लंड दोनही देशांत एकच चलन असल्यानें, निर्यात माल जास्त झाला तरीही येथें कौन्सिलबिलें पटवून जास्त रुपये पाडण्याचा प्रसंग येणार नाहीं.

या पद्धतीप्रमाणें रुपयाची किंमत १६ पेन्स ठरविणें हाच काय तो निःश्रेयसाचा मार्ग समजला जातो. इतर कोणतींही कारणें या बाबतीमध्यें रद्द ठरविलीं जातात. एक्सचेंज बँका, सोन्यारुप्याचे व्यापारी, आयात व निर्यात मालाची घडामोड करणारे व्यापारी हे या पद्धतीचा फायदा करून घेतात व त्यामुळें सोन्याच्या चलनाचा प्रश्न आला ह्मणजे हे सर्व लोक हल्लींच्या पद्धतीचा पुरस्कार करून सुधारणा करूं देत नाहीत. गोखले, थाकरसी, वेब, वाच्छा यांना हिंदुस्थानचें हित जास्त समजतें किंवा या व्यापाऱ्यांस जास्त समजतें हा एक मनोरंजक प्रश्न आहे.

## प्रकरण ७ वें.

## पैसा व त्याचें कार्य आणि चलनाचीं तत्वें.

श्रमविभागाचें तत्व हें समाजाचा मूळ पाया आहे असें जें प्लेटोनें ह्मटलें आहे तें बरोबर आहे. कारण हल्लींच्या सुधारलेल्या समाजांतसुद्धां प्रत्येक मनुष्यास त्यास प्रत्यहीं अवश्य लागणाऱ्या अन्नवस्त्रादिकांपासून तों मोटारीसारख्या चैनीच्या पदार्थापर्यंत प्रत्येक वस्तु श्रमविभागाच्याच तत्वावर उत्पन्न होत असते आणि अशा प्रकारची प्रत्येक वस्तु तयार होत असतांना तिच्या अगदीं प्रारंभापासून तों ती वस्तु पूर्ण तयार होऊन उपयोगांत येईपर्यंत तिचीं जीं अनेक रूपांतरें व स्थित्यंतरें होत असतात, तिचें प्रत्येक ल्हानसहान रूपांतर व स्थित्यंतर अनेक मनुष्यांचें कौशल्य व श्रम यांचे सहाय्यानेंच होत असतें. ह्मणजे हल्लींच्या समाजांतील मनुष्यास त्याच्या साध्या गरजादेखील त्याच्या त्यास स्वनिर्मित वस्तूवर भागविणें अशक्य आहे; परंतु मानवी समाजाच्या सर्व गरजा मात्र मनुष्यजातीच्या परस्पर सहाय्यानें भागवितां येतात. यावरून असें स्पष्ट होतें कीं, प्रत्येकांतील विशिष्ट गुण, कौशल्य व श्रम यांच्या अदलाबदलीवरच सर्व समाज सुखानें व सुरळीतपणें व्यवहार करूं शकतो. ही स्थिति सुधारलेल्या समाजाची झाली; परंतु फार प्राचीन काळीं मनुष्य हा जेव्हां रानटी स्थितींत

होता त्यावेळची स्थिति फार निराळी होती. शिकार करून त्यावर निर्वाह करणें हेंच त्या वेळचें जीवितध्येय होतें. अर्थात त्या स्थितींत मनुष्याच्या गरजाही फार कमी होत्या आणि त्यांची संपत्ति ह्मणजे शिकार, कातडीं, हाडें व पिसें अशा प्रकारची होती. अशा वेळीं एकमेकाच्या गरजा भागविण्याचे जे प्रसंग येत असत किंवा जो कांहीं थोडाबहुत व्यवहार चालत असे तो सर्व ऐनजिनसी अदलाबदलीवरच. परंतु समाजाची जसजशी वाढ व प्रगति होऊं लागली, तसतसें ऐनजिनसी व्यवहारास कठीण पडूं लागलें. ऐनजिनसी व्यवहारामध्यें मोठा दोष हा कीं, सौदा जुळणें कठीण पडतें. कारण एकाद्यास जी वस्तु पाहिजे असते, ती वस्तु जवळ असणारा मनुष्य पहावा लागतो व पहिल्या इसमाजवळ असणाऱ्या वस्तूची गरज दुसऱ्या मनुष्यास असावी लागते तेव्हां कोठें सौदा जमतो. या व अशा तऱ्हेच्या ऐनजिनसी व्यवहारांतील दुसऱ्या अडचणी नाहींशा करण्याकरितां कांहीं तरी एक विनिमयसामान्य (वस्तु) ह्मणूनच पैसा हा अस्तित्वांत आला. निरनिराळ्या देशांत समाजाच्या निरनिराळ्या अवस्था अनेक प्रकारचे पदार्थ विनिमयसामान्य किंवा पैसा ह्मणून उपयोगांत आले आहेत असें इतिहासाकडे पाहिलें असतां आपणांस आढळून येतें. कातड्याचे तुकडे, हाडें, कवड्या, शिंपले, पिसें, चहा, तांदूळ, तंबाकू व मीठ अशा प्रकारें ही यादी किती तरी लांबवितां येईल. [ अगदी आजदेखील आफ्रिकेंतील रानटी लोकांत ऐनजिनसी

व्यवहाराच्या पद्धतीमुळें आपणांस कशा अडचणी आल्या याबद्दल भाडशी प्रवाशी लोकांनीं मोठीं गमतीचीं वर्णनें दिलीं आहेत. ]

आतां यानंतर समाजाची दुसरी स्थिति गोपवृत्तीची. समाजाच्या या अवस्थेंत गुराढोरांचा उपयोग पैशाप्रमाणें करीत असत, अशा प्रकारचे अनेक उल्लेख होमरच्या इलियडसारख्या प्राचीन ग्रीक काव्यांत किंवा आपल्याकडील महाभारतादि ग्रंथांत जागोजाग आढळतात. परंतु जसजशी समाजाची औद्योगिक व इतर वाढ होऊं लागली व समाज सुधारत चालला, तसतसा वर वर्णिलेल्या प्रकारच्या अनेक विनिमयसामान्यांचा किंवा पैशाचा लोप होत जाऊन, त्या जागीं धातूंचा उपयोग होऊं लागला. तांबें, कथील, रुपें, सोनें वगैरे धातु पैसा ह्मणून उपयोगांत येऊं लागलीं. शरीर भूषविण्याकरितां अलंकार ह्मणून अथवा इतर प्रकारेंही धातू या वेळीं समाजांत वापरण्यांत येत होत्या. अर्थात् निरनिराळ्या धातूंमधील फरक, गुणावगुण व त्यांची श्रेष्ठता हीं लोकांच्या लक्षांत आलीं होतीं. आतां एक वेळ धातूंचा पैसा ह्मणून उपयोग होऊं लागल्यावर त्यांच्या नैसर्गिक श्रेष्ठतेच्या अनुक्रमानेंच त्यांची व्यवहारांत पैसा ह्मणून कमी अधिक योग्यता ठरावी हें साहजिकच आहे. आतां पैशाचा कार्यभाग कोणता व उत्तम पैसा ठरण्याकरितां त्यामध्यें कोणते गुण अवश्य लागतात तें पाहूं आणि अशा तऱ्हेनें उत्क्रांत झालेल्या पैशाच्या योगानें समाजांत कोणत्या तऱ्हेचीं कार्यें होतात याचा विचार करूं.

पैशामध्यें विनिमयसुलभता, सर्वग्राह्यता व मूल्याचें सर्वसाधारण परिमाण हे गुण मुख्यतः असावे लागतात. शिवाय पैसा हा मूल्याचा सांठा, मूल्याचें मापन, विलंबित देवघेवीचें साधन व पतीच्या व्यवहारास साधनीभूतनिधि अशा प्रकारची कार्यें करितो. तेव्हां आतां या त्याच्या कार्यभागाचा त्रोटकपणें विचार करूंया.

१ पैशाचें मुख्य कार्य जें विनिमयसुलभता, तें फार महत्वाचें आहे. कारण ऐनजिनसी व्यवहारांत फार अडचणी असतात हें वर सांगितलेंच आहे; पण आपण समाजाच्या प्राथमिक अवस्थेंतील मनुष्याचें एक उदाहरण घेऊं म्हणजे ही गोष्ट जास्त स्पष्ट होईल. समजा कीं, एका मनुष्यापाशीं फक्त एक भाला आहे. त्यावर शिकार करून तो आपला उदरनिर्वाह करतो व दुसऱ्या एका मनुष्यापाशीं फक्त एक जाळें आहे, त्यायोगें मासे धरून तो आपला उदरनिर्वाह करतो. आतां भालेवाल्या मनुष्याची इच्छा आहे कीं, आपणांस जाळें हवें व त्याच्या मोबदला आपल्या जवळची एकच एक वस्तु जी भाला, ती तो देण्यास तयार आहे; परंतु जाळेवाल्या मनुष्याच्या मनांत भाला आपणांस पाहिजे अशी प्रबल इच्छा झाली तरच हा सौदा जमावयाचा. बरें, दुसरा एक प्रश्न असा कीं, एका जाळ्यास एक भाला ही अदलाबदल बरोबर होईल कां जाळेवाल्यास भालेवाल्यानें भाल्याखेरीज आणखी एखादी वस्तु त्यास पाहिजे अशी द्यावी लागेल? जगांतील सर्वच वस्तु सारख्या प्रमाणांतील श्रमां-

वर उत्पन्न झाल्या असत्या व त्यांची गरजही सारख्याच प्रमाणांत असती तर ऐनजिनसी अदलाबदलीवर सर्व व्यवहार चालला असता; परंतु हें अशक्य आहे हें स्पष्टच दिसतें. वरील ऐनजिनसी व्यवहारांतील सौदा जुळविण्याच्या त्रासाशिवाय ज्याला पाहिजे ती वस्तु एकदम घेतां यावी ही सोय म्हणजेच विनिमय-सुलभता पैशाच्या योगानें झाली. एखादा पदार्थ पैसा म्हणून सर्वत्र ग्राह्य झाला की, सर्वांनाच त्याची गरज लागते. कारण ज्याचेजवळ पैसा असतो, त्यास खात्री असते कीं, आपणास पाहिजे ती वस्तु त्याचे बदली घेतां येईल. तसेंच ज्याला आपल्या वस्तु दुसऱ्यास द्यावयाच्या (विकावयाच्या) असतात, त्याला त्याच्या बदली पैसाच घेणें फायदेशीर होतें.

पैशाचें दुसरें महत्वाचें कार्य म्हणजे तो मूल्याचें सर्वसाधारण परिमाण असतो. मूल्य ही कल्पनाच अगोदर सापेक्ष आहे. एखाद्या वस्तूचें मूल्य म्हणजे तिच्या मोबदला दुसरी एखादी वस्तु -तितक्या प्रमाणांत मिळेल तें असें म्हणतां येईल सुताच्या चार वार कपड्याच्या तुकड्याबदला लोंकरीचा दोन वाराचा तुकडा मिळेल. लोंकरीच्या दोन वाराच्या तुकड्याऐवजीं रेशमाचा एक वाराचा तुकडा मिळेल. म्हणजे अशा तऱ्हेनें एखाद्या वस्तूचें मूल्य तिच्याशीं ज्यांची ज्यांची तुलना करितां येईल इतक्या निरनिराळ्या वस्तू-मध्यें सांगतां येईल; परंतु मूल्याची कल्पना ठरविण्याकरितां एकदां एखाद्या पदार्थाचा संकेत केला कीं, त्या पदार्थाचें मूल्य सांगतां

येतें व असा संकेतित पदार्थ म्हणजेच पैसा असल्यामुळें प्रत्येक वस्तूचें मूल्य निरनिराळ्या वस्तूशीं तुलना करून ठरविण्याचें कारण पडत नाहीं. एखाद्या इसमानें आपल्या जवळचा माल विकून त्याचे पैसे केले असें आपण नित्य ऐकतों; पण त्याचा अर्थ इतकाच कीं, त्या इसमानें आपलेजवळील माल देऊन त्याचें मोबदला सोनें, रुपें अगर तांबें यांचे रूपानें दुसरा एक माल घेतला आहे. या रूपांतरित नव्या मालापासून पुढें आपणांस वाटेल ती वस्तु घेतां येईल किंवा अन्य रीतीनें ती मोबदला देऊन त्याचा एखादा उपयोग करून घेतां येईल अशी त्याची खातरी असते. म्हणजे पैसा हा "समक्यानें इतके श्रम केले आहेत त्याचा मोबदला त्यास पाहिजे तेव्हां इतका मिळावा" अशा अर्थाचा एक दाखलाच होय असें म्हणतां येईल. यावरून थोडेसें पुढें जाऊन आपल्यास समाजाच्या अशा एका अत्यंत सुधारलेल्या भविष्यकाळाकडे पाहतां येईल कीं, ज्यावेळीं प्रत्येकाच्या श्रमाची व सेवेची जाणीव राखली जाऊन तिचा योग्य मोबदला त्या श्रम करणारास अगर त्याच्या वारसास कालमर्यादेची सबब न सांगतां देतां येईल. आतां अशा तऱ्हेची स्थिति होण्यास समाजांत परस्पराबद्दल अत्यंत विश्वास असला पाहिजे. अर्थात् सर्व व्यवहार केवळ पतीवर चालला पाहिजे. आजसुद्धां समाजांत पुष्कळ व्यवहार पतीवर चालत आहेत हें खरें; पण या पतीची उभारणी चलनांत असलेल्या एकंदर पैशावरच केली असते व अड-

चणीच्या प्रसंगीं खुद्द पैशाचाच उपयोग करावा लागतो; पण यासंबंधी जास्त विवरण कागदी चलनाच्या वेळीं करण्याचें असल्यामुळें त्यासंबंधी जास्त लिहिण्याची आवश्यकता येथें नाहीं.

विनिमयसुलभता व मूल्याचें सर्वसाधारण परिमाण हीं दोन प्रमुख कार्यें समजलीं ह्मणजे इतर कार्येंही आपल्या लक्षांत येतील. पैशाचें मूल्यमापनासंबंधाचें कार्य त्याच्यावरील–मूल्याचें सर्वसाधारण परिमाण या–कार्याशीं निगडित असल्यामुळें, त्याविषयीं जास्त विवरण करण्याचें कारण नाहीं. मूल्याच्या मापनाची पद्धति एकदां पक्की ठरली कीं, मोठमोठे व्यापार अगदीं सुलभतेनें पार पाडतां येतात व त्यायोगें औद्योगिक प्रगतीला मदत होते.

पैसा हा सर्व देशांमध्यें मूल्याचा सांठा समजला जातो. कारण त्यायोगें वाटेल ती वस्तु प्राप्त करून घेतां येते. अतिशय थोडक्या जागेमध्यें वाटेल तितकी मोठी वस्तु विकत घेण्याजोगी किंमत पैशाच्यायोगें सांठविली जाते. पैशाची किंमत सहसा बदलत नाहीं. तो संग्रहीं असल्यास, वाटेल ती वस्तु घेण्याचें सामर्थ्य मनुष्यामध्यें असतें. तो इतर वस्तूप्रमाणें संग्रहीं टाकल्यानें वाईट होत नाहीं, नासत नाहीं, बिघडत नाहीं, गंजत नाहीं किंवा कमी होत नाहीं. तेव्हां असा पैसा संग्रहीं ठेवण्याची इच्छा [हल्लींच्या औद्योगिक भरभराटीच्या कालांत] मनुष्यास असणें स्वाभाविक आहे.

विलंबित देवघेवींचें साधन म्हणून पैशाचा उपयोग सुधारलेल्या समाजांत पतीच्या पद्धतीच्या वाढीपासून होऊं लागला. कारण उत्पादनामध्यें वेळेचा प्रश्न फार महत्वाचा असतो व योग्य वेळीं जर पैशाची मदत मिळाली, तर त्याचा उपयोग होऊन पुढें वस्तु पूर्ण होऊन बाहेर पडल्यावर तिच्यावर पूर्वीच्या पैशाची परत फेड करतां येते. उ० पिकास कीड लागली आहे व खत वगैरे उपचार केले तर कीड मरते नाहीं तर पीक जातें : अशा वेळीं कर्जाऊ काढलेल्या पैशावर पीक सुधरून पुढें तें पूर्ण पदरांत पडल्यावर त्याची विक्री करून पैसा परत करण्यास हरकत पडत नाहीं. तेव्हां अशा वेळीं कर्जाची रकम पैशांतच ठरली असल्यास, देणारा व घेणारा यांस सोईस्कर होऊन नुकसान होण्याची भीति नसते.

पैशाचा उपयोग पतीच्या व्यवहारास साधनीभूतनिधि म्हणून होतो. बँकांमधील पतीवर चालणाऱ्या व्यवहारास हा वरील निधीच कारणीभूत असतो. आतां अशा बँकांतील पतीच्या व्यवहारांत पुष्कळ वेळां हा पैशाचा निधि अगदीं निरर्थक पडून राहिलेला असतो; परंतु बँकांतील पतीचा व्यवहार ह्यावरच अवलंबून चालत असल्यामुळें, तो निरर्थक शिलक पडून राहतो असें म्हणतां येत नाहीं व त्यांतूनही इंग्लंडमधील सुप्रसिद्ध बँकांच्या मॅनेजराप्रमाणें एखादा हुशार मॅनेजर कोणत्या वेळीं बँकेंत कमीत कमी किती शिलक असली तरी चालेल हें आपल्या अनुभवावरून

ठरवून बाकीचा सर्व निधि उपयोगांत आणतेच. सारांश जगांतील एकंदर पतीच्या व्यवहाराच्या बुडाशीं हा पैशाचा निधीच असतो असें आढळून येतें.

वर एके ठिकाणीं सांगितलें आहेच कीं, समाजाच्या व देशाच्या निरनिराळ्या परिस्थितीप्रमाणें अनेक पदार्थ पैसा ह्मणून उपयोगांत आणले गेले आहेत; परंतु पैसा होणाऱ्या पदार्थांस अवश्य लागणाऱ्या त्यांच्या गुणावगुणाप्रमाणें व समाजाच्या वाढत्या गरजा भागविण्याच्या सामर्थ्याप्रमाणें योग्य तेच पदार्थ व साधनें पैसा ह्मणून उपयोगांत आली. आतां वर वर्णिलेलीं कार्यें किंवा कार्यभाग समाजांत ज्या पदार्थाकडून करून घेतलीं जातात, तो पैसा होय अशा प्रकारें पैशाची व्याख्या करितां येईल. तेव्हां पैशाचे किती प्रकार आहेत तें पाहूं. पैसा हा मुख्यतः तीन प्रकारचा असतो. १ व्यावहारिक आणि हिशोबांतील; २ धात्वात्मक आणि अधात्वात्मक किंवा कागदी; ३ मुख्य पैसा आणि उपपैसा.

१ जो पैसा रोजच्या व्यवहारांत व चलनांत असतो, तो व्यावहारिक पैसा होय. हिशोबांतील पैशाची गोष्ट मात्र निराळी. प्रत्यक्ष व्यवहारांत जरी त्याचें अस्तित्व नसलें, तरी हिशोबामध्यें त्याचें अस्तित्व धरलें जातें आणि हिशोबांत त्याचें अस्तित्व राहण्याचें कारण एके काळीं तो चलनांत असल्यामुळें, लोकांस झालेली संवय असावी. याचें उदाहरण आज इंग्लंडमध्यें दिसून येतें. गिनी हें नाणें आजमितीस इंग्लंडमध्यें चलनांत नाहीं;

तथापि डॉक्टर, वकील वगैरे धंदेवाल्यांची फी गिनीतच ठरविली जाते. इंग्लंडांतून शिकून आलेले कलकत्ता, मुंबई येथील आपले हिंदी डॉक्टर, बॅरिस्टर वगैरे लोक इंग्लंडच्या पद्धतीप्रमाणें आपली फी गिनींतच आकारतात असा अनुभव तेथील रहिवाशांस आहेच. दुसरें एक काल्पनिक उदाहरण आपल्यास घेतां येईल. समजा कीं, कांहींएक कारणामुळें उद्यां रुपया हा चलनांतून एकदम नाहींसा झाला व त्या जागीं पांच रुपयांचें एक व आठ आण्यांचें एक अशीं दोन नाणीं चलनांत आलीं. तरी संवयीमुळें लोक पुष्कळसे व्यवहार रुपयांमध्येंच ठरवितील असाच संभव जास्त आहे.

पैशाच्या दुसऱ्या दोन प्रकारांचें वर्णन यथानुक्रमें पुढें येत असल्यामुळें, येथें त्याचा उल्लेख करण्याचें कारण नाहीं.

आतां पैसा ह्मणून वापरल्या जाणाऱ्या पदार्थांमध्यें कोणते कोणते गुण अवश्य असावे लागतात, ते कां असावे लागतात याचा संक्षेपतः विचार करूं. चांगल्या पैशामध्यें पुढील सात गुण असावे लागतात असें अर्थशास्त्रज्ञांचें मत आहे:— १ उपयुक्तता व मूल्य; २ सुवाह्यता; ३ अविनाश्यता; ४ सजातीयता; ५ सुविभाज्यता; ६ मूल्याचें स्थैर्य; ७ अभिज्ञेयता.

पैशामध्यें उपयुक्तता व मूल्य हे गुण अवश्य असावे लागतात. कारण पैशाच्या योगानें मोठमोठ्या किंमतीच्या मालाची उलाढाल होत असते. तेव्हां ज्यानें हजारों पदार्थांची अदलाबदल व्हाव-

याची असते अशा पदार्थांत स्वतःसिद्ध उपयुक्तता व मूल्य असणें हें स्वाभाविक व जरूरही आहे. समाजाच्या ज्या ज्या स्थितींत जे जे पदार्थ, उदाहरणार्थ, कातड्याचे तुकडे, पिसें इत्यादि पैशाप्रमाणें वापरले जात, त्या त्या वेळीं इतर दृष्टीनें त्यांची उपयुक्तता होती असें आढळून येतें. मृगयावृत्ति समाजांत कातड्यांचा वस्त्रप्रावरणाप्रमाणें शीतनिवारणाकडे उपयोग होत असे. त्याचप्रमाणें गोपवृत्ति—समाजांत गुरें ढोरें हीं फार उपयोगाचीं असत. ह्मणून त्यावेळीं त्यांचा उपयोग पैशाप्रमाणें होत असे. त्यावरून असें सिद्ध होतें कीं, समाजाच्या निरनिराळ्या स्थितींत पैसा होणाऱ्या वस्तूंमध्यें उपयुक्तता व मूल्य हे धर्म कमी जास्त प्रमाणानें वसत असतात. आजच्या समाजस्थितींत सोनें, रुपें इत्यादि मूल्यवान् धातू हे त्यांच्यामध्यें वरील दोन धर्म असल्यामुळें, पैसा ह्मणून उपयोगांत आहेत.

पैशाच्या द्रव्यांत दुसरा गुण सुवाह्यता किंवा स्थलांतरसुकरता हा असावा लागतो. कारण पैसा हा इकडून तिकडे सहज नेतां आला पाहिजे. समजा कीं, एखाद्या दक्षिणेंतील शेतकऱ्यास पंजाबांत कांहीं दिवस राहण्यास जाण्याचें आहे. तर त्यास दक्षिणेंतून गहूं पंजाबांत नेण्यास कोण त्रास पडता ! पण तेच गहूं विकून त्यांच्या पैशावर त्यास पंजाबांत जवळ जवळ तेवढाच गहूं मिळेल. पैशाच्या सुवाह्यतेचा उपयोग मनुष्यास प्रथम दर्शनीं वाटतो त्यापेक्षां तो फार मोठा आहे. हल्लींसारख्या उद्योग-

धंद्याच्या विलक्षण प्रगतीच्या काळांत जेवढ्या थोड्या वजनांत व आकारांत मूल्य सांठवून इकडून तिकडे नेतां येईल तेवढें थोडेंच आहे. ह्मणून या दृष्टीनें लोखंडापेक्षां तांबें, तांब्यापेक्षां रुपें, रुप्यापेक्षां सोनें ह्या धातू चढत्या अनुक्रमानें जास्त किंमतीच्या, उपयोगी व पैसा होण्यास योग्य अशा आहेत; परंतु हल्लींच्या वाढत्या उद्योगधंद्याच्या कालांत सोनें, रुपें यांचासुद्धां उपयोग सुवाह्यतेच्या बाबतींत अडचणीचा व अपुरा पडतो आणि ह्मणूनच अधात्वात्मक पैशाच्या ह्मणजे कागदी चलनाच्या साधनांचे नवे मार्ग नोटा, चेक्स इत्यादि उपयोगांत आणावे लागले आहेत.

पैशाच्या द्रव्यांतील तिसरा गुण अविनाश्यता होय. भौतिक शास्त्रज्ञांच्या तीक्ष्ण कसोटीप्रमाणें या जड सृष्टींतील कोणताही पदार्थ जरी अनंतकाल टिकणारा नाहीं; तथापि सापेक्षतेनें इतर पदार्थांपेक्षां जे पदार्थ जास्त दिवस टिकतात, तेच या दृष्टीनें महत्वाचे होत. सोनें, रुपें ह्या धातू त्यांच्यांत असलेल्या निसर्गसिद्ध रासायनिक द्रव्यामुळें गंजून, कुजून, जळून, सुकून इत्यादि प्रकारें नाश पावत नाहींत व त्यांच्यांत बदल न होतां त्या दीर्घकालपर्यंत राहूं शकतात. कातडीं, शिंपले, कवड्या इत्यादि प्राणिज किंवा तांदूळ, चहा, फळें इत्यादि वनस्पतिजन्य अशा पैशाप्रमाणें वापरल्या जाणाऱ्या वस्तूंमध्यें हा गुण नसल्यामुळें, त्या कुजून, किडून इत्यादि प्रकारें नाश पावतात. लोखंड वगैरे कांहीं धातूसुद्धां गंजून वगैरे नाश पावतात. ह्मणून त्यांना उपभोग्य संपत्तीच्या

शिल्केकडे करितां येत नाहीं. या वरील कारणामुळेंच त्या वस्तू चलनांतून नाहींशा झाल्या व त्यांची जागा सोनें, रुपें इत्यादि अनश्वर धातूंनीं पटकाविली.

पैशाच्या द्रव्यांतील चौथा गुण ह्मणजे सजातीयता हा होय. पैसा असणारें द्रव्य सजातीय असलें पाहिजे. त्याचा कोणताही भाग घेतला तरी त्यांत भिन्नता असूं नये. सोनें, रुपें इत्यादि मूल्यवान् धातूंशिवाय हा गुण इतरत्र क्वचितच आढळतो. धान्य गुरेंढोरें, गुलाम वगैरे पदार्थांत या गुणांचा अभाव होता ह्मणूनच हे पदार्थ पैसा ह्मणून मागें पडले.

पैशाच्या द्रव्यांतील पांचवा गुण सुविभाज्यता होय. पैशासारख्या सर्वमान्य पदार्थांमध्यें हा गुण असणें अवश्य आहे. कारण पैशाच्या द्रव्याचे वाटेल तेवढे लहान मोठे तुकडे व विभाग करितां आले पाहिजेत. पैशाच्या द्रव्याच्या वाटेल त्या लहान वजनाच्या तुकड्याची किंमत त्याच्या मोठ्या वजनाच्या तुकड्याच्या किंमतीच्या गुणोत्तर प्रमाणांत पाहिजे. तरच त्याचीं लहान मोठीं नाणीं करतां येऊन, पदार्थांचें मूल्य ठरविण्यास सुलभ होतें आणि त्यायोगें व्यापारास फार सोयीचें होतें. एखादा पौंड घेऊन त्याचे जर चार भाग केले, तर त्याच्या प्रत्येक भागाची किंमत पौंडाच्या एकचतुर्थांश असते. हिरा, माणिक वगैरे जवाहिरांत सोन्या-रुप्याचे इतर गुणधर्म जरी असले, तथापि सुविभाज्यता हा गुण त्यांत नाहीं. त्यामुळें पैसा होण्यास तें निरुपयोगी

आहे. कारण एखादा मोठासा हिरा घेऊन त्याचे जर भाग केले, तर त्या प्रत्येक भागाची किंमत मूळच्या हिऱ्याच्या किंमतीच्या गुणोत्तरप्रमाणांत असत नाहीं.

पैशाच्या अवश्यक गुणांपैकीं मूल्याचें स्थैर्य हा गुण अत्यंत महत्वाचा आहे. इतर सर्व पदार्थांचें मूल्य मोजण्याचें परिमाण पैसा हें असल्यामुळें, त्याची किंमत स्थिर असणें अत्यंत अवश्य आहे. एखाद्या इसमानें कांहीं एका ठराविक मुदतीकरितां म्हणून दुसऱ्या इसमाशीं देण्या-घेण्याचा व्यवहार केला तर त्या मुदती-नंतर त्या पूर्वीच्या व्यवहाराचा बरोबर मोबदला देतां किंवा घेतां आला पाहिजे आणि हें होण्यास पैशाची किंमत स्थिर असणें अवश्य आहे हें उघड आहे. नाहींतर घेतांना चाळीस इंची वारानें कापड मोजून घेऊन, परत देतांना पंचवीस इंची वारानें मोजून दिल्याप्रमाणें स्थिति होईल. हा गुण आजपर्यंत सर्वांत सोन्या-रुप्यांतच जास्त प्रमाणांत आढळून येतो. सोन्याची उत्पत्ति दरवर्षीं बेताचीच असल्यामुळें, त्याच्या किंमतींत एकदम फेरबदल होत नाहीं.

पैशाच्या द्रव्यांतील सातवा गुण अभिज्ञेयता हा होय. पैसा हा नेहमीं व्यवहारांत खेळणारा पदार्थ असल्यामुळें, तो पाहिल्या-बरोबर खरा खोटा हें तावडतोब ओळखतां यावें अशा प्रकारचा गुण त्यामध्यें असावा लागतो. सोन्या-रुप्याचीं नाणीं, त्यांचे रंग, वजन व विशिष्ट प्रकारचा आवाज यामुळें लवकर ओळखतां

येतात. वर दिलेले हे गुण ज्या द्रव्यांमध्यें दिसून आले, तींच द्रव्यें पैसा ह्मणून चलनांत आलीं. अर्थशास्त्राच्या तीक्ष्ण कसोटी-प्रमाणें पहातां, पैसा होणाऱ्या पदार्थांत जे गुण अवश्य असावे लागतात, ते सर्व हल्लीं उपयोगांत असलेल्या कोणत्याही द्रव्यां-मध्यें पूर्णपणें वसत नाहींत; परंतु इतर सर्व द्रव्यांपेक्षां धातूंमध्यें हे गुण विशेष प्रमाणांत दिसून आले ह्मणून लोखंड, कथील, तांबें, रुपें, सोनें, प्लॅटिनम् इत्यादि धातू किंवा त्यांचीं मिश्रणें पैसा ह्मणून उपयोगांत आलीं. पुनः त्यांतही इतर धातूंपेक्षां सोन्या-रुप्यामध्येंच वरील गुण अधिक प्रमाणांत असल्यामुळें, सोन्या-रुप्याचींच नाणीं सर्व सुधारलेल्या देशांत हल्लीं प्रचारांत आहेत.

सोनें, रुपें इत्यादि धातु पैसा ह्मणून जेव्हां प्रथम प्रचारांत आल्या, तेव्हां त्या सोन्या-रुप्याचे तुकडे, आंगठ्या, वळीं, गोळे अशा निरनिराळ्या तऱ्हेच्या ओबडधोबड आकारांतच होत्या. परंतु व्यापाराची प्रगति होऊन निरनिराळ्या देशांमधील दळण-वळण जसें वाढूं लागलें, तसा अशा प्रकारच्या सोन्यारुप्याच्या तुकड्यांना एक प्रकारचा ठरीव आकार देणें भाग पडलें. कारण अशा ओबडधोबड तुकड्यांत लबाडी होण्याचा संभव फार. ह्मणून त्यांचें एका ठरीव पद्धतींत—नाण्यांत—रूपांतर झालें. आतां नाण्यांचा थोडक्यांत विचार करूं. पूर्वीं हा नाणीं पाडण्याचा हक्क सर्वांसच होता; परंतु धूर्त लोक, नाणीं हिणकस, बनावट वगैरे करून लोकांस फसवित असत. ह्मणून हा हक्क सरकारास

आपल्या ताब्यांत घेणें भाग पडलें. हल्लीं सर्व सुधारलेल्या देशांतील टांकसाळी फक्त सरकारच्याच ताब्यांत असतात व सरकारही आपली जबाबदारी ओळखून, हें नाणीं तयार करण्याचें काम मोठ्या चोख रीतीनें करीत असतें, त्यामुळें लोकांस फसविलें जाण्याची भीति नाही; परंतु पूर्वी राजे लोकांच्या हातांत जेव्हां अनियंत्रित राजसत्ता होती, तेव्हां ते नाणीं पाडण्याच्या आपल्या हक्काचा दुरुपयोग करून, हिणकस व कमी वजनाचीं नाणीं पाडून चलनांत आणीत व अशा रीतीनें लोकांस फसवीत. असे प्रसंग बहुधा लढाई, दुष्काळ वगैरे कारणानें खजिन्यांत तूट आल्यास येत असत किंवा क्वचित् राजे लोक चैनीच्या पायीं अतोनात खर्च झाल्यास, तो खर्च अशा खोटीं, हिणकस नाणीं पाडण्याच्या रीतीनें भरून काढीत असत. महमद तघलक् याची यासंबंधाची हकीकत वाचकांनीं जरूर इतिहासांत पहावी. *

पूर्वकालीन नाण्यांत हल्लींप्रमाणें सुधारणा नसल्यामुळें, रंग, आवाज, अक्षरें इत्यादिकांवरून तीं सहज ओळखतां येत नसत. या कारणानें खऱ्या खोट्या नाण्यांची पारख करण्याचा सराफांचा एक मोठा धंदाच होऊन बसला होता.

वर सांगितल्याप्रमाणें अनियंत्रित राजसत्तेच्या कालांत प्रत्येक राजाच्या लहरीप्रमाणें निरनिराळ्या आकाराचीं, वजनाचीं नाणीं पाडली जात व त्यांत कमीजास्त प्रमाणानें भेसळही केलेली असे.

---

*(Havell's History of Aryan Rule in India p. 312 १५१.)

आतां हीं नाणीं जरी सत्तेच्या जोरावर त्या त्या देशांत चालत असत; तथापि परदेशांतील व्यापारी मात्र तीं नाणीं वजन करून कस लावून त्यांतील शुद्ध धातूच्या किंमतीइतकीच त्यांची किंमत करीत. निरनिराळ्या राजांच्या कारकीर्दींत लहरीप्रमाणें पाडलेलीं कायदेशीर कसाचीं, हिणकस, झिजवट, नवीं अशीं नाणीं देशांतल्या देशांत कायद्यानें एकाच किंमतीचीं ह्मणून चालत; परंतु परदेशांतील व्यपारी उत्तम कसाचीं नवीं नाणीं तेवढीं व्यापारांत स्वीकारीत असत. याचा परिणाम असा होत असे कीं, चलनांतील नवीं चांगलीं नाणीं तेवढीं बाहेर परदेशांत जात असत व वाईट, झिजवट नाणीं देशांतल्या देशांत रहात असत. ही वस्तुस्थिति जरी पुष्कळ लोकांच्या लक्षांत त्या वेळींच आली होती तरी एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत इंग्लंडांत चलनाच्या प्रश्नासंबंधांत 'ग्रेशॅम' नांवाच्या एका स्कॉच अधिकाऱ्यानें जो रिपोर्ट केला, त्यामध्यें त्यानें ही गोष्ट विशेष प्रामुख्यानें पुढें आणिल्यामुळें, 'ग्रेशॅमचा सिद्धांत' या नांवानें ती अर्थशास्त्रांत रूढ झाली आहे. हा नियम थोडक्यांत सांगावयाचा ह्मणजे 'खोटा पैसा खऱ्या पैशास बाहेर घालवितो' असें ह्मटलें असतां पुरें. ग्रेशॅमच्या नियमाप्रमाणें चांगलीं नाणीं बाहेर जाऊन, वाईट नाणीं देशांत राहूं नयेत ह्मणून सरकारास नेहमीं खबरदारी घ्यावी लागते. कारण नाण्यास स्वाभाविक झीज ह्मणून असतेच. त्यामुळें नाणें चलनांत आल्यापासून कांहीं वर्षांनंतर त्याचें एका ठराविक मर्याद-

बाहेर वजन कमी होतें. इकडे नवीं नाणीं टांकसाळींतून बाहेर पडून चलनांत आलेलीं असतातच त्यामुळें ग्रेशॅमच्या नियमाची क्रिया आपोआप होत राहते. याकरितां नाणें वापरांत राहिल्यानें, कायद्यानें ठरविलेल्या मर्यादेपेक्षां कमी वजनाचें झालें की, पुनः टांकसाळींत पाठविलें जावें अशी व्यवस्था सरकार करतें.

सोळाव्या शतकाच्या अखेरपर्यंत नाणीं हीं बहुतेक ओबडधोबड स्वरूपांतच चलनांत होतीं. त्यामुळें विशेष रीतीनें लक्षांत न येईल अशा प्रकारें नाण्याच्या कडा घांसून किंवा कुरतडून लोक फायदा करून घेत असत; परंतु जसजशी देशांची व्यापारविषयक प्रगति होऊं लागली, तशी नाण्यांत सुधारणा होऊं लागली. सन १६९६ सालीं इंग्लंडनें ही सुधारणा प्रथम अमलांत आणली व इतर देशांनीं त्यानंतर त्याचें अनुकरण केलें. नाण्याच्या कडा घांसल्या जाऊं नयेत अगर अन्य प्रकारें त्यांतील एखादा भाग विकृत करून ओळखतां न येईल अशा रीतीनें धातु काढून घेतां येऊं नये ह्मणून वर्तुळाकार व धारेवर रवे रवे असलेलीं नाणीं पाडण्यांत आलीं. आधुनिक उच्च प्रतीच्या यंत्रसामुग्रीमुळें ठराविक आकार, वजन, आवाज इत्यादिकांनीं युक्त, सुंदर व नाजूक नक्षीचीं अशीं नाणीं वाटेल तेवढीं पाडतां येतात व हें काम सरकारनें आपल्या हातीं ठेविल्यामुळें बनावट नाणीं करणें फार कठिण झालें आहे.

चलनांतील मुख्य नाण्यांसंबंधीं असा एक नियम आहे कीं, चलनांतील नाणें जर आटविलें, तर नाण्यांतील धातुगत मूल्य व सरकारी टांकसाळींतील शिक्क्यामुळें त्यास प्राप्त झालेलें चलनांतील अथवा नाणकगत मूल्य यामध्यें नेहमीं एकवाक्यता असली पाहिजे व अशा प्रकारचींच नाणीं हल्लीं सुधारलेल्या देशांतून प्रचलित असल्यामुळें, ब्रिट नाणीं पाडणें फायदेशीर नाहीं. निदान सुवर्णैकचलनाच्या बाबतींत तरी ही गोष्ट खरी आहे. रुप्याच्या नाण्यांची स्थिति मात्र निराळी आहे. रुप्याचें नाणें हें सांप्रत बहुतेक सुधारलेल्या देशांत उपपैसा ह्मणून प्रचलित असल्यामुळें. त्याची चलनांतील किंमत, त्याच्या मूळ धातुगत किंमतीपेक्षां (कायद्यानें मुद्दाम) पुष्कळच वाढविलेली असते. आतां रुप्याचें नाणें हें उपपैसा (हिंदुस्थानाखेरीज इतर देशांत) असल्यामुळें, फार थोड्या किंमतीपर्यंतच कायदेशीर फेडीचें चलन असनें अर्थात् तें तयार करण्यापासून फारसा फायदा नाहीं. येथपर्यंत नाण्यासंबंधीं सर्वसाधारण विचार झाला. आतां मुख्य पैसा होणाऱ्या नाण्यांत वर सांगितल्याप्रमाणें चलनांतर्गत व धातुगत किंमतींचें ऐक्य असणें अवश्य आहे. कारण मुख्य पैशाचें धातुगत मूल्य नाणकगत मूल्यापेक्षां अधिक असेल तर नाणीं अटविलीं जातील. याच्या उलट जर नाणकगत मूल्य धातुगत मूल्यापेक्षां अधिक असेल, तर नाणीं पाडण्याकडे लोकांची प्रवृत्ति होईल. ह्मणून धातुगत व नाणकगत मूल्य यांत ऐक्यच असलें

पाहिजे व तें राखण्याकरितां सरकारास मुक्तद्वार टांकसाळीची पद्धति अमलांत आणावी लागते. या पद्धतीमध्यें चलनांत बाहेरलीं जाणारीं नाणीं ज्या धातूचीं असतात, ती धातू सरकारी टांकसाळींत देऊन, तेवढ्या वजनाचीं नाणीं पाडून मागतां येतात. इंग्लंडमध्यें ही मुक्तद्वारटांकसाळीची सवलत फक्त सोन्याच्या नाण्यांकरितांच ठेविलेली आहे. इंग्लंडमध्यें जर कोणीही एक औंस सोनें टांकसाळींत दिलें, तर त्याला त्याचीं ३ पौंड १७ शिलिंग १० $\frac{1}{2}$ पेन्स ह्याप्रमाणें नाणीं पाडून मिळतात व याबद्दल कित्येक राष्ट्रांच्या टांकसळींत नाणीं पाडण्याचा खर्च ह्मणून जी एक थोडी कसर कापून घेतात, तीसुद्धां इंग्लंडमध्यें घेत नाहीत; परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र असें होतें कीं, सरकारी टांकसाळींत काम फार असल्यामुळें, सोनें दिल्यापासून नाणीं पाडून मिळण्यास बराच अवधि लागतो. याकरितां लोक बँक ऑफ इंग्लंडमध्येंच सोनें देऊन नाणीं घेतात व हीं अशीं तावडतोब नाणीं देण्याबद्दल बँक ऑफ इंग्लंड पंधरा दिवसांचें व्याज ह्मणून प्रत्येक औंस सोन्यामागें १ $\frac{1}{2}$ पेन्स कसर कापून घेते. ह्मणजे एक औंस सोन्यास ३ पौंड १७ शिलिंग ९ पेन्स याप्रमाणें नाणीं मिळतात. रुपें, तांबें इत्यादि धातूंचीं उपनाणीं पाडण्याचा हक्क मात्र सरकारनें फक्त आपणाकडेच ठेविला आहे त्याचें कारण वर दिलेंच आहे.

ही झाली एकचलनपद्धतीची व्यवस्था. आतां दोन धातू जर चलनांत असतील म्हणजे द्विचलनपद्धति जर देशांत सुरू असेल, तर काय होईल तें पाहूं. दोन धातू चलनांत असल्या म्हणजे साहजिकच त्यांमधील गुणोत्तर ठरवावें लागतें; परंतु दोन धातूंतील नाण्यांच्या किंमतीचें कायदेशीर प्रमाण व त्यांचें बाजारांतील धातुगत किंमतीचें प्रमाण यांत एकवाक्यता पाहिजे तरच द्विचलनपद्धति चालूं शकते. नाहीं तर दोन धातूंच्या नाण्यांचें चलनांतील मूल्य व बाजारांतील धातुगत मूल्य यांत अंतर पडलें कीं, ग्रेशॅमच्या नियमाची क्रिया सुरू होते. आणि दोन्हींपैकीं एक म्हणजे जास्त किंमतीची धातु–नाणें–चलनांतून नाहींशीं होते; अर्थात् परदेशांत जातें. यावरून इतकें सिद्ध होतें कीं, सोनें व रुपें यांच्यांतील बाजारभावांत आणि चलनांतील कायदेशीर किंमतींत ऐक्य पाहिजे. अशा रीतीनें या द्विचलनपद्धतींतील अडचणी निरनिराळ्या प्रसंगीं बहुतेक राष्ट्रांस आलेल्या होत्या व त्या नाहींशा करून ही पद्धति यशस्वी करण्याकरितां बऱ्याच राष्ट्रांनीं प्रयत्न करूनही पाहिले; परंतु या पद्धतीच्या सुफलतेचें मुख्य कारण जें तिचा सार्वत्रिक स्वीकार, तें सुधारलेल्या राष्ट्रांच्या ऐक्याच्या अभावीं घडून आलें नाहीं आणि शेवटीं बहुतेकांस सुवर्णैकचलनपद्धतीचाच अवलंब करणें प्राप्त झालें. येथें द्विचलनपद्धति रूढ होण्यासंबंधीं निरनिराळ्या राष्ट्रांकडून जे प्रयत्न झाले, त्यांचें थोडक्यांत अवलोकन करणें बरें होईल.

द्विचलनपद्धतीच्या बाबतींत खरें पाहिलें असतां फ्रान्सनें अतिशय पुढाकार घेऊन, ती अस्तित्वांत राहण्याबद्दल खटपट केली; परंतु मोठ्या राष्ट्रांमधील अविश्वास, राजकारण इत्यादींमुळें हे सर्व प्रयत्न निष्फळ झाले व जवळ जवळ सुवर्णैकचलनपद्धतीचाच सर्वांनीं अवलंब केला. वर सांगितलेंच आहे कीं, द्विचलनपद्धति यशस्वी होण्यास व तिचे फायदे सार्वत्रिक अनुभवास येण्यास तिचा सार्वत्रिक, निदान सुधारलेल्या सर्व देशांत प्रसार झाला पाहिजे. तेव्हां या पद्धतीचा असा सार्वत्रिक प्रसार गृहित धरून त्यापासूनचे फायदे काय आहेत ते पाहूं. वर जे पैशाचे गुण ह्मणून सांगितले आहेत, त्यापैकीं मूल्याचें स्थैर्य हा गुण द्विचलनपद्धतीनें जास्ती प्रमाणांत पैशांत येतो. धातूंच्या उत्पादनामधील कमी जास्ती प्रमाण व त्याचप्रमाणें एकाच धातूवर (एकचलनपद्धतीच्या योगानें पडलेली) कमीजास्त प्रमाणांत असलेली मागणी यामुळें उत्पन्न झालेला मूल्याचे स्थैर्यावरील अनिष्ट परिणाम, दोन धातू मुख्य चलनांत असल्या तर, एकीऐवजी दुसरीचा पुरवठा करून नाहींसा करितां येतो. अशा रीतीनें चढत्या भावाच्या धातूवर पडणारा मार स्वस्त भावाचे धातूच्या मोबदल्यानें नाहींसा होऊन द्विचलनपद्धतीच्या व्यवहारांत समतोलपणा राखला जातो. सोळाव्या शतकाच्या अखेरपर्यंत बहुतेक देशांत द्विचलनपद्धति अमलांत होती; परंतु त्यावेळीं राष्ट्राराष्ट्रांत एकी नसल्यामुळें व हल्लींप्रमाणें अर्थशास्त्राची प्रगतिही विशेष नसल्यामुळें, त्या पद्ध-

तीचा फायदा करून घेतां आला नाहीं. इंग्लंडनें १६९६ मध्यें सुवर्णकचलनपद्धतीचा स्वीकार केला. फ्रान्सनें मात्र या पद्धतीची मजबूत पायावर उभारणी करून तिचे दोष नाहींसे करण्याचा प्रयत्न केला. कॅलॉन नामक फडणीसाच्या सूचनेवरून फ्रान्समध्यें १७९५ सालीं प्रथम कायदेशीर रीतीनें १५ $\frac{१}{२}$ : १ या प्रमाणांत रुपें व सोनें यांचा भाव ठरविला गेला. पुढें १८०३ सालीं नेपोलियननें फ्रान्समध्यें द्विचलनपद्धति अमलांत आणिल्याचें जाहीर केलें. तेव्हां १८०३ पासून ते जवळ जवळ १८५० पर्यंत सोन्यापेक्षां रुपें हेंच जास्ती चलनांत होतें. फ्रान्समधील एकंदर चलनापैकीं शेंकडा २२ ते शेंकडा ७८ असें सोनें व रुपें यांचें प्रमाण होतें व या सर्व कालांत फ्रान्समधून सोनें बाहेर जात होतें व रुपें मात्र एकसारखें आंत येत होतें. पुढें आस्ट्रेलिया व कॅलिफोर्निया येथील सोन्याच्या खाणींचा शोध लागल्यामुळें तर सोन्याची किंमत फारच उतरली. फ्रान्समधील कायदेशीर भावापेक्षां सोनें अर्थातच रुप्यापेक्षां स्वस्त झालें. याचा परिणाम आतां उलट झाला. रुपें फ्रान्समधून बाहेर जाऊं लागलें व सोनें देशांत परत येऊं लागलें. फ्रान्समधून रुपें अगदीं नाहींसेंच होतें कीं काय असें वाटूं लागलें. तेव्हां अशा तऱ्हेनें चलनांत होणारे मोठमोठे फेरफार नाहींसे करण्याकरितां ( चलनांत स्थैर्य उत्पन्न करण्याकरितां ) ह्मणून सन १८६५ मध्यें फ्रान्स, बेल्जम, स्विझर्लंड, इटली व ग्रीस इत्यादि राष्ट्रांनीं मिळून एक

लॅटिन युनियन स्थापन केला व त्याचा सुपरिणामही थोडासा दिसून येऊं लागला. फ्रान्सच्या शेजारींच बेल्जम, स्वित्झर्लंड, इटली वगैरे राष्ट्रें असल्यामुळें, तेथें चलनांत फ्रेंच नाणींच फार असत; परंतु १८७० सालीं जें फ्रँको–जर्मन युद्ध झालें, त्यापासून सर्व दिशा पालटली. या युद्धांत फ्रान्सचा पराजय झाला व १८७१ मध्यें जर्मनीनें इंग्लंडचें अनुकरण करून, सुवर्णैकचलनपद्धतीचा स्वीकार केला व फ्रान्सला जर्मनीस जी खंडणी द्यावी लागली, ती सर्व सोन्यांत द्यावी लागली. याचा व एकंदर मध्ययुरोपांत उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन, जर्मनीनें आपल्या येथील सर्व रुपें फ्रान्स व लॅटिन युनियनमधील इतर राष्ट्रांच्या बाजारांत घालविलें. त्यामुळें रुप्याची किंमत एकदम फार कमी झाली. १८७२ मध्यें नॉर्वे, स्वीडन, डेनमार्क या राष्ट्रांनीं आपापसांत करारनामा करून सुवर्णैकचलनपद्धतीचा स्वीकार केला. या सर्वांचा परिणाम असा होऊं लागला कीं, द्विचलनपद्धति कायम ठेवणें लॅटिन युनियनच्या लोकांस कठिण पडूं लागलें. लागलें. म्हणून १८७३ मध्यें लॅटिन युनियनच्या राष्ट्रांनीं पांच फ्रँकच्या नाण्यांस खुली टांकसाळ बंद केली व प्रत्येक राष्ट्रानें नाणीं ठराविक प्रमाणांत बाहेर काढावीं असें ठरविलें. १८७८ मध्यें तर रुप्यास खुली टांकसाळ बंद केली व रुप्याच्या कृत्रिम नाण्याच्या उत्पत्तीचेंसुद्धां नियमन केलें. मध्यंतरीं १८७६ मध्यें अमेरिकन सरकारनें रुप्याच्या चलनासंबंधीं एक कमिशन नेमिलें

व त्यानें द्विचलनपद्धतीचाच पुरस्कार केला. १८७८ मध्यें पुन चलनासंबंधीं एक परिषद् भरली; परंतु जर्मनीनें त्यांत भाग घेण्याचें नाकारिलें. इंग्लंडनें तोंडीं सहानुभूति दाखविण्यापलीकडे कांहीं विशेष केलें नाहीं आणि उलट बेल्जम, स्वित्झर्लंड यांनींही सुवर्णैकचलनपद्धति अमलांत आणण्याचें ठरविलें. त्यानंतर पुनः सन १८८१, १८९२, १८९७ या सालीं द्विचलनपद्धतीचा सार्वत्रिक स्वीकार करण्यासंबंधीं परिषदा भरवून प्रयत्न करण्यांत आले; परंतु इंग्लंड, जर्मनीसारख्या बलाढ्य व सुसंपन्न राष्ट्रांनीं त्यांस विरोध केल्यामुळें, शेवटीं त्यांतून विशेष कांहीं निष्पन्न झालें नाहीं. एवढें मात्र लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं, फ्रान्सनें व अमेरिकेनें आपल्या देशांत अनेक कायदे पास करून द्विचलनपद्धति कायम राखण्याचे करून प्रयत्न केले. १८९२, १८९७ च्या परिषदा अयशस्वी ठरल्यानंतरच १८९३, १८९८ सालीं हिंदुस्थान सरकारनें चलनासंबंधीं कमिट्या बसवून आपलें धोरण मुक्रर केलें. असा द्विचलनपद्धतीचा थोडक्यांत इतिहास आहे.

आतां चलनपद्धतींचे जे एकंदर पांच प्रकार आहेत ते पाहूं.

वर सांगितलेल्या सुवर्णैकचलन किंवा संमिश्रचलनपद्धति व द्विचलनपद्धति याशिवाय तुलनात्मक, एकात्मक व लंगडी द्विचलन पद्धति असे एकंदर चलनाचे पांच प्रकार आहेत.

तुलनात्मकपद्धतीमध्यें सोन्यारुप्याचीं नाणीं तोलून, कस लावून मूळ धातूच्या भावानेंच स्वीकारलीं जातात. अंतर्राष्ट्रीय व्यापारांत ही पद्धति चालू असते. एकात्मकचलनपद्धतीमध्यें एकाच धातूचें नाणें पाडलें जातें व तें कायदेशीर फेडीचें चलन असतें. यांत दोष असा आहे कीं, नाणें एकच असल्यामुळें, मोठ्या व्यापारास ल्हान पडतें किंवा किरकोळ व्यापारास मोठें होतें त्यामुळें दोन्ही वेळां गैरसोय होते. संमिश्रचलनपद्धतींत एका धातूचें नाणें कायदेशीर फेडीचें मुख्य चलन असतें. (हें बहुधा सोन्याचेंच असतें म्हणून आम्हीं या पद्धतीस सुवर्णैकचलनपद्धतीशीं अन्वर्थक असें धरलें आहे.) याचेंबरोबरच दुसऱ्या धातूंचें—रुपें, तांबें, ब्रॉंझ इत्यादि—नाणें उपपैसा म्हणून चालतें. मुख्य पैशाचें चलन अमर्याद प्रमाणांत असतें व उपपैशाचें चलन ठराविक प्रमाणांत असतें. बहुतेक पाश्चात्य देशांत हीच पद्धति हल्लीं रूढ आहे. द्विचलनपद्धतीसंबंधीं वर वर्णन केलेंच आहे. लंगड्या द्विचलनपद्धतीमध्यें मात्र दोन्हीं धातूंचीं (अर्थात् सोनें, रुपें) नाणीं पाडलीं जातात व तीं कायदेशीर फेडीचें चलन समजलीं जातात; परंतु शुद्ध द्विचलनपद्धतीप्रमाणें दोनही नाणीं टांकसाळींतून पाडून मिळत नाहींत. फक्त एकाच धातूचीं नाणीं पाडून मिळतात. सरकारला मात्र दोनही धातूंचीं नाणीं पाडतां येतात.

आतां इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे सुधारलेल्या देशांतील चलनांचा थोडक्यांत विचार करून मग हिंदुस्थानांतील चलनाकडे वळूं. म्हणजे तुलनेनें दोन्हींमधील भेद लक्षांत येण्यास ठीक पडेल.

इंग्लंडची चलनपद्धति संमिश्र किंवा सुवर्णैकचलनपद्धतीची आहे. कायदेशीर फेडीचें मुख्य चलन सोन्याचे पौंड अथवा सॉव्हरिन हें आहे. उपनाणीं शिलिंग, पेन्स, फार्दिंग वगैरे आहेत तीं रुपें, तांबें, ब्रॉंझ इत्यादि धातूंचीं केलेलीं असतात व हीं किरकोळ व्यवहारांतच वापरलीं जातात. पौंडाचें वजन १२३·४४७ ग्रेन ह्मणजे जवळ जवळ ११ आणे भार असतें. आतां यांतील १० आणे भार शुद्ध सोनें असतें व नाणें लवकर झिजूं नये ह्मणून सुमारें एक भार तांबें असतें; परंतु त्यामुळें पौंडाच्या सोन्याच्या किंमतींत विशेषसा फरक पडत नाहीं. इंग्लंडमध्यें सोन्यास खुली टांकसाळ असल्यामुळें, एक औंस सोनें दिलें कीं, ३ पौंड १७ शिलिंग १० $\frac{१}{२}$ पेन्स इतकीं नाणीं बरोबर पाडून मिळतात व टांकसाळींत हा नाणीं पाडण्याचा खर्च सरकार स्वतः सोसतें. आतां टांकसाळींतून नाणीं पाडून मिळण्यास थोडासा अवधि लागत असल्यामुळें, लोक बहुधा 'बँक ऑफ इंग्लंड' मध्यें सोनें देऊन नाणीं घेतात. सोनें घेऊन तावडतोब नाणीं दिल्याबद्दल 'बँक ऑफ इंग्लंड' व्याज ह्मणून (हें व्याज पंधरा दिवसांचें ह्मणून घेतलें जातें) प्रत्येक औंस सोन्यामागें १ $\frac{१}{२}$ पेन्स कापून घेते. ह्मणजे एक औंस सोन्यास ती ३ पौंड १७ शिलिंग ९ पेन्स इतकींच नाणीं देते. हाफ् सॉव्हरिन अथवा अर्ध्या पौंडाचें दुसरें एक सोन्याचें नाणें चलनांत आहे. त्याचें वजन वगैरे सर्व कांहीं पौंडाच्या अर्ध्या प्रमाणांत आहे. रुप्याचें नाणें

शिलिंग हें आहे व तें कृत्रिम किंमतीचें आहे. हें फक्त दोन पौंडांपर्यंतच कायदेशीर फेडीचें चलन आहे. इतर पेन्स, फार्दिंग वगैरे किरकोळ नाणीं ब्रॉंझ, निकल वगैरेचीं आहेत.

फ्रान्सची चलनपद्धति लंगड्या द्विचलनाच्या जातीची आहे.

वर द्विचलनपद्धतीच्या इतिहासांत सांगितल्याप्रमाणें १८६६ मध्यें फ्रान्स, बेल्जम, इटली, स्विट्झर्लंड यांनी लॅटिन युनियन नांवाचा संघ स्थापून, १ : १५ ½ असें सोन्या-रुप्याच्या भावाचें गुणोत्तर ठरवून आपल्या देशांत द्विचलनपद्धति चालू ठेविली; पण १८७८ पर्यंतच ती चालू शकली. कारण सुवर्णकचलनाचा पुरस्कार इंग्लंड, जर्मनी, स्वीडन, नार्वे इत्यादि देशांनी केल्यामुळें, रुपें अपकृष्ट होऊन, लॅटिन युनियन संघाच्या राष्ट्रांत येऊं लागलें. तेव्हां लॅटिन युनियन संघाच्या राष्ट्रांस १८७८ मध्यें रुप्यास खुली टांकसाळ बंद करणें भाग पडलें. तेव्हांपासून २० फ्रँकचें सोन्याचें व ५ फ्रँकचें रुप्याचें अशीं दोन मुख्य नाणीं संघाच्या राष्ट्रांत प्रचलित आहेत. २० फ्रँकच्या सोन्याच्या नाण्याचें वजन ९९·५६३ ग्रेन इतकें आहे व ५ फ्रँकच्या रुप्याच्या नाण्याचें वजन ३८५·८ ग्रेन आहे. या दोन्हीं नाण्यांत, तीं लवकर झिजूं नयेत म्हणून इंग्लंडांतील पौंडाप्रमाणें थोड्या प्रमाणांत दुसरी धातु मिसळलेली असते. एक फ्रँकचीं वगैरे लहानसहान इतर रुप्याचीं उपनाणीं पुष्कळ आहेत; पण तीं ५० फ्रँकपर्यंतच

कायदेशीर फेडीचें चलन समजलीं जातात. फ्रान्स, इंग्लंड वगैरे परराष्ट्रांशीं होणारा व्यापारी हिशेब, सुवर्णचलनावरच केला जातो. फ्रँकची किंमत १५ रुपयांबरोबर किंवा एका पौंडाबरोबर २५·२२१५ फ्रँक अशा प्रकारें सांगतां येते. स्पेन, रुमानीया, सर्व्हिया, बल्गेरिया हीं राष्ट्रें जरी लॅटिन युनियन संघांत सामील नाहींत, तथापि त्यांची चलनपद्धति मात्र लॅटिन संघाचे राष्ट्रांप्रमाणेंच आहे. म्हणजे फ्रान्सप्रमाणेंच आहे. यावरून जवळ जवळ दक्षिण युरोपमध्यें हीच पद्धति प्रचलित आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें संघांत सामील नसलेल्या दक्षिण अमेरिकेंतील बऱ्याच राष्ट्रांत ही पद्धति सुरू आहे. बोलिव्हिया, एक्वेडॉर, पेरु, अर्जेंटाइन रिपब्लिक, वेनेज्युएला हेटी, कोलंबिया, सेंट्रल अमेरिका हीं तीं राष्ट्रें होत. संघाच्या सभासद राष्ट्रांतसुद्धां नाण्यांचें वजन व शुद्ध धातूचें प्रमाण इत्यादीमध्यें जरी ऐक्य असलें, तथापि नाण्यांचीं नांवें देशपरत्वें निरनिराळीं आहेत. फ्रँक हें फ्रान्सचें, लिरा हें इटलीचें, पेसेटा हें स्पेनचें अशीं नाण्यांचीं नांवें आहेत.

जर्मनीनें १८७३ मध्यें सुवर्णैकचलनाचा स्वीकार केला आहे. जर्मनीच्या नाण्यास मार्क असें नांव आहे. सोन्याच्या २० मार्कच्या नाण्याचें वजन १२२·९१७ ग्रेन इतकें म्हणजे जवळ जवळ इंग्लिश पौंड इतकेंच आहे. ५ मार्कचें, ३ मार्कचें, २ मार्कचें, १ मार्कचें याप्रमाणें रुप्याचीं लहान मोठीं कृत्रिम किम-

तीचीं नाणीं आहेत. तीं २० मार्कपर्यंतच कायदेशीर फेडीचें चलन आहेत. याशिवाय फेनिग वगैरे निकलचीं किरकोळ नाणीं आहेतच. थेलर ह्मणून ३ मार्कच्या किमतीचें एक जुनें रुप्याचें नाणें जर्मनींत चलनांत आहे व तें अमर्याद प्रमाणांत कायदेशीर फेडीचें चलन आहे. हल्लीं लढाईंत जर्मनीचा पराभव झाल्यामुळें, जर्मनमार्कची किंमत अतिशय उतरली आहे हें वाचकांस माहीत असेलच.

जपानची चलनपद्धति प्राचीन काळीं फार घोंटाळ्याची होती. सन १८७१ मध्यें त्यांत सुधारणा करून, दशांशपद्धतीवर चलनाची स्थापना केली. येन हें मुख्य नाणें १०० सेनचें केलें आहे. यावेळीं द्विचलनपद्धति जपानांत प्रचलित होती. सोन्याच्या नाण्याचें रुप्याच्या नाण्याशीं १ : १६ · १७ असें गुणोत्तर होतें. पुढें १८९७ मध्यें द्विचलनपद्धति रद्द करून सुवर्णैकचलनाचा स्वीकार जपाननें केला. मुख्य नाणें सोन्याचें २० येनचें आहे व त्याचें वजन सुमारें २५० ग्रेन आहे. याशिवाय १० येनचें, ५ येनचें अशीं सोन्याचीं नाणीं आहेतच १८९७ पूर्वीं जीं सोन्याचीं नाणीं २० येनचीं व १० येनचीं प्रचारांत होतीं, त्यांचें वजन हल्लींच्या नाण्यांच्या दुप्पट असल्यामुळें, तीं दुप्पट किंमतीनें व्यवहारांत चालतात. रुप्याचीं उपनाणीं ५० सेन, २० सेन, १० सेन अशीं आहेत. शिवाय निकलचीं, ब्रॉंझचीं, १ सेनचीं, ५ रिनचीं वगैरे किरकोळ नाणीं प्रचारांत आहेतच. सोन्यास टांकसाळ खुली आहे व रुप्याचीं नाणीं सरकार पाडतें.

अमेरिकेची पद्धति सुवर्णचलनाची आहे. डॉलर हें मुख्य नाणें येथें चलनांत आहे. सोन्याच्या डॉलरचें वजन २५·८ ग्रेन आहे. रुप्याच्या डॉलरचें वजन ४१२·५ ग्रेन आहे. येथें द्विचलनपद्धतीच पूर्वी चालू होती आणि सोन्याचें रुप्यांशीं १ : १५·९८८ असें गुणोत्तर होतें; परंतु १८७३ मध्यें रुप्याचें नाणें पाडणें बंद केलें. तथापि १८७८ मध्यें रुपें हें कायदेशीर फेडीचें चलन केलें. पुढें १८९० च्या कायद्यानें रौप्यचलनाचें नियमन केलें.

½ डॉलर, ¼ डॉलर, ⅒ डॉलर अथवा डाइम अशीं रुप्याचीं उपनाणीं येथें चलनांत आहेत. या शिवाय सेंट वगैरे निकलचीं किरकोळ नाणीं आहेतच.

हिंदुस्थानांतील चलनासंबंधीं पाहिलें असतां, फार प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत सोन्याचें चलन असावें असें दिसतें. कारण ऋग्वेदांतील कित्येक उल्लेखांवरून सोनें त्या काळीं माहित असलें पाहिजे असें दिसून येतें. पुढील ऋचा या दृष्टीनें मननीय आहेत.—

ये अंजिषु ये वाशीषु स्वभानवः स्रक्षु रुक्मेषु खादिषु । श्राया रथेषु धन्वसु ॥ मं. ५।५३।४.

त्याचप्रमाणें—

अंसेषु व ऋष्टयः पत्सु खादयो वक्षःसु रुक्मा मरुतो रथे शुभः। अग्निभ्राजसो विद्युतो गभस्त्योः शिप्राः शीर्षसु वितता हिरण्मयीः ॥

५।५४।११.

वरील ऋचांत मरुतांच्या तेजस्वी अलंकारांचीं वर्णनें आहेत. त्यांतील अंजि (जवाहिरी दागिने), स्रक् (गोप, कंठे), रुक्म (सोन्याच्या पत्र्याचें उरस्त्राण) खादि (कडी, वाळे), शिप्राः हिरण्मयीः (सोनेरी किरीट) या शब्दावरून तर सोनें ऋग्वेद-कालीं आम्हांस नुसतें धातू म्हणून माहिती नव्हतें तर त्याचे नाना तऱ्हेचे अलंकार करून वापरण्यांत येत होते याविषयीं शंकाच रहात नाहीं. इतकेंच नव्हे तर घोड्यांस देखील सोन्याचे अलंकार घातल्याचे उल्लेख आहेत.

पीवोअश्वाः शुचद्रथा हि भूतायः शिप्रा वाजिनः सुनिष्काः। मं. ४।३७।४.

तसेंच,—

निष्कग्रीवो बृहदुक्थ एना मध्वा न वाजयुः ॥

मं. ४।२।८.

परंतु नाण्यांसंबंधीं मात्र स्पष्टप्रकारचा उल्लेख आढळत नाहीं.

आतां त्या सोन्याचा उपयोग चलनांत नाणें ह्मणून केला जात होता किंवा नाहीं यासंबंधीं मात्र दोन मतें आहेत. कित्येकांचें ह्मणणें असें आहे कीं, सोनें ऋग्वेदकाळीं चलनांत असलें पाहिजे, तर दुसऱ्यांचें मतें सोनें मूल्यवान् धातु ह्मणून फक्त अलंकार वगैरे कारणांकरितांच वापरलें जात असावें असें आहे. तें कसेंहीं असलें तथापि इतर राष्ट्रांच्या मानानें पाहतां, अति प्राचीन काळापासून सोनें हिंदुस्थानांत चलनांत असावें एवढें मात्र खरें. महाभारतादि संस्कृत ग्रंथांत यासंबंधीं पुष्कळच उल्लेख आहेत. पण दुसरीही एक गोष्ट याबरोबर लक्षांत ठेविली पाहिजे कीं, सुवर्णचलनासंबंधीं उल्लेखांशिवाय—गोपवृत्ति समाजांतील लोकांप्रमाणें—गाई, बैल यांचाही उपयोग पैशाप्रमाणें केल्याचे उल्लेख त्याच ग्रंथांत आढळतात; परंतु त्यांची संगत कालानुक्रमानें लावणें कठिण आहे. हिंदुस्थान देशाच्या विस्तृतपणामुळें व तो एकाच वेळीं निरनिराळ्या प्रकारच्या राजे लोकांच्या ताब्यांत असल्यामुळें येथें चलनाची उत्क्रांति सर्व ठिकाणीं सारख्या प्रमाणांत झाली असेल असें ह्मणतां येत नाहीं.

नुकत्याच उपलब्ध झालेल्या "कौटिल्याचें अर्थशास्त्र" या ग्रंथामुळें चंद्रगुप्तकालीन भारतवर्षाची अर्थशास्त्रांतील प्रगति अत्यंत विस्मयजनक असली पाहिजे असें निदर्शनास येतें; परंतु तत्कालीन नाणीं आज उपलब्ध नसल्यामुळें, नाण्यांसंबंधीं निश्चित मत देतां येत नाहीं. इसवी सनापूर्वीच्या दोन तीन शतकांपासून मात्र नाणीं प्रचारांत असावींत असें खात्रीलायक ह्मणतां येतें.

सम्राट् अशोकाच्या नांवाची जीं नाणीं आज सांपडलीं आहेत, त्यावरून नाण्यांसंबंधीं आमची प्रगति दिसून येते. त्यानंतर पहिल्या व दुसऱ्या * "कॅडफायसिस्" नांवाच्या राजांनी नाण्यांत बरीच सुधारणा घडवून आणिली. तसेंच स्कंदगुप्त व पुरगुप्त यांनींही टांकसाळी व नाणीं यासंबंधांत बरेंच लक्ष पुरविल्याचें दिसून येतें. पुढें मुसलमानांचे कारकीर्दींत महमद तघलकानें टांकसाळींतून हिणकस नाणीं काढून स्वाऱ्यांच्या व चैनीच्या पायीं झालेल्या कर्जांतून मुक्त होण्याचे जे हास्यास्पद प्रयत्न केले, त्यांचें विस्तृत वर्णन वाचकांनीं मूळ इतिहासांतच वाचावें अशी आह्मीं शिफारस करितों.

अकबराचे कारकीर्दीपासून मात्र चलनाची व्यवस्थेशीर माहिती लागते. अकबराचे वेळीं हिंदुस्थानचा बराचसा भाग एकछत्राखालीं आल्याकारणानें, इतर सुधारणेबरोबर चलनपद्धतीसही त्याचे कारकीर्दींत व्यवस्थेशीर वळण दिलें गेलें. यापूर्वी युरोपाप्रमाणें येथेंसुद्धां खासगी टांकसाळी फार होत्या, त्या सर्व त्यानें कायदे करून नाहींशा केल्या. त्याचप्रमाणें मुख्य नाणीं व उपनाणीं असे भेद करून, त्यानें प्रत्येक प्रकारच्या टांकसाळींची संख्या मर्यादित केली. ऐनी अकबरीमध्यें यासंबंधानें बरीचशी

* See Havell's History of Aryan Rule in India Page 142-174.

माहिती दिली आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं, सर्व प्रकारचीं नाणीं पाडण्याच्या त्यानें फक्त चार टांकसाळी ठेविल्या होत्या. एक आग्र्यास, एक बंगाल्यांत, एक अहमदाबादेस व एक काबुलांत. त्याचप्रमाणें रुपें व तांबें यांचीं नाणीं पाडण्याकरितां त्यानें दुसरीं दहा ठिकाणें ठरविलीं होतीं व फक्त तांब्याचीं नाणीं पाडण्याकरितां ह्मणून सर्व हिंदुस्थानांत मिळून चोवीस ठिकाणीं परवानगी दिली होती. अकबराचे काळीं द्विचलनपद्धति सुरू होती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण सोन्याच्या होन, दिनार, मोहरा इत्यादि लहान मोठ्या नाण्यांबरोबर रुप्याचें रुपया हेंही नाणें प्रचारांत होतें. तांब्याचें दाम हें नाणें होतें. त्यानंतर श्रीशिवाजी महाराजांनीही आपले कारकीर्दींत टांकसाळी स्थापन केल्याचें दिसून येतें; परंतु त्यांतील बहुतेक टांकसाळी खासगी लोकांच्या असून, त्या सरकारी परवानगीनें चालू केलेल्या असत. शिवाजी महाराजांचे काळीं दक्षिणेंत मोहरांपेक्षां होन हेच जास्त उपयोगांत असावे असें दिसतें. कारण अष्टप्रधानांचे पगार होनांत ठरलेले असत व त्याचप्रमाणें वर्षासनें वगैरेही होनांत ठरल्याबद्दलचे उल्लेख, जुन्या कागदपत्रांत व बखरींत आढळून येतात. त्याचप्रमाणें पन्हाळ्यास रुपयांची टांकसाळ असावी असें वाटतें. कारण दक्षिण महाराष्ट्राकडील भागांत पन्हाळी रुपया अजूनसुद्धां प्रसिद्ध आहे; परंतु या सर्वांपेक्षां शिवकालीन तांब्याचे नाण्याचा ह्मणजे "शिवराई" चा चोहोंकडे

प्रसार झाला होता. पेशव्यांचे काळींही थोडीबहुत नाणीं बाहेर निघत असत; परंतु त्या कालांत चलनाच्या बाबतींत विशेष कांही घडामोड झाल्याचें जुन्या कागदोपत्रीं आढळून येत नाहीं.

ही हिंदुस्थानांतील चलनपद्धतीची संक्षिप्त रूपरेखा झाली. हिंदुस्थान हा देश वर सांगितल्याप्रमाणें निरनिराळ्या वेळीं अनेक प्रकारच्या राजांच्या अमलाखालीं असल्यामुळें, प्रत्येक प्रांताचीं नाणीं निरनिराळ्या प्रकारचीं व वजनाचीं अशीं होतीं म्हणून त्याबद्दल सांगोपांग व क्रमशः माहिती मिळविणें हें काम कठिण व इतिहाससंशोधकांचें आहे. तेव्हां आपण आतां आपल्या मुख्य गोष्टीकडे वळूं.

इतर खासगी सावकार किंवा व्यापारी लोकांप्रमाणें, ईस्ट इंडिया कंपनीनें रुपये पाडण्याची परवानगी मोंगलाकडून व मराठ्यांकडून मिळविली होती व कंपनीचें 'कुंपणी सरकारां'त रूपांतर होऊन सर्व हिंदुस्थानचीं सूत्रें तिच्या हातीं येण्यापूर्वीच कंपनीच्या रुपये पाडण्याच्या सचोटीमुळें तिचे रुपये लोकांस प्रिय झाले होते.

यामुळें आजदेखील दस्तऐवजीं 'रोख रुपये गाडी सुर्ती' हा प्रयोग उपयोगांत येत असतो. पुढें सन १८०० च्या सुमारास सर्व हिंदुस्थान जवळ जवळ कंपनीसरकारच्या अमलाखालीं आलें त्यावेळीं प्रत्येक प्रांतांत निरनिराळ्या किमतीचीं, वजनाचीं व

आकाराचीं नाणीं चालू असल्यामुळें, कंपनीसरकारच्या एकछत्री राज्यकारभाराच्या पद्धतींत ती गोष्ट विसंगतपणा उत्पन्न करणारी होती. मद्रासला 'पॅगोडा' नांवाचें सोन्याचें नाणें (७ शिलिंगचें) चलनांत होतें, तर बंगालमध्यें रुप्याचें नाणें चलनांत होतें. तेव्हां सर्व हिंदुस्थानांतील चलनांत व्यवस्थितपणा येण्याकरितां कांहीं-तरी सुधारणा करावी ह्मणून "ईस्ट इंडिया कंपनीच्या" अधिकारी-वर्गानें सन १८०६ मध्यें एक मसुदा तयार केला. या मसुद्याप्रमाणें सोनें चलनांतून नाहींसें करावें अशी जरी कंपनीसरकारची इच्छा नव्हती, तरी पण, रुप्याचें नाणेंच मुख्य चलन करण्यावर त्यांचा प्रथम भर होता; परंतु पुढें सन १८१८ मध्यें मात्र मद्रासमधील 'पॅगोडा' हें सोन्याचें नाणें बंद करून, त्याऐवजीं रुपया हाच चलनांत आणला गेला. आतां, येथें एक गोष्ट नमूद करून ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, याच सुमारास ह्मणजे सन १८१६ मध्यें इंग्लंडनें सुवर्णैकचलनाचा स्वीकार केला, तथापि त्याचा परिणाम हिंदुस्थानावर मात्र कांहीं झाला नाहीं! उलट हिंदुस्थानांत सोनें व रुपें दोन्ही चलनांत असतां, हिंदुस्थान देश गरीब आहे व तेथील लोकांस सोन्यापेक्षां रुपें अधिक आवडतें, अशा कंपनीच्या नोकरांच्या गैरसमजुतीमुळें ह्मणा अगर प्रामाणिक समजुतीमुळें ह्मणा, हिंदुस्थानांत रुप्याची एकचलनपद्धतीच सन १८३५ मध्यें सुरू झाली. यापुढील हकीकत पूर्वींच्या प्रकरणांत येऊन गेल्यामुळें पुनः देण्याचें कारण नाहीं.

आतां अधात्वात्मक पैशासंबंधीं विचार करून हें प्रकरण पुरें करूं. येथें प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं, अधात्वात्मक अथवा कागदीचलन हें सर्वस्वी पतीवर अवलंबून आहे. पतीच्या अर्था-संबंधानें अर्थशास्त्रज्ञामध्येंसुद्धां मतभेद आहेत; पण आपणांस त्यांशीं कर्तव्य नाहीं. ज्याप्रमाणें धात्वात्मकचलनामध्यें नाणें हें एक श्रमाच्या मोबदल्याचें चिन्ह आहे असें सांगितलें, त्याप्रमाणें अधा-त्वात्मकचलनाची गोष्ट आहे. फक्त अधात्वात्मक अथवा कागदी-चलनाची उभारणी—जरी पैशाचा निधि हा त्याचे बुडाशीं असतोच तरी—मुख्यत: विश्वासावरच झालली आहे. जसजशी राष्ट्रांची प्रगति व व्यापाराची वाढ झपाट्यानें होऊं लागली, तसा धात्वात्मक पैसा इतक्या मोठ्या उलाढालीस अपुरा पडूं लागला व म्हणून अधात्वा-त्मक अथवा कागदी पैसा अस्तित्वांत आला. आता यांतसुद्धां दोन मुख्य भेद आहेत. एक सरकारी पतीवरचें अथवा कायदे-शीर कागदी चलन व दुसरें खासगी अथवा बँका, व्यापारी यांच्या पतीवरचें कागदी चलन. हें खालीलप्रमाणें दर्शवितां येईल.

### अधात्वात्मक पैसा.

- सरकारी अथवा कायदेशीर चलन.
  - परिवर्तनीय नोटा.
  - अपरिवर्तनीय नोटा
- खासगी पतीवरील कागदी चलन.
  - हुंड्या.
  - चेक्स.
  - विनिमयपत्रें,
  - बिलें वगैरे.

सरकारी पतीवरील चलनांत (नोटांत) दोन भेद आहेत हें व दाखविलेंच आहे. नोटासंबंधीं एक मुख्य नियम असा आहे कीं, जवढ्या नोटा सरकार काढतें, तितक्याच किमतीचें सोनें किंवा रुपें सरकारी तिजोरींत ठेवावें लागतें. नाहीं तर एखादे प्रसंगीं नोटा जास्त काढण्याचा सरकारचा मोह अनिवार होऊन, चलनाची वाढ विनाकारण होते व मग नोटा देऊन लोक जर पैसा मागूं लागले व तेवढी मागणी पुरविण्याइतकें सोनें, रुपें जर सरकारच्यापाशीं नसलें तर मग नोटा अपरिवर्तनीय ठरतात अर्थात त्यांची किंमत कमी होते व असें होणें सरकारास अनिष्ट आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं फ्रान्समध्यें असायनेट्स अपरिवर्तनीय झाल्या होत्या व हल्लींच्या महायुद्धापासून रशियामध्यें नोटा अपरिवर्तनीय झाल्या आहेत. सरकारावर जर लोकांचा भरंवसा असेल, तर कित्येक प्रसंगीं नोटांचा अतिरेक झाला तरी त्यांवर विशेष परिणाम होत नाहीं. महायुद्धांत इंग्लंडनेंसुद्धां कागदी चलनाचा अतिरेक केला होता; परंतु इंग्लंडचे मंत्री व मुख्य बँकांचे मॅनेजर हे फार हुषार असल्यामुळें व सरकारवर लोकांची श्रद्धा असल्यामुळें, नोटा परिवर्तनीयच राहिल्या आहेत. यासंबंधीं सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ पिगो यांनीं कॉंटेंपोररी रिव्हूमध्यें एक मननीय लेख लिहिला आहे. इंग्लंड, फ्रान्स वगैरे पाश्चात्य देशांत कांहीं-एक विशिष्ट मर्यादेपर्यंत स्वतःच्या पतीवर नोटा काढण्याची परवानगी मोठ्या बँकांना देण्यांत आलेली आहे व त्याशिवाय सर-

कार नोटा काढते त्या निराळ्याच. हिंदुस्थानांत १८६६ पूर्वी प्रेसिडेन्सी बँकांना ह्या नोटा काढण्याचा अधिकार होता; पण पुढें तो रद्द करून, हिंदुस्थानसरकारच नोटा काढूं लागलें हिंदुस्थान-सरकार जितक्या किंमतीच्या नोटा काढतें, त्याबद्दल तिजोरीमध्यें रोख, रुपे वगैरे रीतीनें तितक्या किंमतीचा ऐवज ठेवतें. यासंबंधीं विस्तृत विवेचन पूर्वींच्या प्रकरणांत आलेलें आहेच. खासगी पतीवरील कागदी चलन ह्मणजे हुंड्या, चेक्स, विनिमयपत्रें यांचाही उपयोग हल्लीं वाढत्या प्रमाणांत आहे व बँकांचा प्रसार जसजसा जास्त होऊन लोकांचा त्यांवर विश्वास बसेल, तसे तसे हुंड्या, चेक्स् वगैरेंवर हल्लींपेक्षां जास्त प्रमाणांत व्यवहार चालतील. यांपैकीं हुंड्यांची पद्धति ही आपणांस पूर्वींपासून माहित आहेच. फक्त चेक्स व बिलें हीं मात्र आह्मांस नवीं आहेत. यांचा व्यवहारांत उपयोग कसा होतो व हिंदुस्थानांतील बँकांशीं त्यांचा काय संबंध आहे हें पुढील प्रकरणांत दाखविलें आहे.

# प्रकरण ८ वें.

## हिंदुस्थानांतील बँका व त्यांचें स्वरूप.

बँक हा शब्द उच्चारल्याबरोबर पैशाच्या देवघेवीसंबंधीं जी एक विस्तृत प्रकारची कल्पना मनांत उत्पन्न होते तशी बँक या परकीय शब्दाबद्दल पेढी हा प्रतिशब्द योजिला असतां उत्पन्न होत नाहीं. कारण शब्दास इतिहास हा असतोच आणि त्याच्यायोगानें एका विशिष्ट परिस्थितीशीं निगडित असलेली कल्पना होते. बँकेच्या बाबतींत एवढी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, बँकेच्या संस्थेस जें इतकें विस्तृत स्वरूप प्राप्त झालें आहे तें गेल्या शतकाच्या अखेरीसच होय परंतु पेढीची स्थिति मात्र तशी नाहीं. पेढीचें हें स्वरूप जरी बँकेप्रमाणेंच, दोन्हींचेंही मूलभूत कार्य जें ठेवी ठेवून घेणें व व्याजानें पैसे देणें, यांतूनच वाढत्या व्यापाराबर उत्क्रांत पावलेलें आहे, तथापि तें हजारों वर्षांपासून हिंदुस्थानांत प्रचलित आहे वर उल्लेखिलेल्या पेढीच्या मूलतत्त्वानुसार पैसे कोणास कर्जाऊ द्यावेत, किती व्याजानें द्यावेत या संबंधीं मनु वगैरे स्मृतिकारांनीं नियम घालून दिलेले आहेत. पहा मनुस्मृति अध्याय ८, श्लोक १४७ इ. व अध्याय १०, श्लोक ११७ इ०) त्याचप्रमाणें आपलेकडील पेढ्यांना हुंडीची पद्धतीहि फार प्राचीन कालापासून माहिती होती. हुंडीसंबंधीं स्पष्ट उल्लेख प्राचीन मंदिरांतील कांहीं शिलालेखांत सांपडले आहेत. पूर्वकालीन युरोपांत जें कांहीं थोडें पेढीचें अथवा बँकिंगचें ज्ञान ग्रीक, रोमन, ज्यू

लोकांना होतें तें त्यांना असीरियन व बॅबिलोनियन लोकांपासून मिळालें असावें असा कित्येकांचा अदमास आहे इ. स. ८०८ अगर त्या सुमारास इटालींतील लोम्बार्डी शहरीं पहिली बँक ज्यू लोकांनीं स्थापिली. त्यानंतर इ स ११५७ चे सुमारास व्हेनिस येथें ज्यू लोकांनीं बँका स्थापन केल्याबद्दल माहिती मिळते. परंतु युरोपांतील बँकिंगचे पद्धतीस फ्लॉरेन्स येथील सराफांच्या योगानें खरें चलन मिळालें असें ह्मणतात. बँक हा शब्द सुद्धां इटालियन Banco बांक या शब्दापासून निघाला आहे. पूर्वी फ्लॉरेन्स येथील सराफ बाजारांत अथवा रस्त्याच्या एका बाजूस बांकावर बसून पैशाचे देवघेवीचा धंदा करीत. ह्मणून पुढें हेंच नांव कायम पडलें. सतराव्या शतकाच्या आरंभीं इंग्लंडमध्यें हुंडीच्या पद्धतीस सुरवात झाली. पुढें १६९४ मध्यें पॅटरसन नांवाच्या एका स्कॉच मनुष्याच्या हस्तें बँक ऑफ इंग्लंडची स्थापना झाली. यायोगानें खासगी सराफांच्या धंद्यास बराच आळा बसला. बँक ही संस्था त्यावेळीं नवीन असल्यामुळें एकंदर व्यवहारांत चोखपणा आलेला नव्हता. सरकारनें जर वेळोवेळीं मदत करून या बँकेवरचीं अरिष्टें टाळलीं नसतीं तर बँक ऑफ इंग्लंडचें जें एक आज नमुनेदार उदाहरण झालें आहे तें झालें नसतें. वर वर्णिल्याप्रमाणें एक दोन शतकांपूर्वी इंग्लंडमध्यें व साधारणतः युरोपांतही हल्लीसारखा बँकामध्यें सुव्यवस्थितपणा आलेला नव्हता. त्यामुळें हिंदुस्थानांत त्यावेळीं आलेल्या इंग्लिश लोकांवर आमच्या इकडील

पेढ्या, त्यांची हुंड्यांची पद्धति, एकंदर व्यापारांतील सच्चेपणा, गुमास्त्यांची अत्यंत विश्वसनीय वागणूक, यांचा उत्तम परिणाम झाला. मि. चार्लस् एन्. कुक यांनीं आपल्या 'हिंदुस्थानांतील बँकांची स्थापना प्रगति व सद्यःस्थिति' या पुस्तकांत हिंदी सराफ हे सचोटीचे मूर्तिमंत पुतळे होत अशाप्रकारें स्तुति केलेली आहे. असो, अशा प्रकारची ही स्तुति अभिमानास्पद जरी असली तथापि पाश्चात्य पद्धतीवरील पेढी अथवा बँकिंग या संस्थेची स्थापना युरोपियन लोकांनींच प्रथम हिंदुस्थानांत केली एवढें मात्र खरें; आणि या गोष्टीस सुरवात होऊन आज जरी एक शतक होत आलें तथापि इतर देशांच्या बँकिंग विषयक प्रगतीशीं हिंदुस्थानची तुलना केली तर हिंदुस्थान फार मागें आहे हें स्पष्ट दिसून येईल.

| देशाचें नांव. | लोकसंख्या | बँकांची संख्या. | भांडवल पौंड | ठेवी पौंड. |
|---|---|---|---|---|
| हिंदुस्थान | ३१५ | ३६४ | २३ * | ११८ |
| ग्रेटब्रिटन व आयर्लंड | ४६ | ९३५७ | ८८ | २३५५ |
| अमेरिकन संयुक्त संस्थानें | ९० | २८९१३ | ४८२ | ५७६० |
| जपान | ७५ | ५८३४ | ६० | ४९४ |
| कॅनडा | ७५ | ३३२७ | २३ | ३२८ |
| आस्ट्रेलिया | ५ | २३५६ | ३५ | २१६ |

१ आकडे लक्ष दशांत आहेत.

* यांतील एक्सचेंज बँकांचें भांडवल १८ दशलक्ष पौंडांचें आहे. त्यांतील हिंदुस्थानांतील भांडवल निराळें काढून दाखवितां येत नाहीं; तथापि जास्तीत जास्ती ७ दशलक्ष पौंडांपेक्षां हें हिंदुस्थानचें भांडवल अधिक होणार नाहीं.

आतां असें होण्याची कारणें अनेक आहेत व त्यांचें दुसरीकडे या पुस्तकांत विवेचन केलेलें आहेच; तथापि जातां जातां थोड्या कारणांचा विचार करूं. हिंदुस्थान देश हा शेतकीप्रधान असल्यामुळें, येथें शेतकऱ्यांची लोकसंख्या अधिक असणें साहजिक आहे. ते बहुतेक अशिक्षित असल्यामुळें व जुन्या पेढ्यांप्रमाणें बँकांच्या शाखा गांवोंगांवीं नसल्यामुळें, बँकेच्या संस्थेचा उपयोग कसा करून घ्यावा याची त्यांस मुळींच माहिती नाहीं. त्यांस आपल्या गांवांतील सावकार बरा वाटतो. पूर्वींपासून ही पद्धति चालत आल्यामुळें, त्यांस एक प्रकारची संवयच पडल्यासारखी झाली आहे. कारण मुसलमानी अमदानीपूर्वीपासून तें आतांपर्यंत प्रत्येक लहानसहान खेड्यांत, जिल्ह्याचे ठिकाणीं, शहरांत, लहान मोठे सावकार, मारवाडी, सराफ हे आहेतच व ते कर्जाऊ पैसे देणें, ठेवी ठेऊन घेणें व हुंड्यांचा वगैरे व्यवहार करीत आले आहेत. इतकेंच नव्हे तर मुसलमानी बादशहा, पेशवे इत्यादींवरमुद्धां त्यांचें वजन असे. अलीकडे मात्र सहकारी पतपेढ्यांचेयोगानें शेतकरी लोकांची बरीच सोय होत आहे व त्यांस नवीन पद्धतीच्या बँकींगचीही थोडीशी माहिती होत आहे. बचतपेढ्यांचेमुळें मध्यम प्रतीच्या वर्गाची व कामकरीवर्गाचीही थोडी सोय झाली आहे. हल्लीं जरी मुंबई, कलकत्ता यासारख्या व्यापाराच्या केंद्रस्थानीं देशी विदेशी बँकांची गर्दी झालेली असली; तथापि सराफ, मारवाडी, मुलतानी वगैरे आपल्या देशी बँकर्सच्या हातांत बरीच सत्ता आहे.

किंबहुना देशांतील सर्व अंतर्व्यापार त्यांचे ताब्यांतच आहे असें म्हटलें तरी चालेल. यामुळेंही एकप्रकारें बँकांचे प्रसारास थोडासा अडथळा होतो; परंतु जर्मनी, जपान, इंग्लंड वगैरे देशांत उद्योगधंद्याचे मदतीकरितां बँकांस विशेष सवलती व आर्थिक सहाय्य देऊन तेथील सरकारांनीं बँकींगचा विस्तृत प्रमाणावर प्रसार केला, तशा प्रकारचे आपल्या येथें सरकारकडून प्रयत्न झाले असें ह्मणतां येणार नाहीं. ज्या कांहीं थोड्याबहुत सवलती मिळाल्या त्यांचा फायदा युरोपियन भांडवलवाल्या बँकांसच मिळाला उलट हुंड्यांचे वेळीं विशेषतः एक्सचेंज बँकांचीच चैन झाली. पीपल्स बँक, स्पीसी बँक यांना सरकारकडून थोडी जरी मदत मिळाली असती तरी त्या बुडाल्या नसत्या. उलट त्यांना कोणत्याही तऱ्हेची मदत न मिळावी अशी खटपट युरोपियन वर्गांतून झाली असा लोकप्रवाद आहे.

दुसरी अशी एक सबब अँग्लोइंडियन लोकांकडून पुढें आणिली जाते कीं, हिंदुस्थानांतील लोकांस सोनें वगैरे मूल्यवान धातूंत पैसा गुंतविण्याची संवय आहे त्यामुळें त्यांचा पैसा निरर्थक पडून राहतो; शिवाय नाणीं, सोनें, रुपें इत्यादि पुरून ठेवण्याचीही पद्धति प्रचलित असल्यामुळें नाणीं चलनांत राहत नाहींत. २। वरील गोष्टींत कांहीं अंशी तथ्य असलें, तथापि, सर्वच दोष वरील कारणांच्या माथीं मारतां येणार नाहीं. अनिश्चित चलनपद्धतीच्या योगानें उत्पन्न झालेला अविश्वास, सरकारच्या सहाय्याची उणीव, अशिक्षितपणा हीं कारणें त्यांत प्रमुख आहेत हें लक्षांत ठेविलें

पाहिजे. बरींच वर्षें गाजत असलेल्या इम्पीरियल बँकचे कल्पनेस लढाईतील कटु अनुभवानंतर सरकारनें १९२० मध्यें मूर्त स्वरूप दिलें आहे. संकल्पित हेतूप्रमाणें जर तिच्याकडून कार्य घडून आलें तरी पुष्कळच झालें असें ह्मणतां येईल. असो.

आतां बँकांचें कार्य काय व त्यांचे प्रकार किती तें पाहूं. बँकेचें कार्य ह्मणजे, लोकांच्या ठेवी ठेवणें, व्याजानें लोकांस पैसे देणें, चलनी नोटा काढणें, चेक, बिलें इत्यादि वटविणें, हुंडीचा व्यापार करणें वगैरे. याशिवाय व्यापाऱ्यांचे खास उपयोगाकरितां असणाऱ्या कमर्शियल बँका; गहाणाचा व्यवहार करणाऱ्या मार्टगेज् बँका, औद्योगिक बँका ( इंडस्ट्रियल बँक्स ), शेतकऱ्यास मदत करणाऱ्या सहकारी पतपेढ्या इत्यादि अनेक प्रकारच्या बँकांचा या यादींत समावेश करितां येईल.

परंतु वर दिलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या सर्व बँकांसंबंधी येथें विचार करण्याचें कारण नाहीं फक्त हिंदुस्थानांतील चलनपद्धतीवर ज्यांचा प्रत्यक्षपणें अथवा अप्रत्यक्षपणें विशेष परिणाम होतो. त्यांचा येथें विचार करणेचा आहे. या दृष्टीनें बँकांचे एकंदर चार विभाग पडतात. १ प्रेसिडेन्सी अथवा सरकारी बँका; ( आतां इम्पिरीयल बँक ). २ एक्सचेंज बँका. ३ जॉईन्ट स्टॉक बँका ( समाईक भांडवलाच्या बँका ). यांतच इंडस्ट्रियल बँकांचा समावेश होतो. ४ खासगी बँका असणारे किंवा पेढीच्या पद्धतीवर खासगी तऱ्हेनें देवघेव करणारे सराफ, मार-

चांदी इत्यादि. शिवाय सहकारी पतपेढ्या व पोस्टाच्या बचत-पेढ्या सेव्हिंग बँका यांना जॉइन्ट स्टॉक बँकांचे पुरवर्णी विभाग मानण्यास हरकत नाहीं.

प्रेसिडेन्सी बँका—हिंदुस्थानांतील पहिली प्रेसिडेन्सी बँक बंगालमध्यें सन १८०६ सालीं 'बँक ऑफ बेंगाल' या नांवानें स्थापिली गेली. कंपनीसरकारचा ताबा या कालीं सर्व हिंदुस्थानावर होता तथापि बंगाल प्रांत हा कंपनीच्या ताब्यांत जाऊन पुष्कळच वर्षे आतांपर्यंत लोटलीं होतीं. शिवाय नीळ, ताग यांची लगवड व व्यपार करणाऱ्या पुष्कळ युरोपियन कंपन्यांनी आतांपर्यंत कलकत्ता, मिर्झापूर वगैरे ठिकाणीं खासगी व सामाईक पद्धतीवर बँका काढल्या होत्या व म्हणूनच बंगाल प्रांतांत पहिली प्रेसिडेन्सी बँक स्थापन झाली सन १८०९ सालीं कंपनीसरकारकडून तिला सनद मिळाली. पुढें सरकारकडून सनदा मिळून सन १८४० मध्यें मुंबईस व १८४३ मध्यें मद्रासेस याप्रमाणें दोन प्रेसिडेन्सी बँका स्थापन झाल्या. आतां या प्रेसिडेन्सी बँका जरी युरोपिअन व्यापारी लोकांच्या प्रयत्नामुळें व मुख्यतः त्यांच्याच भांडवलावर स्थापन झाल्या आहेत; तथापि त्यांचा बराचसा कारभार सरकारनियंत्रणाखालीं चालत असल्यामुळें, त्या सरकारी बँका म्हणूनच व्यवहारांत समजल्या जातात. ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांना, या बँका व्यापारांत आपलें तट्टू पुढें सारतील अशी भीति वाटल्यामुळें, (या बँका युरोपियन भांडवलावर नु

स्यतः उभारल्या असूनही ) यांच्यावर प्रथम बऱ्याचशा कडक अटी लादण्यांत आलेल्या होत्या. एकंदर डायरेक्टर्सपैकीं तीन डायरेक्टर्स सरकार नेमित असे व सन १८५७ पर्यंत तर बँकेचे खजिनदार व सेक्रेटरी सिव्हिलियनच ( सरकारी नोकर ) असत.

सन १८६२ पर्यंत या बँकांस नोटा काढण्याचा अधिकार होता; परंतु पुढें हा अधिकार कमी करण्यांत येऊन, त्यावर पुष्कळ नवीन अटी घालण्यांत आल्या. जितक्या नोटा ह्या बँका काढीत, त्याच्या एकचतुर्थांश रकम शिल्लक असली पाहिजे, असा एक नियम १८३९पर्यंत होता. पुढें १८६२ पर्यंत, एका ठराविक रकमेपेक्षां जास्त रकमेच्या नोटा काढणेच्या नाहींत असा नियम होता. या अशाप्रकारच्या अटींच्यायोगानें बँकांना नोटा काढण्यापासून कांहीं फायदा झाला नाहीं आणि त्या चलनांतही लोकप्रिय झाल्या नाहींत. १८६२ नंतर यांचा नोटा काढण्याचा हक्कही सरकारनें काढून घेतला. १८७६ मध्यें सरकारनें आपलें ÷ भांडवल या बँकांतून काढून घेऊन, डायरेक्टर वगैरे नेमण्याचा हक्क सोडून दिला; परंतु अशा प्रकारें त्यांचा सरकारीपणा नाहींसा होऊन त्यांचा व हिंदी बँकांचा दर्जा सारखा झाला असें म्हणतां येणार नाहीं. हिंदी बँकांना कठिण परिस्थितीशी झगडून स्वतःचा मार्ग काढावा लागतो. सरकारनें १८७६ चा ५ वा; १८७९ चा ११ वा; १८९९ चा २० वा; १९०७ चा १ ला आणि १९१६ चा ८ वा याप्रमाणें निरनिराळे वेळीं कायदे करून जरी

या बँकांवर अटी घातल्या आहेत, तथापि त्यांस सवलतीही दिल्या आहेत. यांतील मुख्य अटी खालीलप्रमाणें आहेत:—

( १ ) सदरहू बँकांनीं हिंदुस्थानाबाहेर पैसा भरावा लागेल अशा प्रकारें कोणताही देवघेवीचा, खरेदी विक्रीचा किंवा विनिमयपत्रांचा व्यवहार करूं नये. या नियमान्वयें हिंदुस्थानाबाहेर एक्सचेंजचा व्यापार या बँकांना करितां येत नाहीं. ( २ ) त्यांनीं हिंदुस्थानाबाहेर कर्ज काढावयाचें नाहीं किंवा हिंदुस्थानाबाहेरील ठेवी स्वीकारणेच्या नाहींत. त्याचप्रमाणें अन्य तऱ्हेनें शाखा किंवा एजंट ठेऊनही वरील देवघेवी हिंदुस्थानाबाहेर त्यांनीं करणेच्या नाहींत किंवा शाखा वगैरेकरितां लंडनमध्यें भांडवल जमविणेचें नाहीं. ( ३ ) त्यांनीं सहा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीनें कर्ज देऊं नये. ( ४ ) किंवा गहाणावर अगर स्थावर इस्टेटीवर पैसा देऊं नये. ( हा नियम विशेषतः आपल्या इकडील बँकांनीं लक्षांत ठेवण्यासारखा आहे. बँकेच्या मुख्य हेतूप्रमाणें पैसा व्यापाराच्या उपयोगाकरितां खेळतां राहिला पाहिजे. स्थावर इस्टेटीवर पैसा जर दोन दोन चार चार वर्षे अडकून पडला, तर बँकांनीं काम करावयाचें तरी काय? किंवा त्यांचा उपयोग तरी काय? मागें बँका बुडण्याच्या सपाट्यांत जेव्हां लोक आपापल्या ठेवी काढून घेऊं लागले, व पैसे कमी पडूं लागले, तेव्हां आमचे कित्येक डायरेक्टर, मॅनेजर गिरण्याकडे वगैरे बोट दाखवूं लागले. बँकांच्या मूळ उद्देशाविरुद्ध अशा

रीतीनें पैसे भलत्या ठिकाणीं गुंतविण्याचा अव्यापारेषु व्यापार अगोदर केलाच कशाला ?) (५) दोन किंवा अधिक सह्या असलेल्या प्रॉमिसरी नोट्सवर पैसे द्यावेत. (६) कोणत्याही इसमास एकमेकांशीं कांहीं संबंध नसलेल्या व्यापाऱ्यांच्या व्यक्तिशः पतीवर पैसे देऊं नयेत. (७) ज्या मालावर पैसे दिले जातील तोच माल बँकेच्या स्वाधीन तारण म्हणून केला पाहिजे.

आतां यांतसुद्धां नियम पांचप्रमाणें बँकेच्या मनांत पैसे देण्याचें असेल तर तिला सवड काढितां येईल. कारण कोणत्याही दोन स्वतंत्र गृहस्थांच्या सह्या मिळविल्या तरी, रकम किती जास्ती कमी द्यावी हें बँकेस त्या सह्यांची जेवढी पत वाटेल त्यावर अवलंबून राहील. त्याचप्रमाणें नियम सातप्रमाणें बँकेच्या ताब्यांत तारण म्हणून दिल्या जाणाऱ्या मालाची किंमत कमी जास्त मानणें हेंही बँकेच्या मर्जीवरच बहुतांशीं राहील.

या अटी जरी घातल्या असल्या, तरी कांहीं सवलतीही सरकारानें दिल्या आहेत त्या अशाः—

सरकारच्या खजिन्यांतील शिलकेपैकीं कांहीं विशिष्ट भाग बँकेस विनव्याजीं देण्यांत येईल. १८६२ नंतर ते ८७६ पर्यंत जवळ जवळ खजिन्यांतील सर्वच शिलक या बँकांत [विन व्याजीं] ठेवण्यांत येत असे; परंतु एकदां सरकारास पैशाची जरूर असतां, यांना सरकारची शिलक वेळेवर सरकारास परत करितां आली नाहीं, म्हणून सरकारानें १८७६ मध्यें रिझर्व्ह

खजिन्याची स्थापना केली व त्या वेळेपासून सरकारी शिलकेचा कांहीं ठराविक भाग बँकांस देतात

प्रेसिडेन्सी बँकांची त्यांच्या स्थापनेपासून तों आतांपर्यंतची कामगिरी खरोखर मोठी आहे. कारण या कालांत दहा पांच वेळां तरी असे प्रसंग आले होते कीं, त्यावेळीं कित्येक बँका बुडाल्या, तर कित्येक डबघाईस आल्या; परंतु या बँका मात्र तशा प्रसंगांतून मोठ्या शिताफीनें बचावल्या. यांच्यावर त्या त्या प्रांतांतील इतर बँकांचा इतका विश्वास आहे कीं, त्या बँका आपल्या शिलका किंवा ठेवी या बँकांतच ठेवितात. ह्मणजे या बँका इतर बँकांचा आधारस्तंभ आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या बँकांची स्थिति हल्लीं इतकी उत्तम आहे कीं, त्यांच्या शिलकीची रकम जवळ जवळ त्यांच्या भांडवलाइतकी झाली आहे. आणि त्यांच्या (शेअर्सची) भागांची किंमत मूळ किंमतीच्या तिपटीवर गेली आहे. या बँकांनीं आपापल्या प्रांतांत आपल्या शाखा काढल्या आहेत. बंगालच्या बँकेच्या १९१९ पर्यंत २६ शाखा होत्या व मुंबई व मद्रासच्या अनुक्रमें १८ व १६ अशा शाखा होत्या. इंपीरियल बँकेच्या स्थापनेपासून आतां सर्व शाखांची मिळून ८५ पर्यंत संख्या गेली आहे. बँक ऑफ बेंगाल, बँक ऑफ बॉम्बे व बँक ऑफ मद्रास या तिन्ही बँकांचें भांडवल अनुक्रमें २ कोटी, १ कोटी, व ७५ लक्ष येणेप्रमाणें आहे. शिवाय शाखांचा प्रसार व्हावा ह्मणून सरकारनें कांहीं वर्षें शाखांपुरतें लागणारें भांडवल विन व्याजी देणेचें कबूल केलें आहे.

आतां आपण एक्सचेंज बँकांकडे वळूं. एक्सचेंज बँकांचे दोन विभाग आहेत. (१) ज्यांचीं मुख्य ऑफिसें हिंदुस्थानचे बाहेर आहेत अशा; (२) ज्यांचीं मुख्य ऑफिसें हिंदुस्थानांत आहेत अशा. यांतही पुनः पोटभेद करितां येतील, ते असे—ज्या बँकांचा हिंदुस्थानांत फार मोठा व्यवहार चालतो त्या व हिंदुस्थानाबाहेर जास्त व्यवहार चालत असून हिंदुस्थानांत फक्त लहान लहान शाखा आहेत अशा

हिंदुस्थानांतच जास्त व्यापार होतो अशा बँका खालीलप्रमाणें आहेतः—दिल्ली आणि लंडन बँक ( स्थापना १८४४ ); चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, आस्ट्रेलिया ॲण्ड चायना स्थापना १८५३); नॅशनल बँक ऑफ इंडिया (स्थापना १८६३); हाँगकाँग ॲण्ड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशन [स्थापना १८६५]; मर्कन्टाईल बँक ऑफ इंडिया (स्थापना १८९३); ईस्टर्न बँक [स्थापना १९१०], मेसर्स कॉक्स आणि कंपनीची बँक [स्थापना १९०९]. आतां यांतील चार्टर्ड आणि हाँगकाँग या दोन बँकांचा सर्व प्राच्य देशांत विशेषतः चीनमध्यें वगैरे जास्त व्यवहार होत असतो, तरी हिंदुस्थानांत सुद्धां त्या बऱ्याच मोठ्या प्रमाणावर व्यवहार करितात. बाकीच्या राहिलेल्या चार ह्या मुख्यतः हिंदी आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. यांत एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ह्मणजे हल्लीं अस्तित्वांत असलेल्या या बँकांपैकीं एक सुद्धां नवी अशी बँक सन १८६४ ते १९०९ च्या मधल्या काळांत स्थापिली

गेली नाही. यांतील दिल्ली आणि लंडन बँक (ही अलायन्स बँक ऑफ सिमला इच्यांत १९१६ मध्यें सामील झाली.) जरी सर्वांत जुनी असली तथापि तिची प्रगति आतापर्यंत विशेष ह्मणण्यासारखी झालेली नव्हती. ईस्टर्न बँकचे व्यवहार मात्र जोरांत आहेत व तिला हिंदुस्थानांत बरेंच मोठें महत्व प्राप्त होईल असें वाटतें. [ मेसर्स कॉक्स आणि कंपनीच्या बँकेचा व्यवहार अद्याप फार जोरांत नाही ] या बँकांचे शेअर्सचे भावांत शेंकडा २०० किंवा त्यापेक्षां अधिक पटीनीं वाढ झालेली आहे. परंतु यावरून नवीन एक्सचेंज बँका स्थापन केल्या तर त्या फायदेशीर होतीलच असें ह्मणतां येणार नाहीं. कारण हल्लीं अस्तित्वांत असलेल्या बँकांनींच सर्व बाजूंनीं व्यापार वेढून टाकलेला आहे. तेव्हां या किंवा लंडन अथवा पॅरिससारख्यां मोठ्या शहरांतील अशा प्रकारच्या दुसऱ्या व्यापारी पेढ्यांचा पाठिंबा असल्याशिवाय नवीन एक्सचेंज बँक यशस्वी होणार नाही.

आतां हिंदुस्थानाबाहेर ज्यांची मुख्य ऑफिसें आहेत त्या बँकांविषयीं विचार करूं. या बँका एकंदर पांच आहेत. काम्तार नॉस्यनल देस्काम्प्त दपारी; १८८९ [हिला आपण सोईकरितां पॅरिस बँक ह्मणूं.] याकोहामा स्पिसी बँक, १८८०; डच्यूस एशियाटिक बँक (महायुद्धापासून लिकिडेशनमध्यें गेली आहे.) इन्टरनॅशनल बँकिंग कार्पोरेशन १९०१, आणि रसो एशियाटिक बँक, १९१० [ या बँकेचे संबंधीं हल्लीं विशेषशी माहिती नाहीं. ] या अनुक्रमें

फ्रेंच, जपान, जर्मन, अमेरिका आणि रशिया या देशांतील व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधिभूत आहेत. यांचा हिंदुस्थानांत व्यापार किती होतो व बाहेर किती होतो याचे आंकडे उपलब्ध नाहीत; परंतु यांच्या एकंदर व्यापारांत, हिंदुस्थानांत यांचा शेंकडा दहा बारा टक्क्यापेक्षां जास्त व्यापार नसावा असें तज्ज्ञांचें मत आहे.

तेव्हां वरील एकंदर विवेचनावरून लक्षांत येईल की, लंडनमध्यें ज्यांची ऑफिसें असून हिंदी व्यापाराचीं सूत्रें ज्यांच्या हातांत आहेत अशा एकंदर बँका फार थोड्या आहेत. या बँकांजवळ भरपूर पैसा शिल्लक असल्यामुळें यांची पत फार मोठी आहे व एकंदर स्थितीही उत्तम आहे. आतां यांचा हिंदुस्थानांतील व्यापार कोणत्या पद्धतीनें चालतो त्याविषयीं विवेचन करूं त्याचा आपल्या प्रस्तुत विषयाशीं संबंध आहे. त्यांचे, हुंड्याशिवाय इतर व्यवहार साध्या बँकांप्रमाणेंच चालत असतात, तेव्हां त्यांबद्दल लिहिण्याचें कारण नाहीं.

आतां एवढें मोठें व्यवहार चालण्यास या बँकांजवळ पैसा कोणकोणत्या मार्गांनीं येतो तें पाहूं. पूर्वी सांगितल्याप्रमाणें यांचेजवळ यांचें मुख्य भांडवल व नफा वाटला जाऊन नियमाप्रमाणें राहिलेली शिल्लकही असतेच; पण याशिवाय इतर बँकांप्रमाणें यांचेजवळ मुदतीच्या ठेवी व त्याचप्रमाणें चालू खात्यावरील ठेवी असतात. ह्या ठेवी त्यांस लंडनमध्यें अगर हिंदुस्थानांत दोन्ही ठिकाणीं मिळतात. त्यांतही त्यांचा मयत्न लंडनमधल्या ऑफि-

सांत ( याचें कारण पुढें कळेल. ) ठेवी जास्त मिळविण्याचा असतो. याकरितां इतर बँकांपेक्षां या बँकांत ठेवीवर जास्त सवलती असतात. वर्षांच्या किंवा त्याहून जास्त मुदतीच्या ठेवीवर शेंकडा चार किंवा केव्हां केव्हां त्याहूनही अधिक व चालू खात्याच्या ठेवीवर महिनाअखेरीस जी रकम शिलक राहील, त्यांवर शेंकडा दोन टक्केप्रमाणें व्याज नियमाप्रमाणें रोख देतात; हल्लीं महा-युद्धापासून हे दर १।२ टक्यांनीं जास्त वाढत आहेत. अशा रीतीनें मिळालेल्या ठेवी शिवाय मूळ भांडवल व शिलकेपैकीं रकम ही सर्व त्यांच्या एकंदर व्यवहाराचा आधार होत. पैकीं बँकेच्या नियमाप्रमाणें व अनुभवाप्रमाणें जरूरीकरितां लाग-णारी रकम तेवढी रोख शिलक ठेवून थोडीशी रकम हिंदुस्थानांत अगर हिंदुस्थानाबाहेर कर्जाऊ देतात. बाकीची थोडी रकम हुंड्या खरेदी करण्यांत गुंतवितात. यांपैकीं कांहीं हुंड्या हिंदु-स्थानावर काढिलेल्या असतात व त्या लंडनमध्यें विकल्या जातात; परंतु लंडनवर काढलेल्या व हिंदुस्थानांत विकल्या जाणाऱ्या हुंड्यांची संख्या जास्त असते. मुदतीच्या ज्या व्यापारी हुंड्या असतात, त्या मुदत पूर्ण होईपर्यंत बहुतेक बँका पुढें ठेवीत नाहीत. हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांच्या ज्या मुदतीच्या हुंड्या लंडन येथील व्यापाऱ्यांवर काढलेल्या असतात, त्या हुंड्यांची मुदत पूर्ण होईपर्यंत एक्सचेंज बँका वाट पहात नाहींत. फक्त तितक्या मुदतीचें व्याज कापून घेऊन हिंदुस्थानांत विकत घेतात व त्या

लंडनमध्यें पुनः फेरविक्री देऊन तेथील बँकांस विकतात. वर सांगितल्याप्रमाणें ( हिंदुस्थानचा निर्यात व्यापार आयात व्यापारापेक्षां मोठा असल्याकारणानें ) लंडनच्या बाजारावर काढलेल्या हिंदुस्थानांतील मुदतीच्या हुंड्यांची संख्या नेहमींच जास्त असते. त्यामुळें ह्या मुदतीच्या हुंड्या एक्सचेंज बँका आपल्या हिंदुस्थानांतील ऑफिसांमार्फत खरेदी करीत असतात व त्यांबद्दलची रकम मुदत पूर्ण झाल्यावर ( अगर मुदतीच्या अगोदर वठविल्यास व्याज कमी होऊन ) त्यांच्या लंडनच्या ऑफिसांत जमा होत असते. तेव्हां या बँकांच्या लंडनच्या शाखांत जरी पैसा भरपूर जमत असला, तरी नवीन अधिक हुंड्या हिंदुस्थानांत खरेदी करण्याकरितांही इकडील शाखांस पैशांची सारखी जरूरी असते. तेव्हां ही पैशाची उणीव भरून काढण्याकरितां, या बँका [ कौन्सिल ड्रॅफ्ट्स ] सरकारी हुंड्या लंडनमध्यें विकत घेऊन, हिंदुस्थान सरकारचे खजिन्यावर त्यांचे पैसे घेतात; किंवा बँक ऑफ इंग्लंडकडून अथवा इजिप्शियन अगर ऑस्ट्रेलियन बँकांच्या एजंटामार्फत पौंड घेऊन ते हिंदुस्थानांतील आपल्या शाखांकडे पाठवितात. शिवाय कौन्सिल बिलांच्या टी. टी. च्या द्वारें पैसे इकडे तावडतोब मिळण्याची सोय झालेली आहे. तेव्हां ते पुनः येथील शाखांतून नवीन खरेदी करण्याकरितां उपयोगांत आणिले जातात. यावरून असें दिसून येईल की, खाजगी हुंड्या किंवा एक्सपोर्ट बिलें यांस जी मागणी असते, ती

हिंदुस्थानांतील निर्यात व्यापारावर अवलंबून असते. हिंदुस्थानांत खरेदी करूं लागल्याबरोबर, लगलीच ह्या बँका लंडनमध्यें हुंड्या खरेदी करून, पैसे जरुरीप्रमाणें तारेनेंसुद्धां ( टी. टी. नें ) इकडे हिंदुस्थान सरकारमार्फत आपल्या शाखांस पाठवितात व पुनः खरेदी होते. अशा रीतीनें हें रहाटगाडगें फिरत असतें.

आतां टी. टी. ची [तारेची] व्यवस्था नाहींशी करून, हिंदुस्थानसरकारमार्फत पैसे पुरविण्याचें जर स्टेट सेक्रेटरीनें नाकारलें आणि सोनें किंवा पौंड पाहिजे तर बँकांनीं पाठवावेत असें ठरविलें; तर त्याच्यायोगानें व्यापार जोरानें चालणार नाहीं. पौंड येथील शाखांत पाठविल्यास बराच खर्च होईल. शिवाय वाटेंत दिवस लागतील, तितक्या दिवसांचें त्या रकमेचें व्याज बुडेल आणि एखाद्या वर्षी जर हिंदुस्थानांत दुष्काळ पडला तर हिंदुस्थानांतून निर्यात कमी होईल. अर्थात् एक्सपोर्ट बिलांची मागणीही कमी होऊन, त्यायोगें हुंड्या विकल्या जाणार नाहींत. असें झाल्यास होमचार्जीस् कशानें भागणार ! अशा तऱ्हेनें हुंड्यांचें समर्थन केलें जातें. या सर्व घडामोडीला लागणारा पैसा बँकांनीं हिंदुस्थानांत मिळालेल्या ठेवींतून घेतलेला असो अगर विलायतेंत मिळालेल्या ठेवींतून घेतलेला असो, लंडन येथील बाजारच्या देवघेवीच्या दृष्टीनें या दोन्हींचाही उपयोग सारखाच आहे; पण याचा हिंदुस्थानच्या व्यापाराच्या दृष्टीनें विचार केल्यास, हिंदु-

स्थानास ही परावलंबी पद्धति विघातक आहे. कारण हिंदी व्यापारांत गुंतविले जाणारे हे पैसे लंडनसारख्या अतिशय दूर असणाऱ्या एका ठिकाणाहून थोड्या मुदतीच्या ठेवींतून आणिले जातात व एखाद्या वेळीं ठराविक मुदतींत व्यापार होऊन पैसे मोकळे न झाल्यास, ते पैसे केव्हां परत मागितले जातील याचा भरंवसा नसल्यामुळें, तिकडे गरज लागल्यास पैसे देणें कठीण पडेल न दिल्यास हुंड्या विकत घेण्याची या बँकांची शक्ति कमी होऊन हिंदी निर्यात व्यापारास द्रव्यसहाय्य करण्यास प्रतिबंध होईल. तेव्हां थोड्या मुदतीच्या ठेवी, मग त्या हिंदुस्थानांतील असोत किंवा लंडनमधील असोत, त्या त्या ठिकाणच्या नेहमींच्या रोख ऐवजा-पेक्षां जास्त रकमेच्या घेऊं नयेत असा नियम असावा म्हणजे भीति राहणार नाही. त्याचप्रमाणें हिंदी एक्सचेंज बँकांच्या लंडन-मधील शाखेंतल्या ठेवी, त्यांच्या तेथील थोड्या मुदतीच्या कर्जाऊ रकमा, त्यांची तेथील शिल्लक, त्याचप्रमाणें त्यांच्या लंडन येथें स्वीकारलेल्या हुंड्या व तावडतोब विकले जाणारे तारण; यांच्या बेरजेच्या रकमेपेक्षां अधिक असूं नयेत. तसेंच हिंदुस्थानांतील थोडक्या मुदतीच्या ठेवी व इतर कर्जें ही त्यांची रोख शि-ल्लक व सहजीं वसूल होणारा ऐवज यांच्या रकमेपेक्षां अधिक नसावी. आतां हिंदुस्थानांत विकली गेलेली पण लंडनवर काढ-लेलीं बिलें हीं विलायती भांडवलांत कीं हिंदी भांडवलांत अंतर्गत करावीं असा प्रश्न उपस्थित होतो; पण ज्याअर्थी त्या हुंड्यांचें

पैसे शेवटी लंडनमधून द्यावे लागतात, त्याअर्थी इंग्लिश भांडवलांतच त्या हुंड्यांचा समावेश करणें योग्य होय. परंतु एकंदरींत हिंदुस्थानांत किंवा बाहेर परदेशांत या एक्सचेंज बँकांचा व्यवहार किती होतो, त्याचप्रमाणें त्यांच्या हिंदी शाखांत किती ठेवी आहेत व परदेशांतील मुख्य शाखेंत किती ठेवी आहेत याचा प्रत्येकीं स्पष्ट खुलासा होईल असे आंकडे उपलब्ध नाहींत. व तसें बरोबर रीतीनें भांडवल विभक्त करून मांडणें कठिण जाईल इतका हा व्यापार गुंतागुंतीचा असतो. हिंदुस्थानांतील सर्व एक्सचेंज बँकांच्या मिळून सालोसालीं ठेवी किती असत व त्यांच्या रोख शिलकी किती, कां असत याची कल्पना खालील कोष्टकावरून येईल.

| | हिंदुस्थानांतील ठेवी. | हिंदुस्थानांतील रोख शिल्लक. |
|---|---|---|
| १९१० | ३७२०( लक्ष रुपये ) | ६६० ( लक्ष रुपये ) |
| १९११ | ४२०३ | ६९८ |
| १९१२ | ४३२५ | ९६० |
| १९१३ | ४६५० | ७६३ |
| १९१४ | ४५४५ | १२६० |
| १९१५ | ५०२५ | १०५९ |
| १९१६ | ५७०० | १६१५ |
| १९१७ | ७१९६ | ९०९५ |

वरील कोष्टकावरून एक गोष्ट लक्षांत येते की, ठेवीची रकम सारखी वाढत होती परंतु त्या मानानें हिंदुस्थानांतील रोख शिल्लक मात्र दिवसेंदिवस वाढण्याऐवजी कमी होत होती. हें अत्यंत घातुक होतें; परंतु १९१६–१७ मध्यें ही स्थिति पालटली आहे असें रोख शिल्लकेचें प्रमाण पाहिल्यास दिसून येईल. ही एकंदर शिल्लक कमी ठेवतांना, एक्सचेंज बँकांची खात्री असते की. जर हिंदुस्थानांतील सांपत्तिक परिस्थितींत कांहीं अडचणीचा प्रसंग उद्भवला व पैशाची जरूर लागली, तर लंडनमध्यें पैसे भरून टी. टी. नें तांबडतोब हिंदुस्थानांतील ठेवी परत देतां येतील. म्हणून ते एकंदर ठेवीपैकीं शेंकडा १८ ते २० या प्रमाणांत रोख शिल्लक प्रसंगाकरितां म्हणून राखून ठेवितात पण हिंदुस्थानासारख्या बँकींगच्या तत्वाचा विशेष फैलाव न झालेल्या देशांत, इतकी कमी शिल्लक ठेवणें जरा धोक्याचेंच आहे. आतां इंग्लंडमधील गोष्ट निराळी आहे. तेथें आजपर्यंतचा अनुभव असा आहे की, शेंकडा २० पर्यंत रोख शिल्लक बँकेंत असली तरी चालते; पण हिंदुस्थानांत व लंडनमध्यें एकाच वेळीं जर पैशाची ओढ बसली तर हिंदुस्थानांत पैसा परत करणें या एक्सचेंज बँकांना फार कठिण जाईल व त्यामुळें यांची स्थिति फार वाईट होईल. बरींच वर्षें विशेष त्रासाशिवाय व संकटाशिवाय लोटल्यामुळें, आपत्कालविषयींच्या कल्पना या बँकांच्या लक्षांत येईनाशा झाल्या आहेत.

आतां वर सांगितल्याप्रमाणें इंग्लंडमध्यें हिंदुस्थानापेक्षां जरी कमी शिल्लक चालते; तथापि वस्तुस्थिति मात्र तशी नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. लंडनमधील एक्सचेंज बँकांची देणीं व जमा पाहिलीं असतां, त्यांची स्थिति पुष्कळ चांगली असल्याचें आढळून येतें. कारण लंडनमध्यें पाठविल्या जाणाऱ्या खाजगी हुंड्यांची संख्याच त्यांच्या जवळच्या ऐवजांत एकंदरीनें जास्त असते व या हुंड्यांना रोख ऐवजाप्रमाणें समजण्यास हरकत नाहीं. महायुद्धापासून हिंदुस्थानाबाहेरील यांच्या व्यापारांत ठेवीवरील रोख शिल्लकेचें प्रमाण पुष्कळच वाढलें आहे.

एकंदरींत पाहतां, एक्सचेंज बँकांना भीतीचें विशेष कारण नाहीं. फक्त हिंदुस्थानांतील ठेवी जास्त घेतल्यास, हिंदुस्थानांतील शाखांत त्या मानानेंच रोखशिलकेची वाढ होत असली पाहिजे ह्मणजे झालें. ठेवी वाढूं देणें व रोखशिल्लक कमी कमी करीत जाणें ह्या मार्गानें मात्र संकट केव्हां उत्पन्न होईल याचा नियम नाहीं व याविषयीं अतिशय सावधगिरी राखली पाहिजे.

हिंदुस्थानांत पहिली जॉईन्ट स्टॉक बँक अलेक्झँन्डर कंपनीनें कलकत्ता येथें सन १७७० मध्यें काढिली. या बँकेनें आपल्या चलनी नोटादेखील काढिल्या होत्या पण त्या कलकत्ता व त्याच्या आसपास फक्त चालत असत कारण सरकारनें त्यांचा स्वीकार तिजोऱ्यांवर करणेचें नांकारलें होतें. ही बँक १८३३ च्या सुमारास

अलक्झेंडर कंपनीच्या बरोबरच नाश पावली. 'कमर्शियल बँक म्हणून एक बँक १८१९मध्यें स्थापिली गेली व तिचाही अंत १८३३ मध्येंच झाला. बंगाल प्रांतांत विशेषत कलकत्त्याच्या आसपास या कालीं बँकांच्या विकास विशेष जोर आला होता नीळ ताग यांची लागवड व व्यापार करणाऱ्या बऱ्याच युरोपिअन कंपन्या या वेळीं येथें होत्या. त्यांनींच 'बँक' या नांवाखालीं बऱ्याच लोकांस फसविलें. बनारस बँकेचे (१८४५) हस्तक कॅप्टन फॅगन, डॉ० बटर; मि० बॅर्थर्स्ट [ मिर्झापूरबँकचे उत्पादक अशा प्रकारच्या बऱ्याच हुषार लोकांनीं बँका स्थापन करून अखेरीस लोकांचे पैसे आपल्या खिशांत लांबविले. हिंदुस्थानचे व्यापारी, अशा प्रकारचे प्रथम ग्रासीं मक्षिकापात फार झाल्यानेंच बँकांकडे साशंकतेनें पाहूं लागले हेंही येथें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. चार दोन व्यापाऱ्यांनीं बँकेच्या नांवावर पैसा गडप करण्यापेक्षां, तो 'अनुत्पादक' स्थितींत पडलेला काय वाईट असें वाटणें साहजिकच आहे. अशा प्रकारच्या वाईट उदाहरणामुळेंच इंग्लिश बँकांवरचा विश्वास उडाला तर त्यांत नवल काय! तरी पण हिंदुस्थान ही एक मूल्यवान् धातु गडप करणारा खड्डा आहे अशा प्रकारची जी एक ओरड वेळीं अवेळीं हिंदुस्थानच्या हितशत्रूंकडून करण्यांत येते, त्यांनीं इतर कारणांबरोबरच वरील कारणांचाही विचार केल्यास बरें होईल, असो.

हिंदुस्थानांत आज लहानमोठ्या अशा "जाइन्ट स्टॉक" (समाईक भांडवलवाल्या) बँका एकंदर ८८ आहेत व त्यांच्या शाखा २०० आहेत. यांच्यामध्यें ५ लक्ष किंवा जास्त भांडवलाच्या व ५ लक्षांखालील भांडवलाच्या असे दोन वर्ग सरकारी खात्यांत केलेले आहेत व तिसरा एक वर्ग एक लक्ष किंवा त्याच्या खालील भांडवलवाल्यांचा करितां येईल यांपैकी पहिल्या वर्गांत मोडणाऱ्यांची संख्या फक्त १८ आहे दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांतील कांहीं बँकांचे व्यवहार जरी व्यवस्थेशीर चालत असले, तरी डळमळीत पायावर उभारणी झालेल्यांचेंच संख्याधिक्य एकंदरींत त्या वर्गांत दिसून येतें व त्या मृगनक्षत्रांत उत्पन्न होणाऱ्या किड्यांप्रमाणें कांहीं नवीन स्थापन होत असतात तर कांहीं लयास जात असतात. १९१३ सालापर्यंत हिंदुस्थानांत व विशेषतः पंजाबांत बँकांचें पीक जोरांत होतें. परंतु कित्येकांचे बाबतींत डायरेक्टर, मॅनेजर वगैरे लोकांस अनुभव कमी असल्यामुळें व कित्येकांच्या बाबतींत त्यांच्या लबाडीमुळें जी बँका बुडण्यास सुरुवात झाली, ती बऱ्याच नांवाजलेल्या अशा बँकांनादेखील भोंवली. पहिल्या प्रथम नोव्हेंबर १९१३ मध्यें लाहोरची पीपल्स बँक ही लिक्विडेशनमध्यें गेली. हिचें जमा झालेलें भांडवल १२॥ लक्ष असून, ही १९०१ मध्यें स्थापन झाली होती. हिच्या ठेवी सव्वा कोटीच्या होत्या व पंजाब सरकारचे हल्लींचे मंत्री लाला हरकिसन हे तिचे उत्पादक होते. जर्मन बँकांचें अनुकरण करून

देशी धंद्यांना उत्तेजन देण्याचा यांचा स्तुत्य हेतु होता व म्हणून गिरण्यामध्यें वगैरे यांनीं बँकेचें बरेंच भांडवल गुंतविलें. वास्तविक स्वतंत्र औद्योगिक बँका काढून दीर्घकालीन मुदतीच्या ठेवी घेतल्याशिवाय साध्या बँकांनीं अशा तऱ्हेच्या विलंबानें नफा मिळणाऱ्या धंद्यांत पैसे गुंतविणें चुकीचें होतें हें खरें, तथापि थोडीशी मदत मिळाली असती तर ही बँक तगून राहिली असती; परंतु या वेळचें वातावरण निराळें असल्यामुळें, मदतीची गोष्ट दूरच राहिली व बँकेचें दिवाळें वाजलें. यानंतर जो तो आपापले पैसे बँकेंतून काढून घेऊं लागला व त्याचा परिणाम सर्व बँकांस भोंवला. यांमध्यें इंडियन स्पिशी बँक ही फार महत्वाची व मोठी अशी बँक होती. हिचें भांडवल पाऊण कोटीचें होतें व ठेवी पावणेतीन कोटींच्या होत्या. हिच्या दिवाळ्यासंबंधीं हकीकत बहुतेकांस माहित आहेच; पण ही बँक अतिशय उत्तम तऱ्हेनें चाललेल्या बँकांपैकीं होती, एवढें मात्र खरें. या लाटेंत १९१३-१४ या एक वर्षांत १॥ कोटी भांडवलाच्या एकंदर ५४ बँकांचें दिवाळें निघालें. दिवाळीं निघाल्यापैकीं कांहीं महत्वाच्या बँकांसंबंधीं खालीं आंकडे दिले आहेत

| | भांडवल. | रिझर्व. | ठेवी. |
|---|---|---|---|
| इंडियन स्पिशी बँक | ७५ | १५ | २७७. |
| पीपल्स बँक ऑफ इंडिया | १२ | २ | १२७. |
| क्रेडिट बँक ऑफ इंडिया | १० | ० | ५१ |

| | भांडवल | रिझर्व. | ठेवी. |
|---|---|---|---|
| चौबे बँकींग कंपनी | १ | ० | १५. |
| डेक्कन बँक | ? | ० | ११. |

( वरील आंकडे लक्ष रुपयांचे आहेत. )

त्याचप्रमाणें खालील कोष्टकांत १९१७ पर्यंत किती बँकांचें दिवाळीं निघालीं तें दाखविलें आहे.

| साल. | भांडवल ( लक्ष रुपये ). | | |
|---|---|---|---|
| | संख्या. | संकलित | जमा. |
| १९१३ | १२ | २,७४ | ३५ |
| १९१४ | ४२ | ७,१० | १०९ |
| १९१५ | ११ | ५६ | ५ |
| १९१६ | १ | २,३१ | ४ |
| १९१७ | ९ | ७६ | २९ |

जॉइन्ट स्टॉक बँकांपैकीं फक्त तीनखेरीजकरून बाकीच्या सर्व हयात बँका २०–२५ वर्षांतील आहेत या जुन्या तीन बँका म्हणजे अलाहाबाद बँक [ १८६५ ], अलायन्स बँक ऑफ सिमला [ १८७४ ] आणि औध कमर्शियल बँक [ ही पहिली हिंदी लोकांनीं काढलेली बँक होय. १८८१ ] या होत. यांपैकीं अलायन्स बँकेनें 'पंजाब बँकींग कंपनी' व 'दिल्ली आणि लंडन बँक' ( ही एक्सचेंज बँक होती. ) यांचा १९१६ मध्यें व बँक ऑफ रंगून इचा १९१७ मध्यें आपल्यांत समावेश करून घेतला आहे. त्यामुळें ही एक्सचेंजचाही व्यापार अलीकडे करिते.

वर निर्दिष्ट केलेल्या पहिल्या व दुसऱ्या वर्गांतील मिळून बँकांची संख्या एकंदर ४३ आहे. यांतील पहिल्या व दुसऱ्या बँकांची १९१७अखेरची स्थिति खालील कोष्टकांत दाखविली आहे.

| | पहिला वर्ग १८ बँका. | दुसरा वर्ग २५ बँका | एकूण. |
|---|---|---|---|
| जमा भांडवल | ३०४ | ४४ | ३४८ |
| ठेवी | ३११७ | ५५ | २२६१ |
| रोख शिल्लक | ७६५ | २० | ७८५ |

महत्वाच्या बँकांची आजची स्थिति लक्षांत येण्याकरितां, खालील कोष्टकांत त्यांचीं नांवें, भांडवल वगैरेसंबंधीं माहिती दिली आहे.

| | नोंदीचें साल. | जमा भांडवल. | ठेवी. | शाखा. |
|---|---|---|---|---|
| बँक ऑफ इंडिया | १९०६ | ५० | ४७० | ० |
| इंडियन बँक | १९०७ | १० | ४१ | ४ |
| पंजाब आणि सिंध बँक | १९०८ | ३ | ३० | ४ |
| भारत नॅशनल बँक | १९०८ | ४ | १ | ६ |
| बाँबे मर्चंट्स बँक | १९०९ | १५ | १ | २ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया | १९११ | २५ | ३५७ | ६ |
| बँक ऑफ मायसोर | १९१३ | १० | ६१ | ७ |
| बँक ऑफ नार्दर्न इंडिया | १९०८ | १ | ६ | ५ |
| जेसोर युनायटेड बँक | १९०९ | १ | ५ | ० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| को-ऑपरेटिव्ह हिंदुस्थान बँक | १९०८ | १ $\frac{1}{2}$ | ७ | २ |
| नॅशनल फायनॅन्सिग ॲण्ड कमिशन कॉर्पोरेशन | १९१२ | ११ | ३६ | १ |
| अलाहाबाद बँक | १८६५ | ३० | ४९० | २५ |
| अलायन्स बँक ऑफ सिमला | १८७० | ८४ | ११०० | ४४ |
| औध कमर्शियल बँक | १८८१ | ५ | ८ | २ |

यावरून शेवटच्या तीनखेरीज बाकीच्या सर्व बँका १९००-नंतरच्या आहेत व आजची त्यांची स्थितीही समाधानकारक आहे असें दिसून येईल.

दुसरी बँकींगसंबंधानें विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ह्मणजे महायुद्धाच्या कालानंतर बँकींगला हिंदुस्थानांत मिळालेलें चलन ही होय. लढाईपूर्वीची बँकांची स्थिति ह्मणजे खरोखरच काळजी करण्यासारखी होती; परंतु आज जर एकंदर आंकडे पाहिले, तर लढाईच्या काळांत बँकांत पैसे गुंतविण्याकडे लोकांचें लक्ष अधिक वेधलें होतें असें दिसून येईल. इतकेंच नव्हे तर लढाईच्या सुरुवातीस जरी (१९१४–१५) लोकांनीं ठेवी परत घेतल्या होत्या, तथापि पुढें दोन वर्षांनंतर पुनः ठेवींची संख्या वाढली.

त्याचप्रमाणें महायुद्धाचे कालांत यांची स्थिति किती चांगली होती, याची कल्पना खालील कोष्टकावरून, महायुद्धापूर्वीच्या स्थितीशी तुलना करितां दिसून येईल.

खालील कोष्टकांत ज्या बँकांचें भांडवल व शिलक हीं ५ लाख किंवा त्यापेक्षां अधिक रुपयांच्या आहेत त्यांचेंच आंकडे आहेत.

| | बँकांची संख्या | जमा भांडवल | शिलक वगैरे. | एकूण. | ठेवी. | रोख शिलक. |
|---|---|---|---|---|---|---|
| १९१३ | १८ | २३१·३ | १३३·० | ३६४·३ | २२५९·२ | ४००·२ |
| १९१४ | १७ | २५१·४ | १४१·९ | ३९३·३ | १७१०·६ | ३५३·२ |
| १०१५ | २० | २८१·४ | १५६·६ | ४३८·० | १७८७·३ | ३९९·४ |
| १९१६ | २० | २८७·२ | १७३·७ | ४६१·० | २४७१·० | ६०३·७ |
| १९१७ | १८ | ३०३·७ | १६३·० | ४६६·७ | ३११७·० | ७१४·८ |

खालील आंकडे ज्या बँकांचें भांडवल व शिलक हीं ५ लाखांपेक्षां कमी आहेत त्यांचे आहेत.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १९१३ | २३ | ३९·१ | ११·४ | ५०·५ | १५१·१ | २४·९ |
| १९१५ | २५ | ४९·२ | १३·४ | ५५·२ | १२६·५ | २८·० |
| १९१५ | २५ | ४५·४ | ९·७ | ५५·१ | ९१·४ | २०·० |
| १९१६ | २८ | ५१·८ | ११·५ | ६३·३ | १०१·२ | १६·८ |
| १९१७ | २५ | ४४·२ | १२·२ | ५४·४ | ९९·२ | २०·४ |

त्याचप्रमाणें महायुद्धकालांत ठेवीची वाढ कशी झाली हें खालील आंकड्यावरून दिसून येईल.

| | लाख रुपये. |
|---|---|
| ३१ डिसेंबर १८८० | ६३ |
| १८९० | २७१ |
| १९०० | ८०७ |
| १९१२ | २७२६ |
| १९१३ | २४१० |
| १९१४ | १८३७ |
| १९१५ | १८८८ |
| १९१६ | २५७२ |
| १९१७ | ३२१६ |

त्याचप्रमाणें सरकारी युद्धकर्जाचे रोखे खरेदी करणारांचे संख्ये-वरूनही, महायुद्धाचे कालांत, लोकांची पैसा बाहेर गुंतविण्याची वाढती प्रवृत्ति दिसून येते. फक्त त्यांना जवळ एखादी विश्व-सनीय बँक असली ह्मणजे झालें. या दृष्टीनें इम्पिरियल बँकेच्या अगर विश्वसनीय बँकांच्या शाखा शक्य तितक्या अधिक काढणें किती अवश्य आहे हें दिसून येतें. पूर्वी कोणत्याही सरकारी कर्जास २००० पेक्षां अधिक इसमांनीं मागणी केली नाहीं; परंतु गेल्या महायुद्धाचे वेळीं सुमारें ४० लाख माणसांनीं आपला पैसा त्यांत गुंतविला.

आतां राहिल्या औद्योगिक किंवा इंडस्ट्रियल बँका. जर्मनी, जपान वगैरे देशांत उद्योगधंद्यास मदत करण्याकरितां ह्मणून अशा

तऱ्हेच्या बँकांस सरकारकडून मदत झालेली आहे. पण आमचे इकडे मात्र सरकार सहानुभूतीनें या प्रश्नाचा विचार करण्यापलीकडे कांहीं करीत नाहीं. ह्मणूनच इतर बँकांस उद्योगधंद्यांत पैसे घालणें बहुधा फायदेशीर नसतें. औद्योगिक बँकेस मुख्य गोष्ट ह्मणजे दीर्घकालीन मुदतीच्या ठेवी मिळाव्या लागतात, व पैसा कोठें गुंतविणेचा, कसा गुंतविणेचा याबद्दल बँकेच्या चालकांस स्वतः त्या धंद्यासंबंधीं पूर्ण माहिती असावी लागते. आपल्या इकडील देशी बँकांनीं असे प्रयत्न केले पण अनुभवाच्या व मदतीच्या अभावीं त्यांचींच दिवाळीं वाजलीं. हिंदुस्थानांत पहिली अशी औद्योगिक बँक ह्मणजे टाटा कंपनीनें स्थापन केलेली 'टाटा इंडस्ट्रियल बँक' ही होय. (ही थोडासा एक्सचेंजचाहि व्यवहार करते.) हिची स्थापना १९१७ सालीं जाहली. त्यानंतर कलकत्ता येथें दुसऱ्या दोन औद्योगिक बँका निघाल्या आहेत. एक कलकत्ता इंडस्ट्रियल बँक व दुसरी सर टॉमस हॉलंड ( दारूगोळा खात्याचा खटला) यांचेयोगें प्रसिद्धीस आलेली कर्नानी बँक. त्याचप्रमाणें ह्मैसूर संस्थानांतही एक 'मायसोर इंडस्ट्रियल बँक' या नांवाची औद्योगिक बँक निघाली आहे व नवीन औद्योगिक बँकाहि हळूं हळूं उत्पन्न होत आहेत. 'इंडस्ट्रियल बँक ऑफ वेस्टर्न इंडिया लिमिटेड' या नांवाची एक बँक अहमदाबाद येथें पुरुषोत्तमदास, मंगळदास वगैरे प्रमुख हिंदी व्यापाऱ्यांच्या प्रयत्नानें स्थापन झाली आहे. तिचें संकल्पित भांडवल सव्वासहा कोटींचें

असून जमा चाळीस लाख आहे. अशारीतीनें औद्योगिक बँका निघून त्यांनी नवीन धंद्यास उत्तेजन दिल्यास तें योग्य होईल व जाइन्ट स्टॉक बँकांवर अव्यापारेषु व्यापार करण्याचे प्रसंग कमी होतील.

देशी संस्थानांतही अलीकडे बँका निघण्याचा स्तुत्य उपक्रम झाला आहे. बडोदा, म्हैसूर, मोरवी वगैरे संस्थानांत त्या त्या संस्थानिकांचे प्रोत्साहनामुळे बँका निघाल्या आहेत. यांपैकीं 'बँक ऑफ बरोडा' हिची स्थितितर त्यांतल्या त्यांत अत्यंत वाखाणण्याजोगी आहे. हिच्या शाखा मुंबई, अहमदाबाद, सुरत वगैरे शहरी असून तेथें या बँकेची पत मोठी आहे. सांगली संस्थानांत एक छोटीशी बँक अलीकडे स्थापन झाली आहे. [निझाम] हैदराबाद, इंदोर वगैरे संस्थानांत इंपीरियल बँकेच्या शाखा आहेत हें खरें. परंतु असल्या मोठमोठ्या संस्थानांत संस्थानिकांचे मदतीनें बँका स्थापन होणें हें त्यांस भूषणावह आहे व त्यांच्या प्रजेसही सुखाचें आहे.

प्रेसिडेन्सी व एक्सचेंज बँका आणि जाइन्ट स्टॉक बँका व सराफ मारवाडी इत्यादि यांपैकीं पहिल्या दोन्हींचा परदेशांशीं मुख्य व्यापार असल्यामुळें त्यांना युरोपियन व्यापारांचे अड्डे म्हणतां येईल दुसऱ्या दोहींचा हिंदी व्यापाराशीं मुख्यतः संबंध येत असल्यामुळें त्यांस हिंदी व्यापाराचे अड्डे असें म्हणतां येईल. आतां सराफ, मारवाडी हे बहुधा हिंदुस्थानांतील अन्तर्गत व्यापारांत पैसा घाल-

त्रात व हुंड्या खरेदी करितात. परदेशावरच्या हुंड्या खरेदी करण्यांत ते आपले पैसे गुंतवीत नाहींत. त्यामुळें बाजारांत ओढ पडून बँकांचे व्याजाचे दर वाढले तरी त्यांस एक दोन टक्के कमी व्याजानें पैसे देतां येतात. आतां, केव्हां केव्हां बँकांपेक्षांही हुंड्यांचा दर भारी असतो; पण असे प्रसंग क्वचित् !

आतां राहिल्या सेव्हिंग बँका व कोऑपरेटिव्ह बँका.

सरकारनें प्रथमतः आपल्या देखरेखीखाली १८३३।३५चे दरम्यान कलकत्ता, मद्रास, मुंबई या तीन ठिकाणीं बँका उघडल्या. पुढें १८७७ मध्यें जिल्हानिहाय सेव्हिंग बँका स्थापिल्या. नंतर पोस्ट ऑफिसच्या सेव्हिंग बँकांचे पद्धतीस १८८२ मध्यें सुरवात झाली व त्यांनें १८९६ मध्यें सरकारी सेव्हिंग बँकांचाही समावेश त्यांतच झाला. हल्लीं त्यांत पैसे ठेवणारांची संख्या १६॥ लाख आहे व सर्वांच्या मिळून सुमारें १९ कोटींच्या ठेवी आहेत. या बँकांचा विशेष उपयोग मध्यम प्रकारचा सुशिक्षित वर्गच मुख्यतः करून घेत असतो.

शेतकरी लोकांचे उपयोगाकरितां [बँका] पेढ्या काढण्याची कल्पना १८८३ त प्रथम मुंबई सरकारनें पुढें आणली. परंतु १९०४ पर्यंत तिला मूर्त स्वरूप आलें नाहीं. लॉर्ड कर्झन यांचे कारकीर्दींत १९०४ सालीं सहकारी पतपेढ्यांचा कायदा पास झाला. १९१२ सालीं या कायद्याची व्याप्ति वाढविण्यांत आली व त्यामुळें एकंदरींत पेढ्यांची वाढ बरीच झाली. यायोगें सेन्ट्रल

को आपरेटिव्ह बँक्स ( मध्यवर्ती सहकारी पेढ्या ) स्थापन करण्यांत आल्या. ( मध्यवर्ती पेढीनें लहानसहान खेड्यांतील पतपेढ्यांना मदत करून देखरेख करणेची असते. ) याशिवाय रिसोर्स सोसायटीज अगर साधन-समीत्या, कन्झ्युमर्स सोसायटीज अगर उपभोग-समीत्या आणि प्रोड्युसर्स सोसायटीज अगर उत्पादक-समीत्या असे तीन भेद केले आहेत. यायोगें मध्यवर्ती बँकेचें काम सुलभ झालें आहे. यांचे १९२०-२१ सालाचे आंकडे पुढील-प्रमाणें आहेत. सर्व जातीच्या पेढ्यांची संख्या ४०७७२, सभासदांची संख्या १९,२१,१४८, सर्व पेढ्यांचें मांडवल, ठेवी वगैरे सर्व २१,४०,७०,००० मिळून रुपयांचे आहे.

याप्रमाणें हिंदुस्थानांतील बँकांची रूपरेखा आहे. हळूं हळूं बँकांत पैसे गुंतविण्याची लोकांची प्रवृत्ति वाढत आहे. अशा वेळीं सरकारकडून बँकांच्या स्थापनेस प्रोत्साहन मिळत गेल्यास, थोडक्याच कालांत सर्व हिंदुस्थानभर बँका पसरण्यास हरकत नाहीं.

आतां स्टेट अथवा इंपीरिअल बँकेच्या स्थापनेसंबंधीं थोडें लिहून हें प्रकरण पुरें करूं.

तिन्ही प्रेसिडेन्सी बँकांची मिळून एक मध्यवर्ती बँक स्थापावी अशी सूचना मि० जी. डिक्सन यांनीं, १८६७ मध्यें जुनी मुंबई-बँक मोडल्यानंतर प्रथम मांडली; परंतु बंगाल बँकेचे वगैरे डायरेक्टर्स विरुद्ध असल्यामुळें, ही सूचना फेटाळली गेली. १८८९-

मध्यें करन्सीकमिटीपुढें लॉर्ड राथश्चाइल्ड यांनीं व सर एडवर्ड हॅंब्रो यांनीं अशाबद्दल एक योजना मांडली. या योजनेस हिंदुस्थान सरकार व स्टेट सेक्रेटरी यांची सहानुभूति होती; तथापि असल्या मध्यवर्ती बॅंकेच्या मॅनेजराचें प्रस्थ फार वाढेल व तो सरकारासमुद्धां प्रसंगविशेषीं त्रासदायक होईल अशा अनेक कुशंका निघून, ती गोष्ट रहित झाली. अर्थशास्त्रज्ञामध्यें अशा बॅंकेच्या अवश्यकतेबद्दल एकवाक्यता होती व सर एडवर्ड होल्डनसारख्या प्रख्यात तज्ज्ञानें १९१३ सालच्या कमेटीपुढें ही गोष्ट विशदपणें मांडिली होती; पण हिंदुस्थानचे तत्कालीन फडणीस लॉर्ड मेस्टन यांनीं ती गोष्ट अव्यवहार्य असें म्हणून हाणून पाडली. सन १९१३–१४ च्या चेंबर्लेनकमिशननें मात्र या गोष्टीचा सरकारनें अवश्य विचार करावा अशी सल्ला दिली; तथापि पुढें बरेच दिवसांनीं १९२० चे सप्टंबरमध्यें इंपीरियल बॅंकेची स्थापना झाली. बरींच वर्षे पडलेल्या योजनेस लढाईच्या कालांतील कटु अनुभवामुळें कां होईना, मूर्तस्वरूप आलें हें बरें झालें. या बॅंकेचे नियम वगैरेसंबंधीं माहिती परिशिष्ट 'अ' मध्यें दिली आहे.

# प्रकरण ९ वें.

## महायुद्धाच्या कालांतील फेरबदल.

महायुद्धाचा पहिला परिणाम असा झाला कीं, जगांतील सर्व देशांतील चलनपद्धति व अन्तरराष्ट्रीय हुंडणावळ व बँकिंगला अवश्यक असा विश्वास अथवा पत हीं सर्व, एखाद्या झंझावातानें वृक्ष हालून जातो त्याप्रमाणें हालून गेलीं. प्रत्येक देश आपला सोन्याचा निधि एकत्र जमविण्याच्या उद्योगाला लागला व त्याप्रमाणें सोन्याच्या निधीवर निर्बंध घालण्यांत आले. कांहीं देशांत सोन्याचें नाणें चलनांतून काढून टाकून नोटांवर व चेकवर सर्व व्यवहार करूं लागले. लढाईकरितां शस्त्रास्त्रें उत्पन्न करण्याकडे वेळ व द्रव्य खर्च झाल्यामुळें, निर्यात मालाचें उत्पन्न कमी होऊन निर्यात व्यापार मंदावला. परंतु आयात बहुतेक देशांत नेहमींपेक्षांही जास्त वाढली; त्यामुळें नवीन सोनें येण्याचें बंद होऊन आहे तेवढेंच सोनें अपुरें होऊं लागलें यामुळें व्यवहारांत नोटा दिल्या गेल्या. सोन्याचें नाणें मागण्याचा हक्क कायद्यानें पुष्कळ देशांत काढून घ्यावा लागला. तथापि किंमती वाढल्यामुळें चलनां-विषयींची मागणी दुप्पट तिप्पट झाली. इंग्लंडांत महायुद्धाचे सुरवातीस ३॥ कोटी पौंडांच्या नोटा चलनांत होत्या त्या महा-युद्धाचे अखेरीस ३० पौंडापर्यंत गेल्या.

इतर देशांतील वर निर्दिष्ट केलेले सर्व प्रकार हिंदुस्थानांतही घडून आले. अविश्वास, सोनें व रुपये सांठविण्याची प्रवृत्ति, अधिक चलन, महर्घता, सट्टेबाजी, बँकांतील ठेवी काढून घेणें वगैरे सर्व चिन्हें दृश्यमान झालीं, परंतु एक दोन वर्षांनीं सर्व लोकांस महायुद्धाच्या परिस्थितीची संवय झाल्यामुळें विश्वास उत्पन्न होऊन बँकिंगची पद्धति व चलन पद्धति यांस एक प्रकारचें स्थैर्य आलें. युद्धांत असें व्हावयाचेंच असें म्हणून लोक तिकडे दुर्लक्ष करूं लागले. महागाईचीही विशेष कोणी पर्वा करीनासें झालें. तथापि एकंदर चलनपद्धतीची ही परीक्षेची वेळ होती यांत संशय नाहीं.

प्रथम चलन कसकसें वाढत गेलें तें पाहूं.

| साल. | नवीन पाडलेले रुपये. | नोटांच्या निधीमधून चलनांत आलेले रुपये. | हिंदुस्थानांत आलेले पौंड. | नोटांचे निधीमधून चलनांत आलेले पौंड | नोटा. |
|---|---|---|---|---|---|
| १९१३–१४ | ९,५१ | − ४,०८ | ९,४२ | ६,९४ | ३,८६ |
| १९१४–१५ | ० ०० | −११,८० | − ११ | १४,७० | − ४,४० |
| १९१५–१६ | ० ०० | + ९,२८ | − ३,३३ | − ४,६० | ६,१० |
| १९१६–१७ | २९,९८ | + ५,९७ | − ७ | २ | १८,६४ |
| १९१७–१८ | २३,१० | + ६,६० | ९,०० | २,४० | १३ ४० |

( हे आंकडे लक्ष रुपयांचे आहेत. )

वरील कोष्टकावरून असें दिसून येईल कीं, वरील पांच वर्षांत चलनांत एकंदर ६८५६ लक्ष रुपये, १४७१ लक्षांचे पौंड व

३६५१ लक्षांच्या नोटा जास्त आल्या. हीं सर्व मिळून एकंदर चलन १३९.८२ रुपयांच्या किंमतीनें वाढलें. १९१५ पर्यंत नवीन रुपये पाडण्याची विशेष जरूर भासली नाहीं; परंतु १९१६ व १९१७ या दोन सालांत मागणी अतिशय वाढली. १९१३ व १९१४ मध्यें नोटांच्या निधींत रुपये येऊन चलनांतून कमी झाले, परंतु नंतर ह्या निधींतून पुष्कळ रुपये चलनांत परत आले. १९१८–१९१९ मध्यें लोकांजवळचे रुपये ४५ कोटींनीं वाढले व १९१९–१९२० मध्यें लोकांजवळ आणखी २५ कोटी रुपये आले. पूर्वींच्या मानानें हिंदुस्थानांत पौंड फार कमी आले. कारण खाजगी निर्यात कायद्यानें बंद केली होती. प्रथम नोटांचें चलन विशेष वाढलें नाहीं; परंतु १९१५ पासून तें जोरानें वाढूं लागलें

मागें नोटांच्या चलनाचें कोष्टक दिलें आहे त्यावरून १९१६ चे पुढें चलन किती वाढत गेलें तें दिसून येईल. १९१८ मध्यें १९१३ पेक्षां लोकांजवळचें नोटांचें चलन जवळ जवळ ३० कोटींनीं वाढलें. १९१७ मध्यें रुपें महाग झाल्यामुळें, नवीन रुपये पाडणें फार खर्चाचें झालें याकरितां सरकारनें एक रुपया व अडीच रुपये या दोन किंमतीच्या नोटा चलनांत आणल्या व त्यामुळें रुपयावरचा भर तितका कमी झाला. कांहीं ठिकाणीं अविश्वासामुळें लोक नोटा घेण्यास नाखुष असत व त्यामुळें नोटांचे रुपये मिळण्यास बटाव द्यावा लागे; परंतु हा अविश्वास कमी

मागण्याकरितां सरकारनें नोटांचे रुपये देण्याची शक्य तेवढी व्यवस्था केली. प्रत्येक खजिन्यांत नोटांचे रुपये देण्याविषयीं हुकूम सोडलेले होते. रुपयांचें काम अंशतः भागण्याकरितां, सरकारनें १९१७ सालीं ७।८ कोटि रुपयांचे पौंड चलनांत आणले. लोकांनीं रुपये आटवून चांदी बाहेर पाठवूं नये या हेतूनें रुप्याची निर्यात त्याच सालीं बंद केली.

महायुद्धाच्या पूर्वीं कायद्याप्रमाणें सरकारास १४ कोटि रुपयांपेक्षां जास्त सिक्यूरिटी नोटांच्या निधींत ठेवतां येत नसत. त्यामुळें जवळ रुपये असूनही ते सरकारास वापरतां येत नसत. ही मर्यादा १९१५ मध्यें २० कोटींची केली त्यामुळें आणखी ६ कोटींच्या नोटा, रुपये किंवा पौंड न ठेवतां चलनांत आणणें शक्य झालें. परंतु महायुद्धामध्यें इंग्लंडांतील सरकारच्या वतीनें येथें कोट्यवधि रुपयांचा माल खरेदी करणें भाग पडलें. व त्याकरितां आणखी नोटा काढणें अवश्य झालें.

इंग्लंडांतील सिक्यूरिटीच्या आधारावर या नोटा चलनांत आणण्याकरितां पूर्वींच्या कायद्यांत दुरुस्ती करून पौंडांच्या सिक्यूरिटी ४ कोटींच्या ऐवजीं १० कोटीं पर्यंत ठेवण्याची परवानगी १९१६ सालीं सरकारनें मिळविली. यामुळें असें झालें कीं, येथें ६ कोटींच्या नोटा सरकारनें माल खरेदी करण्यांत वापरून, त्याच्या ऐवजीं स्टेट सेक्रेटरीनें इंग्लंडांतील सरकारची 'ट्रेझरी बिल्स्' विकत घेऊन आपल्याजवळ नोटांच्या निधींत ठेविल्या. अशा

रीतीनें साम्राज्य सरकारास मदत करण्याची संधि हिंदुस्थानास मिळून, येथील चलन अनायासें वाढलें. हा कायदा केला नसता तर येथें नोटा दिल्याबरोबर स्टेट सेक्रेटरीस तेथील निधींत सोनें ठेवणें भाग पडलें असतें व त्यामुळें इंग्लंडांतील केंद्रीभूत सोन्यापैकीं ६ कोटींचें सोनें एकदम कमी झालें असतें. असें होणें त्या वेळीं इष्ट नसल्यानें, ही तजवीज करावी लागली.

पुनः १९१७ मध्यें असाच प्रसंग आल्यामुळें, पौंडांच्या सिक्यूरिटीची मर्यादा ५२ कोटींपर्यंत नेली. यामुळें ४ कोटींच्या सिक्युरिटीशिवाय ४८ कोटींचीं 'ट्रेझरी बिल्स' स्टेट सेक्रेटरीस विकत घेतां आलीं व त्यांच्या आधारावर हिंदुस्थानांत ४८ कोटींच्या नोटा, रुपये किंवा पौंड निधींत न ठेवितां चलनांत आणल्या. १९१८ मध्यें ही मर्यादा ८६ कोटींपर्यंत नेली. हीं 'ट्रेझरी बिल्स' व नेहमींच्या १४ कोटींच्या सिक्यूरिटी मिळून नोटांच्या निधींमधील सिक्यूरिटी १०० कोटींच्या झाल्या. यायोगानें एकंदर नोटांचें व निधीमधील रुपयांचें परस्पर प्रमाण कमी झालें. पुढील कोष्टकांत नोटांचें चलन, सोनें व (लक्ष रुपये) रुपये यांचे आंकडे दिले आहेत.

| साल. | नोटांचें एकंदर चलन. | सोनें हिंदुस्थानांत. | सोनें इंग्लंडांत. | रुपये. |
|---|---|---|---|---|
| १९१६-१७ | ७६,१० | १२,२० | ११,९० | १९,५० |
| १९१७-१८ | १०१,२० | १२,०० | ६,६० | १९,०० |
| १९१८-१९ | १४१,०० | १७,४० | १० | ३४,१० |

१९१८-१९१९ मध्यें १४१ कोटींच्या चलनाच्या मानानें पौंड, सोनें व रुपये मिळून धात्वात्मक निधि फक्त ६४ कोटी ६० लक्ष रुपये किंमतीचा होता ह्मणजे नोटांच्या अर्ध्यापेक्षांही ५।६ कोटींनीं कमी होता. ही स्थिति नेहमींच्या वेळी इष्ट नसल्यानें, नोटांचें चलन कमी करणें किंवा रुपये निधीमध्यें जास्त भरणें असे दोनच मार्ग आहेत. या मार्गाचें अवलंबन सरकारनें हलकें हलकें केल्यामुळें आजमितीस नोटांच्या चलनाची स्थिति वरच्यापेक्षां जास्त समाधानकारक आहे. १९२१ चे सुरुवातीस एकंदर नोटांचें चलन १६४०७ लक्ष रुपयांचें होतें. नोटांच्या निधींत ५९,३२ लक्ष रुपये व २४,०० लक्ष पौंड होते. ४,०० लक्षांचे रुपये टांकसाळींत नवीन पडत होते. सिक्यूरिटी हिंदुस्थानांत ६८०० लक्षांच्या होत्या व इंग्लंडांत ८,३५ लक्षांच्या होत्या.

आतां रुपये व पौंड यांच्या हुंडणावळींत जीं स्थित्यंतरें झालीं त्यांचा विचार करूं. निर्यात माल आयात मालापेक्षां जास्त असला ह्मणजे हुंडणावळ वर जाते व आयात माल जास्त झाला ह्मणजे हुंडणावळ खालीं जाते हें पूर्वी एका प्रकरणांत स्पष्ट केलेंच आहे. हुंडणावळ खालीं गेली ह्मणजे लोकांस पौंडांची गरज जास्त भासते व त्यामुळें सरकारास इंग्लंडांतील सोन्यावर उलट हुंड्या काढाव्या लागतात. अशा रीतीचा प्रसंग पूर्वी फक्त १९०८ मध्यें आला होता; परंतु महायुद्धांत ही आपत्ति वारंवार येऊं लागली. त्यामुळें उलट हुंड्या विकण्याचे प्रसंगही

वारंवार येऊं लागले; तथापि सामान्यतः पाहिलें असतां, महायुद्धाकरितां हिंदुस्थानांतील मालावर विशेषतः धान्यावर यूरोपांत इतकी मागणी होती कीं, एकंदर व्यापाराचा आढावा हिंदुस्थानच्या बाजूचा होता. आयात मालापेक्षां निर्यात बहुतेक जास्त असे व त्यामुळें हुंडणावळ नेहमीं उच्च बिंदूवर असे.

सर्व देशांतून रुप्याची मागणी आल्यामुळें, रुप्याचा भाव १९१८ नंतर फारच वर गेला. तो जातां जातां इतका वर गेला कीं, रुपयांतील धातूची किंमत त्याच्यापेक्षां जास्त झाली व रुपयाचा उपनाणें असण्याचा धर्म नाहींसा होऊन, तो पूर्ण किंमतीच्या नाण्याप्रमाणें झाला. त्यामुळें सरकारास रुपये पाडण्यापासून फायदा न होतां, तोटा होऊं लागला. असें झाल्यामुळें १६ पेन्साला एक रुपया देण्याचें सरकारनें बंद केलें; कारण त्या रुपयाची खरी किंमत १८।२० पेन्स अशी झाल्यामुळें, प्रत्येक व्यापारी एका पौंडास पंधरा रुपये घेऊन त्याची चांदी सतरा रुपयांस विकूं लागला. ह्मणून स्टेट सेक्रेटरीनें हुंड्याचा भाव १८ पेन्स प्रथम केला. त्यामुळें येथून पाठविलेल्या निर्यात मालावर नुकसान होऊं लागलें. माल विकून जे पौंड येतील, त्यांचे रुपये १ = १५ या भावानें न मिळतां, १ = १३ या भावानें मिळूं लागले. अर्थात् प्रत्येक पौंडामागें २ रुपयांला खोट येऊं लागली. असें झाल्यानें सुवर्णसंलग्नचलनाची १ = १५ रुपये हा दर कायम ठेवण्याची जी प्रतिज्ञा होती, तिचा भंग झाला.

याच वेळीं सोनें व रुपें हिंदुस्थानांत पाठविण्याची मोकळीक असती तर ही हुंडणावळ इतकी वर गेली नसती; परंतु सोनें व रुपें यांची आयात सरकारनें कायद्यानें बंद केली होती. ही हुंडणावळ अधिक वर जाऊं न देण्याकरितां स्टेट सेक्रेटरीनें एक्सचेंज बँकांच्या लंडन येथील मुख्य अधिकाऱ्यांजवळ असा ठराव केला होता कीं, १६ $\frac{1}{2}$ पेन्सांपेक्षां जास्त पेन्स एका रुपयाऐवजीं देऊं नयेत. राष्ट्राच्या दृष्टीनें जास्त महत्वाचा जो निर्यात माल असेल, त्याच्या आधारावर काढलेलीं बिलें हीं प्रथम विकत घ्यावीं असाही या ठरावांत एक मुद्दा होता. १९१७च्या सप्टेंबर महिन्यापर्यंत ही व्यवस्था अमलांत आली; परंतु या वेळेस रुपें महाग झाल्यामुळें, हा दर टिकला नाहीं व १९१८च्या एप्रिल महिन्यांत १८ पेन्स हा दर कायम करावा लागला. या आपत्तींतून सुटण्याकरितां, सरकारनें, युनायटेड स्टेटस्‌मध्यें पुष्कळ रुपें खरेदी करून तें हिंदुस्थानांत पाठवून दिलें. त्या रुप्याचे रुपये पाडून स्टेट सेक्रेटरीनें हुंड्या विकल्यामुळें हुंडणावळणीच्या दरास आळा बसला.

यानंतर कांहीं दिवसांनी रुपें अधिक अधिकच महाग होत गेलें व त्यामुळें हुंडणावळीचा दर २० पेन्स, २२ पेन्स, २४ पेन्स, २८ पेन्स अशा क्रमानें चढत गेला. यामुळें व्यापारामध्यें अस्थिरता उत्पन्न होऊन, कोणत्या वेळेस काय दर होईल याचा कोणासही अंदाज करतां येईना. अर्थात् इंग्लंडांतील बँकांवर काढलेली

निर्यात मालावरचीं 'बिल्स' विकत घेण्यास येथील एक्सचेंज बँका नाखुष होत्या. कारण हीं बिलें विकत घेऊन इंग्लंडांत पाठविलीं असतां, तेथें जे पैसे जमा होतील, ते पुनः हिंदुस्थानांत पाटविण्याचे वेळीं हुंडणावळ एक दोन पेन्सांनीं वर गेली तर पुनः नुकसान व्हावयाचें; त्याचप्रमाणें स्टेट सेक्रेटरीच्या हुंड्या जास्त विकत घेऊन हिंदुस्थानांत रुपये जमा केले असतां, पुनः ते पैसे इंग्लंडांत पाटवितांना हुंडणावळ खालीं गेली तर तिकडूनही नुकसान होणार. अशा पेचांत सांपडल्यामुळें बँकांचा व्यवहार बंद पडला व त्यामुळें निर्यात व आयात मालाची देवघेव करण्यास अडचण पडूं लागली. ही अडचण दूर करण्याकरितां, हुंड्या व उलट हुंड्या दोनही विकण्यास सरकारनें सुरुवात केली. याचा परिणाम असा झाला कीं, एका रुपयास २८ पेन्स मिळण्याच्या आमिषानें व्यापाराच्या गरजेपेक्षांही जास्त उलट हुंड्या बँका घेऊं लागल्या. यामुळें हुंडणावळीचा दर आणखीच अस्थिर होऊन निव्वळ सट्टेबाजी सुरू झाली.

१९२० च्या फेब्रुवारी महिन्यांत पौंड व डॉलर यांमधील हुंडणावळ पहिल्यापेक्षांही पौंडांच्या विरुद्ध झाल्यामुळें, रुपया व पौंड यांच्या हुंडणावळीवर त्याचा परिणाम झाला. एका रुपयाची किंमत, एका पौंडांत जितकें सोनें असतें त्याच्या $\frac{1}{10}$ अशी स्मिथ करन्सी कमिटीनें ठरविली. परंतु सोन्याचा व पौंडांचा संबंध सुटून गेल्या मुळें एकदशांश सोन्याची किंमत एकदशांश पौंडापेक्षां जास्त

झाली त्यामुळें १ रुपया = एक दशांश पौंडाचें सोनें = एक नव-मांश पौंड अशा तऱ्हेचें प्रमाण बसलें. एक रुपया दिला असतां २८।३० पेन्स मिळूं लागले. उलटपक्षी हुंड्यांची किंमतही तितकीच झाली. एक रुपया मिळण्याकरितां ३० पेन्स द्यावे लागत.

अशा कृत्रिम रीतीनें हुंडणावळीस सरकारनें आधार दिल्यामुळें हुंडणावळ वर राहिली. परंतु वस्तुतः हिंदुस्थानास देणं नसून फक्त या दराचा फायदा घेण्याकरितां लोक इंग्लंडांत पैसे पाठवीत असल्याकारणानें, सरकारनें उलट हुंड्या विकण्याचें बंद केल्याबरोबर हुंडणावळ १९२० च्या अखेरीस खाली खाली जात चालली. याच वर्षी रुपें पुनः अकल्पित रीतीनें स्वस्त झाल्यानें ही रुपयाची फुगलेली किंमत पुनः पूर्वपदावर आली. ती हल्लीं इतकी खाली गेली आहे कीं, १ रुपयास १५ पेन्स मिळतात. स्मिथ-कमिटीचा, एक पौंडाबरोबर दहा रुपये हा दर निश्चित करण्याचा प्रयत्न विफल होऊन, पुनश्च हरिः ॐ म्हणण्याचा प्रसंग आला आहे. आणखी २ वर्षेंतरी हुंडणावळ स्थिर होईल किंवा नाहीं याबद्दल वानवाच आहे. अशा तऱ्हेनें महायुद्धाचे कालीं सुवर्ण-संलग्न चलनाची बरीच तिरपीट उडाली. ब्यूरॉक्रॅटिक राज्यपद्धतीचा दोष हा आहे कीं, आपण कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं समर्थ आहों असें या पद्धतींतील अधिकाऱ्यांस वाटतें.

सोन्या-रुप्याच्या भावास गवसणी घालण्याचें धाष्टर्य करणें हें साहस सामान्य नाहीं. या साहसाचें वैयर्थ्य परवां नुकतेंच हिंदु-

स्थान सरकारच्या फडणिसांनीं आपल्या मुखानें कबूल केलें आहे ही त्यांतल्यात्यांत आनंदाची गोष्ट आहे.

हुंडणावळीचा भाव जरी अशा तऱ्हेनें वाढत गेला, तरीसुद्धां हुंड्या विकण्याचें अगदीं बंद झालें नव्हतें. १९१४ चे आगष्ट-पासून १९१५ चे जानेवारीपर्यंत, १९१५चे जूनपासून सप्टेंबर-पर्यंत, १९१८ च्या अखेरीस १९२० च्या जानेवारीपासून त्या सालच्या अखेरपर्यंत उलट हुंड्या विकण्याचा प्रसंग आला. याशिवाय इतर सर्व महिन्यांत हुंड्या विकल्या जात होत्या. यांचें प्रमाण कधीं जास्त व कधीं कमी असे. १९१६–१७ मध्यें जवळ जवळ ५४ कोटि रुपयांच्या हुंड्या विकल्या. १९१९।२० मध्यें ४७ कोटि रुपयांच्या हुंड्या विकल्या.

महायुद्धाच्या कालांत जवळ जवळ १२० कोटि नवीन रुपये टांकसाळींतून पाडल्यामुळें सुवर्णचलन निधि जवळ जवळ २५ कोटींनीं वाढला. पूर्वीप्रमाणें रुप्याचा भाव असता तर एका रुप-यामागें ५ आणे प्रमाणें एकंदर फायदा अदमासें ४० कोटि रुपये झाला असता. परंतु यांपैकीं बरेचसे रुपये चांदी महाग असतांना पाडले होते व त्यांत नफा न होतां उलट किंचित् नुकसानच झालें. १९१६ मध्यें ४० कोटि; १९१७ मध्यें ४७ कोटि; १९१८ मध्यें ५२ कोटि याप्रमाणें या निधीची वृद्धि झाली आहे. महायुद्धां-तील टंचाईमुळें या निधीमध्यें रोख सोनें मुळींच नसून, सर्व सिक्युरिटीच आहेत.

# प्रकरण १० वें.

## गुणदोषविवेचन.

हिंदुस्थानांतील चलनपद्धतीच्या सर्व अवयवांचें आतांपर्यंत आविष्करण केलें. आतां एकंदर पद्धतीचे गुणदोष काय आहेत हें पाहून या पद्धतींत कोणते फेरबदल करणें इष्ट आहे हें या प्रकरणांत पाहिलें पाहिजे. प्रचलित पद्धतीचा मोठा दोष हा आहे कीं, ही पद्धति अतिशय कृत्रिम आहे. सोन्याचें व रुप्याचें मूल्य बदललें असतांही दोन नाण्यांमध्यें ठराविक गुणोत्तर राखण्याचा प्रयत्न करणें हें एकंदरीनें नैसर्गिक कारणांशीं विरोध करण्यासारखें आहे. रुपें स्वस्त आहे तोंपर्यंत एका पौंडास पंधरा रुपये देण्याचें वचन पाळतां येईल; परंतु रुपें एका विवक्षित मर्यादेच्या पलीकडे गेल्यास १ : १५ हें गुणोत्तर कायम ठेवतां येणें शक्य नाहीं. अशाच तऱ्हेची आपत्ति महायुद्धांत आल्यामुळें ही पद्धति ढासळून पडण्याच्या बेतांत आली. नंतर कांहीं काळानें पौंड व रुपया यांतील प्रमाण बदलावें लागलें. हल्लीं हें प्रमाण कायमप्रमाणें १ : १० आहे; परंतु हें कदाचित् १ : २० असेंही होऊं शकेल. सोनें व रुपें यांच्या किंमती जशा बदलत जातील, तसें हें प्रमाण बदलावें लागेल.

प्रचलित चलनपद्धतीचें दुसरें कृत्रिमत्व असें आहे कीं, कौन्सिल बिलें विकल्यामुळें हिंदुस्थानांत लोकांची इच्छा नसतांना त्यांना रुपये द्यावे लागतात. त्यामुळें सॉव्हरिन चलनांत येण्यास प्रत्यवाय होऊन, रुप्याचें नाणें विपुल होतें व सोन्याचें नाणें प्रचलित करण्याचा संकल्प सरकारी दप्तरांतच राहून, त्याला मूर्त स्वरूप येणें हें जवळ जवळ अशक्यच झालें आहे. चलनांत सोनें नसल्यामुळें, 'प्रतिकूल व्यापार' झाला असतां, ह्मणजे निर्यात मालापेक्षां आयात जास्त झाली असतां जें देणें परदेशी द्यावें लागतें, तें इंग्लंडांतील निधींच्यामार्फत द्यावें लागतें. इंग्लंडांतील निधि जास्त जास्त फुगत गेले ह्मणजे हिंदुस्थानांतील सोनें चलनांत न राहतां, येथील व्यापारास निरुपयोगी होतें. नैसर्गिक पद्धतीमध्यें प्रतिकूल व्यापाराच्या प्रसंगीं आवश्यक तेवढें सोन्याचें नाणें परदेशी पाठविलें जातें व त्यानंतर पुनः किंमती वगैरे बदलून व्यापाराचा ओघ पूर्वपदावर येतो. त्याचप्रमाणें सोन्याची किंवा रुप्याची किंमत कितीही बदलली तरी नैसर्गिक पद्धतींत यत्किंचित्ही घोंटाळा होत नाहीं. नाणें व गट यांची किंमत एकच असल्यानें, धातु महाग झाल्यास नाण्याचीही किंमत वाढते व स्वस्त झाल्यास कमी होते. त्यामुळें दोन धातूंमधील प्रमाणाचा प्रश्नच अशा पद्धतीमध्यें उद्भवत नाहीं. हिंदुस्थानांतील चलनपद्धतींत सोनें व रुपें यांपैकीं कोणत्याही धातूची किंमत जास्त कमी झाली तरी घोंटाळा उत्पन्न होतो. सोनें महाग झाल्यास, १५ रुपये

देऊन पौंड मिळण्यास अडथळा होतो. रुपें महाग झाल्यास एका पौंडास १५ रुपये देणें जड जातें. अशा रीतीनें ए ठराविक प्रमाण दोन नाण्यांमध्यें राखण्यास अकटोविकट श्र करावे लागतात व अनेक संस्था उत्पन्न करून हें कृत्रिम गा चालू राहील अशी व्यवस्था ठेवावी लागते. सोन्याचें नाणें अस ल्यास ही सर्व खटपट वांचेल व शक्तीचा अपव्यय होणार नाही

आतां इंपीरियल बँक निघाल्यामुळें इंग्लंडांतील सर्व निधि येथे परत आणणें शक्य आहे. आवश्यक तेवढा निधीचा भाग इंग्लंडांत ठेवून बाकी सर्व सोनें हिंदुस्थानांत आणून सोन्याचें नाणें सुरु केल्यास हल्लीच्या कृत्रिम पद्धतीचे बहुतेक दोष नाहींसे होतील टांकसाळ खुली केल्यास लोक आपल्या जवळचें सोनें देऊन सोन्याचें नाणें पाडून घेतील. सोन्याचें नाणें कमी पडेल ही शंका व्यर्थ आहे: शिवाय कौन्सिल बिलें निघण्याची बंद केली म्हणजे आयात व निर्यात यांमधील जो फरक असतो तेवढी सर्व रक्कम हिंदुस्थानांत सोन्याच्या रूपानें आलीच पाहिजे. हें सोनें किंवा हीं नाणी चलनांत उपयोगांत आणतां येतील व याप्रमाणें पांच चार वर्षांच्या शिलकीचा उपयोग केल्यास २००।३०० कोटींचें सोन्याचें नाणें हिंदुस्थानांत सहज रीतीनें होऊं शकेल.

हल्लींच्या पद्धतीप्रमाणें ५०।७५ कोटींचा निधि व्यर्थ इंग्लंडांत ठेवावा लागतो व त्याचा फायदा आमच्या व्यापारास न मिळतां इंग्लंडांतील व्यापारास मिळतो. शिवाय इतक्या किंमतीचें सोनें

इंग्लंडांत असतांही, आम्हांस रुपयांवरच निर्वाह करणें भाग पडतें. 'होमचार्जेस'चें देणें सोन्यांत असल्यामुळें, सोन्याच्या नाण्याशीं संबंध येतो व त्यामुळें रुपया व कोणतें तरी सोन्याचें नाणें यांचें नक्की प्रमाण ठरवावें लागतें. हा एवढा उपद्व्याप करण्यापेक्षां, येथेंच सोन्याचें नाणें सुरू केल्यास, 'होमचार्जेस'चा प्रश्न अगदीं सोपा होईल. जेवढे पौंड देणें असेल तेवढे पौंडांमध्यें दिले व बाकीचे पौंड आमच्या नांवें लंडन येथील इंपीरियल बँकेंत भरले म्हणजे कोणतीही भानगड उरली नाहीं. हें सोनें अथवा पौंड ती बँक हिंदुस्थानांत पाठवून त्यांच्या आधारावर नोटा काढून वाटेल तितका व्यवहार करूं शकेल व अशा रीतीनें हल्लींची निधींची रकम आमच्या व्यापारास हितावह होईल.

दोन देशांमधील हुंडणावळ ही व्यापाराच्या नेहमींच्या स्थितीवर अवलंबून असते हें गेल्या दोन तीन वर्षांत सर्वांच्या चांगलें प्रत्ययास आलें आहे. हुंडणावळ कृत्रिम रीतीनें ठरविल्यास या नैसर्गिक स्थितीस विरोध होऊन, आयात व निर्यात माल यांच्या नैसर्गिक हालचालीस कृत्रिम स्वरूप येतें. पौंड व रुपया यांमध्यें ठरीव प्रमाण स्थापित केल्यानें, हुंडणावळ ही पक्की होते व तिचा आणि व्यापाराचा नैसर्गिक संबंध राहत नाहीं. या कारणाकरितां सुवर्णसंलग्नचलन हें कृत्रिम असून, नैसर्गिक व्यापाराच्या घडामोडीस अनुसरून नाहीं हें स्पष्ट आहे. इंग्लंड व हिंदुस्थान या दोनही देशांत सोन्याचें नाणें झालें म्हणजे हुंडणा-

नेहमीच्या व्यापाराच्या आकारावर व निर्यात आणि आया मालाच्या किंमतीवर अवलंबून राहील व तिच्यामधील कृत्रिमप नाहीसा होईल.

हल्लींच्या पद्धतीमध्यें कौन्सिलबिलें फाजील विकली जात अर त्यामुळें, आणखी एक दुष्परिणाम घडून येत आहे. तो : कीं, चलनांत रुपये अधिक अधिक आल्यामुळें, त्याचा किंमतं वर परिणाम होऊन, महर्घता दिवसेंदिवस वाढत चालली आ १८९३ पासून १९१४ पर्यंत जी सारखी महर्घता वाढत चालल तिचें मुख्य कारण चलनाची अमर्याद वाढ हें होय, असें नामद गोखले यांनीं आपल्या बजेटावरील भाषणांत अनेक वेळां प्रति पादन केलें आहे. आयात मालापेक्षां निर्यात जितकी जा आहे, तेवढ्याबद्दल रुपें किंवा सोनें हिंदुस्थानांत आलें असतें त चलन वाढलें नसतें व किंमती जास्त स्थिर राहिल्या असत्या गोष्ट निर्विवाद आहे. वास्तविक पहातां, टांकसाळ बंद क ण्याचा मुख्य-उद्देश हा होता कीं, नवीन रुपये पाडण्याचें बं करून, रुपयांची टंचाई उत्पन्न करून, रुपयाची किंमत वाढविं तो उद्देश बाजूला राहून, गेल्या वीस वर्षांत सरकारी रीतीनें रुप चलनांत इतके आले कीं, चलन पाण्यासारखें पातळ झालें आ व त्याचा नैसर्गिक परिणाम किंमतीची वाढ हा अगदी स्पष्ट दिसून येत आहे. अशा रीतीनें हल्लींच्या पद्धतीपासून रुपयाची किंम अथवा क्रयशक्ति स्थिर न राहतां सारखी बदलत चालली आ

त्यामुळें असंतोष, संप, मजुरीचे व नफ्याचे दर वाढणें इत्यादि अनिष्ट परिणाम जास्त जास्त दृग्गोचर होऊं लागले आहेत.

उत्तम चलनपद्धतीचा नियम असा आहे कीं, जें नाणें उपनाणें असतें, तें कायदेशीर चलन फक्त एका ठरीव मर्यादेपर्यंत असतें. ह्या नियमास अनुसरून रुपया हें उपनाणें असल्यामुळें, शंभर किंवा हजार रकमेच्या वरील देणें सोन्याच्या मुख्य नाण्यांत दिलें पाहिजे असा निर्बंध पाहिजे; परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं। रुपया हें वाटेल त्या मर्यादेपर्यंत कायदेशीर फेडीचें चलन आहे. परंतु त्याची किंमत मात्र कृत्रिम आहे. अशा रीतीनें दहा अकरा आणे किंमतीचें नाणें सोळा आण्यांचें म्हणून लोकांवर लादलें जातें. यास उपाय मुख्य नाणें सोन्याचें करणें हाच होय. प्रत्यक्ष चलनांत सोन्याची नाणीं पुष्कळ असावीं असें कोणाचेंही मत नाहीं. बहुतेक व्यवहार नोटांच्या मदतीनें करावा; परंतु नोटा दिल्या असतां, सॉव्हरिन अथवा दुसरें सोन्याचें नाणें मिळण्याची व्यवस्था असावी व रुपया हा खरोखरीच मोड अथवा परचुटण या स्वरूपाचा असावा. उपनाण्याला मुख्य नाणें करून त्याला कृत्रिम किंमत देण्याची क्लृप्ति हिंदुस्थानाशिवाय इतरत्र क्वचितच आढळेल. येणेप्रमाणें गेलीं वीस पंचवीस वर्षें, आमचें चलन, अर्थशास्त्राच्या नियमांस धाब्यावर बसविणारें असें झालें आहे.

अशा रीतीनें कायद्याप्रमाणें सुवर्णचलन असतांही, प्रत्यक्ष व्यवहारांत रुप्याचेंच चलन झालेलें आहे. नांव मोठें व लक्षण

खोटें या म्हणीप्रमाणें स्थिति होय. रुपया उपनाणें म्हणावें तर वाटेल त्या रकमेपर्यंत रुपये देतां येतात. बरें, रुपया मुख्य नाणें म्हणावें, तर चेंबरलेनकमिशनप्रमाणें रुपयाची किंमत स्वतःसिद्ध कांहीं नसून, रुपया म्हणजे पौंडाचा एकपंधरांश अशी त्याची व्याख्या केली आहे. म्हणजे जेव्हां एखाद्यास आम्ही १५ रुपये देतों, तेव्हां त्यास एक पौंड देतों असें समजावयाचें. मुख्य नाणें पौंड हें असून, रुपया हा त्याचा एक भाग अथवा हिस्सा आहे. असें जरी आहे, तरीही चलनांत पौंड नाहींत यामुळें पौंड हें मुख्य नाणें आहे असें म्हणणें हास्यास्पद दिसतें. फार झालें तर पौंड हें हिशोबाचें मापन (standard of account) आहे असें म्हणतां येईल. त्यामुळें हल्लींच्या चलनाचें वर्णन सार्थ रीतीनें करणें दुर्घट झालें आहे.

आतां हल्लींच्या चलनापासून गेल्या वीस पंचवीस वर्षांत काय काय आर्थिक अनर्थ उद्भवले आहेत तें पाहूं. पहिला अनर्थकारक परिणाम असा कीं, या चलनामुळें महर्घता भयंकर वाढली आहे. पूर्वी रुप्याचें चलन असल्यामुळें, सोन्यांतील किंमतीचा व हिंदुस्थानांतील किंमतीचा विशेष संबंध जोडलेला नसे. जो माल युरोपांत जाई, त्याच्या किंमतीवर मात्र सुवर्णचलनाचा व त्यांत दर्शविलेल्या किंमतीचा परिणाम होई; परंतु रुप्याचा व पौंडाचा संबंध जोडल्यापासून आमच्या प्रत्येक किंमतीवर युरोपांतील सोन्याच्या किंमतीचा परिणाम होऊं लागला.

१८९३ पूर्वी रुपया हा अतिशय स्थिर होता; परंतु १८९३-नंतर त्याची क्रयशक्ति दिवसेंदिवस कमी कमी होऊं लागली. १८९४ साली किंमतीचा सूचकअंक (Index number) ११४ होता, तो १९०० साली १९२ झाला. याचा अर्थ, ज्या वस्तू ११४ रुपयांस पहिल्या सालांत मिळत होत्या, त्यांना दुसऱ्या साली १९२ रुपये पडूं लागले. १९०८ साली हा सूचकअंक २३१ होता व १९१३ मध्यें १९९ होता.

आतां कोणी असें ह्मणेल कीं, ह्या किंमती हिंदुस्थानांतच अधिक झाल्या नसून, इंग्लंड इत्यादि देशांतही अधिक झाल्या होत्या. त्यामुळें येथील चलन हें किंमती वाढण्याचें कारण नसून, सार्वत्रिक कांहीं तरी अन्य कारणें असलीं पाहिजेत; परंतु ही विचारसरणी भ्रामक ठरते. कारण इंग्लंडमध्यें जरी किंमती वाढलेल्या आहेत. तरी हिंदुस्थानांतील किंमतीच्या तुलनेनें त्या कांहींच नाहीत. इंग्लंडांतील सूचकअंक १८९४ साली ६३ होता तो १९०० मध्यें ७५ झाला; आणि १९०८ मध्यें ७३ होता.

यावरून असें स्पष्ट होतें कीं, हिंदुस्थानांतील किंमतीची वाढ ही फक्त स्थानिक कारणावर अवलंबून होती व हें स्थानिक कारण ह्मणजे रुपयांची अमर्याद संख्या हें होय. १८९३ च्या पूर्वी वार्षिक नवीन पाडलेल्या रुपयांची सरासरी ७ कोटि रुपये होती; परंतु १९०० नंतर ही सरासरी १४।१५ कोटि रुपये झाली व

महायुद्धाच्या पांच वर्षांत एकंदर १०४ कोटींच्या वर रुपये नवीन पाडले गेले. १८९३ पूर्वी वीस वर्षेपर्यंत हिंदुस्थानांतील लोकसंख्या व व्यापार वाढत असतांही, रुपयाची क्रयशक्ति स्थिर होती व किंमती होत्या तशाच होत्या.

या चलनाच्या वृद्धीचें अथवा द्रवीभवनाचें (Rerefication) मुख्य कारण कौन्सिलबिलांची होमचार्जेसच्या इयत्तेपेक्षां अधिक असणारी किंमत हें होय. कौन्सिलबिलें अधिक विकल्यामुळें, हिंदुस्थानांत सोनें न येतां लोकांच्या हातांत रुपये पडतात. रुपयांची जरूर नसली तरीही, ते आटविण्यांत नुकसान असल्यामुळें, ते जसेच्या तसेच राहतात. हिंदुस्थानांत जर सोन्याचें नाणें असून खुली टांकसाळ असती, तर नाणें जास्त झाल्यास, तें आटवितां आलें असतें व व्यापाराकरितां जरूर लागल्यास पुनः आटविलेल्या गटाचें नाणें पाडतां आलें असतें; परंतु रुपया हें उपनाणें असून, त्याची किंमत कृत्रिम असल्यामुळें, हें कार्य घडून येत नाहीं. दरवर्षी कौन्सिलबिलांबद्दल मिळालेले रुपये चलनांतच राहतात व चलन अधिक अधिक द्रवीभूत होत जातें.

महायुद्धामध्यें या चलनांत आणखी नोटांची भर पडली. पूर्वी अदमासें ४० कोटि रुपये किंमतीच्या नोटा होत्या, त्या हल्लीं १८० कोटि रुपयांपर्यंत गेलेल्या आहेत. महायुद्धाकरितां आवश्यक अशा वस्तु अतिशय महाग झाल्यामुळें, त्या विकत घेण्याकरितां अधिक चलनाची जरूर पडली. हें चलन मिळण्यास

दुसरा मार्ग नसल्यामुळें, नोटा काढणें आवश्यक झालें व पूर्वीच्या कायद्यांचें उल्लंघन केल्याशिवाय या नवीन नोटा काढतां येत नसल्यामुळें, त्या कायद्यांमध्यें दुरुस्ती करून, रुपयांचा आधार नसतांही नोटा काढण्याची परवानगी सरकारनें घेतली. त्यामुळें चलनांत १२५ कोटि नोटा अधिक आल्या. त्यामुळें एकंदर चलन इतकें वाढलें आहे की, त्याचा परिणाम किंमतीवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. हल्लींच्या मितीस एकंदर चलनांत अदमासें २५० कोटि रुपये व १७५ कोटींच्या नोटा आहेत हें पूर्वी सांगितलेंच आहे. अशा रीतीनें एकंदर चलन ४००।४२५ कोटींचें झाल्यानें व व्यापारधंदा, उद्योग व आर्थिक उत्पादन स्थिर असल्यानें, रुपये जास्त व वस्तु कमी असें होऊन, त्यांचें गुणोत्तर बदललें आहे.

यास उपाय एकच आहे. तो हा की, सिक्यूरिटींच्या आधारावर नोटा काढण्याचा कायदा रद्द करून, पूर्वीप्रमाणें रुपयांच्या आधारावर नोटा काढण्याची पद्धति पुनः अमलांत आणिली पाहिजे. महायुद्धाचे पूर्वी २० कोटि रुपयांच्या नोटा सिक्यूरिटींच्या आधारावर काढितां येत असत. ही मर्यादा फार तर ३० कोटींवर न्यावी; परंतु यापेक्षां अधिक नोटा काढणें झाल्यास रुपये अथवा सॉव्हरिन नोटांच्या निधीमध्यें ठेविल्याशिवाय चालणार नाहीं असा कायद्याचा निर्बंध पाहिजे. असें केल्यानें नोटांची वाढ अमर्याद होणार नाहीं व किंमतीवर अनिष्ट परिणाम होणार नाहींत.

१८९८ साली फौलरकमिटीनें जो ऊहापोह केला, त्यांत रुपें हें नेहमीं स्वस्त राहील व त्यामुळें रुपयाची धात्वात्मक किंमत ११।१२ आण्यांच्या पलीकडे कधींही जाणार नाहीं असें गृहीत धरलें होतें. सुदैवानें अशा तऱ्हेची स्थिति महायुद्धापर्यंत राहिली हें खरें आहे; तथापि एकाच तऱ्हेच्या गृहीतकृत्यावर एका मोठ्या देशाची चलनपद्धति आधार धरून राहील असें मानणें हें कोत्या बुद्धीचें द्योतक आहे. सर लायोनेल ॲब्राहाम यांनी, स्मिथकमिटीपुढें साक्ष देतांना असें सांगितलें कीं, "या सर्व वादामध्यें हिंदुस्थानसरकारचा एक मोठा प्रमाद दिसून येतो तो हा कीं, भविष्यकालाविषयीं अमुक, तमुक, हें असें होईल याप्रमाणें गृहीतकृत्यें त्यांनी केलीं; परंतु असें करण्यास मुळींच आधार नाहीं." अशाच तऱ्हेचा प्रमाद फौलरकमिटीनें केला व रुपें हें कधींही महाग होणार नाहीं असें गृहीत धरलें.

१९१६ मध्यें रुप्याची किंमत वाढूं लागली व सरतेशेवटी ती इतकी वाढली कीं, रुपयाची धात्वात्मक किंमत कायदेशीर किंमतीपेक्षां जास्त झाली. त्यामुळें रुपये आटविणें किंवा बाहेर पाठविणें हें फायदेशीर होऊं लागलें. १९१७ च्या ऑगष्टमध्यें एक तोळा रुप्याची किंमत १८ झाली. त्यामुळें सुवर्णसंलग्नचलनाचें मुख्य तत्व ढांसळून पडलें. एक रुपयाची किंमत १६ पेन्सांपेक्षां अधिक झाली आणि रुपया व पौंड यांमधील प्रमाण कायम ठेवणें अशक्य झालें. कांही काळपर्यंत इंग्लंड व युनायटेड् स्टेट्स

येथील सरकारांच्या मदतीनें रुप्याची किंमत 'कंट्रोल' केल्यामुळें स्थिर राहिली; परंतु हें नियमन बंद केल्याबरोबर रुप्याची किंमत एका तोळ्यास ३२ पेन्सपर्यंत गेली. असें झाल्यानें, हुंडणावळ १ पौं.= १५ रु. होती ती १ पौं.= ८ रु. अशी करावी लागली. अर्थात् १ रु. = ३० पेन्स असें रुपया व पेन्स यांमधील गुणोत्तर झालें.

परंतु हुंडणावळ स्थिर ठेवणें हें प्रचलित पद्धतीचें मुख्य अंग असल्यामुळें रुपयास उपनाण्याचें स्वरूप प्राप्त होण्याकरितां एक रुपयाची किंमत त्यांतील रुप्यापेक्षांही जास्त राहील असें नवीन प्रमाण ठरविणें भाग पडलें. रुप्याच्या किंमतीची कमाल मर्यादा एक बारांश पौंड (सोनें-स्टर्लिंग नव्हें) म्हणजे पौंडांत जें सोनें असतें त्याचा एक बारांश हिस्सा अशी ठरवून, हें नवीन प्रमाण एक रुपयास एक दशांश पौंड (सोन्याचा) असें स्मिथ कमिटीनें ठरविलें. रुपें महाग असल्यानें हें प्रमाण प्रचलित पद्धति कायम ठेवण्यास आवश्यक होतें. परंतु रुपें पूर्वीप्रमाणें स्वस्त झाल्यास (म्हणजे एका तोळ्यास २०।१२ पेन्स असा दर झाल्यास) ही हुंडणावळ अतिशय उच्च बिंदूवर राहील. रुपयाची किंमत अदमासें १। शिलिंग असतां त्याची कायदेशीर किंमत २ शिलिंगांपेक्षांही जास्त होईल. असें झाल्यास कौन्सिल बिलें कोणीही विकत घेणार नाही व होमचार्जेस वसूल करण्यास स्टेट सेक्रेटरीस एखादा नवीन मार्ग काढावा लागेल. अशा रीतीनें सुवर्ण संलग्नचलनाचें

सर्वच अवयव विस्कळित होतील. अशा अनेक आपत्ति हल्लींच्या पद्धतीमुळें उत्पन्न होत असल्यानें ही पद्धति बदलून टाकून सुवर्ण-एक-चलनपद्धति अस्तित्वांत आणावी असे बहुतेक हिंदी अर्थशास्त्रज्ञांचें मत झालें आहे. सोन्याचें नाणें केल्यानें आतांपर्यंत वर्णन केलेले सर्व कृत्रिमतेचे दोष सहजच लुप्त होतील व हिंदुस्थानांतील पद्धति इंग्लंडांतील पद्धतीप्रमाणें नैसर्गिक व बाह्य उपाधींपासून अलिप्त होईल. या पद्धतीचें समर्थन करण्यापूर्वी, स्मिथ कमिटीनें हल्लींचीच पद्धति नवीन पद्धतीशीं जुळेल अशी करण्याविषयीं जे प्रयत्न केले आहेत त्यांचें परीक्षण करणें आवश्यक आहे. या कमिटीच्या सूचना हिंदुस्थानसरकारनें मान्य केल्यामुळें त्यांना विशेष महत्व आलेलें आहे.

ही कमिटी १९१९ च्या मे महिन्यांत नेमिली गेली. हुंडणावळीची स्थिरता रुप्याच्या वाढत्या किंमतीमुळें नाहींशी झाली होती; ती पुनः पूर्वस्वरूपावर आणणें हा या कमिटीपुढील मुख्य प्रश्न होता. हें करण्याकरितां रुपयाची किंमत वाटेल त्या बिंदूपर्यंत नेण्याची हिंदुस्थानसरकारची तयारी होती. रुपया हें टपनाणें राहिलेंच पाहिजे असाही हिंदुस्थानसरकारचा मुख्य सिद्धांत होता व सुवर्ण-संलग्नपद्धतीप्रमाणें हा सिद्धांत बरोबर होता. १९१८ मध्यें नोटांच्या निधीची स्थिति फार धोक्याची झाली होती. लोकांनीं मागणी केल्यामुळें त्यांतील रुपये अतिशय कमी झाले होते व जास्त मागणी झाल्यास नोटांचे रुपये देणें अशक्य

झालें असतें. असें झाल्यानें लोकांचा नोटांवरचा विश्वास उडून जाऊन पुन्हां नोटांचें चलन लोकप्रिय करणें दुरापास्त झालें असतें. ही आपत्ति दूर करणें हाही या कमिटीपुढें आणखी एक महत्त्वाचा प्रश्न होता.

जोंपर्यंत रुपयाचा पौंडांत भाव १६ पेन्स आहे तोंपर्यंत रुपयांतील रुप्याची किंमत जास्त असल्यामुळें तें अटविणें हें फायदेशीर असतें व त्यामुळें रुपये अटविले गेल्यास नोटांबद्दल रुपये देणें शक्य होणार नाही. रुपये अटविल्यामुळें कमी पडल्यास लोक नवीन नोटा करन्सीच्या निधींमधून मागतील व असा क्रम २।३ वर्षे चालल्यास सर्व निधि नाहींसा होईल. याकरितां रुपयाचा भाव २४ पेन्स (सोनें) करण्याचें स्मिथ कमिटीनें ठरविलें. २४ पेन्स भाव केल्यानें रुपयाची किंमत त्यांतील रुप्याच्या किंमतीपेक्षां जास्त होईल व रुपये अटविण्यांत फायदा न होतां नुकसान होईल. त्याचप्रमाणें २४ पेन्स (सोनें) हा भाव ठरविल्यानें हुंडणावळीची स्थीरताही साध्य होईल. कारण २४ पेन्स दिल्यास एक रुपया देणें केव्हांही अशक्य नाहीं. अशा सर्व कारणांकरितां स्मिथ कमिटीनें एक रुपयाबरोबर २४ पेन्स हा भाव कायम करण्याविषयीं शिफारस केली. कमिटीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर स्टेट सेक्रेटरींनीं त्याबरहुकूम तावडतोब अंमलबजावणी करण्याचें ठरविलें. वस्तुतः रुप्याचा भाव अस्थिर असतांना कायमची हुंडणावळ ठरविणें अतिशय साहसाचें होतें. स्मिथ कमि-

टीचा दर कायम राखण्यास सोन्याचा भाव कमी असणें व रुप्याचा भाव ज़ास्त असणें हीं दोन्हीं आवश्यक आहेत. सरकारनें एक पौंडाबरोबर १० रुपये ठरविल्यास एका पौंडांत जेवढें सोनें असतें त्याची किंमत दहा रुपये झाली पाहिजे. परंतु बाजारांत तेवढ्या सोन्याची किंमत अठरा वीस रुपये होती. त्याचप्रमाणें रुपें स्वस्त झाल्यास रुपयाची किंमतही त्याप्रमाणें कमी होऊन पौंडांतील सोनें दहा रुपयांस मिळणार नाहीं. असें झाल्यास पौंड दहा रुपयाच्या ऐवजी देण्यास कोणीही तयार होणार नाहीं. सरकारासही पौंड चलनांत आणणें कठीण होईल. त्याचप्रमाणें पौंडाची किंमत अठरा वीस रुपये असतांना कोणतीही एक्सचेंज बँक दहा रुपये घेऊन एक पौंडाचा ड्रॅफ्ट देण्यास तयार होणार नाहीं. अशी स्थिति असल्यानें सरकारनें जरी हा दर ठरविला व आपले हिशेबही या दरानें करण्यास सुरवात केली तरीही व्यवहारांत नवीन हुंडणावळ प्रस्थापित होईना.

नंतर हा दर ज़बरदस्तीनें प्रस्थापित करण्याकरितां सरकारनें सोनें विकण्यास सुरुवात केली. १९१९ च्या ऑगस्ट महिन्यापासून दर महिन्यास दहा लक्ष पौंडांचें सोनें याप्रमाणें तीन महिने विकलें. नंतर तीन महिनेपर्यंत दर महिन्यास ११ लक्ष पौंडांचें सोनें याप्रमाणें विकलें. यामुळें सोन्याची किंमत ३२ रुपये तोळ्यावरून २५ रुपये तोळ्यापर्यंत खालीं आली. एकंदर अदमासें २२ लक्ष तोळे सोनें विकलें; तथापि सोन्याची किंमत १६

रुपयांवर येईना. उलट कांहीं दिवसांनीं किंमत अधिकच होऊन, आज मितीस ती ३२ रुपयांच्याही पुढें गेली आहे. हिंदुस्थान देशासारख्या मोठ्या देशांत ६।७ कोटींचें सोनें विकून, सोन्याचा भाव १६ रुपयांवर आणण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे आकाशास गवसणी घालण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे. याच सुमारास रुपेंही स्वस्त होऊं लागलें. ह्मणजे स्मिथकमिटीच्या हुंडणावळीस अनुकूल अशीं जीं अंगें होतीं, तीं दोन्हीं प्रतिकूल होऊं लागलीं. सोनें स्वस्त व रुपें महाग होण्याऐवजीं, सोनें महाग व रुपें स्वस्त होऊं लागलें. सर लायोनेल ॲब्राहाम यांनीं ह्मटल्याप्रमाणें हिंदुस्थानसरकारचीं गृहीतकृत्यें त्यांना नडूं लागलीं. रुपें महाग राहील अशा कल्पनेवर रचिलेली इमारत ढांसळून पडली व पुनः १ पौंड =१९ रुपये असा दर करावा लागेल कीं काय अशी सरकारास शंका वाटूं लागली. हलके हलके हुंडणावळ १ रु. = २४ पेन्स या बिंदूच्यानजीक येण्याच्याऐवजीं, खालीं येत येत गेल्या थोड्या महिन्यांत १६ पेन्सांच्याही खालीं गेली.

अशा रीतीनें स्मिथकमिटीची शिफारस कल्पनेच्या अवस्थेंतच राहून, तिला मूर्तस्वरूप येणें दुर्घट झालें आहे. हा सर्व परिणाम महायुद्धानंतरच्या व्यापाराच्या व हुंडणावळीच्या अस्थिरतेनें घडून आला आहे हें खरें; परंतु अशी अस्थिरता असतांना व रुप्याची किंमत आहे तशीच राहील किंवा खालीं जाईल हें निश्चित

नसतांना, हुंडणावळ कायदा करून पक्की करण्यांत स्मिथकमिटीनें अतिशय उतावीळपणा केला ही गोष्ट नाकबूल करितां येणार नाहीं. कांहीं वर्षांनी हिंदुस्थानचा व्यापार स्थिरस्थावर होऊन निर्यात माल पूर्वीच्या प्रमाणावर आल्यानंतर, सुवर्णसंलग्नचलन पुनः सुरळीत रीतीनें चालेल अशी पुष्कळ लोकांस आशा आहे. आमच्या मतें, गेल्या चार वर्षांतील अनुभवानें या चलनाची अस्थिरता व कृत्रिमपणा अतिशय स्पष्ट रीतीनें व्यक्त झाली आहेत. असें असतां पुनः या चलनपद्धतीवर हिंदुस्थान देशानें विश्वास ठेवणें हें अदूरदर्शित्वाचें लक्षण होईल.

सर्व साधकबाधक मुद्यांचा विचार केला असतां, सुवर्णचलन हेंच हिंदुस्थानास हितावह आहे असें दिसून येईल. या चलनांत पौंड हें मुख्य नाणें करून, रुपया हें खरोखरीचें उपनाणें केले पाहिजे. ५० किंवा १०० रुपये या मर्यादेच्या बाहेर रुपये हें कायदेशीर नाणें नाहीं असें कायद्यांत नमूद केलें पाहिजे. नोटाही रुपयांवर आश्रयभूत न राहतां, सोन्याच्या नाण्यावर आश्रय धरून राहिल्या पाहिजेत. अर्थात् नोट दिली असतां त्याबद्दल पौंड दिले पाहिजेत. सर्वांत महत्वाचें अंग हें आहे कीं, टांकसाळ खुली असली पाहिजे, ठराविक वजनाचें सोनें दिल्यास एक नाणें पाडून दिलें जाईल अशी हमी सरकारनें घेतली पाहिजे.

या चलनाचें कार्य अंतरव्यवहारांत व बाहेरच्या देशाशीं होणाऱ्या व्यवहारांत कसें होईल तें आतां पाहूं. देशामध्यें सर्व किंमती

पौंडांमध्यें दर्शविल्या जातील. होतां होईल तों लोक मोठ्या रकमें-बद्दल नोटाच देतील; परंतु कांहीं कारणांकरितां नाण्याची जरूर लागल्यास, नोटांऐवजी करन्सीच्या निधीमधून नाणें मिळूं शकेल. अल्प किंमतीच्या व्यवहाकरितां आवश्यक तेवढे रुपये चलनांत राहतील. हुंड्या विकून स्टेट सेक्रेटरीस हल्लींप्रमाणें होमचार्जेसची रकम वसूल करतां येईल व कौन्सिलबिलांचे पैसे येथें पौंडांत अथवा पौंडांच्या नोटांत हिंदुस्थानसरकार देईल, किंवा इंपीरियल बँकच्या द्वारें तेवढी रकम लंडनमध्यें ड्रॅफ्ट विकून वसूल करतां येईल व ते ड्रॅफ्ट तीच बँक हिंदुस्थानांत पटवील. हल्लीं उलट हुंड्या विकण्याचा जसा प्रसंग आला, असा पुनः प्रसंग आल्यास येथील इंपीरियल बँक लंडन येथील शाखेवर ड्रॅफ्ट देऊन हें देणें फेडूं शकेल. क्वचित् प्रसंगीं रोकड पौंड पेट्यांमध्यें घालून लंडन येथें पाठवावे लागतील; परंतु असें करण्यानें विशेष हानि होणार नाहीं. पुढील सालीं निर्यात माल आयात मालापेक्षां जास्त झाला म्हणजे तेच पौंड पुनः येथें परत येतील.

सुवर्णचलनास हिंदुस्थान देश विशेष पात्र आहे. येथील निर्यात आयात मालापेक्षा जास्त असल्यामुळें दर वर्षी २५।३० कोटि रुपयांचें सोनें येथें सेंचणें अगदी सोपें आहे. व अशा तऱ्हेनें ५।६ वर्षे सोनें येऊं दिल्यास एकंदर दीडशें कोटीपर्यंत सोन्याचें नाणें होईल. एवढें नाणें सर्व देशास पुरेसें आहे. सुवर्णचलन केल्यास नाणें अटविण्याची प्रवृत्ति कमी होईल कारण तसें केल्यास नाण्या-

ची टंचाई पडून पुन्हां अटविलेलें सोनें टांकसाळींत नेऊन त्याचें नाणें पाडावें लागेल. हल्लींच्या काळीं पौंड अटवितात याचें कारण असें आहे कीं, रुपया हें कायदेशीर चलन असल्यामुळें पौंडावांचून अडत नाहीं. परंतु सुवर्णचलनांत रुपया हें खरोखरीचें उपनाणें असल्यामुळें पौंडाशिवाय मोठ्यादेण्याचे व्यवहार चालणार नाहींत. रुपयांच्या नोटा व रुपये हे कायदेशीर नाहींत असें ठरविलें ह्मणजे सोन्याच्या नाण्याचा उपयोग करणें भाग पडेल. हल्लीं खुली टांकसाळ नसल्यामुळें जे पौंड व्यापाराच्या देवघेवींत येथें येतात ते चलनाच्या कामाकरितां अपुरे होतात. त्यावरून सुवर्णचलन केल्यासही हल्लींप्रमाणेंच स्थिति राहील व लोक पौंडाचा उपयोग फक्त संचयाकरितांच करतील असें ह्मणणें बालिशपणाचें आहे. हल्लींच्या स्थितीचा आधार घेऊन सुवर्णचलनाविषयीं विधानें करणें हें तर्कशास्त्राच्या विरुद्ध आहे.

चेंबरलेन कमिशनचें मत असें होतें कीं, सुवर्णचलन केल्यास लोक पौंड वापरतील व त्यामुळें नोटांचें चलन कमी होईल. परंतु हें विधान करतांना नोटा या हल्लींप्रमाणें रुपयांच्या नोटा आहेत असें कमिशननें गृहीत धरलें परंतु हें सुवर्णचलनाच्या व्याख्येच्या विरुद्ध आहे. सुवर्णचलनांत रुपयांच्या नोटा असणें इष्ट नाहीं. नोटा या मुख्य नाण्यावर आधारभूत असतात व मुख्य नाणें पौंड हें झाल्यास सर्व नोटांचा आधार पौंड हाच असला पाहिजे. असें झालें ह्मणजे पौंड हें फक्त लहान किंमतीस देण्याकरितां वापरलें

आंतील व शंभर अथवा त्यांहून अधिक अशा किंमतींच्या देण्या-करितां नवीन नोटांचा उपयोग केला जाईल. यावरून वरील आक्षेप अगदीं भ्रामक आहे असें दिसून येईल. बँकिंगची पद्धति अधिक प्रचलित झाली म्हणजे पौंडांचा व्यवहारांत उपयोग कमी कमी होऊन चेक व पौंडांच्या नोटा यांच्या आधारें बहुतेक व्यव-हार चालतील. असें होण्यास इंपीरियल बँकची एक शाखा प्रत्येक जिल्ह्यांत उघडण्याची सरकारनें व्यवस्था केली पाहिजे. सुवर्णचलन केलें म्हणजे सोन्याचें नाणें मोठ्या प्रमाणांत वापरलेंच पाहिजे असें नाहीं; यूरोपांतील देशांत सुवर्णचलन असूनही नाण्याची काटकसर नोटांच्याद्वारें होऊं शकतें. मग हेंच कार्य हिंदुस्थानांत होणें अशक्य कां असावें?

सुवर्णचलनाविरुद्ध एक आक्षेप असा आहे कीं, हिंदुस्थानांतील लोकांस त्याची जरूरी नाहीं. आतां लोकांना एखाद्या गोष्टीची जरूरी आहे कीं नाहीं हें ठरविणें कठीण आहे. विशेषतः हिंदु-स्थानांतील लोक अशिक्षित व आपलें मत दर्शविण्यास असमर्थ असल्यामुळें त्यांचें मत काय हें ठरविण्यापेक्षां त्यांना हितकर कोणती पद्धति आहे हें ठरविणें जास्त सयुक्तिक आहे. मराठी साम्राज्यांत व मोंगलांच्या साम्राज्यांत हल्लींपेक्षां व्यापार कमी असूनही अनेक शतकें सोन्याचें नाणें प्रचलित होतें असें न्या. रानडे यांनी दाखविलें आहे. फौलर कमिटीनेंही हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सुरू करणें इष्ट आहे असें आपलें मत दिलें.

१८९३ साली टांकसाळ बंद केली त्या वेळेसही अनेक व्यापारी व कित्येक सरकारी अधिकारी यांनी सोन्याचें नाणें करणें हाच उत्तम पक्ष आहे असें मत दिलें. असें असतां लोकमत सुवर्ण-चलनांस अनुकूल नाही असें ह्मणणें हें चमत्कारिक दिसतें. कदाचित या आक्षेपकांचें असें ह्मणणें असेल की शेंकडा ८० लोक गरीब असल्यामुळें व त्यांचे व्यवहार दहा वीस रुपयांच्या आंतील असल्यामुळें त्यांना पंधरा रुपयांच्या किंमतीइतकें मोठें नाणें वापरण्याची केव्हांही गरज पडत नाहीं. त्यांच्याकरितां रुपया हेंच मापन सोईचें आहे व पौंड हे चलनांत आल्यास त्यांना पुनः पौंडाची मोड करून रुपये वापरणेंच भाग पडेल. यांवर उत्तर इतकेंच कीं, सामान्य लोकांकरितां रुपये हे राहतीलच. सुवर्ण-चलनांत रुपये काढून टाकावे असें कोणत्याही हिंदी अर्थशास्त्रज्ञानें ह्मटलेलें नाहीं. परंतु जेथें कारण नसतां हजारों रुपये अथवा रुपयांच्या नोटा वापरण्यांत येतात तेथें पौंड अथवा पौंडांच्या नोटा उपयोगांत आणाव्या असा सुवर्णचलनाचा अर्थ आहे. हिंदुस्थानचें दारिद्य हें सुवर्णचलन अमलांत आणण्याच्या विरुद्ध एक कारण देण्यांत येतें. परंतु सरकारी अहवाल वाचले असतां हिंदुस्थान देश गरीब आहे किंवा श्रीमंत आहे याविषयीं कांहींच निश्चित होत नाहीं. कांहीं अहवालांत असें नमूद केलें आहे कीं, या देशांत भाव, मजुरी, नफा इत्यादि वाढत असून हा देश श्रीमंत होत चालला आहे. असें असतां चलनाचा प्रश्न निश्चि-

त्याबरोबर हा देश गरीब होतो. या दोहोंची संगति लावणें कठीण आहे. ज्या देशांत दरसाल सर्व देणें देऊनही ३०।३५ कोटि रुपयांचें सोनें येतें त्या देशांत सुवर्णचलन होणें हें अगदीं नैसर्गिक व युक्त आहे.

सुवर्णचलनावर दुसरा आक्षेप असा आहे की, या चलनामुळें हिंदुस्थानांत सोनें फार येऊन, इतर देशांत सोन्याची टंचाई पडून सर्वत्र अस्थिरता उत्पन्न होईल. हल्लीं सोन्याचें चलन नाहीं तरीही फक्त दागिने वगैरेकरितां अदमासें २५।३० कोटींचें सोनें दरवर्षी हिंदुस्थानांत येतें. सोन्याच्या चलनाकरितां दरसाल आणखी ४०।५० कोटींचें सोनें येऊं लागल्यास, इतर देशांत सोनें महाग होऊन, तेथील बँकिंगचा आधार कमकुवत होईल व पतीची सर्व इमारत डळमळूं लागेल. या आक्षेपावर पहिलें उत्तर हें आहे की सर्व जगांतील व्यवहाराचा विचार हिंदुस्थानास कर्तव्य नाहीं. जर्मनीनें १८७१ मध्यें सुवर्णचलन सुरू केलें त्यावेळेस त्यानें सर्व जगाचा विचार केला होता काय? उत्तम चलनपद्धति जी असेल ती स्वीकारण्याचा प्रत्येक देशाचा हक्क आहे. त्यापासून इतर देशांस अपाय झाल्यास तो अपरिहार्य आहे.

परंतु वस्तुस्थिति अशी नाहीं. सोन्याचें उत्पादन दरसाल अधिक अधिक वाढत चाललें आहे. १८९० सालीं जगांत एकंदर २६ कोटींचें सोनें पैदा झालें. १८९६ सालीं ४८ कोटींचें सोनें पैदा झालें. १८९९ सालीं ९२ कोटींचें सोनें पैदा झालें.

१९१५ सालचें उत्पादन १४९ कोटि रुपयांचें होतें. असें असतां हिंदुस्थानांत ४०–५० कोटींचें सोनें आल्यास सोन्याची टंचाई पडेल असें ह्मणतां येत नाहीं. शिवाय हिंदुस्थानांत बँकिंगची पद्धति रूढ झाल्यावर दर वर्षी इतकें सोनें लागणार नाही. सोन्याची काटकसर करण्याचा प्रयत्न जसा यूरोपांत केला जातो तसा हिंदुस्थानांत केल्यास येथेंही नोटा व चेक यांचे आधारें व्यवहार होऊन थोडें सोनें पुरेसें होईल. प्रत्येक जिल्ह्यांत इंपीरियल बँकेची शाखा काढिल्यास जिल्ह्यांतील व्यवहारांतसुद्धां नोटांचें चलन वाढून नाण्यांचें महत्व कमी होईल. असा प्रयत्न आजपर्यंत कोणीही केलेला नाहीं. असें असतां हिंदुस्थान मागसलेला देश आहे हें पालुपद घोकीत बसण्यांत तात्पर्य काय? आमच्या मतें हल्लींचें रुपयांचें चलन अदमासें ३२५ कोटि रुपयांचें आहे त्यांपैकीं १२५ कोटि चलन उपनाणें ह्मणून ठेवून बाकीच्या २०० कोटि रुपयांऐवजीं अदमासें १० कोटि पौंड चलनांत आणल्यास सर्व व्यवहार उत्तम रीतीनें चालेल. याशिवाय जास्त चलन लागल्यास त्याची जबाबदारी सरकारावर नसून लोकांवर आहे. अधिक नाणें लागल्यास लोकांनीं सोनें आणून तें पाडून न्यावें; खुली टांकसाळ ठेवणें एवढेंच सरकारचें कर्तव्य आहे.

उलटपक्षीं यूरोपांतील देशांचा एक प्रकारें फायदाच होईल. गेलीं वीस वर्षें सोन्याच्या विपुलत्वामुळें यूरोपांत किंमती वाढ

लागल्या आहेत त्या सोन्याची टंचाई झाल्यास अनायासें कमी होऊन महर्घतेच्या सर्व दुःखांपासून हे देश मुक्त होतील दुसरें उत्तर असें आहे कीं सर्वांगसुंदर असें सुवर्णसंलग्नचलन यूरोपांतील देशांनीं अमलांत आणावें म्हणजे सोनें मुळींच चलनांत नसतां सुवर्णचलन करण्याची अप्रतिम युक्ति जी आजपर्यंत हिंदुस्थानास शिकविली जात आहे तिचा त्यानां प्रत्यक्ष अनुभव घेण्यास सांपडेल. यूरोपांतील देशांनीं आपले सुवर्णनिधि युनायटेड-स्टेट्समध्यें ठेवून आपले सर्व व्यवहार त्या निधींच मार्फत चालवावे. फिंडले शिरस यांच्या मतानें सुवर्णचलनापेक्षां सुवर्णसंलग्नचलन हें श्रेयस्कर आहे. हें खरें असल्यास इंग्लंड फ्रान्स जर्मनी इत्यादि देशांनीं हें चलन स्वीकारण्यास कालावधि लावूं नये हें बरें.

एकंदर विचार करतां हिंदुस्थानांतील चलनपद्धति आत्यंतिक (final) आहे असें म्हणतां येणार नाहीं. परवांच सर विठ्ठलदास यांनीं असेंब्लीमध्यें याविषयीं उहापोह करण्याकरितां एक कमिटी नेमण्याविषयीं ठराव पुढें आणला होता. तो जरी पास झाला नाहीं तरी हिंदुस्थानांतील सर्व शास्त्रज्ञांचें सुवर्णचलनाविषयीं अतिशय ठाम असें अनुकूल मत असल्यामुळें हा प्रश्न लवकरच पुन्हां उपस्थित होईल त्यावेळीं सर्व लोकनियुक्त सभासदांनीं आपलें मत स्पष्टपणें जाहीर केल्यास या प्रश्नाचा कायमचा निकाल लागेल अशी आशा करणें व्यर्थ होणार नाहीं.

# परिशिष्ट ( अ ).

## इंपीरियल बँकेची घटना.

सन १९२० चा ॲक्ट ४७ यामधील मुख्य कलमें पुढें दिलेलीं आहेत.

कलम ३. इंपीरियल बँक ऑफ इंडिया नांवाची बँक, हल्लींच्या प्रेसिडेन्सी बँकांचे व्यवहार आपल्या अंगावर घेण्याकरितां व या कायद्यान्वयें इतर व्यवहार चालविण्याकरितां स्थापिली जात आहे. हल्लींच्या प्रेसिडेन्सी बँकांचे भाग धारण करणारे सर्व लोक व पुढें भाग धारण करणारे सर्व लोक मिळून, एक संस्था समजली जाईल व या संस्थेवर फिर्याद होऊं शकेल व ही संस्था दुसऱ्यांवर फिर्याद करूं शकेल. सुरुवातीचें भांडवल ११ कोटि २५ लक्षांचें आहे व प्रत्येक भाग ५०० रु० किंमतीचा आहे. भाग धारण करणारांची जबाबदारी मर्यादित [ लिमिटेड ] आहे.

कलम ४. प्रेसि० बँकांचे सर्व व्यवहार ही बँक करील. हे व्यवहार ह्मणजे त्यांचे हक्क शक्ति, अधिकार, विशिष्ट अधिकार, मालमत्ता [ रिझर्व्ह फंड, शिलकी कर्जाऊ दिलेल्या रकमा ] मालमत्तेपासून उत्पन्न होणारे हक्क व हितसंबंध, हिशोबाचीं पुस्तकें, बह्या, दस्तऐवज, दाखले, कर्ज व देणें हीं सर्व होत. ह्या नवीन

बँकच्या अस्तित्वामुळें, पूर्वीच्या बँकांचे दावे वगैरे यांना बाध येणार नाही. प्रेसि० बँकांनी केलेले सर्व करार, वचनें व इतर कागद हे सर्व नवीन बँकेस बंधनकारक आहेत.

कलम ५. पूर्वीचे भाग धारण करणारे नवीन बँकेचे तितक्याच रकमेचे भाग धारण करणारे असें समजले जातील. पांचशेंपेक्षां लहान रकमेबद्दल अपूर्णांकदर्शक सर्टिफिकिटें देण्यांत येतील. हीं सर्टिफिकिटें परत देऊन त्यांनीं नवे पूर्ण रकमेचे भाग विकत घ्यावे किंवा त्याबद्दलचे पैसे परत घ्यावे. पूर्वीच्या प्रत्येक भागीदारास आणखी दोन भाग मागण्याचा अधिकार आहे. तीन महिन्यांत हे नवीन भाग न मागितल्यास, ते सार्वजनिक रीतीनें विकले जातील. हिंदुस्थान देशाच्या बाहेर राहणाऱ्या भागीदारांस सहा महिनेपर्यंत मुदत दिली जाईल.

कलम ७. नवीन बँक सुरू झाल्याबरोबर प्रेसि० बँका नष्ट झाल्या असें समजावें. नंतर पूर्वीच्या बँकांवर दावे वगैरे चालणार नाहींत.

कलम ८. ही शेडयूल नंबर १ मध्यें निर्दिष्ट केलेले सर्व व्यवहार करूं शकेल.

कलम ९. लंडन येथील शाखा, पूर्वी प्रेसि० बँकांचे जे गिऱ्हाईक अथवा खातेदार तीन वर्षेपर्यंत असतील, त्यांच्याशीच

चालू खातें व ठेव ठेवणें हे व्यवहार करूं शकेल, इतरांशी करूं शकणार नाही.

**कलम १०.** भारतमंत्री यांच्याशीं करार करून हिंदुस्थान-सरकारच्या वतीनें रोख नाणें, गट व सिक्युरिटी हीं जमा करणें इकडून तिकडे पाठविणें वगैरे व्यवहार ही बँक करूं शकेल. त्याच-प्रमाणें सरकार सांगेल त्याप्रमाणें इतर व्यवहारही करण्याचा तिला हक्क आहे. या करारांमध्यें गव्हरनर जनरल इन् कौन्सिल यांना बँकेस निर्बंध घालण्याचा अधिकार आहे व हे निर्बंध न पाळल्यास हा करार रद्द करण्याचाही अधिकार आहे. या कायद्याच्या सुरु-वातीपासून पांच वर्षांच्या आंत नवीन शंभर शाखा (कमीत कमी) उघडणें हें आवश्यक आहे. त्यांपैकीं २५ शाखा सरकार सांगेल त्याच ठिकाणीं उघडल्या पाहिजेत.

**कलम ११.** या कामाकरितां इमारती बांधण्याकरितां वगैरे स्थावर मिळकत विकत घेण्याचा या बँकेस अधिकार आहे त्याचप्रमाणें अशी मिळकत विकणें, भाड्यानें देणें, तिचा विमा उतरणें इत्यादि व्यवहार करण्याचाही तिला अधिकार आहे.

**कलम १२.** वाटेल तितक्या शाखा वाटेल तेथें उघडण्याचा तिला अधिकार आहे. यांपैकीं वाटेल त्या शाखा बंद करण्याचाही तिला हक्क आहे.

कलम १३. गव्हरनर-जनरल-इन् कौन्सिल यांच्या परवानगीनें दुसऱ्या बँका आपल्यांत सामील करण्याचा, त्यांचें भांडवल व भाग आपण घेण्याचा व स्वतःचें भांडवल अशा कामांकरितां वाढविण्याचा हक्क तिला आहे अशा तऱ्हेनें नवीन अंगीकृत केलेल्या व्यवहारांची या कायद्याअन्वयें व्यवस्था ही बँक करील. अशा तऱ्हेच्या बँका या १९१३ च्या कंपनीच्या ॲक्टाप्रमाणें नोंदविलेल्या असल्या पाहिजेत.

कलम १४ या बँकेचे भाग हे जंगम मिळकत समजली जाईल. या भागांना क्रमानें संख्या दिलेली असली पाहिजे.

कलम १९. भागाचा हक्क मिळण्याकरितां भागाचें सर्टिफिकेट शिक्कामोर्तब केलेलें असलें पाहिजे.

कलम २०. भागांचें नोंदणीपत्रक बँकेनें सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केलेल्या जागी ठेविलें पाहिजे व तें तपासण्याचा वाटेल त्या भागीदारास हक्क आहे अशा नोंदणीपत्रकाची प्रत वाटेल त्या भागीदारास मागतां येईल.

कलम २१. दोन व्यक्तींमध्यें जो करार लेखी होऊं शकेल असा करार ही बँक करूं शकेल व त्यावर तिनें अधिकृत केलेल्या मनुष्याची सही असली म्हणजे पुरें आहे. त्याचप्रमाणें तोंडी

करारही बँकेस करतां येतील अशा तऱ्हेचे सर्व करार बँक व जिच्याशीं करार केला ती व्यक्ति अथवा संस्था या दोहोंना बांधूं शकतात.

**कलम २२.** शेडयूल नंबर २ यांमधील सर्व नियम या बँकचे नियम समजले जातील.

**कलम २४.** बँकेची एकंदर व्यवस्था 'गव्हरनर यांचे मध्यवर्ती मंडळ' करील. बँकेच्या सर्व हक्कांचें हें मंडळ प्रतिनिधि म्हणून समजावें.

**कलम २५.** मुंबई, मद्रास व कलकत्ता येथें 'स्थानिक मंडळें' स्थापन केलीं पाहिजेत. यांशिवाय इतर ठिकाणीं मध्यवर्ति मंडळ, गव्हरनर–जनरल यांच्या संमतीनें स्थानिक मंडळें अस्तित्वांत आणूं शकतें.

**कलम २७.** पूर्वीच्या प्रेसि. बँकांचे डायरेक्टर प्रेसिडेंट, व्हाइस् प्रेसिडेंट, व सेक्रेटरी यांचें 'स्थानिक मंडळ' प्रथम केलें जाईल.

**कलम ३१.** गव्हरनर जनरल यांच्या संमतीनें मध्यवर्ति मंडळ हें पोटकायदे करूं शकतें.

**कलम ३२.** इतर कायद्यांत जेथें जेथें प्रेसि. बँकांचा उल्लेख केलेला आहे, तेथें तेथें त्यांच्या ऐवजी इंपीरियल बँक हिचा उल्लेख केला आहे असें समजावें.

## शेडयूल नं० १.

### बँकेच्या व्यवहारांचें स्पष्टीकरण.

या बँकेस पुढीलप्रमाणें व्यवहार करण्याची परवानगी आहे.

(अ). पैसे कर्जाऊ देणें.

स्टॉक, ज्या सिक्यूरिटींमध्यें पैसे ठेवण्यास पार्लमेंटच्या ॲक्टप्रमाणें अथवा हिंदुस्थानांतील कायद्याप्रमाणें ट्रस्टींना परवानगी आहे अशा सिक्यूरिटी, स्थानिक सरकारें यांच्या सिक्यूरिटी, सिलोनच्या सरकारी सिक्यूरिटी; प्रेसिडेन्सी बँक ॲक्ट १८७६ या अन्वयें नमूद केलेल्या सरकारी रेलवेच्या सिक्यूरिटी; कोणत्याही कायदे-कौन्सिलमध्यें पास झालेल्या कायद्यास अनुसरून काढलेले कर्जरोखे किंवा डिबेंचर अथवा जिल्हा बोर्डांचे कर्जरोखे; गहाण ठेवलेला व बँकेच्या ताब्यांत दिलेला माल, स्वीकारलेल्या हुंड्या; लिहून दिलेलीं खातीं; कंपन्यांचे पूर्ण रक्कम भरलेले भाग; स्थावर-मिळकत व तिचा हक्क शाबित करणारे कागदपत्र यांच्या आधारांवर एखाद्याच्या नांवें रक्कम जमा करून त्याचें खातें उघडणें, भारतमंत्री यांच्या नांवें खातें उघडल्यास सिक्यूरिटी न ठेवतां त्यांना क्रेडिट देण्यास अथवा ठराविक रक्कम उचलण्याची परवानगी देण्यास मध्यवर्ति मंडळास अधिकार आहे.

(आ). अशा तऱ्हेनें ठेवलेल्या सिक्यूरिटी वगैरे विकणें व त्या विकून आलेल्या पैशांची व्यवस्था करणें; बँकेच्या ताब्यांत

असलेल्या किंवा ज्यांवर बँकेचा हक्क आहे अशा मालाची तो माल अटीप्रमाणें सोडवून नेला नसल्यास विक्री करणें व ते पैसे वसूल करून घेणें.

( इ ). हुंड्या देणें, हुंड्यांचा स्वीकार करणें व कटमिति कापून घेऊन हुंड्यांबद्दल रकम देणें. हिंदुस्थानाबाहेरच्या हुंड्या गव्हरनर जनरल यांच्या संमतीनें विकणें व विकत घेणें.

( ई ). बँकेचे पैसे ( अ ) मध्यें निर्दिष्ट केलेल्या सिक्युरि-टींत गुंतविणें व त्यांची रोख रकम करणें; सिक्यूरिटीमध्यें घात-लेल्या पैशांची दुसऱ्या तऱ्हेच्या कर्जामध्यें अथवा ठेवींमध्यें अद-लाबदल अथवा रूपांतर करणें.

( उ ). 'पोस्टबिलें' व लेटर्स ऑफ क्रेडिट काढणें व तीं गिऱ्हाइकांमध्यें प्रचलित करणें; मात्र हीं दाखविणारास दर्शनी दिलीं पाहिजेत अशा स्वरूपाचीं नसावीं.

( ऊ ). सोनें अथवा रुपें विकणें किंवा विकत घेणें. सो-न्याचीं अथवा रुप्याचीं नाणीं विकणें अथवा विकत घेणें.

( ए ). ठेवी ठेवणें व चालू खातें ठेवणें व कर्ज देण्याऐवजीं एखाद्याच्या नांवें रकम जमा मांडणें.

( ऐ ). दागिने, सोन्यारुप्याचीं भांडीं, ताटें, जवाहिर, मोत्यांचे दागिने, मिळकतीचा हक्क शाबीद करणारे कागदपत्र व इतर मूल्यवान् वस्तूंची ठेव घेणें अथवा त्यांची सुरक्षितता आ-पल्या शिरावर घेणें.

(ओ). लोकांकडून आपल्या येण्यामध्यें ज्या ज्या वस्तु स्थावर व जंगम हातांत येतील, त्या विकून, त्यांची रक्कम तयार करणें.

(औ). कमिशन घेऊन पैशाच्या देवघेवीसंबंधी अनेक व्यवहार करणें.

(अं). एखाद्या कंपनीचे भाग विकणें किंवा ताब्यांत घेणें, सिक्यूरिटी अथवा भाग यांचे पैसे व व्याज वसूल करणें आणि हे वसूल केलेले पैसे हुंड्या करून किंवा अन्य मार्गांनी मालकास पाठविणें; या वरील कामासंबंधानें कमिशन घेऊन, एजंट या नात्यानें काम करणें व ताब्यांतील जमीनजुमला, घरें इत्यादि विकून टाकून निकाल करण्याच्या कामांत व्यवस्थापक अथवा ट्रस्टी होणें.

(अः). [अं] यांत निर्दिष्ट केलेल्या व्यवहाराकरितां हुंड्या काढणें अथवा लेटर्स ऑफ क्रेडिट देणें ती अशी की ज्यांचे पैसे हिंदुस्थानाच्या बाहेर मालकास मिळतील. हीच कामें आपल्या गिऱ्हाइकांकरितां जरूर लागल्यास करणें.

(क). अशा तऱ्हेच्या हुंड्यांचे पैसे देण्याकरितां हिंदुस्थानाबाहेर ज्यांचे पैसे मिळतील अशा तऱ्हेच्या हुंड्या (लंडन, पॅरिस वगैरे ठिकाणीं पौंडांत अथवा फ्रँकमध्यें वसूल होणाऱ्या) खरेदी करणें; मात्र या हुंड्या सहा महिन्यांच्या मुदतीपेक्षां जास्त मुदतीच्या असूं नयेत.

( ख ). बँकेच्या कामाकरितां हिंदुस्थानांत कर्जानें पैसे काढणें व याकरितां बँकेजवळ असलेला कोणताही तिच्या मालकीचा माल गहाण लावून देणें.

( ग ). इंग्लंडांत कर्ज काढणें. हें कर्ज फक्त स्वतःच्या जवळ असणाऱ्या व खात्रीनें येणें असलेल्या मालमत्तेच्या आधारावरच काढलें पाहिजे. अन्य रीतीनें नाहीं.

( घ ). आतांपर्यंत निर्दिष्ट केलेल्या मुख्य व्यवहारांच्या अंतर्गत जे दुसरे बारीकसारीक व्यवहार अथवा कामें करावीं लागतील, तीं करणें.

या बँकेनें पुढील व्यवहार कधींही करूं नयेत.

( १ ) सहा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीकरितां कर्ज देणें.

स्वतःच्या भागांच्या आधारावर कर्ज देणें.

( २ ) एका व्यक्तीकरितां अथवा भागीदारांनें चालविलेल्या व्यापारी संस्थेकरितां एका ठराविक रकमेपेक्षां जास्त रकमेच्या हुंड्यांचे रोख पैसे देणें व एका ठराविक रकमेपेक्षां जास्त कर्ज देणें.

( ही रकम पुढें सरकारी गॅझेटांत जाहीर केली जाईल. )

( ३ ) ज्या ठिकाणी हुंडी ( अथवा दुसरें कायदेशीर 'निगोशिएबल' वेचनपत्र ) रोख पैसे मागण्याकरितां दाखविली जाईल अशा हुंडीचे पैसे ( अथवा तिच्या आधारावर कर्ज देणें अथवा खातें उघडणें ) तिच्यावर भिन्न भिन्न अशा दोन व्यापाऱ्यांच्या अथवा व्यापारी संस्थांच्या सह्यांशिवाय देणें.

( ४ ) सहा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीनंतर ज्यांचे पैसे वसूल होतील, अशा हुंड्या अथवा इतर निगोशिएबल वेचनपत्रें इत्यादिकांबद्दल रोख पैसे देणें अथवा त्यांचे आधारावर कर्ज वगैरे देणं.

## शेड्युल नं० २.

### इंपीरियल बँकेचे सामान्य नियम.

(फक्त महत्वाचे तेवढेच दिले आहेत.)

प्रत्येक भागाबद्दल शिक्का मारलेलें सर्टिफिकेट मिळालें पाहिजे. अनेक इसमांच्या नांवाचा भाग असल्यास, त्यांपैकीं कोणा तरी एकास सर्टिफिकेट दिलें जाईल. भाग धारण करणाऱ्यानें बँकेस जें देणें असेल, त्याबद्दल बँकेच्या भागावर व डिव्हिडंडवर त्याचा हक्क राहील. भागाविषयीं मागणी करणें झाल्यास, ती एकाच कालीं भागाच्या एकचतुर्थांशपेक्षां जास्त असूं नये व दोन मागण्यांमध्यें दोन महिन्यांचें अंतर असावें. भागाचे पैसे न दिल्यास, त्याबद्दल व्याज द्यावें लागेल. भाग विकल्यास, विकणारा व विकत घेणारा या दोघांची अर्जावर सही पाहिजे व बँकेच्या पुस्तकांत नवीन भाग धारण करणाराचें नांव नोंदलें जाईपर्यंत पूर्वीच्या मनुष्याची मालकी राहील. भाग धारण करणारा मृत झाल्यास, त्याचे एक्झिक्यूटर्स हेच मालक समजले जातील. एखादी मागणी करून पैसे न आल्यास भाग धारण करणारास नोटीस दिली पाहिजे. अशा नोटिशीबद्दल कांहीं तजवीज न झाल्यास भाग काढून घेतला जाईल.

एकतृतीयांश भाग धारण करणारांच्या मतानें ठराव पास झाल्यास, बँकेचें भांडवल वाढवितां येईल अथवा कमी करतां येईल. असें करण्यास गव्हर्नर जनरल यांची संमति पाहिजे. असा ठराव झाल्यानंतर मध्यवर्ति मंडळानें योग्य ती व्यवस्था करावी. प्रत्येक वर्षी ऑगष्ट महिन्याच्या १ तारखेस सामान्य सभा भरविली जाईल. या सभेबद्दल पंधरा दिवस पूर्वी सरकारी गॅझेटांत सूचना दिली जाईल.

पांच लक्षांचे भाग धारण करणारे १०० लोक किंवा कोणतेही ३ गव्हर्नर [बँकेचे] यांना मुद्दाम सभा बोलाविण्याचा शक्ति आहे. अशा सभेबद्दल दोन महिनेपूर्वी सूचना दिली पाहिजे व त्या सूचनेंत सभेच्या उद्देशाबद्दल विवरण केलें असलें पाहिजे. २०० भाग धारण करणारे हे कोणतीही सभा चालविण्यास अत्यावश्यक आहेत. भाग धारण करणारास आपल्या वतीनें प्रतिनिधि पाठवितां येईल. प्रत्येक गोष्ट बहुमतानें ठरविली जाईल. सभेच्या पूर्वी तीन महिने भाग धारण केल्याशिवाय सभेंत मत देण्याचा हक्क मिळणार नाहीं. ज्या भागाचे कांहीं पैसे अद्यापि भरलेले नाहींत, त्यासंबंधानें मत देण्याचा हक्क पैदा होणार नाहीं. सभासदांनीं सांगितल्यास, अध्यक्षांच्या इच्छेप्रमाणें उघड रीतीनें अथवा गुप्त रीतीनें (बॅलटच्या पद्धतीनें) मतांची मोजदाद (पोल) केली जाईल सभेंत केलेले सर्व ठराव बँकेस निर्बंध करणारे होतील असें समजावें.

जेथें स्थानिक मुख्य शाखा असतील, तेथेंही वर्षांतून एकदां, मध्यवर्तिमंडळ ठरवील त्या तारखेस, त्या शाखेच्या पत्रकांतील बाबीप्रमाणें सामान्यसभा झाली पाहिजे. या सभेंतील काम मध्यवर्तीसभेप्रमाणेंच चालतील. मुद्दाम सभा बोलाविण्यास, दहा भाग धारण करणारांस अधिकार आहे व त्यांच्या भागांची रक्कम ५० हजार रु. त्यांची असली पाहिजे.

गव्हर्नर किंवा स्थानिक मंडळाचा सभासद होण्यास १० हजारांचे भाग धारण करणें आवश्यक आहे; पण सरकारनें नेमलेला अधिकारी असेल तर, त्याला ही अट लागू नाहीं. एखाद्या दुसऱ्या बँकेचा डायरेक्टर, एजंट अथवा मॅनेजर यांस इंपीरियल बँकेंत गव्हर्नर अथवा स्थानिक मंडळाचा सभासद होतां येणार नाहीं; परंतु अशा मनुष्यास गव्हर्नर जनरल हे २८ व्या कलमांत दिलेल्या अधिकारान्वयें त्या जागीं नेमूं शकतील. इंपीरियल बँकेंत जर नोकरी धरली, तर वरील अधिकार देतां येणार नाहींत. सहा महिन्यांवर गैरहजीर राहिल्यास त्याचे हे अधिकार काढून घेतले जातील. एका संस्थेंतील दोन डायरेक्टर अथवा भागीदार एकाच वेळीं मध्यवर्तिमंडळाचे किंवा स्थानिक मंडळाचे सभासद होऊं शकणार नाहींत.

एकंदर भांडवलाच्या निम्या किंमतीचे भाग धारण करणारे बहुमतानें गव्हर्नरास काढून टाकूं शकतील; परंतु गव्हर्नर जनरल यांनीं नेमिलेल्या गव्हर्नरास मात्र काढतां येणार नाहीं.

स्थानिक मुख्य शाखेच्या भांडवलापैकीं निम्या किंमतीच्या भागांचे धारण करणारे, बहुमतानें ठराव पास करून, स्थानिक मंडळाच्या समासदास काढून टाकूं शकतात व त्याच्या जागीं दुसरा नेमूं शकतात.

मध्यवर्तिमंडळाची बैठक तीन महिन्यांतून एकदां तरी झालीच पाहिजे. प्रत्येक स्थानिक मुख्य शाखेच्या ठिकाणीं एक वेळां तरी हें मंडळ एकत्र झालें पाहिजे. कोणत्याही स्थानिक मंडळास मध्यवर्तिमंडळाची सभा भरविण्याविषयीं मॅनेजिंग डायरेक्टर यांस सांगण्याचा अधिकार आहे. अशा प्रत्येक सभेंत जे गव्हरनर असतील त्यांनीं आपणांपैकीं एकास अध्यक्ष निवडावें. अशा अध्यक्षास आपलें स्वतःचें मत असून शिवाय सारखीं मतें झाल्यास ज्यादा निर्णायक मत देतां येते.

स्थानिक भाग धारण करणारांची सामान्य सभा स्थानिकमंडळां-तील समासदांची संख्या ठरवूं शकेल. स्थानिक मंडळाची सभा ही मंडळाच्या अध्यक्षानें तो नसल्यास उपाध्यक्षानें व तोही नस-ल्यास सर्वांत प्राचीन अशा समासदानें बोलवावी. हे अध्यक्ष व उपाध्यक्ष पहिल्या सभेच्यावेळीं स्थानिक मंडळानें निवडावे. एका-मागून एक दोन वेळां एकच मनुष्य या जागांवर निवडूं नये. एखादी जागा रिकामी झाल्यास इतर समासदांनीं ती भरून काढावी.

गव्हर्नर किंवा सभासद यांच्या जागा रिकाम्या आहेत एवढ्याच कारणानें मध्यवर्तिमंडळाचा किंवा स्थानिक मंडळाचा कोणताही ठराव रद्द होऊं शकत नाहीं. दुसऱ्या गव्हर्नराच्या किंवा अधिकाऱ्याच्या किंवा मंडळाच्या सभासदाच्या दोषांबद्दल गव्हर्नर किंवा मंडळाचा सभासद यास त्यांचा स्वतःचा दोष असल्याशिवाय, जबाबदार धरूं नये.

बँकेचा शिक्का कमींत कमी तीन गव्हर्नरांच्या देखत मारला पाहिजे. याशिवाय स्थानिक मुख्य शाखांकरितां दुसरे शिक्के केले जातील. हे शिक्के, स्थानिक मंडळाच्या कमींत कमी दोन सभासदांच्या देखत मारले पाहिजेत. याशिवाय त्यावेळीं स्थानिक मंडळाचा सेक्रेटरी हजर पाहिजे. ज्या कागदावर शिक्का मारला असेल, त्यावर या सर्वांनीं आपली सही केली पाहिजे. अशा शिक्क्याशिवाय कोणताही कागद कायदेशीर समजला जाणार नाहीं.

मध्यवर्तिमंडळास व स्थानिक मंडळास इतर अधिकारी, नोकरचाकर वगैरे नेमण्याचा व त्यांचे पगार, पेनशन् वगैरे ठरविण्याचा पूर्ण अधिकार आहे. कोणत्याही अधिकाऱ्यास अथवा नोकरास काढून टाकण्याचा त्यास अधिकार आहे. मध्यवर्तिमंडळानें सरकारी गॅझेटांत जाहीर करून, ज्या अधिकाऱ्यांस आपल्या वतीनें नियुक्त केलें असेल, त्यांनीं, स्टॉक, डिबेंचर, खातीं, हुंड्या, लेटर्स ऑफ क्रेडिट इत्यादिकांवर सह्या कराव्या. कोणत्याही अधि-

कार्‍यांनीं दुसऱ्या व्यापारधंद्यांत पडतां कामा नये किंवा सरकारी प्रॉमिसरी नोटा इत्यादि विकण्यांत दलालाचें काम करतां कामा नये.

प्रत्येक वर्षाच्या जून महिन्याचे व डिसेंबर महिन्याचे अखेरीस मध्यवर्तिमंडळानें सर्व हिशोब पुरा करून तोंडमिळवणी केली पाहिजे आणि अशा हिशोबाची व शिलकेची एक प्रत गव्हर्नर-जनरल-इन्-कौन्सिल यांजकडे पाठविली पाहिजे. वाटेल ती माहिती मागविण्याचा, वाटेल तो कागद हजर करण्यास सांगण्याचा व सर्व हिशोब ठराविक पद्धतीनें प्रसिद्ध करण्यास लावण्याचा हिंदुस्थान सरकारास पूर्ण अधिकार आहे. दर सहा महिन्यांच्या नफ्यावरून डिव्हिडंड ठरविले जाईल. दरवर्षी योग्य ती रकम रिझर्व्ह म्हणून ठेवण्याचा मध्यवर्तिमंडळास अधिकार आहे.

सामान्यसभेच्या वेळीं तीन हिशोबतपासनीस निवडावे. हे भाग धारण करणारे असले तरी चालतील परंतु गव्हर्नर, स्थानिक मंडळाचे सभासद व दुसरे अधिकारी यांना निवडूं नये. दुसरी सामान्य सभा भरेपर्यंत पूर्वीचे हिशोबतपासनीस यांनीं काम करावें. गव्हरनरजनरल यांनी याशिवाय त्यांना वाटतील ते हिशोबतपासनीस नेमण्याचा अधिकार आहे. हिशोतपासनीस यांना ते मागतील तेव्हां बँकेचीं पुस्तकें व वह्या दाखविल्या पाहिजेत. त्यांनीं आपल्या मदतीस दुसरे अकौंटंट नेमावे.

"सर्व माहिती ठराविक पद्धतीनें दिलेली आहे, बँकेची स्थिति यथार्थ दिलेली आहे व कांहीं माहिती मध्यवर्तिमंडळाकडून मागितलेली असल्यास ती समाधानकारक आहे" अशाबद्दल हिशोबतपासनीस यांनी भाग धारण करणारांस अहवाल सादर करावा. सरकारी तपासनीस यांनीं आपला अहवाल हिंदुस्थानसरकार यांस सादर करावा.

कोणत्याही भाग धारण करणारांस, बँकेस सूचनापत्र पाठवता येते. रजिष्टरांत असलेल्या पत्त्यावर व्यवस्थित रीतीनें पोष्टांतून हें पत्र पाठविलें म्हणजे बँकेची जबाबदारी संपली. हें पत्र पोंचलें नसल्यास तसें सिद्ध करण्याची जबाबदारी भाग धारण करणारावर आहे. पत्ता नसल्यास सरकारी गॅझेटांत व एका दैनिक पत्रांत हें सूचनापत्र जाहीर केलें म्हणजे ज्या दिवशीं तें जाहीर होईल त्यादिवशी त्याला तें मिळालें असें समजावें. बँकेस सूचनापत्र पाठविणें असल्यास तें स्वतः मुख्य ऑफिसांत हजर करावें किंवा पोष्टानें पाठवावें.

या कायद्यानें १८७६ चा प्रेसि० बँकाचा अॅक्ट; १८७९ चा प्रेसि० बँकांचा अॅक्ट, १८९९ चा प्रेसि० बँकांचा अॅक्ट; १९०७ प्रेसि० बँकांचा अमेंडमेंट अॅक्ट व १९१६ चा प्रेसि० बँकांचा अमेंडमेंट अॅक्ट असे पूर्वीचे सर्व कायदे रद्द झाले आहेत.

---

# सूचि.

## अ.

अकबर १६७.

अफगाणिस्तान ४६.

अब्राहाम ( सर लायोनेल ) २२८, २३३.

ॲटकिनसन ४४.

ॲडी ४४.

ऑस्ट्रिया-हंगेरी २०, २६.

## आ.

आयात माल ६, ४०, ११२, ११६, २१२, २१९, २२२, २३५.

आंतरराष्ट्रीय परिषद ९, १०.

## इ, ई.

इलियड १३५.

इंपीरियल बँक ६१, ६२, ६३, ६७, ९०, ९५, ११३, ११४, ११९, १२५, १७८, २०१, २०३, २०५, २०६, २२०, २३५, २३७, २४०.

ईजिप्ट २६.

ईस्ट इंडिया कंपनी १६८, १६९, १७९.

## उ, ऊ.

उपनाणें ( उपपैसा ) १५१, १५८, १५९, १६३, २१३, २२३, २२४, २२६, २३०, २३४, २४०.

उलट हुंड्या १७, १८, ४७, ७५ ७९, ८१, ८३, ८६, ९६, ९९, १०५, १०६, १०७, ११३, ११५, ११७, २१२, २१६, २१७.

## ए.

एकचलनपद्धति १, ४, १०, ३४, ३६, ४६, १५४, १५५, १५८, १६९, २३०.

एक्सचेंज बँका ६५, ९१, ११७, १७७, १०८, १८४, १८७, १९०,
१९१, १९३, २०३, २१४, २१५, २३२.

ऐ.

ऐनजिनसी अदलाबदल १३४, १३७.

क.

करन्सीऑफिस—२८, ३९, ५१, ५९.
कर्झन (लॉर्ड) १३१.
कायदेशीर चलन ५०, ५१.
किंमती ९४, २०७, २२२, २२४, २२६, २४०.
कीन्स २१, ३२, ६३, ११८, १२१.
कृत्रिम किंमत १२, १६, ३७, ४८, ४९.
कृत्रिम चलन २१, ४८, ९४, ९५, १३१, २१८.
कौटिल्य १६५.
कौन्सिलबिलें. "हुंड्या" पहा.

ख.

खुली टांकसाळ २, ३, ४, ५, ९, १३, १५, २१.

ग

गॉशन् (लॉर्ड) २६.
गोखले ३, ४१, ९१, ९२, १२३ १३१, १३२, २२२.
गोपक्रिन १२५ १६५.
ग्रेशॅमचा नियम १४९, १५३.

च.

चलन एकंदर ४५, ४६, ९२, २०८, २०९, २२७.
चलन-कायदेशीर ५०, ५१.
चलन-विश्वासजनित ५०.
चलनी नोटा १६, १८, ३५, ३७, ४४, ५८, ६१, ६३, १०८, ११०, १११,
११३, ११५, ११९, २०७, २०८, २२१, २२७, २३८, २४०.

चीन ५.
चेक ४६, ६२, १७२, २०७, २४०.
चेंबरलेन कमिशन १७, ६६, ९१, ९३, ९८, ११७, २०६, २२४, २३६.

ज.

जपान १६२, १७५, २०१.
जर्मन साम्राज्य ४, ९, २६, १६१, २०१, २३९.
जॉइंटस्टॉक बँका १९३......१९८, २०३.

ट.

टांकसाळ २, ११, ४२. ९३, ९७, १०८, १५२, १६६, १६७, २२०, २२२, २३४, २३६, २४०.
टेंपल (सर रिचर्ड) १.
ट्रेझरी (इंग्लंडांतील) ३, १५.
ट्रेझरी बिलें ११९, २१०, २११.

ड.

डलहौसी (लॉर्ड) १.
डेन्मार्क २१.
डॉकिन्स् (सर क्लिन्टन्) १५.
डॉलर १६३.

त.

तिबेट ४६.
तेजी ३८, ३९, ५८. १०२, १०४, १२५, १२८.

थ.

थाकरसी (सर विठ्ठलदास) ३, ४१, १२३, १३२-२४१.

द.

दादाभाई १०.
दुष्काळ ७४, १०२, १०४, ११२, ११३, ११६, १२७, १८९.
द्विचलनपद्धति ९, १०, १५३, १५४, १५७, १५८, १६२, १६७.

### न.

नाणीं १४७, १४८, १४९, १५०, २१९, २२३.
निर्यात माल ६, ४०, ८८, ११६, २१२, २१३, २१९, २२२, २३४, २३५.
नीतिशास्त्र ४१
नेपाळ ४६.
नोटांचा निधि ३५, ५५, ७६, ६४, ६५, ९९, १००, १०१ १०५ १०६, १०९, ११७, ११८, ११९, १२१, १२५, १२९, २३०, २३५.

### प.

पत १३८, १४०, १४१, १५०, २०१.
पिक ४४.
पिसो २१.
पैसा १३४, १३५, १३८......१४७.
पौंड ६, ११, १५, १६, २९, ३१, ३३, ३८, ३९, ४७, ५५, ८९, ९२, ९३, ९४, १००, १०१, १०३, १०८, १०९, १११, ११२, ११५, ११७, ११८, १२०, १२२, १३१, १५९, १८८, १८९, २१०, २११, २१२, २२०, २२१, २२४, २३२, २३४, २३५, २३६, २३७.
पंजाब ३१, ३७,
प्रेसिडेन्सी बँका १९, २८, ५१, ५९, ६२, १००, ११२, १२६, १२७, १७२, १७८, १७९......१८३, २०३.
प्लेटो १३३.

फिलिपाइन बेटें २१.
फॉलर कमिटी २, १३, १४, १५, ९५, २२८, २३७.
फ्रान्स १५५ १५६, १६०, १६१, १७१.

ब.

बार्बर (सर डेव्हिड) ११
बँका ११०, १११, ११३, ११४, ११६, १२१, १७२, १७३, १७७, १७८, १९२, २३७.
बँक ऑफ् इंग्लंड २६, ३६, ५७, १०१, १०४, ११४, १२१, १२९, १५२, १५९, १७४.
बँकिंग ४४.
बँक चार्टर ॲक्ट ५१.
बंगाल ३१, ३८.
ब्रह्मदेश ३१.

भ.

भारतमंत्री २, ११, २६, ६४, ६५, ८४, ८६, ८७, ९१, १०३, १०४, १२५, १८९, २०६, २१३, २२९, २३१.

म.

मद्रास ३१.
मध्यप्रांत ३१.
मनुस्मृति १७३,
महाभारत १३५.
मिल् २६.
मेक्सिको २१.
मेटस्न् (लॉर्ड) २६, ६७, २०६.
मंदी ३८, ३९, ५९.

य.

युनायटेड स्टेट्स–"संयुक्त संस्थानें" पहा.

र.

रशिया २१.
रानडे २३७.

रिकार्डो २६.
रुपये १, ३, ५, १९, ४१, ४७, ९४, १०२, १०७, १०८, १०९, ११०
  ११२, ११३ ११५, १२०, १३१, १३२, २१०, २११, २१२,
  २२१, २२२, २२४, २२६, २३२, २३५, २३६.
रुपें (चांदी) ३, ८०, ९०, १०२, १०५, १०७, १०८, १५५, १७१,
  २१०, २१४, २१६, २१७, २१८, २२२, २२८, २२९, २३०,
  २३१, २३२, २३३.
रॉथचाइल्ड (लॉर्ड) २०६.

ल.

लॅटिन युनियन् ४, ९, १५६, १६०.

व.

वेब्, सर मॉन्टेग्यू ४१, १३२.
वेस्टलंड (सर जेम्स) ११.

श.

शिरॅस २४१.
शिलक ७२, ८८, ९१, ९२, १००, १०२ १०५, १०६, १०७, १०९,
  ११८, १२४, १२५, १२८, १३०.

स.

समाजशास्त्र ४१.
सयाम २१.
सर्क्युलें (नोटांची) ५२.
सहकारी पतपेढ्या २०४, २०५.
सुवर्णचलननिधि १५, १७, १८, ६५, ६६, ९७, १०१, १०४, १०५,
  १०६, १०९, १११, ११५, ११७, ११८, १२१, १३१.
सुवर्णसंस्थचलन १६, १८, २०, २५, ५३, ७०, ७४, १०७. १३३, २१३,
  २१९, २२९, २३४.

सॉलसबरी (लॉर्ड) १२५.
सोनें ६, ८४, ८९, ९३, ९४, ९५, ९९, १००, १०४, १०५, १०६, १०७, ११०, १११, ११२, ११७, ११८......१२१, १५५, १६०, १७१, १८९, २१२, २१४, २१६, २१८, २२२, २२३, २३४, २३९, २४०.
सोन्याचें नाणें १, २, ९, ११, १३, १४, १५, १८, ३३, ४०, ९५, १५१, १६२, २२०, २२१, २३४, २४१.
संयुक्तप्रांत ३१.
संयुक्त संस्थानें (अमेरिका) ९, १२३, १६३, १७५, २१४, २२८, २४२.
सांव्हरिन् २, १०, १३, २२, २९. ३०, ३३, २१९.
स्मिथ कमिटी २३, ८१, २१५, २१६, २२८, २२९, २३०, २३१, २३३, २३४.
स्टेट बँक १९, २०५.
स्ट्रेट्स सेटलमेंट २१.
स्ट्रूवी ५.

हर्शेलकमिटी २, १०.
हिंदुस्थानसरकार १०, १२, १५, २०, २५, २६, २८, ४७, ६२, ६८, ८२, ८७, १०३, १८२, २०६, २३२.
हुंडणावळ ५, ७, ८, ११, १२, १३, १४, १८, २३, २४, २५, ३०, ३३, ३७, ४१, ६४, ६६, ७५, ७६, ८२, ९६, ९८, १०३, १०५, १२२, १३०, २१२, २१४, २१५, २१८, २२१, २२८, २२९, २३१, २३३.
हुंड्या [कौन्सिल बिलें] १७, १९, २९, ४३, ६४, ६५, ८५, ८९, ९६, १०२, १०३, १०४, १०८, १२८, १८८, १८९, २१३, २१६, २१७, २१९, २२१, २२६, २२९, २३५.

हॅबो ( सर एडवर्ड ) २०६.
हॅरिसन ४४.
होमचार्जेस ७, ११, १४, ३७, ४०, ६८, ८७, ९०, ९१, ११६,
२२१, २२६, २२९, २३५.
होल्डन ( सर एडवर्ड ) २०६.

CHECKED